बापूंची पत्रे - सुशीला नाय्यर यांना

संकलन आणि अनुवाद

ब्रिजमोहन हेडा

१

६ डिसेंबर १९३५

चि. सुशीला,

पाहू, हे पत्र तुला मिळते की नाही. मी ना तर असे मान्य केले आहे ना लिहिले आहे की तुझी इच्छा पैसा कमावण्याची आहे. जर तशी इच्छा असती तर शिल्लक राहणारी रक्कम मला पाठवण्याचा विचार तरी तू कसा करू शकली असतीस? आता तर तुझी इच्छासुद्धा मला कळली आहे. पाहू ईश्वर काय करतो?

प्यारेलालची शस्त्रक्रिया काल झाली असेल. आज अधिक माहिती कळायला हवी.

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली.

पत्राच्या प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, सौजन्य प्यारेलाल

२

[७ एप्रिल १९३८नंतर]

(मीराबेन यांनी गांधीजींना ७ एप्रिलला लिहिलेल्या पत्राच्या खाली हे पत्र लिहिलेले आहे.)

चि. सुशीला,

मी काय लिहू? तुला माझे कालचे पत्र मिळालेच असेल. ते लिहिल्यानंतर मी प्यारेलालचे पत्र पाहिले. ईश्वर तुला धीर आणि शांतता देवो. तुला जर तिथे शांतता मिळत नसेल तर कशीही का असेना माझी मांडी तर आहेच.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

३

आगगाडीतून,

१६ एप्रिल १९३८

चि. सुशीला,

इतक्यात तू माझ्या स्वप्नात येऊ लागली आहेस. याला मी आकर्षण म्हणू की प्रेम? ते काहीही असो, तू माझ्याकरिता फार मोठे प्रश्नचिन्ह झाली आहेस. "एकाला तर नेले; दुसऱ्यालाही घेऊन जाल?" या आईच्या शब्दांचा प्रतिध्वनी अजूनही माझ्या कानी घुमतो आहे. तिची काळजी बरोबरच होती. माझे कर्तव्य स्पष्ट आहे. निदान आज तरी तुझे स्थान माझ्याजवळ नाही. प्यारेलालचे जीवन स्थिर झाले तर फार चांगले. परंतु जर तसे झाले नाही तर मी स्वतःला अगदीच बेकार समजेन. आणि तुझ्यासारखी मुलगी माझ्यासारख्या बेकार माणसाबरबर राहून काय करील?

आईची मांडी सोडावी असे कोणतेही सबळ कारण तुझ्याजवळ नाही. तुला मी जेव्हा दिल्लीच्या पत्राकडे दुर्लक्ष करायला लावले तेव्हा मी माझ्या कर्तव्यात चूक केली. तुला देण्यात आलेली नोकरी तू स्वीकारायला पाहिजे होती. ती जागा जर अजूनही भरलेली नसेल तर तू त्यांना लिहू शकतेस की, 'अजूनही जर जागा रिकामी असेल तर तुम्ही दिलेल्या प्रस्तावातील कोणताही प्रस्ताव मी स्वीकारू शकते.' (स्रोतात हे वाक्य इंग्रजीत आहे.) तुझे कर्तव्य आईजवळ राहून अर्थार्जन करणे आहे. आणि अर्थार्जन करत असतानाच तुझी इच्छा असेल तितकी तू तुझ्या ज्ञानात भर घाल. मी हे पूर्ण विचारांती सांगतो आहे. महादेवसुद्धा हेच सांगेल. हे मी प्यारेलालाही कळवेन. त्याला जर वेगळे काही सांगायचे असेल तर मी परत लिहीन.

माझी काळजी करणे बंद कर. रात्र चांगली गेली. सकाळी रक्तदाब १६४।१०२ होता. तरीही मला चांगले वाटते. तुझी सेवा मी कसा विसरू शकतो? तिचा मोबदला मी काय देऊ? मुलीला कोणता आणि कसा मोबदला देऊन वडील तिचे ऋण फेडू शकतील? ईश्वर तुला मोबदला देईल. प्यारेलाल जर शांतचित्त झाला तर तो मोबदला पुरेसा असेल. जर तसे घडले नाही तर मी कोणता जरी मोबदला दिला तरी त्याला

काय अर्थ असेल? तू तुझे कर्तव्य केले. मग तू त्याच्या फळाची अपेक्षा का करशील? तू मला लिहीत राहायला पाहिजे. ईश्वर तुला योग्य मार्ग दाखवील.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

४

सेगाव,

१८ एप्रिल १९३८

तुझ्या रडण्याची गोष्ट प्यारेलालने सांगितली. माझे हृदयही रडू लागले. जो दुष्ट असतो त्याला सर्व दुष्ट दिसतात. मीही त्याच जातीचा आहे काय? माझ्या विकारांचे किती प्राबल्य असेल की मी तुझ्यासारख्या निष्पाप मुलीतही क्षणभर का होईना विकाराची कल्पना केली. माझी सेवा तू काय करशील? ती सेवा मिळवण्याचा मला अधिकार कुठे आहे? तुझा धर्म स्पष्ट आहे. आईजवळ राहून जी काही सेवा करता येत असेल ती कर. प्यारेलालसारख्या साधुपुरुषाचे जीवन मी नष्ट केले हे तर खरेच आहे. इतके पुरेसे नाही काय? माझा पितृधर्म आहे की पितृअधर्म?

बापूचे आशीर्वाद

मूळ पत्रावरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य -डॉ. सुशीला नाय्यर

५

[एप्रिल १९३८]

(मजकुरावरून अंदाज केलेली; पाहा "प्यारेलाल यांना पत्र", १६ मे १९३८)

आता काय करता येऊ शकते? माताजी म्हणतात की तू जाऊ शकत नाही. हे खरे आहे की ही गोष्ट प्रकृतीसंबंधी आहे. प्रत्येकजण याच्याशी सहमत झाला पाहिजे. तुला इथे कोणीही मरू देणार नाही. मी अर्थातच थोडासा बेफिकीर होतो. मी माझ्याच काळज्यांमध्ये हरवलेलो होतो, मी तुझ्या खाण्यापिण्याकडे लक्ष दिले नाही. इतकेच नाही तर मी तुझ्यावर विश्वास ठेवला. मीराबेनची कारणे अगदी वेगळी आहेत. मी तिला सांगितले की तू सुशीलाबद्दल आणि माझ्याबद्दल इतरांशी बोलून विष पसरवते आहेस आणि म्हणून तिने तुझ्याबद्दल आणि माझ्याबद्दल बोलू नये असे पत्र मी तिला लिहिले आहे. तिला ही अट कठीण वाटली. म्हणून ती गप्प आहे. हे चांगले झाले याबद्दल संशय नाही.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६

मुंबई,

१० मे १९३८

चि. सुशीला,

मी तुझ्या पत्राची वाट पाहत होतो. काल मला ते मिळाले. महादेवने जरी ते वाचले तरी त्यामुळे काही हानी होण्यासारखे मला त्यात दिसले नाही. महादेव सर्व पत्रे वाचत असतो. त्यात आगीत तेल पडण्यासारखे काय होते?

मूर्ख पोरी ! तू खरोखरच मूर्ख आहेस. यामुळे तर मी तुझ्यावर अजूनच प्रेम करतो. तुझ्या हट्टीपणाने मी दुखावत नाही. मी तुला नेहमीकरिता मूर्ख राहू देणार नाही.

तू देवता नाहीस आणि महादेवही देव नाही. हा भ्रम दूर केला तर भवितव्य उज्ज्वल होईल. तुम्ही दोघेही साधेभोळे आहा असे मी समजतो. अंतर इतकेच आहे की तुला अजून विषयवासनेचा अनुभव नाही. महादेवने तिचा पूर्ण अनुभव घेतला आहे. अखेरीस तो विवाहित माणूस आहे. परंतु प्रेमदेवता फार सूक्ष्म आहे. तुम्हा दोघांनाही तिच्या हल्ल्याची कल्पना नव्हती.

तू विनाकारण स्वतःला दोष देतेस. इच्छेने निश्चितच तुझा ताबा घेतला होता. परंतु तुला तिची मुळीच जाणीव नव्हती. या दृष्टीने महादेवलासुद्धा याची जाणीव नव्हती. महादेव काळजीपूर्वक वागत नव्हता. परंतु त्याला याचीसुद्धा जाणीव नव्हती.

तू अथवा महादेवने मला मुळीच नाराज केलेले नाही. जोपर्यंत तुझा विवेक एखाद्या गोष्टीचा स्वीकार करत नाही तोपर्यंत तू त्या गोष्टीचा स्वीकार करायला नको, मग त्यामुळे मला वा इतर कोणाला कितीही वाईट वाटले तरी त्याची फिकीर करू नकोस.

आता तुला माझा सल्ला आहे की जे झाले ते तू आता विसरून जा आणि सध्या तुझे जे कर्तव्य आहे ते आनंदाने करत राहा, माझे मन काळजीतून मुक्त कर.

मला तुझा कार्यक्रम सांग.

डॉ. गिल्डर इथे होते. रक्तदाब १८०।१०८ आहे. हवामान सुंदर आहे. इथून १७ तारखेला आम्ही वर्ध्याकरिता निघण्याच्या विचारात आहो.

मी तुझे पत्र महादेवला परत करत आहे. बाकीची पत्रे मी फाडून टाकीन.

माझे हृदयमंथन सुरू आहे. मी मजेत आहे. या सर्वांचा अखेरीस काय परिणाम होईल हे केवळ ईश्वरालाच माहीत. मालीश वगैरे थाबवलेली आहे. मी एकटा आंघोळ करतो.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तुला हसू येते काय? मी पत्र परत वाचले नाही. मी सर्व पत्रे फाडून टाकली आहेत.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७

११ मे १९३८

चि. सुशीला,

तुझे कसे सुरू आहे? तू केव्हा शांत होशील.? १४ एप्रिल माझ्याकरिता जितकी शुभ होती तितकीच ९ मेसुद्धा माझ्याकरिता शुभ आहे. (पाहा "अमृतलाल नानावटी यांना पत्र", २ मे १९३७, "अमृत कौर यांना तार", ३ मे १९३७, "द. बा. कालेलकर यांना चिठ्ठी", १४ मे १९३७, "अमृत कौर यांना पत्र", १२ मे १९३७) ९ तारखेत विशेष सात्त्विकता होती. १४ तारखेला मी फार अस्वस्थ होतो. ९ तारखेला मी दुःखी होतो पण शांत होतो. तुझ्या अंतःकरणाला ही गोष्ट कळली असती तर किती चांगले झाले असते!

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८

१५ मे १९३८

चि. सुशीला,

तुझी इच्छा असेल तर मी तुला, मुलांना आणि मनूलासुद्धा माझ्याबरोबर दिल्लीला घेऊन जाईन. तू तिथे हवे तितके दिवस राहू शकशील.

बापू

ता. क. - ईश्वराने सुरेंद्रला भरपूर दिले आहे. आणि तुझ्यामागे तुझा स्वतःचा वेगळा खजिना आहे. याशिवाय राहण्याचा खर्च येणार नाही.

गुजराती फोटोप्रतीवरून : सी. डब्ल्यू. १५७०. सौजन्य - मनूबेन सुरेंद्र मश्रूवाला

९

विश्राम वाटिका, जुहू,

१५ मे १९३८

मूर्ख पोरी,

अवतरण चिन्हही सोडून देऊ? तू आता शांत झाली आहेस आणि तुझ्या वचनाप्रमाणे वागते आहेस असे जर मला कळले तर तेसुद्धा मी सोडून देईन. ज्ञानमय मूढपणा असू शकतो. ही गोष्ट मला कळते. तुझ्यात असा मूढपणा सतत असो. माझ्या प्रकृतीबद्दल काही सूचना करायच्या असतील तर कर. तुझी पत्रे आवशयक आहेत. राजकुमारी, प्रभा, मीरा, कनू, अ.स. यांना पत्र लिही. आता तू तुझे जीवन ताबडतोब सामान्य केले पाहिजे. बाकी प्यारेलालच्या पत्रात. आई कशी आहे? ती प्रसन्न आहे काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०

विश्राम वाटिका, जुहू,

१६ मे १९३८

मूर्ख पोरी सुशीला,

आज तुझे दुःख विसरून मला जे वाटते ते समजून घे आणि त्यात सहभागी हो. खरे म्हणजे तू दुःखी होण्याकरिता काहीच कारण नाही. याच डाकेद्वारे मी मीराबेनची तीन पत्रे पाठवत आहे. पत्रातील अतिशयोक्ती वगैरेंकडे दुर्लक्ष कर आणि त्यातील प्रेम, त्यात असलेले सत्य पाहा. ती पत्रे शांतपणे वाच आणि माझ्याकरिता काय करणे योग्य आहे ते सांग. तुझी इच्छा असेल तर मीराबेनला लिही. याबाबतीत मला स्त्रियांची मदत पाहिजे. तुझी इच्छा असेल त्याला तू हे पत्र दाखवू शकतेस.

माझी प्रकृती चांगली आहे. लिहिण्यासारखे नवीन काहीही नाही. वर्ध्याला आम्ही २-३ दिवसात जाऊ.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११

विश्राम वाटिका, जुहू,

१६ मे १९३८

मूर्ख पोरी सुशीला,

मी तुला लिहिल्यानंतर मला प्यारेलालचे पत्र मिळाले. तो लिहितो की माझ्या अंतःकरणात तुला जे स्थान होते ते तू नेहमीकरिता गमावले आहे (असे तुला वाटते) आणि परिणामी तू निस्तेजही झाली आहेस. मला ही गोष्ट अस्वस्थ करते. माझ्या अंतःकरणातील तुझे स्थान जसेच्या तसे कायम राहील. तू वेगळा विचार का करतेस हे मला कळत नाही. तू तुझ्या मनातील शंका काढून टाक. खरी गोष्ट तर ही आहे की मी तुझ्याकरिता जो होतो तो आता राहिलेलो नाही. परंतु मला भीती वाटत नाही. मी जर खरा असेन तर तुझा संशय निघून जाईल. मी न कळत का होईना तुझ्यावर अन्याय तर केला नाही ना इतकीच भीती मला वाटत असते. परंतु तुला माझे दुःख सांगण्याकरिता मी हे लिहून राहिलेलो नाही. माझ्याकरिता तुझे जे स्थान आहे ते तू गमावले नाही निदान यावर तू विश्वास ठेवू शकशील. मला तुझे उत्तर तारेने मिळाले पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२

[१६ मे १९३८नंतर]

(पाहा या आधीचे तीन विषय)

तू जर हे सर्व हसतखेळत घेतले तर तुझ्या यातना कमी होतील. तुला जर मला रडवायचे असेल तर तू अर्थातच लांब चेहरा करून उदास होऊन बसू शकते. मी तुला उदास असलेली पाहू शकत नाही. एक प्यारेलाल पुरेसा नाही काय?

महादेवने मला पाठवलेले पत्र जर तू वाचले असशील तर मी लीलाला काहीही सांगितले नाही हे तुझ्या लक्षात येईल. मी कोणालाही काहीही सांगितलेले नाही. मीराबेनला मी केवळ इतकेच सांगितले की तुझी तक्रार मी तुम्हा दोघांनाही कळवली आहे. अखेरीस तुझा दोष तरी काय आहे? महादेवसारख्या तरुणावर आणि तुझ्यासारख्या निरागस मुलीवर मी आरोप केला हा माझाच दोष आहे. इतकीशी गोष्ट मी कोणालाही सांगू शकत नाही काय? याबद्दल दुःखी होऊन तू मला दुःखी का करतेस? मला सहन करू शकत असशील तर आनंदी चेहरा ठेव आणि सेवेत बुडून जा. माझ्यात जर किंचितही शुद्धी असेल तर प्यारेलालही वाचेल आणि त्याच्याबरोबर मीही, नाही तर आम्ही दोघे सोबतच जाऊ.

हे पत्र तुझ्याजवळच ठेव. ते जर माझ्याजवळ राहिले तर कोणी तरी ते वाचेल अशी भीती मला वाटते. अखेरीस ते फाडायचे आहे.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३

१७ मे १९३८

चि. सुशीला,

महादेवचे पत्र वाचल्यानंतर तू माझ्यावर रागवायलाही नको आणि मला टाकून द्यायलाही नको. तुला दुःखी करण्याकरिता मी काहीही कमी ठेवले नाही. मला त्याचा पश्चात्ताप नाही. मी जे काही केले ते तुझ्या भल्यासाठी केले. तू जर तिथे दुःखी राहिली तर तू वचनभंग करशील. तुला जर माझा कंटाळा आला नसेल तर तुम्ही दोघेही ताबडतोब निघून या. प्यारेलालने माझ्यापासून दूर जाणे म्हणजे श्रवणला त्याच्या आईवडिलांपासून कोणी तरी हिसकावून घेणे. तुझ्यावर माझा इतका अधिकार नाही. मी जर जिवंत राहिलो तर एक दिवस तुझी खात्री पटेल. सध्या तरी मी तुझ्या पत्रांची वाट पाहीन.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४

१८ मे १९३८

मूर्ख पोरी सुशीला,

प्रत्येक पत्रातून तू तुझा मूर्खपणा सिद्ध करते आहेस. हो, तू जर सेगावला कंटाळली असशील तर तुझी सेवा घेण्याचा मला हक्क नाही असे मी म्हणालो होतो. तू माझ्याजवळ येऊ नये असे तर यातून कोणत्याही अवस्थेत सूचित होत नाही. याचा अर्थ होतो तू परतण्याची घाई केली पाहिजे. तुला जर इतकी साधी गोष्ट कळत नसेल तर मला परत विचार. या संदर्भात मी तुला माझी परिस्थिती सांगतो. हे दिवस चांगले गेले नाही. काल मी १२ तास काम केले. मी मनाने थकलेला होतो. माझी पाठ भयंकर दुखत होती. मी चांगला झोपलो. मी परत ताजातवाना झालो. परंतु माझी मानसिक परिस्थिती चांगली नाही. अशा परिस्थितीत मला तुझी अनुपस्थिती जाणवते. परंतु जोपर्यंत तुला या ठिकाणाची ओढ वाटत नाही तोपर्यंत मी तुला कसा बोलावू शकतो? तू जर माझ्याजवळ असतीस तर मी इतके तास काम करू शकलो असतो काय? आता तरी मला काय हवे आहे हे तुला कळले काय? परंतु कोणत्याही परिस्थितीत तू इथे ताबडतोब निघून यायला पाहिजे असाही याचा अर्थ होत नाही.

आता तुझा दुसरा प्रश्न. ९च्या रात्री काय झाले याबद्दल तू जे म्हणतेस ते मी मान्य करतो. तुझे म्हणणे चूक असण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. समुद्राच्या शिंपल्यात ज्यांना चांदी दिसते ते त्रिकाळ खरे असतात. परंतु ज्याला ते शिंपले आहे असे माहीत असते त्याला नेहमीच शिंपले दिसतील. नाही काय? लैंगिक वासना आपल्याला काय करायला लावत नाहीत! याचा अर्थ असा होत नाही की मी बरोबर होतो आणि तू जो विचार करत होतीस तो भ्रम होता. विश्वास ठेव की मी भ्रमाला बळी पडलेलो असू शकेन हे मी मान्य करतो. यामुळे तू तुझ्या भूमिकेला चिकटून राहू शकतेस. खरे म्हणजे तसे करणे तुझे कर्तव्य आहे. भजनावलीतील श्लोकांचे मनन कर. धर्म तोच असतो जो विद्वानांना मान्य असतो, संत प्रवृत्तीचे लोक आणि आसक्ती आणि रागद्वेषविरहित लोक ज्याचे पालन करतात आणि तुझे अंतःकरण जी गोष्ट धर्म आहे असे मान्य करते. मी ना तर विद्वान आहे ना संत आणि ना मी आसक्ती इत्यादींपासून मुक्त आहे. केवळ धार्मिक पिता म्हणून

बसलो आहे. अशा माणसाचे शब्द जर तुझ्या मनबुद्धीला पटत नसतील तर तू ते नाकारले पाहिजे. तू काहीही जरी केले तरी माझ्या अंतःकरणात तुझे स्थान जसेच्या तसे कायम राहील. माझ्या दृष्टीत तू कधीही अधःपतित नव्हती.

हो, माणसाचे वाक्य जसे असतात तसाच त्यांचा अर्थ घेतला पाहिजे. असे जरी असले तरी शब्दार्थ घेण्यापूर्वी आजूबाजूची परिस्थिती लक्षात घ्यावी लागत असते. म्हणायचा मुद्दा हा आहे की जिथे विवेकानुसार शारीरिक स्पर्श करणे आवश्यक असते तिथे स्पर्श न करण्याचा अर्थ ज्या कामाकरिताचा शारीरिक स्पर्श त्याज्य मानला जातो ते कामही त्याज्य होईल आणि म्हणून ते वर्तन वा ते हावभाव टाळायला पाहिजे. तर शाब्दिक अर्थाबद्दल इतके पुरे. परंतु इतकेसुद्धा पुरेसे नाही. शब्दांचा अर्थ समजून घेण्याकरिता त्यांचे सखोल महत्त्व कळणेसुद्धा आवश्यक आहे. तुम्ही जेव्हा दररोज गीतेचा पाठ म्हणता तेव्हा तुम्हांला शब्दशः अर्थ माहीत असतो. परंतु त्या शब्दांचे सखोल महत्त्व जोपर्यंत तुम्हांला कळत नाही तोपर्यंत केवळ शाब्दिक अर्थ कळणे व्यर्थ आणि तो ओझ्यासारखे होईल. याने तुझ्या पत्राचे संपूर्ण उत्तर मिळाले काय?

आम्ही इथून बहुधा २० तारखेला निघू. मी तुझे पत्र फाडून टाकले आहे. आजकाल महादेव तुझी पत्रे वाचत नसतो. मी जे लिहितो ते तो पाहतो. त्याची दुःखद अवस्था कायम आहे. तो त्याचा स्वभाव आहे. काळ आपले काम करील. ईश्वराचे एक नाव काळसुद्धा आहे ना?

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५

वर्धा,

१९ मे १९३८

सुशीला,

२१, राजा बझार चौक,

नवी दिल्ली

तू अजूनही स्वतःला जरी अपात्र समजत असशील तरी जितक्या लवकर तू येशील तितके बरे. प्यारेलाल सहमत आहे. शारदाला आण. ईश्वर तुझ्यावर कृपा करो. सुंदरम इथे आहे. तुला जर सुंदरमला तिथे भेटायचे असेल तर तू तिथे थांबू शकते.

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१६

सेगाव,

२३ मे १९३८

चि. सुशीला,

मला तुझे दोन लिफाफे एकदम मिळाले. महादेव शांत दिसतो. परंतु त्याची ही शांतता जर खरीखुरी असेल तर तो तुझ्या पत्रांनी दुःखी होणार नाही. मी त्याला तुझी सर्व पत्रे पाठवत असतो.

तू नक्कीच मूर्ख आहेस. परंतु दुर्दैवी आणि अयोग्य निश्चितच नाही. आणि दुर्दैवी का? तू माझे प्रेम गमावले काय? तू महादेवचे प्रेम गमावले काय? अयोग्य का? तू असे काय केले की ज्यामुळे तुला तू अयोग्य आहे असे वाटते? तू मूर्ख निश्चित आहे कारण या जगासंबंधीच्या काही साध्या गोष्टी तुला कळत नाहीत. परंतु मीच तुला मूर्ख बनवले आहे. माझा मूर्खपणा जर मी तुझ्यात पाहत असेन तर त्याचे काय?

आता ९ तारखेबद्दल. तू त्यामुळे इतकी दुःखी का होतेस? माझ्या सूप्त वासनांचा परिणाम म्हणजे तुझ्यावरील माझे प्रेम असे कशावरून नसेल? शक्य आहे की तसे नसेलही. माझ्या भ्रमाचा तो परिणाम असणे शक्य नाही काय? देवत्वाचा माझा दावा नाही. जर तू चूक असू शकत असशील तर मी का चूक असू शकत नाही? या दोन्ही गोष्टी काल्पनिक असू शकतात, असे नाही काय? तुला कशाचाही अनुभव आला नाही आणि मला तुझ्या अंतःकरणातील कळत नाही. आपल्या दोघांच्या हृदयाचा स्वामी ईश्वर आहे. केवळ त्यालाच आपली हृदये माहीत आहेत. यामुळे तुझा धर्मपिता म्हणून माझा आदेश आहे की तू तुझे वर्तन पूर्णपणे निर्दोष समज, आणि तुझ्या व्यथा विसर. तुझ्या व्यथांचे कारण माझे गैरसमज आहेत. ते विसर. माफ कर असे मी कसे म्हणू?

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१७

सेगाव, वर्धा,

२४ मे १९३८

चि. सुशीला,

तुला माझे कालचे पत्र मिळाले असेल. तू केव्हा येशील म्हणून बा चौकशी करते आहे. इतरही चौकशी करत असतात आणि मीसुद्धा. तू तिथे जे काम करते आहेस ते इथेसुद्धा करता येऊ शकते. शिवाय तू माझी सेवा करू शकशील. विजया अगदी चांगली आहे. आणि वसुमतीसुद्धा. भणसाळीच्या सात गाठी काढल्या. तू निश्चितच या सर्व प्रकरणात मदत करू शकतेस. आता तू भरपूर दिवस लांब राहिली आहेस. यावर विचार कर आणि मला लिही. तुझी यायची इच्छा आहे की नाही? काहीही असले तरी तू तुझ्या शोकमग्न अवस्थेतून बाहेर पडायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - आज सी. एस. (सिव्हिल सर्जन?) आले होते. माझा रक्तदाब सकाळी सकाळी १० वाजता १५५।९५ आहे.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१८

सेवाग्राम, वर्धा,

२५ मे १९३८

मूर्ख पोरी,

तुझा हा शोक केव्हा संपणार आहे? तुझ्या या दुःखद मनःस्थितीत तू असे काही शब्द वापरतेस की जे बाणाप्रमाणे शरीरात घुसतात. तुझ्या उपस्थितीत मी कधी तरी १२ तास काम केले काय? आता तुला महादेवची पत्रे मिळतात काय? महादेवने तुला लिहिणे थांबवायचे ठरवले आहे हे मी तुला सांगितले होते काय? आजच्या पत्रात तर तू तुझ्या मूर्खपणाची हद्द केली आहे. असे कुठे सांगितले आहे की समुद्राच्या शिंपल्यात एकदा चांदी सापडली की दरवेळी सापडेल? आणि कालच मी लिहिले होते की तुझ्याबाबतीत जर एखादी गोष्ट शक्य असेल तर ती गोष्ट इतरांच्या बाबतीतही तितकीच शक्य असेल. मला शिपल्यात चांदी दिसणे शक्य नाही काय? तू "अयोग्य" हे विशेषण मागे घेतले पाहिजे. मला तू अयोग्य वाटते तेव्हा अयोग्य होशील की केवळ तू अयोग्य आहे असा तुझा विश्वास आहे म्हणून तू अयोग्य ठरशील? असे म्हणून तू माझा पूर्णपणे त्याग करू इच्छिते काय? आता मी तुझा दुःखी चेहरा सहन करू शकत नाही कारण त्याकरिता काहीही कारण नाही. प्यारेलाल तुला इतकी साधी गोष्ट सांगू शकत नाही काय? निदान माझ्याकरिता तरी तू तुझे दुःख विसर. तुला बरे वाटावे म्हणून मी काय करू शकतो? मान्य की तू मला दुःखी केले, परंतु मी काय तुला कमी दुःखी केले? कोणी कोणाला दोष द्यायचा? याचा निर्णय आपण ईश्वरावर का सोडू नये? 'मला बरे वाटते' असे पत्र तुझ्याकडून केव्हा येणार आहे?

राजकुमारीचे पत्र सोबत जोडले आहे. देवदासलासुद्धा ते वाचू दे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१९

सेवाग्राम, वर्धा,
२६ मे १९३८

चि. सुशीला,

मला तुझी दोन पत्रे एकदम मिळाली. तीन दिवसांपासून प्यारेलालच्या माध्यमातून मी केवळ तुझ्याशीच बोलत होतो. तू ती पत्रे पाहिली की नाही हे मला माहीत नाही. ते काहीही जरी असले तरी आज मी तुला पत्र लिहिण्याची हिंमत करतो आहे.

तू लिहिले आहे : "तुम्ही मला ओळखता आणि मी स्वतःलासुद्धा ओळखते अशी जर मला खात्री वाटते तर दुराव्याचा हा काळसुद्धा संपेल." मी तुला ओळखतो अशी खात्री तुला केव्हा वाटेल? तू स्वतःला केव्हा ओळखशील? तू जेव्हा स्वतःला ओळखशील तेव्हा तू पराकोटीची ज्ञानी होशील. तेव्हा तू माझ्याकडे येण्याऐवजी सर्व जग तुझ्याकडे येईल. थोडक्यात मी तुला गमावले आहे. तू अपात्र मुलगी नाहीस. तू मला कोणता त्रास दिला? माझ्या स्वप्नातसुद्धा असा विचार आला नाही. मी अपात्र वडील असल्याचे आधीच सिद्ध झाले आहे. मी तुला भरपूर त्रास दिला नाही काय? तुझ्या निष्पाप वर्तनात मी दोष पाहिला नाही काय? त्या क्षणीच मी तुला गमावले. मी तुला हे त्याच दिवशी सांगितले होते. करणी तशी भरणी. तू सर्व काही परत केले आहे. त्यांतील काही गोष्टी तर केवळ तुझ्याकरिता होत्या. मायक्रोस्कोप वगैरे काही मी माझ्याकरिता आणले नव्हते. ते केवळ तुझ्याकरिता विकत घेतले होते. तू जर त्या वस्तू स्वीकारू शकत असशील तर त्या वस्तू तुझ्याकडे परत पाठवण्याची मला परवानगी दे.

मी अजून काय लिहू? तू मला पत्र लिहावे इतकीसुद्धा माझ्यात पात्रता नाही. तू जर लिहिले तर अर्थातच मला आनंद होईल.

मी तुझे कल्याण करू शकलो नाही, परंतु ईश्वर तुझे कल्याण निश्चित करील.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२०

सेवाग्राम, वर्धा,

१ जून १९३८

चि. सुशीला,

तुझी दोन पत्रे एकदम मिळाली. आता सर्व काही बदलले आहे, नाही काय? माझ्या कालच्या आणि परवाच्या पत्रातून हे स्पष्ट होईल. आता मी ठरवले आहे की बा वगळता इतर कोणत्याही स्त्रीकडून अशी कोणतीही सेवा घ्यायची नाही की ज्यात शारीरिक स्पर्श होतो. त्यामुळे प्रेमळ स्पर्शाचा प्रश्नच उपस्थित होणार नाही. मी अजून एक शोध लावला आहे. मी केवळ स्त्रियांना स्पर्श करू शकतो आणि इतर मात्र तसे करू शकत नाही असे म्हणण्यात मी भयंकर चूक करण्याचा अपराध केला होता ! या प्रयोगाकरिता मला विज्ञानाची मुळीच मान्यता मिळू शकत नाही हे मला कळायला पाहिजे होते. यात माझा भयंकर अहंकार होता. ब्रह्मचर्याने घातलेले निर्बंध माझा कोणताही सहकारी तोडू शकत नाही, केवळ मीच तोडू शकतो असे मला वाटले. माझ्या सहकाऱ्यांना जोपर्यंत स्त्रियांना स्पर्श करण्याचा अधिकार नाही तोपर्यंत मलासुद्धा स्त्रियांना किंचितसाही स्पर्श करण्याचा अधिकार नाही. एक वा दोन दिवसात मी सर्व काही ठीक करीन अशी मला आशा आहे. ही चूक दाखवून देण्याकरिता तुझी दृढताच कारणीभूत असल्यामुळे तुझे आभार. माझ्या मते तुझ्याकरिता आणि महादेवकरिता मी जे निर्बंध घातले ते मुळीच समर्थनीय नाहीत. असे निर्बंध लादण्याचा अधिकार मिळावा असे कोणते गुण माझ्यात आहेत? मी मान्य करतो की मी केलेल्या दोषारोपणातून माझ्या स्वतःच्या अपयशाचे प्रतिबिंब दिसत होते, तुझ्या वा महादेवच्या नाही, तर मग मी ठरवलेल्या निर्बंधांना स्थान कुठे राहते? ज्या प्रमाणात मी या प्रकरणात गुंतलो त्या प्रमाणात मी अपराधी आहे, तू नाहीस, आणि महादेवही नाही. मी हे सर्व भावनावश न होता लिहीत आहे. आणि तुझ्या सेवेकरिता काय पण बक्षीस मी तुला दिले !

आता प्यारेलालकरिता. आईचे शब्द माझ्याकरिता अमृतासारखे होते. : “तुम्ही आधीच प्यारेलाल घेऊन टाकले आहे. आता तुम्हांला सुशीलालाही घ्यायचे आहे?” ती बरोबर होती. मी तुझ्याकरिता काहीही

चांगले केले नाही. प्यारेलालकरिता मी काय चांगले केले? प्यारेलालच्या भवितव्यावरून माझे वागणे बरोबर होते की नाही ते ठरेल. तुझ्याबद्दल बोलायचे तर मी तुला अजूनही मूर्ख समजतो. तू माझ्याकरिता एखाद्या देवीप्रमाणे काम केले. तू जर इतकी दृढ राहिली नसतीस तर माझे डोळे उघडले नसते. मी अजूनही माझ्या भ्रमाच्या बेशुद्धीत असतो. मला पश्चात्ताप करत मरावे लागेल असे जे मीराबेन म्हणाली होती ते बरोबरच होते. ईश्वराने मला केवळ तुझ्या माध्यमातून सावध केले. तू जरी माझ्याकडे माझी मुलगी म्हणून आलीस तरी तू आईप्रमाणे वागली. माझ्या गुणामुळे नाही तर तुझ्या गुणांच्या आधारे तू तुझ्या भावाला वाचवशील.

तू ब्रिजकृष्णला मदत करते आहेस ही चांगली गोष्ट आहे, तू रुग्णालयातील जागा घ्यावी असा माझा सल्ला आहे. तू पूर्णपणे चांगली हो. परंतु मी तुला मार्गदर्शन करणारा कोण? तुला प्यारेलालसारखा भाऊ मिळाला आहे. तो तुझ्याबरोबर आहे. तो जे सांगेल तेच कर. अखेरीस ईश्वर तुझा त्याग कसा करू शकतो? तो जर तुझा त्याग करील तर त्याच्याजवळ शिल्लक काय राहील? तुझे तर निरंतर कल्याणच होईल. माझी काळजी करू नको. मी चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२१

सेगाव, वर्धा,

[२ जून १९३८ला वा त्याआधी]

(मजकुरावरून हे पत्र या काळातील आहे असे दिसते.)

मूर्ख मली सुशीला,

तुझ्याकडून पत्र नाही. मी का लिहायला पाहिजे? परंतु परत विचार केल्यानंतर मी लिहायचे ठरवले. माझ्या निर्णयाने तू दुखवली जाण्याचे काहीही कारण नाही. तू जरी मूर्ख असली तरी माझा हा निर्णय अगदी स्वतंत्रपणे घेण्यात आला आहे आणि तो घेण्याशिवाय पर्याय नव्हता हे कळण्याकरिता तुझ्यात पुरेशी बुद्धिमत्ता आहे. जे इतर करू शकत नाहीत ते मी कसा करू शकतो? ही स्वयंसिद्ध गोष्ट आजपर्यंत मला कशी कळू शकली नाही? मी इतका मूर्ख कसा होतो? आणि तरीही तुला मूर्ख म्हणताना मी संकोच केला नाही!

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२२

[२ जून १९३८नंतर]

(हे पत्र गांधीजींच्या २ जून १९३८च्या पत्रामागे लिहिलेले आहे.)

मूर्ख मुली,

तू तुझा मूर्खपणा सिद्ध करण्याचा प्रयत्न करते आहेस काय? महादेवने सांगितल्याशिवाय तुझ्या निर्विकारपणाबद्दल मला कसे कळले असते? तेव्हापासून मी तुझ्याकडून सेवा घेतो आहे. तू जर विकाराचा अनुभव घेतला असता तर मग आपण दोघेही सारख्या परिस्थितीत असतो आणि दोघेही एकमेकांपासून सावध राहिलो पाहिजे. मी सावध आहे इतके माझ्याकरिता पुरेसे आहे. ज्या दिवशी तुझ्यापासून मला वाचवण्याची माझ्यावर वेळ येईल त्या दिवशी तुला माझा मृत देह दिसेल, तू मला जिवंत पाहणार नाही. वयाच्या ६९व्या वर्षी तुझे विकार माझ्यावर परिणाम करू शकत नाहीत. मी माझ्याच विकारांनी पोळला जातो आहे. माझ्या विकारामुळे कोणत्याही स्त्रीकडून सेवा घेण्याकरिता मी अपात्र ठरलो आहे. यामुळे माझा त्याग करण्याकरिता तू मोकळी आहे, परंतु तूच मला सांगितले आहे की मी तुम्हांला कोणत्याही परिस्थितीत सोडू शकत नाही. यामुळे मी तुझ्या सेवेचे स्वीकार केलाच पाहिजे, आणि नम्रपणे म्हणजे इथे निर्वाकारपणे मी तुझ्या सेवेचा स्वीकार करत असतो.

तू इतरांची पत्रे वाचली आहेस काय? कोणीही तक्रार केलेली नाही. केवळ मीराबेनला कल्पना होती. असे असूनही तुझ्याबद्दल कोणाचीही तक्रार नाही. केवळ माझी तक्रार आहे. परंतु ती अगदी वेगळी गोष्ट आहे. तू या लोकांना विसरून जा.

दोन प्रश्नांचा विचार कर. आईबद्दल तुझे जे कर्तव्य आहे त्यापासून मी तुला वंचित करायला नको. खोलवर तुझ्या अंतःकरणात तुझी शिकण्याची इच्छा आहे. ही इच्छा चांगलीही आहे. ती इच्छा मी टाकून द्यायला लावली पाहिजे काय आणि तुझ्याकडून सेवा घेतली पाहिजे काय? हे दोन प्रश्न अतिशय महत्त्वाचे आहेत.

माझ्या प्रयोगाची गोष्ट सोड. अजूनही मी लिहू शकतो, पण तू माझ्या हातावर दया केली पाहिजे.

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२३

सेगाव, वर्धा,

३ जून १९३८

मूर्ख मुली,

तू कशीही जरी देवी असलीस तरी स्वतःचा मूर्खपणा तू व्यक्त करतेसच. काय पण पत्र लिहिते ! तुला जर अन्यायी बापाकडे धावत यायचेच असेल तर तुला कोण अडवू शकते? मला तुझा कोणताही दोष दिसत नाही. माझा भयंकर दोष मला स्पष्टपणे दिसतो. आणि तरीही दोष तुझाच होता अशी माझी खात्री पटवून देण्याचा तू प्रयत्न करते आहेस. हा मूर्खपणा नाही काय? आता शांत हो. तिथे काही काम घे. प्यारेलाल जेव्हा तयार होईल तेव्हा तुझी इच्छा असेल तर तूसुद्धा येऊ शकतेस. माझ्याजवळील स्थान तू गमावले आहे असे म्हणून तू माझा छळ करू नको.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२४

५ जून १९३८

मूर्ख पोरी,

तू किती मूर्ख आहेस ! तिथे बसून तू रडत आहेस आणि मलाही रडवते आहेस !!! तू विनाकारण स्वतःवर दोष घेते आहेस. मी बाकडून सेवा घेण्याचे बंद केलेले नाही. इतर स्त्रिया थोडी नाराज आहे, पण ती आनंदात आहे. तिलासुद्धा मुद्दा कळला. अ.(मतुल) स.(लाम) दुःखी असते हे खरे आहे. परंतु मी तिलाही थोडेबहूत हसवतो. ती तुझ्यापेक्षाही मूर्ख आहे. तीसुद्धा काही दिवसात शांत होईल. माझा आदेश ऐकून तुम्ही दोघीही इथे येण्याकरिता निघाला असाल असे मला वाटते. आज निघणे अशक्य आहे. तुला जर निघणे शक्य झाले नसेल तर संपर्काशिवाय दिवस जाऊ नये म्हणून मी हे पत्र लिहीत आहे. आता रडणे बंद कर. तुला हसताना पाहण्याकरिता मी उत्सुक आहे. तू कोणतेही पाप केलेले नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२५

६ जून १९३८

मूर्ख पोरी,

तुझ्या मूर्खपणाला काही सीमा आहे काय? मी तुझा कायमचा त्याग कसा काय करू शकतो? तू मला इतक्या उंचावर का नेऊन ठेवतेस? तू जे स्थान मला देतेस ते माझे नाही. हं, हे खरे आहे की ते माझे असायला पाहिजे अशी माझी इच्छा आहे. तुमच्यापैकी कोणाचाही प्रभाव ७ तारखेच्या रात्रीच्या माझ्या अनुभवावर पडू शकत नाही. १४ तारखेच्या घटनेबद्दल सांगायचे तर त्यात मला माझ्याच वासनेचे प्रतिबिंब दिसते. आपण भेटू तेव्हा हे मी अजून स्पष्ट करून सांगेन. तुझ्या अंतःकरणात जी गोष्ट नव्हती ती तिथे होतीच असे तू का गृहीत धरतेस? तू असे म्हणतेस ही माझ्याकरिता लाजिरवाणी गोष्ट आहे. माझ्यात वासना आहेत याची मला सातत्याने जाणीव होते. अशा परिस्थितीत जे आहे हे स्पष्ट आहेच, त्याकडे दुर्लक्ष का करावे आणि जे नाही त्याचा शोध का घ्यावा? परंतु हे पत्र दिल्लीला पोहोचेपर्यंत तुम्ही दोघेही तिथून निघालेले असाल.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२६

[४ जुलै १९३८नंतर]

(बालकृष्ण भावेंना क्षयरोग झाला आहे व त्यांना रुग्णालयात न्यायचे आहे असे गांधीजींनी जमनालाल बजाजना ४ जुलै १९३८ला पाठवलेल्या पत्रात लिहिले होते. यावरून अनुमानित.)

बालकृष्णाला एखाद्या समजदार माणसाची चोवीस तास आवश्यकता असते काय? तसे असेल तर तशी व्यवस्था करण्यात यावी. त्याबद्दल चिमणलालशी बोल. एक माणूस रात्री जाऊ शकतो. कृष्णचंद्र आणि शंकरन हे चांगले कार्यकर्ते आहेत. दिवसा तीन पाळ्या करणे आवश्यक आहे. आनंद, कनू, भणसाळी, कृष्णचंद्र आणि आवश्यकता पडली तर राज भूषण यांच्यापैकी कोणालाही त्याकरिता पाठवता येऊ शकते. काय होते ते पाहू या.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय

२७

[७ सप्टेंबर १९३८नंतर]

(ही चिठ्ठी "७ सप्टेंबर १९३८" चा पोस्टाचा शिक्का असलेल्या पत्रामागे लिहिलेली आहे.)

मूर्ख पोरी,

आजच्या तुझ्या पत्राने तू मला फार दुःख दिले. तू इतकी अशक्त का आहेस? तुला सेवा करायची आहे आणि तुझ्यात आत्मविश्वास नाही हे कसे? काही जरी झाले तरी मी तुला दुःखी झालेली पाहू शकत नाही. आजच्या भजनाची आठवण ठेव.

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२८

८ सप्टेंबर १९३८

तू अगदी वेडी आहेस. मी जर तुझ्यावर जास्त प्रेम केले असेल तर मी तुला जास्त रडवलेही आहे. मला तू कशा प्रकारे त्रास देत असतेस हे तर मला माहीतही नाही. तू जर खरोखर माझी मुलगी असशील तर तुझी काळजी घेणे माझे काम आहे. ती तर माझ्याकरिता आनंदाची गोष्ट असली पाहिजे.

आता माताजीचे काम तू माझ्यावर सोड. इथे राहशील तर त्यांच्या आशीर्वादानेच राहशील, इतर कारणाने नाही.

बापू

मूळ पत्रावरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

२९

१० सप्टेंबर १९३८

चि. सुशीला,

तुला खुश करण्याकरिता मी काय करू? तुला हसू यावे म्हणून मी एक कात्रण पाठवले. तुला वाईट वाटले. मला काय वाटते हे तुला कळावे म्हणून मी तुला महादेवचे पत्र दाखवले. तर त्यानेसुद्धा तुला वाईट वाटले. तू इतकी संवेदनशील का आहेस? तुझे कल्याण कशात आहे हे जसे मला दिसते तसे जर आईला दिसत नसेल तर मी तुला कसा काय ठेवून घेऊ शकेन? माताजींना खुश ठेवले पाहिजे असे तुझेसुद्धा मत आहे.

आता शांत हो. जे काही घडायचे असेल ते घडेल. माझ्याबरोबर अभ्यास करून जर तुला शांतता वाटत नसेल तर मला सोड. माझ्याबरोबर राहणे तुझ्याकरिता हिताचे आहे असे जर तुला वाटत असेल तर तर प्रश्न कुठे आहे . . . (स्रोतात अस्पष्ट आहे.)

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

३०

[११ सप्टेंबर १९३८नंतर]

(ही चिठ्ठी सुशीला गांधी यांच्या ११ सप्टेंबर १९३८च्या पत्रामागे लिहिलेली आहे.)

हे पत्रसुद्धा पागलपणा आहे. माझ्याबरोबर राहून तू पागल तर राहणार नाहीस. इतर लोक काय म्हणतात वा करतात याचा तुझ्यावर परिणाम का व्हावा? हो, किंचितशा का होईना माताजींच्या भावना जर दुखवल्या जात असतील तर ते आपणा दोघांनाही असह्य व्हायला पाहिजे. इतरांच्या टीकेचा सामना करावाच लागेल.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

३१

[१६ सप्टेंबर १९३८पूर्वी]

(मजकुरावरून पाहा "मुन्नालाल गं. शाह यांना पत्र", २१ ऑगस्ट १९३८ आणि "प्रभावती यांना पत्र", १५ सप्टेंबर १९३८)

तू त्याच्याशी बोलणे पूर्णपणे बंद करायला पाहिजे. विनाकारण त्रास देऊन काय फायदा? प्रत्येकाला त्याच्याबरोबर थोडा वेळ बसायला सांग, परंतु त्याला बोलायची परवानगी देण्यात येऊ नये.

प्यारेलाल आजारी असेपर्यंत मी मालीशचा आनंद घेऊ शकणार नाही. तुला वेळ तरी कुठे आहे? तुझे दोन तास घेणे पाप आहे असे माझे मत आहे. यामुळे तू स्वतःहोऊनच काही काळ मालीश न करण्याचा निर्णय घे. आंघोळीबद्दल सांगायचे तर मी स्वतःच आंघोळ करीन.

हे सर्व बालकृष्णकरिता करायचे आहे असा विचार तू कर. काय करायचे ते कृष्णचंद्रला सांग. तो तुला, महादेवला आणि आवश्यक असेल तर डेव्हीडला अहवाल पाठवेल. महोदय बहुधा बाळकृष्णला पाहायला येऊ शकतील. त्यांच्याशी प्रत्येक गोष्टीची चर्चा कर.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

३२

[डिसेंबर १९३८]

(स्रोतात ठेवलेल्या ठिकाणावरून)

मी तर सांगितलेच आहे की तू जी वेळ ठरवली आहेस त्यावर कायम राहा. या दयेला अर्थ नाही. सेगावला तू रुग्णालय समज आणि तिथे ठरलेल्या वेळी जा. तू एक तास इथे काम कर आणि एक तास तिथे असे चालणार नाही. लोकांना एकदा सवय झाली की सर्व काही सुरळीत होईल. यामुळे तू एक तर सकाळची वेळ ठरव वा सायंकाळची. मग आपण पाहू. खेड्याबद्दल निर्णय घेत असताना अर्थातच आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. आपण इथले कायम रहिवासी नाही असे समजणे चूक आहे, आपण तात्पुरते रहिवासी नाही. यामुळे १५ दिवस जायचे आणि मग थांबायचे हे शोभत नाही.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३

[१९३८]

चि. सुशीला,

महोदयांना (डॉ. महोदय) लिही. टकळी यज्ञानंतर सकाळी आलेल्या शिक्षकाबरोबर बस, ते परत येणार आहेत. मी तर अगदीच विसरून गेलो होतो. आशा आहे तू विसरली नसशील

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

३४

[१९३८]

तू मला का छळतेस? रडायला मनाई आहे आणि तू स्वतः ही गोष्ट मान्य केलेली आहे. तुला सर्व गोष्टी माहीतसुद्धा नाही. माझ्या सध्याच्या व्यथांचे कारण काय आहे याचा तू शांतपणे शोध घ्यावा अशी माझी इच्छा आहे. मला झोपायची इच्छा आहे, परंतु झोप येत नसेल तर मी काय करू? मी जवळपास एक तास चाललोसुद्धा. मी रामनाचा जप कधीही थांबवला नाही. यात रडायचे काय? समंजस हो.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३५

[१९३८]

मला रात्रभर झोप आली नाही असे जर मी म्हणत असेन तर ते माझ्या पापीपणाचे कारण आहे असे समजायला पाहिजे. आजच्या रक्तदाबाचेसुद्धा तेच कारण आहे. एक वाजेपर्यंत माझा डोळा लागायचा आणि परत जाग यायची, या क्षणी मला कोणत्याही काळजीचा वा कोणत्याही बाह्य गोष्टीचा त्रास होऊन राहिलेला नाही. काय झाले हे मला काहीसे कळते आहे आणि काहीसे कळून राहिलेले नाही. मी काळजी करून राहिलेलो नाही. परंतु ज्या यातनांमधून मी जातो आहे त्या मी तुला सांगायलाच पाहिजे.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६

[१९३८]

मॅथ्यूबद्दल काही तरी केले पाहिजे. त्याला हे ठिकाण सोडायचा सल्ला दे.

तू आनंदकडे लक्ष देऊन राहिलेली नाहीस. तू त्याच्याबरोबर दररोज मिनिट दोन मिनिट घालवायला पाहिजे. तो किती लघ्वी करतो, त्याचे वजन किती आहे इत्यादींची नोंद ठेव.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७

[१९३८]

नागपूरहून मनुकांचा अजून एक डबा आण. प्यारेलालला जर एक दिवस अजून राहणे आवश्यक आहे असे वाटत असेल तर राहू दे.

ली. आणि अ.स. (अमतुस्सलाम) कशा झोपतील हा प्रश्न तू माझ्यावर सोड. परंतु तुला जर रस नसेल, वा तुझा जर स्वतःवर विश्वास नसेल तर तू माघार घेऊ शकतेस. हा प्रयोग माझ्याकरिता फार महत्त्वाचा झाला आहे. परंतु हा प्रयोग यशस्वीपणे मी तेव्हाच करू शकेन जेव्हा मला तुझे पूर्ण सहकार्य मिळेल. तू निश्चितच याची प्यारेलालशी चर्चा करशील. तू महादेशीसुद्धा यासंबंधी चर्चा करू शकतेस. मला प्यारेलालने पूर्णपणे समजून-उमजून केलेले सहकार्य हवे आहे.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३८

[१९३८]

काही चुकीचे जरी लिहिले असेल तरी आपण चुकीचे वाचायला पाहिजे काय? निदान आज तरी आपण या बाबीचा योग्य विचार केला पाहिजे आणि अभ्यास करणाराने या अध्यायाचे वर्णन होईल असे एक नाव निश्चित केले पाहिजे.

पाचवे प्रकरण संन्यासयोग आहे आणि एकाच विषयावर दोन प्रकरणे होऊ शकत नाहीत. (संदर्भावरून स्पष्ट आहे की भगवद्गीतेतील प्रकरण सहावे ज्ञान-कर्मजसंन्यासयोग आहे तर पाचवे प्रकरण कर्मसंन्यासयोग आहे.)

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३९

[१९३८]

"इशावास्यमिंद सर्व तेन त्यक्तेन भुंजीथा" (इषोपनिषद) हे सर्व ईश्वराने व्यापलेले आहे. तू जर त्यागभावनेने त्यांचा उपयोग करशील तर त्या तुझ्या आहेत. तू जर एकटीच वस्तुंचा उपभोग घेऊ इच्छिशील तर तुझे काहीही नाही.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

४०

[१९३८]

कुठे भिजलीस? "अव्यवस्थित चित्तानामप्रसादोऽपी भयंकर" अव्यवस्था केव्हा जाईल? जेवण सोडून जाणे अन्नदेवतेचा अपमान आहे. आताच आणायचे आहे की जेवण झाल्यानंतर असे तू मला विचारायला पाहिजे होते. आता मला अजून कठोरपणे वागावे लागेल. तू तयार असशील तेव्हाच मी खाईन. आणि एकदा का तू जेवण करायला बसलीस की मग जेवण संपवल्यानंतरच उठशील. मी लवकर जेवतो ते आपल्या दोघांच्याही सोयीकरिता. माझ्याबरोबर जेवायला तू तयार होऊ शकतेस. जीवन थोडे विचारपूर्वक घडवले पाहिजे. तू जर असे करशील तर तुला स्वतःकरिता काही वेळ मिळेल; तू तुझे कर्तव्यही चांगल्या प्रकारे पार पाडू शकशील आणि तुला अनुभव आणि ज्ञानही मिळेल.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

४१

[१९३८]

तू प्यारेलालचे अंथरुण घालतेस, परंतु तो झोपतोच कुठे? तो एक वाजेपर्यंत जागा होता.

येथील संडास कसे आहेत? तिथे तू माती का ठेवलेली नाही? हे बरोबर नाही. इथे किती तरी . . . . (या वाक्यातील बाकीचा भाग आणि पुढील एक वाक्य स्पष्ट नाही.) फारशी काळजीही दिसत नाही आणि प्रयत्नही दिसत नाहीत. मी माझ्या कामात फार व्यग्र आहे, नाही तर मीच सर्व संडासांची काळजी घेतली असती. एक तर मी ते स्वतः साफ केले असते वा करवून घेतले असते. मी म्हणेन की अजूनही तू काही तरी कर.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

४२

[१९३८]

मी जेव्हा संडासात बसलो होतो तेव्हाच तू जाऊ शकली असतीस. हा अव्यवस्थितपणा झाला

. नाही काय? गोष्टी अव्यवस्थित केल्या तर ना तर मनःशांती असते, ना स्थैर्य. वेळ मिळाला तर संडासला जाणे, झोपणे, आणि बाकी सर्व कर्तव्यपरायणता, असेच ना?

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

४३

२० जून १९३९

चि. सुशीला,

तू रेल्वे स्थानकावर का आली नाहीस? खाण्याचे. झोपण्याचे आणि फिरायला जाण्याचे नियम पाळ. मला दररोज तुझे पत्र आले पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

४४

२१ जून १९३९

चि. सुशीला,

काल स्थानकावरून तुला मी जे पत्र पाठवले होते ते मिळालेच असेल. मी तुझ्या पत्राची उद्या वाट पाहीन. लवकर ये. मंजू रुग्णालयातून परतली आहे. तू चांगली असशील. लीलावती अजून भेटली नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

४५

२२ जून १९३९

चि. सुशीला,

काल रात्री तू तिथे नव्हतीस आणि मला दोन वाजता जाग आली. मग मला झोप लागली नाही, म्हणून मी उठलो आणि पत्रे लिहू लागलो. आता तू काय म्हणशील? बाकी प्यारेलालच्या पत्रातून.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

४६

२३ जून १९३९

चि. सुशीला,

मला तुझे पत्र मिळाले. काल रात्री मी भरपूर झोपलो. हो, बा दुःखी आहे. तिला खोकला झाला आहे. तिच्याकरिता तुझी अनुपस्थिती मला अखरते. शक्य असेल तर रविवारी इथे ये.

आम्ही साप आणि विंचवांबरोबर इथे राहत आहोत हे मी तुला सांगितले काय? ईश्वर आमचे रक्षण करतो. तुझ्याजवळ सापाच्या विषाचा उतार करणारे औषध आहे काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

४७

[७ जुलै १९३९पूर्वी]

("मी तुला अबोटाबादहून तार पाठवीन" या वाक्यावरून तारखेचा अंदाज केला आहे. गांधीजी अबोटाबादला ७ ते २६ जुलै १९३९च्या दरम्यान होते.)

मूर्ख पोरी,

तुझ्याकरिता मूर्ख हे अगदी योग्य विशेषण आहे. आणि किती मूर्ख? काल तर तू मुळीच नव्हतीस? देवदास जे म्हणाला होता त्यात द्वेषभावना होती असे तुला वाटते काय? जर काही असेल तर ती माझ्याबद्दल असेल. आणि तो जे काही म्हणाला ते आपल्या सर्वांच्या हिताकरिता होते. मग चिडण्याचे कारण तरी काय? तू किती रडलीस आणि तेही अकारण. तू ही सवय सोडायला पाहिजे. इतका हळवेपणा कशाला? तू शांत झाली असल्याची मला तार पाठव. हा मूर्खपणा सोड. देवदासची माफी माग. याचा अर्थ असा नाही की देवदास म्हणेल ते तू केले पाहिजे. तुला जे योग्य वाटेल ते कर. त्याला शांतपणे समजावून सांग. मला तुझ्याकडून दररोज पत्र हवे आहे. तू काय केले पाहिजे हे सांगणारी तार मी तुला अबोटाबादहून पाठवीन. विजया आणि इतरांना लिहीत राहा

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

४८

आगगाडीतून,

२७ जुलै १९३९

चि. सुशीला, मूर्ख मुली,

मी दिवस मोजेन. तू तुझे तेथील काम स्थिर चित्ताने करत राहा. सुशीला माझ्याशी बोलेल काय असे देवदास मला विचारत होता. मी म्हणालो, ती निश्चितच बोलेल. आता तूच पुढाकार घेतला तर चांगले होईल. तो जे काही म्हणतो ते शांतपणे ऐकून घे आणि त्याचे समाधान कर. तू मुळीच राग दाखवायला नको.

तू प्यारेलालची काळजी करू नको. ते मी पाहीन. तू तिथे आनंदात राहायला पाहिजे. तू माताजींशी भांडणार नाहीस. तू नियमितपणे विजया, प्रभा, लीलावती, अ. स. इत्यादींना लिहीत राहशील.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

४९

आगगाडीतून, इटार्सीनंतर

२८ जुलै १९३९

चि. सुशीला,

काल मथुरेहून मी तुला पत्र पाठवले होते. तुला ते मिळाले असेल. मी तुला देवदासला भेटायला सांगितले होते. तू कशाचीही काळजी करू नकोस. मला लिहीत राहा. दररोज रात्री खूप लोक भेटायला यायचे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५०

सेगाव,

२९ जुलै १९३९

मूर्ख मुली,

आगगाडीच्या प्रवासातून मी तुला दोनदा लिहिले होते. शंकरन चांगला आहे. चढण्याउतरण्याला मनाई आहे. तो चांगला जेवतो. मॅथ्यू (पी. जी. मॅथ्यू) बालकृष्णच्या (बालकृष्ण भावे) जागेत राहतो. तो चांगला दिसतो. तो इथे पूर्ण अंतर चालत आला.

तू देवदासला भेटली असशीलच. माझे चांगले सुरू आहे. कनूने माझी मालीश केली आणि मी डुलकी घेतली. बाला काम करण्यापासून अडवणे कठीण आहे. तू तिला अडवू शकत होतीस. बासुद्धा काळजीमुक्त होती. आता ती माझी काळजी घेते. काय होते ते पाहू. इथे पाऊस नाही. लोक काळजीत आहेत.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५१

सेगाव,

३१ जुलै १९३९

चि. सुशीला,

तुला तीन पत्रे लिहिली. काल मी लिहू शकलो नाही. मला तुझे पत्र मिळाले. त्यात माझ्या पत्राची पोच नाही. मी तुला मथुरा, बैतूल आणि सेगावहून लिहिले. तू तिथेच राहायला पाहिजे आणि कामात पूर्ण लक्ष घालायला पाहिजे. तेथील वातावरणात तुला काही नाविन्य आढळले ही चांगली गोष्ट आहे. कनू दररोज माझी मालीश करतो. मीसुद्धा नियमितपणे आंघोळ करतो. आज महोदयांनी रक्तदाब पाहिला. १५५।९० आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५२

सेगाव, वर्धा

२ ऑगस्ट १९३९

चि. सुशीला,

मला तुझी दोन पत्रे एकदम मिळाली. निदान तुला माझी सर्व पत्रे मिळाली. मी चांगला आहे. मला चांगली झोप लागली. मी साडेनऊ वाजता झोपायला जातो. तुझे वजन वाढले पाहिजे.

मी तुझ्या रुग्णालयाचा विचार करतो आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५३

सेगाव, वर्धा

४ ऑगस्ट १९३९

मूर्ख मुली,

तुझी दोन पत्रे सोबत मिळाली. मी तुला दर तिसऱ्या दिवशी तुला पत्र लिहीत असतो. काल शिरीन आली. ती चांगली मुलगी आहे असे दिसते. आज तिनेच माझा रक्तदाब पाहिला. तो १३५-८८ होता. प्यारेलालने तपासले तेव्हाही इतकाच होता. शिवाय इथे बंगालमधील एक कैदी आला आहे. निमू अर्थातच इथे आहे. रात्री ९ वाजता झोपायला जातो. आता सकाळचे तीन वाजले आहेत. पोटावर मातीच्या पट्ट्या लावून मी पडलो आहे. गेल्या तीन दिवसांपासून मी खजूर घेत असतो. ते फार चांगले आहेत. मला तुझी आठवण होत असते. पाऊस न आल्यामुळे लोक काळजी करत आहेत. माझी काळजी करू नकोस.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५४

सेगाव, वर्धा,

६ ऑगस्ट १९३९

चि. सुशीला,

मला तुझे पत्र मिळाले. बाला तू पाठवलेले पत्र मी तिला दिले. शिरीन माझा रक्तदाब बरेचदा पाहत असते. ते थोडे वर चालले आहे. आज दुपारी ते १६०-९० होते. ती स्वतः; तुला लिहीतच असेल. माझे वजन १०३ पौंड आहे. ते थोडेसे कमी झाले आहे असे वाटते. शक्ती भरपूर आहे. झोप चांगली लागते.

शंकरन आजारी आहे. त्याला ताप आहे. काल १०२ होता. शिरीन त्याची काळजी घेते आहे. ती सर्व काम मन लावून करते. ती कताई करणेसुद्धा शिकते आहे.

तू तुझ्या खाण्यापिण्याची काळजी घेत असशील अशी आशा आहे. तुला रात्रपाळीत काम करावे लागते काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५५

सेगाव, वर्धा,

७ ऑगस्ट १९३९

चि. सुशीला,

यात काही शंका नाही की मला तुझ्यासाठी रुग्णालय बांधायचे आहे. परंतु ते रुग्णाकरिता राहणार आहे. तुझ्याशिवाय मी रुग्णालय चालवू शकत नाही. तू इथे असलीस तर शेजारपाजरच्या लोकांना मदत करता आली असती आणि आपल्याला असे काही ज्ञान मिळाले असते की ज्याद्वारे आपण ग्रामीणांना स्वस्त औषधे देऊ शकलो असतो. हे सर्व डोक्यात असल्यामुळे मी रुग्णालय बांधायचा विचार करत होतो.

शंकरनचे पत्र तू वाचावे म्हणून पाठवतो आहे. आज त्याला ताप नाही. त्याला खाण्याकरिता काहीही दिले नाही. त्याला केवळ संत्र्यांचा रस दिला. शिरीनने अर्थातच त्याला क्विनाईन दिले.

वालजीभाईंचे पत्र आहे. ते सोबत आहे. तू सरळ त्यांना लिहू शकते. हे काय झाले? तू रुणालयाच्या (म्हैसूर येथील क्षयरोग्यांकरिता असलेले आरोग्यधाम. तिथे वालजी देसाईंवर उपचार सुरू होता.) डॉक्टरलाही लिहायला पाहिजे. तुम्ही सर्व शिकलेल्या आहा तर शकुंतला थोडीच अशिक्षित राहणार आहे? हिंदीला कोण किंमत देते?

मी भरपूर झोप घेतो. अर्ध्या तासाचेच अंतर आहे ना.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५६

वर्धा,

११ ऑगस्ट १९३९

चि. सुशीला,

मी तुला दोन दिवसांपासून लिहू शकलेलो नाही, शिरीन कदाचित जाईल. तिला १६ तारखेला तिथे पोहोचायचे आहे. तिला जर इथे नोकरी मिळाली तर ती परतू शकेल.

मी चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज महाविद्यालय रुग्णालय, नवी दिल्ली

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५७

सेगाव, वर्धा,

१४ ऑगस्ट १९३९

मूर्ख पोरी,

तू मूर्ख तर आहेसच. तिथे बसून घाबरते आहेस. काळ आपले काम करत असतो इतकेसुद्धा विसरतेस? आणि जर माझ्यात दोष नसेल आणि कोणी त्याचे वर्णन करत असेल तर घाबरण्याची आवश्यकता काय? माझ्याकडून तू इतकेही का शिकू शकत नाही की कोणी आपली कितीही निंदा वा टीका केली तरी त्याचा आपल्यावर परिणाम होऊ द्यायचा नाही. इथे येशील तेव्हा ना तर कोणी निंदा करील ना टीका.

डॉ. यंगचे उत्तर सोबत आहे. कार्यकारिणीत तो माझ्याबरोबर येत असे. एकदा असेच प्यारेलाल आणि शिरीनही आले होते.

खाण्या-झोपण्यात बेफिकीपणा चालणार नाही. सिनेमाच्या मोहात डोळे खराब करून घेणार नाहीस तर चांगले होईल. परंतु जाण्याची इच्छा होत असेल तर जाशील.

निमू काल मुंबईला गेली. कृष्णचंद्र आज-उद्यात येईल. कुंदर बाकडे गेला आहे.

बापूचे आशीर्वाद

मूळ पत्रावरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५८

सेगाव, वर्धा,
२१ ऑगस्ट १९३९

मूर्ख मुली,

मला तुला रोज लिहावेसे वाटत असते पण वेळच नसतो. अखेरीस आज हरिजन दिवस असूनही माझ्या सकाळच्या जेवणानंतर तुला पत्र लिहायला बसलो. मला तुझी शेवटची दोन पत्रे आवडली नाही. तू ती उन्मादात लिहिलेली आहेत. तू इतकी अस्वस्थ का? तू देवदास आणि इतरांना का घाबरतेस? इथे येण्याच्या कल्पनेनेच तुझा भीतीने थरकाप का उडावा? तुला गीतेचे जे ज्ञान मिळाले आहे आणि आपली इतकी सगळी जी चर्चा झाली आहे त्याचे काय? मला जे काही करायचे आहे ते इथेच करायचे आहे असे एकीकडे तू जगासमोर घोषित करतेस आणि दुसरीकडे तू इथे राहणार आहेस की नाही याचीच तुला शंका वाटते! किती हा मूर्खपणा! यातून तू मुक्त हो. तू मरण्यापूर्वीच का मरतेस?

देवदासशी झालेल्या चर्चेचे तू जे वर्णन केले आहे ते चांगले आहे. तू दिलेली उत्तरेसुद्धा चांगली होती. हे संभाषण झाले हे निश्चितच चांगले झाले. आशा आहे बोलत असताना तू चिडली नसशील. अधिक चर्चेनंतर गैरसमज अजून दूर होतील.

तिथे दर्यागंजमध्ये डोळ्यांचा दवाखाना आहे. जा आणि तो पाहा. आशा आहे की तू चांगली असशील आणि अन्नासंबंधीच्या नियमांचे पालन करत असशील.

प्यारेलालचे उपवास करत राहणे आणि इतर गोष्टींचा नेहमीच त्रास होत असतो. तू खोडकर आहेस. तू यंगला संधी दिली म्हणूनच त्याने मला लिहिले. ऑगस्टनंतर मी कोणत्याही अवस्थेत राहू शकत नाही असे जर तू त्याला स्पष्ट सांगितले असतेस तर त्याने निश्चितच मला लिहिले नसते ना? तेथील रुग्णांची गरज सांगितल्यानंतर मी नकार कसा देऊ शकतो? तू स्वतःही नकार देऊ शकली नसती. आता मी सोळा तारखेची वाट पाहतो आहे. मी काय करायला पाहिजे? तू इथे आल्यानंतर आपण तुझ्या रुग्णालयाचे पाहू. शिरीन आली नाही.

आशीर्वाद,
बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

५९

सेगाव, वर्धा,

२४ ऑगस्ट १९३९

मूर्ख मुली,

डेव्हिडला भेटण्यासाठी प्यारेलाल कृष्णदासबरोबर नागपूरला गेला आहे. प्रकाश काल आली. दवाखाना दाखवण्याकरिता तिलाही तो सोबत घेऊन गेला. मला इथे दोन रुग्ण भेटले. - दुर्गा आणि आशादेवी. यांच्याकरिता तरी मला इथे तुझी उणिव जाणवते. आपल्याला आंत्रपुच्छ (अपेंडिसायटिस) आहे की काय अशी तिला भीती वाटते आणि आशा देवींना गत दोन महिन्यांपासून ताप येऊ राहिलेला आहे. परंतु यात तू काय करू शकशील? ते काहीही असले तरी यामुळे मी इतका अस्वस्थ आहे की मी दोनदा स्वप्नात यासंबंधी तुझ्याशी बोललो. हे सर्व सांगताना मला तुला हे सांगायचे आहे की तू तिथे राहून चूक केली आहे. इथे तुझ्याकरिता काय कमी काम आहे? मी जेव्हा जागो झालो तेव्हा मी स्वतःलाच म्हणालो अखेरीस तू तरी काय करू शकली असती?' यंगने तुला भाग पाडले आणि तू माझ्यावर जबाबदारी ढकलली ! मी एकच निर्णय घेऊ शकतो. हे स्वप्न माझ्या काळजीची अभिव्यक्ती होती. इतकी काळजी का? यातून गीतेच्या अनुसरणाचा अभाव दिसतो! तू काळजी करू नकोस आणि तुझे काम पूर्ण कर.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६०

सेगाव, वर्धा,

२६ ऑगस्ट १९३९

चि. सुशीला,

तुझे पत्र २२ तारखेचे आहे. मी २४ तारखेला पत्र लिहिले होते. तुला माझे पत्र मिळालेच असेल. मी फार घाईत आहे. त्यातल्या त्यात प्यारेलाल तुला दररोज लिहितो हे पाहून मला समाधान वाटते. माझी प्रकृती अर्थातच चांगली आहे. प्रकाश आणि प्यारेलाल काल नागपूरहून परतले. कृष्णदासला क्षयरोग नसून पायोरिता आहे. प्रकाशने मला माताजींच्या बातम्या सांगितल्या. तू माताजींबरोबर असल्यामुळे त्यांच्या दातांकरिता काही तरी केले असशील ना? काय निदान आहे? याचा तुझ्यावर अतिरिक्त जबाबदारी असा अर्थ होतो काय? मीसुद्धा त्यावर विचार केला पाहिजे काय? महादेव इथे ३ वाजता पोहोचला.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६१

सेगाव आश्रम,

३० ऑगस्ट १९३९

चि. सुशीला,

काल रात्री मी तुझे लांब पत्र वाचले. माझ्यासमोर अबोटाबादचे ते दृश्य उभे राहिले जेव्हा मी तुझी खरडपट्टी काढली होती आणि तू रडली होती. त्या वेळेचा तुझा चेहरा मी विसरू शकत नाही. आता जेव्हा मी माझ्या निर्दयीपणाचा विचार करू लागतो तेव्हा माझे हृदय रडू लागते. तू दे.ला दिलेले उत्तर बरोबर होते.

तुझ्या तीन समस्या सोडवायच्या आहेत. - माझ्याकडे येणे, तू आलीस तर काय होईल याची भीती आणि माताजींसबंधीचे तुझे कर्तव्य. तुझी भीती निरर्थक आहे. तू जर सहनशीलता शिकलीस तर तुला कशाची भीती आहे आणि का? माझी सेवा करून, आजाऱ्यांची काळजी घेऊन आणि स्वयंपाकघरात काम करून तू समाधान मानू शकत नाही काय? माताजींसंबंधीची समस्या फार महत्त्वाची आहे. त्याबद्दल स्वतंत्रपणे विचार करणे हे तुझेही कर्तव्य आहे आणि माझेही. परंतु निर्णय घेण्याकरिता माझ्याजवळ काही आधार नाही. याबाबतीत प्यारेलालचा फार कमी उपयोग आहे. यावर केवळ तूच शांतपणे विचार केला पाहिजे. तू तुझ्या शक्तीचाही अंदाज घेतला पाहिजे. माताजींनी इथे यावे आणि तुम्ही दोघींनीही इथे सोबत राहावे असे मला वाटते. आताच नाही. तुझा दवाखाना तयार होऊ दे; मला तुझ्याकरिता खोली बांधू दे. तरीही माताजी मोहनलालला सोडू शकतील काय हा प्रश्न शिल्लक राहतोच. तुला फार मोठे ओझे वाहायचे आहे. तू इथे १६ तारखेला आल्यानंतरही यासंबंधी निर्णय घेऊ शकतेस. घाबरू नकोस. ईश्वर तुझा मार्गदर्शक आहे. तू १५ तारखेपूर्वी निघण्याची आवश्यकता नाही. तू घेतलेली जबाबदारी पूर्ण कर.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तू बाला का लिहीत नसतेस? ती तुझ्याकरिता तळमळत असते.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६२

दिल्ली,

७ सप्टेंबर १९३९

तू काल जे म्हणाली होतोस ते बरोबर होते. तुला तुझा धर्म कळायला पाहिजे. माताजी काय म्हणतात ते तू समजून घ्यायला पाहिजे. त्यांना शांत केल्यानंतरच तू यायला पाहिजे.

तुझी प्रकृती चांगली असेल अशी आशा आहे. तू स्वतःला विनाकारण दुःखी करते आहेस हे पाहून मला दुःख होते. ईश्वर तुला शांतता देवो.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६३

सेगाव आश्रम,

९ सप्टेंबर १९३९

मूर्ख मुली,

मी ३.३० ला उठलो. झोपू शकलो नाही. आपण दिल्लीत भेटल्यापासून अदृश्य रूपाने तूच माझ्यासमोर उभी होतीस. तुला माझे पत्र मिळालेच असेल. बाचा पहिला प्रश्न होता - सुशीला आली नाही काय? ती केव्हा येणार आहे असे काल रात्री तिने मला विचारले होते. बबुडी शारदा लिहिते, सुशीलाबेन नाही आली? ती केव्हा येणार आहे? लीलासुद्धा तिच्या पत्रातून हेच विचारत असते. हे सर्व या बाजूने. माझ्याबद्दल मी काय सांगू? परंतु तू माझा वा या ठिकाणाचा विचार करू नको. तुझे कर्तव्य काय आहे याचा तू स्वतंत्रपणे विचार कर. तू केवळ माताजींचा आशीर्वाद घेऊनच येशील, त्यांच्याशी भांडून नाही. मोहनलालला खुश करणे तुझे कर्तव्य आहे. माझ्याकरिता त्याच्या सुखदुःखाकडे दुर्लक्ष होईल असे तू काहीही करायला नको. तुझे कर्तव्य त्यांच्याबद्दल आहे. दुसरा मुद्दा तू प्यारेलालला लिहिलेले पत्र आहे. तू एम. डी. करण्याबद्दल लिहिले आहे. तेथील जीवनाची प्रशंसा केली आहे. त्यात काही चूक नाही. ते स्वाभाविक आहे. तू एम. डी. करण्याकरिता मोकळी आहेस. तुला आज जरी शिकणे सुरू करायचे असेल तरी माझा विचार करू नकोस. तुला इथे येऊन जर समाधान मिळत नसेल तर येऊ नकोस. तुझे कर्तव्य जेव्हा तुला इथे येण्याकरिता भाग पाडेल तेव्हाच तू इथे येणे योग्य होईल. तू आलीस तर मला फार आनंद होईल. तू जर येऊ शकत नसशील तर तुझे कर्तव्य तिथे आहे, इथे नाही असे मी समजेन.. तुला जर येथील वातावणाची भीती वाटत असेल तर ती लाजेची गोष्ट होईल.आता प्रार्थनेची वेळ झाली आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६४

सेगाव, वर्धा,

१३ सप्टेंबर १९३९

चि. सुशीला,

बाचा धीर सुटत चालला आहे. "सुशीलाबेन १८ तारखेला येणार आहे ना?" असे सर्व विचारत असतात. यामुळे तू ठरलेल्या वेळी यावे असा माझा तुला सल्ला आहे, परंतु माताजी जर दुःखी होत असतील तर तुझे जे कर्तव्य असेल त्याप्रमाणे कर. कदाचित इथे आल्यानंतरच तुला तुझा अंतिम निर्णय घेता येणे शक्य होईल. कृष्णदासकरिता मला तुझी फार गरज आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६५

२७ सप्टेंबर १९३९

चि. सुशीला,

मी सकाळी पोहोचतो आहे. आज सायंकाळी वर्ध्याकरिता निघेन. तू बरोबर येणार आहेस ना? तुला घ्यायला कार येणार आहे. तुझ्या सामानसुमानासह ये. तू कारला थोडा वेळ वाट पाहायला लावू शकते. तुला माताजी आणि इतरांना भेटण्याची संधी मिळेल. नाही काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६६

१० ऑक्टोबर १९३९

चि. सुशीला,

रस्त्याभर मी तुझाच विचार करत होतो. मी माझे म्हणणे तुला का पटवून देऊ शकत नाही? शक्य आहे की माझे प्रेम अपरिपूर्ण असेल वा अशुद्ध असेल म्हणजे तसेच असेल. मला मान्य आहे की तू माझ्याकडे माझ्याकरिता आली होतीस आणि माझ्याकरिताच तू इथे थांबणार आहेस. परंतु जे इतर लोक माझ्याकरिता इथे येतात तेसुद्धा माझे काम करत असतात आणि वेळ आली की वेगळेही राहत असतात. परंतु तेसुद्धा माझ्या कामाकरिता, एरव्ही नाही. थोडक्यात इतके भरपूर झाले. तू जो अर्थ लावला आहे त्याला यात स्थान नाही. तू चांगली असशील.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६७

१२ ऑक्टोबर १९३९

चि. सुशीला,

आंघोळीच्या वेळी तू मालीशबद्दल जे म्हणालीस त्याबद्दल तुला वाईट वाटत नाही काय? तुला हे चांगले वाटते काय? दिल्लीला पाठवण्यात आलेली तार तुला आवडली काय? तू शांत आहेस काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६८

१३ ऑक्टोबर १९३९

चि. सुशीला,

पृथ्वी सिंग जर मालीश करू शकत असेल तर तू त्याला सांग. कृष्णचंद्रला आंघोळीचे सांग. पहिल्या दिवशी दोघांनी पाहायचे आहे. मलाच जर हे सर्व करावे लागणार असेल तर ते माझ्या मौनावर फार मोठे ओझे होईल. दर वेळी त्यांच्याकरिता सूचना लिहिणे कठीण होईल. यामुळे या बदलाकरिता मला तुझे पूर्ण सहकार्य हवे आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

६९

२९ डिसेंबर १९३९

केवळ माझ्याकरिता तुला ठेवले तर माझ्या दृष्टीने तो अपराध होईल आणि मी संपर्ण आयुष्य ज्या आधारावर जगलो त्याला नाकारणे होईल. परंतु अनेक कारणांकरिता मला इथे तुझी उपस्थिती आवश्यक आहे. यात प्यारेलाल आहे, तुझा स्वतःचा समावेश आहे आणि ज्यांची काळजी घेणे आवश्यक आहे असे रुग्ण आहेत. या सर्वांबरोबर जर तू माझ्या शरीराची काळजी घेशील तर ते मान्य होईल. तू कोणत्या कारणाकरिता राहते आहेस याच्याशी माझा काही संबंध नाही. तू माझी सेवा करण्याकरिता इथे राहते आहेस ही गोष्टसुद्धा मी समजू शकतो. तुझ्याकरिता ही गोष्ट प्रशंसनीय असू शकते. व्यवहारात मी सेगावला राहतो यामुळे काही फरक पडत नाही. परंतु मी जेव्हा बाहेर जातो आणि तुझी आवश्यकता इथे आहे असे मला वाटते आणि तुला जरी तसे वाटत नसेल तरी तू माझ्या म्हणण्याप्रमणे ऐकायला पाहिजे. मला दिसते त्याप्रमाणे मला सोडून जाणे तुझे कर्तव्य नाही. माझी सेवा करणे हे तुझे कर्तव्य आहे असे तुलासुद्धा वाटते, मी जेव्हा बाहेर जातो तेव्हा काय करायचे यासंबंधीच मतभेद आहेत. तू मला सहन करायला पाहिजे. असे करण्यातच तुझ्या हिताचा आणि माझ्या शांततेचा समावेश आहे.

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७०

सेगाव, वर्धा,

शुक्रवार, [१९३९]

(मजकुरावरून हे पत्र १९३९ साली लिहिलेले असावे असे दिसते.)

चि. सुशीला,

मला तुझी सर्व पत्रे मिळाली. तू गंभीर चूक करते आहेस ! मला स्वतःचाच संशय येतो. संशयावर कोणताही इलाज नाही. हा संशय कायम असतानाही मला ज्या विविध सेवांची गरज आहे व त्या तूच केल्या पाहिजे यातच समंजसपणा आहे. तू जर इतकी दूर राहशील तर संशय कसा जाईल? मला व्यर्थ गोष्टी करायच्या नाहीत. मला इतकेच माहीत आहे की काहीही जरी झाले तरी तू मला सोडून जायला नको आणि माझ्या अटींवर का होईना तू माझ्याबरोबरच राहायला पाहिजे. तू जर माझ्याबरोबर राहिलीस तर देवदासची शंकासुद्धा, वा तुला त्याला काहीही म्हणायचे असेल ते म्हण, दूर होईल. यामुळे तू माझ्या कामाकरिता यायला पाहिजे. असे करून तू फार मोठी मदत करू शकशील आणि जर माझे काही भ्रम असतील तर तेसुद्धा दूर होतील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७१

सेगाव, वर्धा,

[१९३९]

चि. सुशीला,

तुला माझी सर्व पत्रे मिळाली असतील अशी आशा आहे. तुझ्या २३ तारखेच्या पत्राने काहीशी काळजी वाटू लागली. तुझ्या आईबद्दल सांगायचे तर तुझे आणि माझे त्यांच्यासंबंधात काय कर्तव्य याचा तूच विचार केला पाहिजे कारण सर्व तथ्ये तुला माहीत आहेत.

दुसरीकडे मी तुझ्या येण्याचे दिवस मोजतो आहे. प्रकाश उद्या निघते आहे. रक्तदाब तपासण्याचे काम तिने चांगल्या प्रकारे केले. ती माझ्याबरोबर सकाळी आणि सायंकाळी दोन्ही वेळा फिरायला येते. ती सगळ्यांमध्ये चांगल्या प्रकारे मिसळली आहे. काल कृष्णदास राहायला आला. त्याच्याबरोबर मनोज्ञा आहे. आनंद ग्योलो परवा आला. शंकरनच्या प्रकरणाची जी कागदपत्रे तुला पाठवली त्यांची ना तर त पोच दिली ना त्याबद्दल काही सूचना दिली.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७२

सेगाव, वर्धा,

[१९३९]

चि. सुशीला,

हे मी काय ऐकतो आहे? तू अन्न आणि अपुऱ्या झोपेमुळे आजारी पडलीस! हे का आणि कसे झाले? तू तिथून काही वजन वाढवून आणि काही शक्ती मिळवून इथे परतशील असा आपला करार झाला होता. लोक जरी तुला हे वा ते खाण्याकरिता आग्रह करत असतील तरी तू त्यांच्या आग्रहाला का बळी पडायला पाहिजे? तुझ्यात नकार देण्याची शक्ती नाही काय? 'द स्टेट्समन'मधील तुझा लेख चांगला आहे. त्या लेखात तू तुझ्याबद्दलच खोटे बोलली आहेस हे तुझ्या लक्षात आले काय? दुग्धशाळा, गायी इत्यादींना विहिरीजवळ न्यावे लागते. दुग्धशाळेची पक्की इमारत आहे. तिथे तुझ्याकरिता रुग्णालय स्थापन करण्याचा विचार आहे. मीराबेनची योजना सोबत जोडत आहे. ती पाहा आणि त्यावर विचार कर. जे काही करण्यात येईल ते तू परतल्यानंतरच.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७३

३ फेब्रुवारी १९४०

चि. सुशीला.

तू किती दुःख दिले? आणि मला सोडून जात असतानाही दंश केलास. "पत्र काय लिहायचे?" इतका संताप? थोडा विचार तर कर की जर मी माझ्या शरीराकरिता आजाऱ्यांना सोडून तुला जर माझ्याबरोबर घेऊन गेलो असतो तर मी नीच झालो असतो आणि जीवनभराचा माझा धर्म मी एका क्षणात नाहीसा करून टाकला असता. यानंतर माझ्याजवळ काय शिल्लक राहिले असते? तुला हे का कळत नाही की किशोरीलालभाईससोडून तुला घेऊन जाणे मला शोभले नसते. ही वैद्यकीय ज्ञानाची गोष्ट नाही. ही माझ्या मानसिकतेची गोष्ट आहे. परंतु आता तुझ्या दृष्टीत माझी काहीही किंमत नाही. मी तुला दुःखी करण्याचेच काम करतो आहे असे तुझे मत झाले आहे. हा कसा कमकुवतपणा आहे की तू सोबत येऊ शकली नाही, परंतु मला माहीत आहे की तुझ्या विचित्र वर्तणुकीत तुझे दुःखच सामावलेले होते. तू हट्टीपणाने मला सोडशील तर तू लक्षात ठेव की आज दवाखाना ज्या प्रकारे चालतो आहे तसा मी चालवू शकणार नाही. सर्व उपकरणे तुझ्याबरोबर जातील. मला त्यांचा काय उपयोग? तू तुझा धर्म विसरते आहेस.

बापूचे आशीर्वाद

परत -

शांत हो. विचार कर. मी म्हणतो ते ऐक. पळून जायचा विचार सोड. माझ्याबरोबर वर्षातून एक-दोन महिने राहू शकली नाही म्हणून काय तू माझी दहा महिने सेवा करणार नाहीस? थोडा विचार कर. थोडी दया कर. मी जे काही केले आहे ते तुझ्या, माझ्या आणि आश्रमाच्या हिताकरिता केले आहे. तुझे मन शांत झाले अशी जर तू तार करशील तर मला आनंद होईल.

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७४

४ फेब्रुवारी १९४०

चि. सुशीला,

तुला माझे कालचे पत्र मिळाले असेलच. मला आज तुझ्या तारेची अपेक्षा होती. ती आली नाही. ठीक आहे, मला माहीत आहे की मी जे काही म्हणतो आहे ते १०० टक्के बरोबर आहे. तू जे म्हणतेस ते १०० टक्के चूक. मी तुझी खात्री पटवू शकलो नाही केवळ याचेच मला दुःख होते. प्यारेलालला माझ्या अंतःकरणातील सर्व काही मी सांगितले आहे. तू म्हणतेस तसे जर मी केले तर त्यामुळे माझाही अधःपात होईल आणि तुझीही हानी होईल. मी तुला माझ्याबरोबर दौऱ्यावर घेऊन जात नाही (गांधीजी बंगाल आणि बिहारच्या दौऱ्याकरिता १५ फेब्रुवारीला वर्ध्याहून निघणार होते.) एवढ्याकरिता मला पूर्णपणे टाकून देणे कितपत योग्य होईल याचा तूच विचार कर. २९ तारखेलाच पळून जाणे अगदीच योग्य होणार नाही. तुला जरी जायचेच असेल तरी तरी त्यात काही विवेक आणि पद्धत असायला पाहिजे. तुझा मूर्खपणा सोड आणि सावध हो. वालजीभाई आणि भारतानंद यांच्या आहारावर लक्ष ठेव. किशोरीलालभाई चांगले व्हायला पाहिजे. छिंदवाडा प्रकरण मी हाताळले आहे. आपल्याला इथे माहिती कळायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७५

५ फेब्रुवारी १९४०

चि. सुशीला,

रात्रीसुद्धा तुला विसरू शकत नाही. तू किती मूर्ख आहेस ! आजाऱ्यांबद्दल कशा गोष्टी सांगत होतीस! इतक्या निर्घृणतेकरिता माझी तयारी नव्हती. त्या दिवशी तू जे बोलली त्यावर मी जसजसा विचार करत जातो तसतसा मी निराश होत जातो. तू माझ्याबरोबर असल्यामुळे तुझे केवळ नुकसानच झाले आहे काय? तुझा अभ्यास थांबला. तुझी चांगल्यापैकी नोकरी होती, ती माझ्यामुळे गेली. तुझे जीवन अव्यवस्थित झाले. या सर्वांकरिता मी केवळ तुझ्या मूर्खपणाला दोष कसा देऊ शकतो? माझ्या स्वार्थीपणाला का नाही? मी माझ्या स्वार्थाच्या जाळ्यातच अडकलो नसतो तर तू माझ्याबरोबर राहिली असतीस काय? तू जाशील तेव्हा तू काय कारण सांगशील? मी काय सांगेन? मी तुला माझ्याबरोबर दौऱ्यावर नेऊ शकत नव्हतो म्हणून तू माझा त्याग करून निघून गेली असे मी सांगू काय? रुग्ण काय विचार करतील? शंकरन काय विचार करील? तुला जे काही करायचे असेल ते पद्धतशीरपणे कर. मीराने कुंवरजींना झोपडीत नेलेच असेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७६

१५ फेब्रुवारी १९४०

चि. सुशिला,

मी तुला काय लिहू? मी जे काही केले ते कर्तव्यभावनेने केले. तू शांत हो. माझा सल्ला ऐक. जाण्याबद्दल विसरून जा. ईश्वरावर भरवसा ठेव. तुझ्या जाण्याच्या चर्चेने बा दुःखी झाली आहे. आम्ही कारमध्ये होतो तेव्हा ही गोष्ट निघाली होती. तू हट्ट करणे अगदीच योग्य नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७७

सेवाग्राम, वर्धा

[१५ फेब्रुवारी १९४०पूर्वी]

(मजकुरावरून हे पत्र १९४०मध्ये लिहिले होते असे दिसते, गांधीजी एक महिन्याच्या दौऱ्याकरिता कलकत्त्याला जाण्याकरिता वर्ध्याहून १५ फेब्रुवारीला निघाले होते. या दौऱ्यात सोबत न येण्याकरिता सुशीला नाय्यरची समजूत घालण्याकरिता गांधीजी त्यांना लिहीत होते; पाहा "सुशीला नाय्यर यांना पत्र", ३ फेब्रुवारी १९४०.)

चि. सुशीला,

तुझी दोन पत्रे मिळाली. मी तुला काय उत्तर देऊ? तू माझ्यातील प्रत्येक गोष्टीकडे चुकीच्या बाजूने पाहते आहेस. तू माझ्याबरोबर कधीही येऊ शकत नाही असे मी कधीही म्हणालो नाही. शक्य आहे की अधूनमधून तू माझ्याबरोबर येशील. परंतु तू जो फरक करते आहेस तो मला मान्य नाही. कनू नेहमीच एका डब्यात असतो आणि अ. स. दुसऱ्या डब्यात हे चूक आहे. माझ्याबरोबर कोणत्या वेळी कोण येईल हे मी ठरवायला पाहिजे. परंतु आपण या गोष्टीकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहत आहो असे दिसते. तसे असू दे.

या वेळी मी तीन लेख पाठवत आहे.

मला प्रभुदासच्या प्रकरणात काहीही अर्थ दिसत नाही.. देवदास विकृत दृष्टिकोनातून पाहत असेल तर त्यामुळे तुझ्याकरिता काय फरक पडतो? तीन माकडांची ती मूर्ती तुझ्याजवळ असली पाहिजे, माझ्याजवळ नाही. तुला ती हवी आहे काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती वरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७८

शांतिनिकेतन,

१८ फेब्रुवारी १९४०

मूर्ख पोरी सुशीला,

मी कुठेही असलो तरी तुझा विचार करत असतो. त्याचबरोबर माझे जे वागणे कठोरपणाचे दिसत होते ते खरे म्हणजे मुळीच कठोरपणाचे नव्हते. तुला आणि इतरांना मी इथे आणले नाही हे मी चांगलेच केले. कारणे अनेक आहेत. आता अजून हे वर्णन करत बसण्यात अर्थ नाही, तुझी प्रकृती आणि मनोवस्था चांगली असेल अशी आशा आहे. बबलो आजारी पडल्यामुळे मी महादेवला आज कलकत्त्याला पाठवले आहे. गरीब बिचारा बबलो [इथे] काहीही पाहू शकला नाही. मी चांगला आहे. मी मालीश करून घेऊ शकलो नाही. बाकी सर्व नेहमीप्रमणे. मी रात्री लवकर झोपतो. माझा हात खिडकीत फसला होता. आता चांगला आहे. किंचतशी जखम झाली होती.

वालजीभाई, कुवरजी चांगले असतील अशी आशा आहे. झोहरा आणि शिरीन मला भेटल्या. झोहराने माझा निरोप पाठवलाच असेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

७९

२३ फेब्रुवारी १९४०

चि. सुशीला,

तुझ्याकडून काहीही बातमी नाही. परचुरे शास्त्री कसे आहेत? बियाणींना (ब्रिजलाल बियाणी) मी छिंदवाड्याबद्दल लिहिले आहे. आशा आहे की बालकृष्ण आणि कुवरजींना उकाडा सहन होत असेल. माझी प्रकृती एकदम चांगली आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८०

गांधी सेवा संघ,

२४ फेब्रुवारी १९४०

सुशीला,

सेगाव, वर्धा

वालजींना विश्रांती आणि दुधाचा उपचार घ्यायला सांग.

बापू

मूळ इंग्रजीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८१

आगगाडीतून,

१३ मार्च १९४०

चि. सुशीला,

तुझी इच्छा असूनही तू जाणार नाही अशी मी आशा करतो. तू गेलीस तर ती फार मोठी चूक होईल याबद्दल मला शंका नाही. बालासुद्धा असेच वाटते. ईश्वर तुला सहनशीलता आणि विवेकबुद्धी देवो.

बलवंतसिंहचे समाधान कर. किशोरीलालभाई चांगले असतील. खोकल्यावर काही तरी घेण्याकरिता अमतुल सलामची समजूत घाल. गौरा चांगला असेल. झोहरा इथे आहे. तिने खाण्यापिण्याचेही आणले आहे.

दिवसातून मी तीनदा झोपलो. मला मानसिक थकवा फार आहे.

आशीर्वाद,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८२

सेगाव,

२२ एप्रिल १९४०

तुझ्या तीन पत्रांचे उत्तर द्यायचे राहिले आहे. याचे कारण माझी असहायता आहे.

मी तुझा युक्तिवाद समजू शकतो. परंतु मी माझ्या भूमिकेवर कायम आहे. यथावकाश एक तर तू माझे मन वळवशील वा मी तुझे. मी कोणताही नवीन युक्तिवाद करू शकत नाही. मी कोणत्या मार्गाने जातो ते तू पाहत राहा. मला स्वतःलाच ते माहीत नाही. माझे केवळ एकच मार्गदर्शक तत्त्व आहे. ते समजून घे. त्याचा अर्थ लावण्यात आणि अनुसरणात चूक होऊ शकते. जर तसे सिद्ध झाले तर ती माझ्या साधनेतील उणीव आहे असे समजायला पाहिजे. दिवसेंदिवस मला स्पष्टपणे दिसते आहे की अहिंसा रुजवण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही.

२४ एप्रिल १९४०

वरील लिहिल्यानंतर मी एक अर्थ लावला. तुझ्या मनात जे काही येते ते तू लिहीत राहायला पाहिजे. माझ्या उत्तराची वाट पाहू नको. तू प्यारेलालला लिहिलेले पत्र मी वाचले. मीच त्याला उत्तर देण्यापासून अडवले. यातून केवळ अनावश्यक शब्दाशब्दी होईल आणि निघणार काहीही नाही. तुला जे सांगायचे आहे ते तू आधीच सांगितले आहे. आता भावाने आणि बहिणीने आपापल्या मार्गाने जावे. मी क्वचितच आपल्या संबंधाबद्दल त्याच्याशी चर्चा करत असतो. मी माझ्या मार्गाने जातो आणि भाऊ आणि बहीण त्यांच्या मार्गाने जातात. आम्ही आमच्या कामात व्यग्र आहो. कामाशिवाय इतर काही बोलायला वेळ कुठे आहे? त्यांच्याबद्दल तू विचार करणे थांबवावे असा माझा तुला सल्ला आहे. असे असूनही तुझ्या हातात पुरेसे काम नाही काय?

मी आज व्हाईसरायना पत्र लिहिले आहे. (पाहा "लॉर्ड लिनलिथिगो यांना पत्र", २४ एप्रिल १९४०.) त्याच्या प्रती कोणालाही पाठवण्याचा माझा विचार नाही. मी इतकेच म्हणेन की तुला ते आवडेल. परंतु यातसुद्धा माझी चूक होऊ शकेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८३

२१ मे १९४०

मूर्ख पोरी,

मी तुला काय लिहू शकतो? या परिस्थितीत मला सोडून जाणे हा फार मोठा असभ्यपणा आहे हे मला माहीत आहे. परंतु मला जी गोष्ट असंस्कृतपणाची वाटते तीच तुला कर्तव्य वाटते, असे असेल तर तू तुझे कर्तव्य करायला पाहिजे आणि अशा परिस्थितीत ते करण्याकरिता मी तुला प्रोत्साहन दिले पाहिजे. तू जर माझे ऐकशील तर मी म्हणेन की (१). तू तोपर्यंत जाऊ नये जोपर्यंत तू तुझ्या भूमिकेबद्दल माझी खात्री पटवून देत नाही. वेगळ्या शब्दांत तू मुळीच जायला नको. आणि जर ते शक्य नसेल तर (२) धुके निवळेपर्यंत तू जाण्याचा शब्दही काढायला नको. इतकेच नाही जर माताजींना हे कळू शकत असेल तर त्यासुद्धा तुला दिल्लीत क्षणभरही ठेवणार नाहीत.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८४

सेवाग्राम,

२५ मे १९४०

चि. सुशीला,

तू जे शेवटचे वाक्य म्हणाली होतीस ते तुला शोभणारे नाही. "मला प्रासंगिक सत्य नको, अर्धसत्य नको, मला पूर्ण सत्य पाहिजे"— याच्या अर्थाचा विचार कर.

जोपर्यंत तू सेवाग्रामला आहेस तोपर्यंत तुझे कर्तव्य काय आणि माझे काय हा प्रश्न मुळीच उपस्थित होत नाही. तू इथे माझ्याकरिता आहे असे हवे तर तू समजू शकतेस, मी हवे तर तू इथे आहेस तर तुझी सेवा घेतो आहे असे समजू शकतो. तू जेव्हा बाहेर जाण्याची वेळ येईल तेव्हा माझ्यासमोर समस्या निर्माण होईल, तुझ्यासमोर नाही. दुसरे समजून उलट करीन तर आत्मवंचना होते. सेवाग्राममध्ये असलो तर असे होऊ शकत नाही कारण तिथे तिथे मी आधीच तुझ्याकडून सेवा घेत असतो. तुला जर हा भेद स्पष्टपणे कळत नसेल तर आपण दोघेही ही बाब ईश्वरावर सोडू. ईश्वर जेव्हा आपल्याला तुझी वा माझी चूक दाखवील तेव्हा तू चूक दुरुस्त करशील वा मी करीन.

मी तर तुला सांगितलेच आहे की जोपर्यंत धुके निवळत नाही तोपर्यंत तू थांबायलाच पाहिजे. तुला जर त्याबद्दल निश्चित काही जाणवत नसेल तर तुला हवे तसे कर. दडपणाखाली काहीही करू नकोस. तेच कर ज्यामुळे तुला आत्मसमाधान मिळेल. अखेरीस तुला जे तुझे कर्तव्य वाटेल तेच तुझे कर्तव्य असेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८५

सेवाग्राम,

२५ मे १९४०

मूर्ख पोरी,

तू खरोखरच मूर्खपणाची प्रतिमा आहेस. मला तुझे पत्र मुळीच कळत नाही. मी जर तुला खोटे सांगितले असेल तर तू पापी कशी होशील? मला तुला माझ्याबरोबर ठेवायचे आहे, परंतु तुला असत्यावर विश्वास ठेवायला लावून नाही. माझे असत्य प्रेमामुळे होते. त्या प्रेमात मोह होता. त्यात तू कशी दोषी असू शकतेस? उपवास करायचा असेल तर तो मी करायला पाहिजे. परंतु मी तसे करणार नाही कारण माझे असत्य इतके अधिक पापपूर्ण नव्हते. तू जर उपवास करशील तर तू मला दुःख देशील आणि तू जे करते आहेस त्यामुळे तुझ्या चुकीत अजून भर पडेल. तू जर तुझी चूक पाहण्याकरित उत्सुकच असशील तर शांतपणे आज्ञापालन कर. मी जोपर्यंत इथे आहे सेवा तर होतच राहणार आहे. मग तुला तुझी चूक कळेल. परंतु तू जर हे सहन करू शकत नसशील तर जा. एक दिवस असा येईल की तुला तुझी चूक कळेल आणि तू हसशील. माझा विश्वस असो व नसो तू थांबण्याकरिता तुझी कारणे आहेत. मी जर बाहेर गेलो आणि तुला बरोबर नेले नाही तर तू आश्रमाबाहेर राहू शकतेस.

पळतेस कशाला? पळून जायची तुला लाज वाटत नाही काय? दू दुखावली जावी असे मी काय लिहिले? मी काय लिहिले पाहिजे? मला तुझ्या मूर्खपणाची लाज वाटते. तुझा मूर्खपणा घालवण्याकरिता मला निश्चितच उपवास करावा लागेल. हा करुण रस नाही, हास्य रस आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८६

सेवाग्राम,

२५ मे १९४०

चि. सुशीला,

मी अपमानित होण्याचा प्रश्न नाही. तूच तुझा अपमान केला आहे. परंतु तुला जर ते दिसत नसेल तर मी काहीही करू शकत नाही. मी तो माझा अपमान समजत नाही. माझे शब्द परत वाच.

आपल्या दृष्टिकोनात महदंतर आहे असे मला वाटते. तुझी समजूत पटावी म्हणून मी काय करू शकतो? मी अजून काहीही सांगू शकत नाही. लाल लाल आहे हे माणूस कसा सिद्ध करू शकतो? तू जास्तीतजास्त इतकेच म्हणू शकशील की तुम्हांला जे लाल दिसते ते मला पिवळे दिसते. मी माझ्या भावना तुझ्याजवळ स्पष्ट केल्या आहेत. मी जे म्हणतो त्यात जर तुला काही अर्थ दिसत नसेल तरे स्पष्ट करण्याकरिता मी कोणती भाषा शोधू?

इतकेच नाही तर मी जेव्हा तुला माझ्याबरोबर नेतो तेव्हाही प्रश्न नव्हता. मी हे आधीच स्पष्ट केले आहे. तेव्हासुद्धा तिथे हा प्रश्न होता. यामुळेच मी म्हणालो होतो की तुला माझ्याबरोबर ठेवण्याकरिता मी असत्याचा आधार घेतला होता.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८७

४ जून १९४०

चि. सुशीला,

काय पण तू मुलगी आहेस! आज प्रत्येकजण तुझे स्वागत करण्याकरिता तुझी वाट पाहत होता आणि मग तुझी तार आली.

आंघोळीनंतर मी बाच्या खोलीसमोरून जात असताना बाने खोकल्याकरिता मी काय करू असे मला विचारले. मी म्हणालो की तू काळजी करू नको, सुशीला आज येते आहे. ती कबूल झाली. मग मी माझ्या खोलीत गेलो आणि तिथे तुझी तार आढळली.

अशा प्रकारे तुझी वाट पाहणे सुरू होते. काल तुझी दोन पत्रे एकदम आली. एकात तू तुझ्या परीक्षेच्या निकालासंबंधी काही शंका व्यक्त केल्या होत्या. आशा आहे की तुझी शंका निराधार ठरली असेल. परंतु का माहीत नाही तुझा निकाल कळावा म्हणून मी अधीर झालो आहे. ईश्वर तुझ्या डोक्यावरील हे ओझे काढून घेवो. तू तिथे असतानाच बहुधा तुला निकाल कळेल. तुला निकाल कळला तर मला तार पाठव.

बाचा खोकला कायम आहे. तो अर्थातच सौम्य आहे. जमनालालला इथे ठेवण्यात आले आहे. त्याचे वजन भरपूर कमी झाले आहे. त्याच्या आहारावर नियंत्रण ठेवण्यात आले होते. अखेरीस त्याला किती लाभ होतो हे कळेलच.

माझी प्रकृती एकदम उत्तम आहे. वजन कमी झाले आहे. या उकाड्यात माणूस फार खाऊ शकत नाही.

सोबत प्यारेलालचे पत्र आहे. ते काल मिळाले होते. तू तिथून काय काय आणायचे यासंबंधी ते आहे. शिवाय इतरांचीही पत्रे आहेत. ती मी सोबत पाठवत आहे. तू घड्याळाबद्दलची चूक स्पष्ट करून सांगशील.

इथून पत्र गुरुवारी निघेल. तू निघण्यापूर्वी तुला ते शुक्रवारी मिळावे. यामुळे प्यारेलालला हव्या असलेल्या वस्तूंबद्दल मी तार पाठवून राहिलेलो नाही. अजून महादेव आला नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

“

१६ जून १९४०

विचित्र गोष्ट आहे. तू किती संवेदनशील आणि संशय घणारी आहेस! अशा वेळी मौन बोचते. परंतु माझ्या मौनाबद्दल गैरसमज असू नये. तरीही मला ते आवडते. जसजसे आपण परस्परांबद्दल उदार होत जातो तसतसा या प्रकाराचा गैरसमज होणे बंद होईल. मौनाचे इतरही असे अनेक लाभ आहेत की जे अनन्य आहेत.

माझ्या फाईलमध्ये मी माझ्या पद्धतीने कागद लावलेले असल्यामुळे तिला हात लावू नको असे मी सांगितले होते. कोणीही तिच्यात ढवळाढवळ करू नये अशी माझी इच्छा होती. रविवारी वा अशाच इतर दिवशी माझ्या कामात कोणीही हस्तक्षेप केलेला मला सहन होत नाही. मी इतरांशी असाच वागत असतो.

मी स्वतः पत्ते लिहिलेले आहेत कारण मी ते जलद करू शकत होतो. काहीही झाले तरी मला वालजींना पत्र पाठवायचे होते. आणि ते संपवल्याबरोबरच मला वैद्यला पत्र लिहायचे होते आणि त्यांचा पत्ता काढायचा होता. हे सर्व तुला स्पष्ट करून सांगण्यापेक्षा मी स्वतःच हे सर्व लिहिणे सोयीस्कर होते. हो तू लिहून देते म्हणून म्हणाली होतीस. मी प्रतिसाद दिला नाही कारण त्यात वेळ वाया घालवण्याऐवजी सह्या करण्याचे काम मला करायचे होते.

राहता राहिली राजकुमारीच्या लेखाबद्दलची गोष्ट. तिला तो इतरत्र कुठे तरी पाठवायचा असल्यामुळे मला तो बाहेर काढायचा नव्हता. या दृष्टीने तो तपासेपर्यंत मला तो माझ्या फाईलमधून हलवायचा नव्हता. तू तो लेख पाहिला की नाही हा विचार नव्हता. राजकुमारीचा लेख पाहण्यापासून तुला अडवण्याचा विचार नव्हता. तूच असे प्रश्न उपस्थित केले आहेत. आता सर्व काही स्पष्ट झाले काय?

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

८९

प्रवासात,

८ जुलै १९४०

मूर्ख पोरी,

मी तुला मनातून बाहेर काढू शकत नाही. तू २४ वा २५ तारखेला येशील अशी मी निश्चितच आशा करत होतो. भारतानंदनी पत्राच्या शेवटी काय लिहिले ते तू वाचले काय? ते बरोबर होते. तू यावे अशी माझी इच्छा आहे, पण तुझे चित्त शांत असेल तरच ये. ते तुझे कर्तव्य आहे. महादेव, कनू आणि प्यारेलाल जसे आले तसे यायचे असेल तर ये. माझ्या शेवटच्या वाक्याचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. देवदास आणि रामदास माझी मुले आहेत. परंतु ते माझ्यापासून दूर आहेत. तू मुलगी आहेस. ते जसे मला आहेत तशीच तूसुद्धा माझ्याकरिता नेहमीच तशी राहशील. तू दूर जरी राहिलीस तरी आपले तसेच गोड संबंध कायम राहतील जसे देवदास आणि रामदासशी आहेत. परंतु तू जर माझ्याबरोबर राहशील तर तुला माझ्या अटींवर राहावे लागेल. भूतकाळ विसर. नव्याने शांत डोक्याने विचार कर. तुला अटी घालणे शोभत नाही. तुला अटींवर ठेवणे मला परवडू शकत नाही. तू पात्र आहेस की नाही हा प्रश्न नाही. देवदास आणि रामदास निश्चितच अपात्र नाहीत? हा प्रश्न स्वभावाचा आहे. महादेव आणि इतर आले त्याप्रमाणे जर तू येऊ शकत नसशील तर याचा अर्थ असा होतो काय की तुझी इच्छा असेल तेव्हाही तू येऊ शकत नाहीस? कोणत्याही प्रकारे दुःखी होऊ नकोस.

तू जर निश्चितच येणार नसशील तर सध्याच्या स्वरूपात दवाखाना ठेवण्याचा माझा विचार नाही. तो मी तुझ्याकरिता सुरू केला होता. जोपर्यंत दुसरा एखादा डॉक्टर इथे मुक्काम करण्याचे ठरवत नाही तोपर्यंत दवाखान्याचा काहीही उपयोग नाही. इथे दुसरा डॉक्टर ठेवणे मला परवडू शकत नाही.

सोबत मी तयार असलेले गुजराती साहित्य जोडत आहे. दुसरे लेखही तयार होत आहेत. मी स्वतःच माझा आंगठा खराब केला आहे. आता तो ठणकत आहे. त्यात पू भरणार नाही अशी आशा आहे. मी त्याच्यावर पट्टी बांधीन. तू मला लिहीत राहा. हरिजन सेवक सुंदर कर. दुःखी होऊ नको.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९०

८ जुलै १९४०

चि. सुशीला,

कमीत कमी एक गुजराती लेख यासोबत पाठवत आहे. बाकी मी वर्ध्याहून पाठवीन अशी आशा आहे. आंगठ्याचे नख मला माझ्या मूर्खपणाची आठवण करून देत आहे. अधूनमधून तो दुखतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९१

सेगाव, वर्धा,

१० जुलै १९४०

चि. सुशीला,

तुला सर्व लेख रीतसर मिळाले असतील. तुझ्यावर जर वेळेचे दडपण असेल तर मी तुला मदत व्हावी म्हणून प्यारेलालचे अनुवाद पाठवत आहे. हे अनुवाद जर तू केलेले असते तर मी ते अधिक बारकाईने तपासले असते कारण उत्तम अनुवाद कसा करायचा हे मला तुला शिकवायचे आहे. प्यारेलालच्या अनुवादात अर्थाभिव्यक्ती बरोबर झालेली आहे की नाही हे पाहण्याकरिता मी तो तपासला होता. मी ती भाषा काही ठिकाणी कदाचित अधिक सोपी आणि चांगली केली असती. परंतु हे तू तिथेही करू शकतेस.

तू मला हवे ते लिहायला तू मोकळी आहेस. ही माझीसुद्धा मागणी आहे. केवळ त्या दिवसाकरिता तुला मनाई करण्यात आली होती. कोणती स्वप्ने? तू जर धष्टपुष्ट झालीस तर मी तुझी काळजी करणार नाही. मी स्वतःची शक्य ती सगळी काळजी घेईन. आज माझे वजन १११.५ पौंड आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९२

सेवाग्राम, वर्धा,

१५ जुलै १९४०

चि. सुशीला,

मला तुझे तक्रार करणारे पत्र मिळाले. तुझी आशा बरोबर आहे. खरी गोष्ट तर ही आहे की मथुरेला पोहोचण्यापूर्वीच मी तुला पत्र लिहिले होते. परंतु प्यारेलालला ते आवडले नाही. त्याचे म्हणणे मला पटले. यामुळे मी पत्र रद्द केले आणि ते फाडून टाकले. यामुळे मथुरेहून लिहिलेले पत्र राहून गेले. त्यानंतर इटारसी आणि वर्धामध्ये मी तीन पत्रे लिहिली. यामुळे तुझी आशा व्यर्थ नव्हती. होती की नाही? कबूल कर. मी तुला विसरलो तरच मी तुला लिहायला विसरतो. तू नेहमीच माझ्या डोळ्यांसमोर असतेस. प्यारेलाल तुझी अनुपस्थिती भरून काढण्याचा प्रयत्न करतो परंतु त्याला हे करणे कसे शक्य होईल? त्याला तुझ्या हातासारखे हात कुठे मिळतील? तुझ्यापेक्षाही तो मला चिकटून झोपतो, परंतु त्याचा हेवा कोणाला वाटेल? असे असले तरी तुझ्याबरोबरची निर्भयता माझ्यात आली नाही. तू करत असलेली जवळपास प्रत्येक गोष्ट प्यारेलाल करतो. मी माझ्या प्रकृतीची काळजी घेतो आहे. बा चांगली आहे.

तुला मला जे काही लिहायचे असेल ते तू मला मनमोकळेपणाने लिहू शकते. मी तुझी २४ तारखेला वाट पाहीन. माझा आदेश कायम आहे. परंतु माझ्या आदेश निरर्थक आहे. ईश्वराच्या मार्गदर्शनाचे अनुसरण कर. तुझ्या कल्याणाशिवाय माझी दुसरी कोणतीही इच्छा नाही.

तुझी काळजी घे. घेशील ना.? माताजी जे जेवण आणतात ते परत करण्यात त्यांचे आणि तुझे दोघांचेही हित आहे. समंजस मुले आपल्या आईवडिलांच्या आंधळ्या प्रेमाला चिकटून राहत नाहीत. तू जर एकदा ते अन्न परत करशील तर अवांछनीय मार्गाने त्या परत कधीही आपले प्रेम व्यक्त करणार नाहीत.

तुला लेख वेळेवर पाठवण्यात यावे म्हणून मी स्वतः त्यात लक्ष घालतो आहे. आज तीन लेख पाठवले जात आहेत. महादेवने काल तुला त्याचा गुजरातीतील लेख पाठवला. तुझ्याकडून जे काही आले आहे ते मी आज पाहीन. तू कल्पना केल्याप्रमाणे मी आज भरपूर लिहिले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९३

वर्धागंज,

१७ जुलै १९४०

डॉ. सुशीला नाय्यर

लेडी हार्डिंग्ज रुग्णालय

नवी दिल्ली

रुग्ण चांगला आहे. नियमितपणे लस टाचून घेतो आहे. (एक वेड लागलेला कोल्हा आश्रमात झोपलेल्या पाच जणांना चावला होता.)

स्नेह,

बापू

मूळ इंग्रजीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४

सेवाग्राम, वर्धा,

१७ जुलै १९४०

चि. सुशीला,

तुला माझी पत्रे का मिळत नाहीत? लक्ष ठेवून मी तुला लिहीत असतो. आज मी तुला रुग्णांबद्दल तार पाठवली. ते आराम करत आहेत. मी जेव्हा कोल्हा चावल्याबद्दल ऐकले तेव्हा तू बाजूलाच आहेस असे समजून मी तुला शोधू लागलो, आणि मग तू दिल्लीला असल्याचे माझ्या लक्षात आले.

तुझ्या सल्ल्याप्रमाणे मी केले. अनुवाद केलेली एक प्रत मी सरळ वि(योगी) ह(री)ना पाठवली. तुझ्या अनुवादाचा दुसरा भाग मी आज पाठवला. तुला या कामात भरपूर वेळ द्यावा लागत असल्याची मला कल्पना आहे. यामुळे मी ते पुढील आठवड्यात पाठवेन. पुढील आठवड्याकरिता इंग्रजी लेखातून योग्य ते लेख घे. लेखनात जेव्हा पुनरावृत्ती असते तेव्हा सर्व एकाच आठवड्यात घेता येणे अशक्य असते.

तुला रात्री स्वप्न पडणे मला आवडत नाही. ते कमीकमी होत जाऊन बंद व्हायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९५

सेवाग्राम, वर्धा,

१८ जुलै १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुला माझे पत्र कालच मिळाले असेल. कोल्ह्याने चावा घेतलेले रुग्ण चांगले आहेत. आज सातवे इंजेक्शन देण्यात आले. कुपारप्पाची (जे. सी. कुमारप्पा) प्रकृती परत काहीशी बिघडली, डोळ्यात जळजळ होत होती आणि मग दिसत नव्हते. असे जवळपास एक तास झाले. त्याला तुझी आठवण येते. तो तुला लिहिणार आहे. तिकडे मी येण्याची अफवाच समज.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९६

सेवाग्राम, वर्धा,

२० जुलै १९४०

चि. सुशीला,

मला तुझी दोन पत्रे मिळाली. मी तुला शक्य तितक्या लवकर मजकूर पाठवण्याचा प्रयत्न करत असतो. सत्या एव्हाना पूर्णपणे चांगली झाली असेल. कुमारप्पाचा रक्तदाब आता स्थिर झाला आहे. तो १७०।१२०पर्यंत गेला होता. काय करावे याचा मी विचार करतो आहे. तुला काही सूचना करायची असेल तर मला लिही. बबलोला १०४ डिग्री ताप आला आहे. आज त्याचा दुसरा दिवस आहे. अजून ताप उतरला नाही. यामुळे काल लस टोचली नाही.

मी तुला बंधनातून मुक्त केले आहे. त्यांतील इतर गोष्टी खऱ्या आहेत. वाद करण्यात काय अर्थ आहे? तू ईश्वराच्या मार्गदर्शनाचे अनुसरण केले पाहिजे. तू जर तुझा विचार बदलला नाही तर+++ तू २४ तारखेला वा मी माझा विचार बदलेपर्यंत येणार नाही असे दिसते. मला येथील परिस्थितीचा विचार करायचा असल्यामुळे मी याचा उल्लेख केला आहे. पंजाबला जर १० रुपये दिले तर इतर तिघांनाही तितकेच दिले पाहिजे. यामुळेच मी आग्रह करून राहिलेलो नाही. जास्तीचे दोन रुपये कसे द्यावे याचा मी विचार करून राहिलो आहे.

तुला माझ्याजवळील चाकू आठवत असेल. तो लाकडी पेटीत दिसत नाही. तू तो दिल्लीला तर नेला नाही? तो दिल्लीत राहून तर गेला नाही? तो कसा शोधावा?

प्यारेलाल नीट जेवू लागला आहे असे मी म्हणेन. ईश्वराची काय इच्छा आहे ते पाहू या. माझ्या मागील लेखाप्रमाणे मी इथेच कसोटीत उत्तीर्ण व्हायला पाहीजे, नाही काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९७

सेवाग्राम,

२० जुलै १९४०

चि. सुशीला,

तू किती बेफिकीर आहेस! कुमारप्पाला तू पाठवलेल्या पत्रात तीन चुका? “Answere” हा शब्द किती वेळा दुरुस्त केला आहे? “all togather” हा शब्द “alltogather” असा एक पाहिजे. “Reccord” मध्ये केवळ एक c पाहिजे. तू शब्दकोशाचा पूर्ण उपयोग केला पाहिजे. चुकीचे इंग्रजी स्पेलिंग आणि घाणेरडे अक्षर मी सहन करू शकत नाही. तू काळजीपूर्वक लिहिले तर बरोबर स्पेलिंग लिहू शकशील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९८

सेवाग्राम, वर्धा,

२१ जुलै १९४०

चि. सुशीला,

तुझे लांब भाषांतर या सोबत जात आहे. ते तपासण्याकरिता दोन तासांपेक्षा अधिक वेळ लागला नाही. मला ते अतिशय काळजीपूर्वक आणि लक्ष देऊन तपासावे लागले. तुझ्या खराब अक्षरांवरून तू घाईत होतीस असे दिसते. यामुळे ते वाचणे कठीण गेले. तू अनेक ठिकाणी अधिक स्पष्टपणे लिहू शकली असती असे तुझ्या लक्षात येईल. हा अनुवाद करणे कठीण होते. आणि इंग्रजी इतकी ओघवती होती की त्यातील विचारांचे आकलन करणे कठीण होते. हा सर्व विचार केला तर तुझा अनुवाद चांगला होता. तू जर अधिक काळजीपूर्वक हे काम केले असते तर तू हे अजून चांगले करू शकली असती. आज मी तुला दोन पत्रे लिहिली आहेत.

बबलोला आज मुळीच ताप नाही. केशवानंद आणि अप्पू हे दोघेही आज आजारी आहेत. ते स्वतःच त्याकरिता जबाबदार आहेत. तो साधा हिवताप आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

९९

सेवाग्राम, वर्धा,

२५ जुलै १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. रुग्णांबद्दल मला कळले. रुग्णालयाच्या तुझ्या मुद्द्याबद्दलही कळले. तुझा दृष्टिकोन जसा दृढ होत चालला आहे तसाच माझाही. तुला कमीपणा यावा ही गोष्ट माझे मन कधीही स्वीकारू शकत नाही. मी तुला कमीपणा आणतो आहे असे जेव्हा तुला वाटले तेव्हा खरे म्हणजे त्या भावनेपासून मी तुला वाचवण्याचा प्रयत्न करत होतो. आई आपल्या बाळाला वाचवण्याचा जसा प्रयत्न करते तसा प्रयत्न मी करत होतो. बाळाला मात्र वाटत असते की आई आपल्या प्रगतीच्या आड येते आहे. परंतु तू आणि मी बाळ नाही. यामुळे आपण याला मतभेद म्हणू या आणि या विषयावर पडदा टाकू या. याशिवाय माझ्याजवळ राहणारे नेहमीकरिता माझ्याजवळ राहणार नाहीत हे मी तुला समजावून सांगत असतानाही तुला ते पटत नाही. माझी इच्छा असेल तर केव्हाही मी त्यांना जाऊ देऊ शकतो. त्यांच्यापैकी कोणी हा अधिकार समजत असेल तर ही त्यांची चूक असेल. त्यांच्यापैकी काही जरी माझ्याजवळ सुरुवातीपासून राहत असले तरी ते तसे अशा अधिकारामुळे करत नाहीत. त्यांना असा अधिकार आहे अशा प्रकारे मी वागलो असेन, परंतु त्याकरिता कारण आहे. परंतु आताच ही चर्चा कशाला? मी तुझा निर्णय मान्य करत आहे. जेव्हा तुला राहवणार नाही तेव्हा इथे ये. इथे तुझे स्थान तर आहेच. मी तुझे स्वागत करीन. तुझ्या इच्छेविरुद्ध तुला इथे ओढून आणून मला तुला नाराज करायचे नाही.

मी तुला इंग्रजी साहित्य लवकर पाठवू शकत नाही कारण मी ते तयार करू शकत नाही.

प्यारेलालकडून मला कळले की तुला जर टाटांची शिष्यवृत्ती (वा इतर काही) मिळू शकली तर ती तुला हवी आहे. महादेव जर काही करू शकत असेल तर ठीक आहे. मग तू महादेवशी सरळसरळ का बोलत नाही? तुला जितक्या पैशांची गरज असेल तितके तू माझ्याकडून घे वा तितका पैसा उभारण्याचा मी प्रयत्न करीन. तुझ्याकरिता हा सर्वात सोपा मार्ग असेल.

तुझी प्रकृती खालावली आहे. तू तिच्यात सुधारणा केली पाहिजे अशी माझी इच्छा आणि मागणी आहे. तसे सहजपणे करता येऊ शकते.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१००

सेवाग्राम,

२७ जुलै १९४०

चि. सुशीला,

तू लिहितेस की तिथे तुझे कोणाशीही भांडण नाही आणि दुःखी होण्यासारखेसुद्धा काही कारण नाही. मला वाटते की इथे तू तुझ्या वातावरणात नसते, तिथे तू तुझ्याच वातावरणात असते हे याचे कारण आहे. तू अशा ठिकाणी आहेस आहे की जिथे असावे अशी तुझी इच्छा होती आणि जिथे तू तुझ्या मेहनतीने पोहाचली आहेस. इथे तुला केवळ परिस्थितीने आणले आहे. यामुळे तू तिथे तुझ्या स्वाभाविक परिस्थितीत आहेस. ही परिस्थिती तुझ्याकरिता अस्वाभाविक असल्यामुळे इथे भांडणे होत होती वा तुला तसे वाटत होते. हे केवळ तुझ्यासंबंधातच खरे नाही तर इतरांचीही हीच परिस्थिती आहे. मला असे वाटते की जे लोक येथील वातावरणाशी समरस झालेले नाहीत त्यांची सतत भांडणे सुरू असतात. येथील वातावरण प्रत्येकाकरिता स्वाभाविक आहे असे म्हणता येत नाही. ते जसे आहे तसेच असणार आहे. यामुळे जो या वातावरणावर प्रभुत्व मिळवायला शिकला वा ज्याची तसे करण्याची इच्छा आहे तोच इथे समाधानात राहू शकतो आणि त्याचा विकास होऊ शकतो. हे लिहिण्यामागे माझा कोणताही विशेष हेतू नाही. डॉक्टर म्हणून तुला या सर्व गोष्टींबद्दल विचार करता आला पाहिजे, आणि म्हणून माझा दृष्टिकोन तुझ्यासमोर विचारार्थ मांडला आहे.

कुमारप्पा आज इथे राहायला येत आहे. हा बदल तुझ्या पत्राला अनुसरून करण्यात आला आहे. त्याला काही विश्रांची दिली पाहिजे असा हेतू आहे. तो कोईम्बतूरला जाऊ शकला असता, परंतु तो जर इथे राहिला तर काय सुरू आहे हे मी स्वतः पाहू शकेल आणि आवश्यकता वाटली तर मला तुझा सल्ला घेता येईल. इथे जर त्याची प्रकृती चांगली राहिली नाही तर आपल्याला पर्यायांचा विचार करावा लागेल. तो तुझी आठवण करतो. तू केव्हा येणार आहेस असे त्याने कालसुद्धा विचारले होते. तू तिथे सप्टेंबरच्या मध्यापर्यंत गुंतलेली आहेस आणि तुझा पुढील कार्यक्रम निश्चित नाही असे मी त्याला सांगितले. त्याने केवळ

ऐकून घेतले. इतरसुद्धा विचारत असतात. बबलोचा ताप अजूनही कायम आहे. त्याला केवळ मलेरियावरील औषध देण्यात येत आहे. काल त्याने १५ ग्रेन क्विनाईन घेतले. केशव आणि अप्पू यांना मलेरियाने जोरदार ग्रासले हेतो. आता ते बरे आहेत. अजून त्यांनी कामाला सुरुवात केलेली नाही. आभाला बरे नाही.

आज तुझ्याकडे ३ इंग्रजी लेख पाठवण्यात येतील. आता मी पत्र लिहिणे टाळू शकत असल्यामुळे हरिजनचे काम मी माझ्या हाती घेतले आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०१

सेवाग्राम,

२९ जुलै १९४०

चि. सुशीला,

तुला सांगून ठेवतो की महादेवला जर कळले तर तो तुला शिष्यवृत्ती मिळावी म्हणून प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही. परंतु मी यात पडणार नाही. हे लिहिण्यामागे तुला दुखवावे हा माझा हेतू नाही. हीच गोष्ट तुझ्या इथे राहण्याबद्दलही आहे. मला तुझा मुद्दा कळला. मी माझी चूक कबूल करतो. तुझ्याकरिता उत्तम गोष्ट सेवाग्रामला विसरणे आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित करणेच आहे. तिथे थांबण्यात आणि शिक्षण सुरू ठेवण्यातच तुझी शांतता आणि तुझे हित आहे. ज्या गोष्टी सुटल्या त्या सुटल्या. त्यांच्याकरिता रडत बसण्यात अर्थ नाही. त्यांच्या ठिकाणी तू जीवनाचा जो अनुभव मिळवला तो वाया जाणार नाही याबद्दल मला खात्री आहे. ते पद मिळत असताना मी जर हस्तक्षेप केला नसता तर तुला आर्थिक अडचण गेली नसती. तुझ्या सध्याच्या अडचणींच्या परिस्थितीतूनही ईश्वराने कोणती योजना आखली आहे हे आपल्याला कसे कळेल?

प्यारेलालची मी जास्तीत जास्त काळजी घेत आहे. तू जे म्हणतेस ते बरोबर आहे. ईश्वर त्याचे रक्षण करील. मी काय करू शकतो?

मागील आठवड्यात तुला लेख उशिरा का मिळाले हे मला कळत नाही. ते इथून वेळेवर डाकेत टाकण्यात आले होते. परंतु आपल्या सर्व गणितात हे सेवाग्राम आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे.

राजकुमारी येईल तेव्हा हरिजन सेवकचे काम वाटून टाकण्याचा माझा विचार आहे. ते पूर्णपणे तुझ्या सोयीनुसार आणि इच्छेप्रमाणे असेल. मी तुला निवडक लेख पाठवण्याचा प्रयत्न करीन. असे केले तर तुला आवडेल काय? इंग्रजी की गुजराती? तुला तुझेच किती तरी वाचन करायचे आहे असे मला प्यारेलालकडून कळले. अनुवादाच्या कामात त्यामुळे अडथळा येणार नाही काय? त्यामुळे जर तुझ्या

आनंदात भर पडत असेल आणि तुझ्या मनावर त्याचे दडपण येत नसेल तर तू हे काम सुरू राहू देणे मला आवडेल.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - पंजाबबद्दल मी काही तरी करीन. माझी भूमिका काय आहे ते तुला माझ्या लेखावरून कळेल. मी माझ्या मनात काहीही राखून ठेवत नाही.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०२

सेवाग्राम, वर्धा,

३१ जुलै १९४०

चि. सुशीला,

तुझी तीन पत्रे एकाच वेळी मिळाली. काय झाले आणि तू येणार आहेस की नाही या भानगडीत मी पडू नये हा तुझा सल्ला मला मान्य आहे.

मी तुला जे लिहिले त्याचे तू विश्लेषण केले आणि त्यासंबंधीचे माझे मत विचारले. मी काय मत देऊ शकतो? प्रत्येक वाक्यात मला मतभेद दिसतात. तू काढलेल्या निष्कर्षांना कोणताही आधार नाही कारण तू जे गृहीत धरतेस ते मला माहीत आहे आणि ती माहिती तुझ्या निष्कर्षाच्या विरोधात आहे. मला जे सूर्यप्रकाशाप्रमाणे स्पष्ट दिसते ते तुला दिसत नाही यावर काय उपाय आहे? यावरून तुझे मन माझी साक्ष मान्य करत नाही. प्यारेलालने केलेले निदान माझ्या मते पूर्णपणे चूक आहे. सत्याकरिता मी माझ्या सहकाऱ्यांना आणि संपूर्ण जगाला दुखवू शकतो. तू म्हणतेस की तुझा प्रतिकार जेव्हा मवाळ होऊ लागला तेव्हाच मी माझा मार्ग बदलवला. यावरून असे दिसते की या बदलाकरिता बाह्य कारणे नव्हती. देवदास काय म्हणाला याला मी निश्चितच महत्त्व देत नाही. माझ्याविरुद्ध झालेला तो त्याच्यातील बदल आहे. अशा प्रकारे प्रत्येक गोष्टीत तुझे आणि माझे मत वेगवेगळे आहे असे दिसते. अशा परिस्थितीत काय करता येऊ शकते? यामुळे तू शांत व्हावे असा माझा तुला सल्ला आहे. ते पत्र विसर. हे पत्रसुद्धा विसर. हे सर्व प्रकरण आपण ईश्वरावर सोडू या.

मी लेखांबद्दल समजू शकतो. लेखात तिथे केलेली दुरुस्ती तू तिथेच करवून घे. हे कसे करायचे याचा तू तिथेच विचार कर. समाजाशी संबंधित माहिती आपण प्रकाशित करणार नाही. ती आवश्यक नाही. दुरुस्त केल्यानंतर पुढील लेख मी पाठवला आहे. मला मुळीच घाई नाही.

तू लुधियानाला लिहिले काय? तू लिहिले नसशील तर लिहिण्याची आवश्यकता नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०३

सेवाग्राम, वर्धा,

१ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

तुझे विचार दुरुस्त करून पाठवण्याऐवजी ते जसे येतात तसे पाठवलेले चांगले राहील. असे केले तर मी तुला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकेन. तुझ्या तिन्ही अटी जेव्हा पूर्ण होतील तेव्हाच तू इथे ये. परंतु तू अटींची काळजी का करतेस? तू तेव्हाच येशील जेव्हा तुला आल्याशिवाय राहवणार नाही. मग एकाही अटीकरिता वाव राहणार नाही. सध्या तरी आपण वेगवेगळ्या दिशेने जात आहो असे दिसते. यामुळे सध्या तू इथे येण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

तुझी जिथे आवश्यकता आहे असा तुझा विश्वास आहे तिथेच तू सुखी राहू शकशील. तुला माझा सहवास आवडतो. मनात जतन करून ठेवण्यासारखी ही गोष्ट आहे. ती मिळवता येऊ शकत नाही. ही गोष्ट जर मिळाली तर ती ईश्वराची कृपा. ती मिळावी म्हणून इच्छा करूनच आपण समाधान मानावे. मला नेहमीच मणिलालचा सहवास हवाहवासा वाटत असतो. परंतु मी जर त्याला इथे बोलावले तर तसे त्याच्या कर्तव्याच्या आड येऊनच करता येईल, नाही काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०४

सेवाग्राम,

४ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

किती लांब पत्र आणि किती कठोर परीक्षा! तू जर इथे असतीस तर मी तुझे कान धरून ओढत आणले असते आणि इतकेच नाही तर एकदोन थापडाही लगावल्या असत्या. परंतु तू फार दूर असल्यामुळे मी तुझ्या पत्राचे उत्तर दिलेले आहे. मी तुझ्या पत्राचे उत्तर आरामात देणार आहे. परंतु तुझी इच्छा असेल आणि मी तुझ्या अटी मान्य करीन तेव्हाच तू यावे अशी माझी इच्छा असल्यामुळे तू सेवाग्रामला विसरायला पाहिजे असे मी लिहिले होते. माझ्या अटीवर तू आजसुद्धा येऊ शकते. परंतु तू माझ्या अटींचे पालन करणार नाही आणि तुझ्या अटी मान्य कराव्या इतक्या पुरेशा प्रमाणात मला त्या कळत नाहीत. मी. तुला जे सेवाग्राम विसरण्याकरिता सांगतो आहे ते यामुळे. तिथे निदान तुला तुझे काम आहे. इथे मला माझे काम आहे, ते तुझे कधीही झाले नाही. मी जे लिहिले ते यामुळे. तुला कळत नसल्यामुळे म्हणा वा पुरेसे कळत नसल्यामुळे म्हणा तू जर येणार नसशील तर मी तुला माझ्यापासून वेगळे केले असे तू कशावरून म्हणू शकते? त्याकरिता तू अनुवादाचे काम का सोडायला पाहिजे? “जे मन रामाच्या भक्तीचा दैवी स्रोत टाकून देते आणि दवाच्या काही बिंदूंवर आपल्या आशा केंद्रित करते ते किती मूर्ख असले पाहिजे?”

तुला अनुवादाचे काम करायचेच आहे. मी तुझ्यावर विसंबून असल्यामुळे मी इतरांकडून ते काम काढून घेतले हे तुला माहीत नाही काय? मी इथून जरी अनुवाद पाठवले तरी जबाबदारी तुझीच असेल. तू केलेला अनुवाद कसा आहे हे मी लोकांना विचारत असतो. बलवंतसिंह म्हणतो की तो ओबडधोबड आहे. महादेव आणि बबलोचे म्हणणे आहे त्यात काही थोड्याशा चुका आहेत. वडील आणि मुलगा दोघेही हिंदीचा चांगलाच अभ्यास करत आहेत. यामुळे तुला भरपूर त्रास घ्यावा लागेल. तू इतका वेळ देऊ शकशील की नाही हे मला माहीत नाही. तू यावर विचार केला पाहिजे. वियोगीजींना (वियोगी हरी, संपादक हरिजन सेवक संघ) ‘हरिजन सेवक’च्या कामात आता रस वाटत नाही असे मला वाटते. जर असे असेल तर तूसुद्धा अडचणीत

येशील. तू त्यांना वेळोवेळी भेटायला पाहिजे. त्यांच्या अनुपस्थितीत कोण काम करते हे तू शोधून काढायला पाहिजे. अशा प्रकारे तुझ्याकडून 'हरिजन सेवक'ची जबाबदारी काढून घेण्याचा माझा मुळीच विचार नाही. हं, इतके निश्चित आहे की 'हरिजन सेवक' तिथून हलवण्याचा माझा विचार आहे. (पाहा, "वाचकांना" २ सप्टेंबर १९४०) ते एक तर इथे आणले जाईल वा पुण्याला त्याचे मुद्रण केले जाईल. ते जर इथे येईल आणि इथे न येण्याचा तुझा निर्धार जर कायम असेल, तर आपले जे सुंदर संबंध आहेत ते संपतील. ते सुंदर आहेत कारण त्यात कोणत्याही संघर्षाला संधी नाही, आणि माझ्या कल्पनांच्या तू फार जवळ नाहीस. परंतु ते जर संपले तर त्यांचा दोष पूर्णपणे मी तुला देईन. माझ्या सर्व पत्रांचा थोडक्यात सार हा आहे. तुला माझ्यात सामावून टाकण्याचा मी प्रयत्न करतो आहे, पण तू जर माझ्यापासून दूर पळून जाण्याचा प्रयत्न करत असशील आणि मला दोष देत असशील तर मी काय करू शकतो?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०५

सेवाग्राम,

५ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

मला जेव्हा मोकळा वेळ असेल तेव्हा मी तुझ्या पत्राचे उत्तर देईन. तुला जर एखादी नोकरी सहजपणे मिळत असेल तर तू ती करावी हे सांगण्याकरिता हे पत्र. तू मला इथे माझ्या कामाकरिता हवी आहेस. यात माझ्या देहाची काळजी घेण्याचाही समावेश असू शकतो. तुला हे मान्य नाही असे दिसते. तू केवळ डॉक्टर म्हणून माझी सेवा करण्याकरिता येशील आणि मी हे मान्य करत असेन आणि इतरांचा विरोध नसेल तरच तू इथे येशील असे दिसते. अशक्यप्राय गोष्ट मागण्यासाराखे हे आहे. माझ्या अटीप्रमाणे जेव्हा केव्हा तुला शक्य असेल तेव्हा तू इथे ये. पत्ते तुझ्या हातात आहेत, माझ्या नाही.

बबलोने तुझा एक अनुवाद तपासला आहे. त्याने केलेले बदल फार चांगले असल्याचे मला आढळले. त्यात काही ढोबळ चुका आहेत. दुसरा अनुवाद अजून चांगला आहे. परंतु त्यात अशा गोष्टी आहेत की ज्यांशिवायही भागू शकते. तुला मदत व्हावी म्हणून मी ते दुरुस्त करून घेतले आहेत. जे काही आज तयार आहे ते मी पाठवत आहे.

तू अस्वस्थ दिसत होती असे मीराबाई सांगत होत्य. त्यांनी वापरलेला शब्द 'ऍब्सेंट माईंडेड' आहे. तू अजून रोड आणि अशक्त आहेस. ही उणीव भरून काढता येऊ शकते.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०६

शेगाव, वर्धा,

८ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

यासोबत मी अजून दोन लेख जोडत आहे. दोन लेख नगपूरला डाकेने पाठवले आहेत. अशा प्रकारे तुला एकूण चार लेख मिळतील.

तू शांत असशीलच. सध्या इथे पाऊस येऊन राहिलेला नाही. सर्वांची प्रकृती चांगली आहे. शकरीबेन (शकरीबेन चि. शाह) आल्या होत्या पण आज परत जात आहेत. आनंद परत आजारी पडला आहे. शारदा एकटी तिच्या मुलांकडे पाहू शकत नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०७

शेगाव, वर्धा,

८ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

१. तू सेवाग्राममध्ये रस घेतला हे खरे आहे, परंतु तेथील काम जसे तू तुझे कर्तव्य समजते तसे तू येथील काम समजत नाही. तुझे अंतःकरण सेवाग्राममध्ये नाही. मी जिथे असतो तिथे ते असते.

२. एकदम भांडणे होत नसतात. तुला जर ते भांडण वाटले नसते तर काहीही झाले नसते. माझी कागदपत्रे पाहिल्यावाचल्याशिवाय तू पराचा कावळा केला.

३. मी सांगितलेली गोष्ट कठोर परंतु चिरंतन सत्य होती. "नवीन लोकांना जुने टिकू देत नाहीत" हे तुझे वाक्य वस्तुस्थितीला धरून नाही. तुझे निरीक्षण जर बरोबर असते तर आज जितक्या गतीने आश्रम वाढत राहिला आहे तितका वाढत राहिला नसता.

४. मी तुला उंच उचललेलेही नाही आणि तुझा अधःपातही केला नाही. परंतु तू इतकी संवेदनशील आहेस की तुला माझ्यावर अन्याय करण्यातही संकोच वाटत नाही. बापू बदललेला नाही, परंतु तुला तो बदललेला दिसतो. तुझ्या मोठ्या मनामुळे तू त्याला माफ केले ही वेगळी गोष्ट आहे.

५. ईर्षा होती हे खरे आहे परंतु ती तुझ्याबद्दल नव्हती. तुला जर हे कळले असते तर तुला जो इतका त्रास झाला तो होण्याची आवश्यकता राहिली नसती.

६. प्यारेलाल म्हणतो की तुझा सर्व गैरसमज झालेला आहे. परंतु प्यारेलालला तू जे सांगितले त्यावर त्याचा जर खरोखरच विश्वास असेल तर तो मला मुळीच ओळखत नाही. बापूचे पूर्ण जीवन आतील आणि बाहेरील विरोध सहन करण्यात व्यतीत झाले आहे, त्याला शरण जाण्यात नाही. चुकीच्या पद्धतीने तडजोड करण्याऐवजी मी नेहमीच सहकाऱ्यांना गमावणे मान्य केले आहे.

७. विरोध जेव्हा थांबू लागले तेव्हा मी माझ्या भूमिकेत बदल केला. यावरून दिसत नाही काय की त्याचा विरोधाशी संबंध नव्हता?

८. मी माझी भूमिक बदलवली हेसुद्धा मला मान्य नाही. मी तुला सत्य काय आहे ते स्पष्ट आणि सिद्ध करून सांगितले आहे. माझी भूमिका बदललेली नाही असा माझा दावा आहे.

९. हे खरे आहे.

१०. परंतु जो मला केंद्रस्थानी समजतो त्याला स्वतःला आपण सुरक्षित आहो असे वाटले पाहिजे. हा दृष्टिकोन घेण्याऐवजी तू तुझ्या स्वतःच्या मनाचे अनुसरण केले आणि मग तू गोंधळली.

हे सर्व तुझ्या २९ जुलै १९४० च्या पत्राचे उत्तर आहे.

आता २ ऑगस्ट १९४०च्या पत्राविषयी.

१, २, ३ - मी कलकत्त्याला जाईपर्यंत तुझा अनुभव गोड होता आणि नंतर तो कटू झाला तर तो तू सहन करायला पाहिजे होता. तू असे करू शकली नाही कारण तू सेवाग्रामला आपले कार्यक्षेत्र आणि कर्तव्यक्षेत्र मानले नाही. तुझे कृतीक्षेत्र केवळ मी होतो. ते मुळातच चूक होते. मी कोणाचेही कृतिक्षेत्र व्हायला नको. ईर्षेचे कारण यात दडलेले आहे, याबाहेर नाही.

४. मी तुला उन्नतावस्थेत नेले हे सत्य नाही.

५. याचे उत्तर वर दिलेले आहे.

अजून नवीन काहीही नाही.

आशा आहे की हे तू वाचू शकशील. माझ्या उत्तराने तुझे समाधान होईल अशी अपेक्षा मी कसा करू शकतो?

आपण एकाच गोष्टीचा दोन वेगवेगळ्या दृष्टीकोनातून विचार करत आहो इतके जरी तू मान्य केले तरी माझे समाधान होईल. परंतु तू हे सर्व विसर आणि नव्याने सुरुवात कर. असे माझ्याकरिता करायचे नाही तर माझ्या कामाकरिता. जेव्हा केव्हा तुला यायचे ठरवावेसे वाटेल तेव्हा ये. या वेळी तू तुझ्या

कर्तव्यक्षेत्रात आहेस. त्याचे तुला चांगले प्रशिक्षण मिळालेले आहे. ते सुरू राहू दे. नंतर तुला जर येणे योग्य वाटले तर तू येऊ शकतेस. जोपर्यंत आपले दृष्टिकोन वेगवेगळे आहेत तोपर्यंत तू जरी आलीस तरी तुला शांतता मिळणार नाही. प्यारेलाल हे तुला जास्त चांगल्या प्रकारे समजावून सांगेल. तुझ्या अनुपस्थितीत सध्याच्या स्वरूपात मी रुग्णालय सुरू ठेवू शकत नाही. हे तुझे आहे. आता तू गेलेली असल्यामुळे त्याच्याकडे पाहणे मला सहन होत नाही. परंतु केवळ रुग्णालयाकरिता तू परतलेलीही मला सहन होऊ शकत नाही. माझ्या दृष्टीत तुझा वेगळाच उपयोग होता आणि आहे. त्यात रुग्णालयाचा समावेश असू शकतो, परंतु ती वेगळी गोष्ट आहे. आपले रुग्णालय होते आणि आता ते बंद होते आहे याचे तू वाईट वाटून घेण्याचे वा दुःखी होण्याचे कारण नाही. अशा गोष्टी मी तुझ्याकरिता स्थापनही करू शकतो आणि त्या बंदही करू शकतो. माझी घडण ही अशी आहे. मला जे आवडतात त्यांच्याकरिता मी नेहमीच असे खर्च करत आलो आहे. मला तर तुझे कल्याण हवे आहे, मग ते कुठेही होवो.

आशीर्वाद,,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०८

शेगाव, वर्धा,

१४ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मी तुला काय लिहू? तुझ्याजवळ सर्व प्रश्नाची उत्तरे आहेत. आपण जर एखाद्या गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून पाहिले तर आपल्याला तोच अनुभव येईल. परंतु आपण विरुद्ध दृष्टिकोनातून पाहत असू तर आपल्याला आलेला अनुभव एकच नसेल आणि प्रत्येकजण आपापल्या दृष्टिकोनावर ठाम असेल. आपल्या बाबतीत असेच घडते आहे. ईश्वर आपल्यामध्ये आहे. आपल्याला त्याचे मार्गदर्शन मिळो. नवल याचे वाटते की मी जर एक वाक्य मान्य केले तर तू त्याच वाक्याची मागणी करतेस. तू म्हणतेस की मी तुला महादेव इत्यादींच्या श्रेणीत ठेवतो. माझे म्हणणे आहे की तू दुसऱ्या कोणत्याही पद्धतीने विचार केलेला नाही. परंतु तुझ्याकरिता इतके पुरेसे नाही. मी महादेवला जशी वागणूक देईन तशीच तुला देतो काय याची तूच परीक्षा घे आणि मी जर त्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालो तर तू मला टाकून दे. आश्चर्य म्हणजे या अशा तुझ्या गोष्टींवर तुलाच हसू येत नाही. परंतु तुझे मन तुला कोणत्याही गोष्टीकडे सरळपणे पाहूच देत नाही. अशा परिस्थितीत मी इतकेच म्हणू शकतो की तुला जे हवे होते ते मी तुला दिलेले आहे याबद्दल शंकाच नाही. जेव्हा तुला हे कळेल तेव्हा ये. रुग्णालय अस्तित्वात आहे की नाही याची तुला काळजी का? ते जर अस्तित्वात नसेल आणि तुझी इच्छा असेल तर तुझ्याकरिता ते परत उघडता येईल. रुग्णालयाकरिता वा ते अस्तित्वात असण्याच्या अटीवर तर तू निश्चितच येणार नाहीस? माझे मन त्याविरुद्ध बंड करून उठते. तुझ्याशिवाय दवाखान्याकडे पाहिले की मला वेदना होतात. तुझ्याकरिताच तो दवाखाना काढण्यात आला होता. त्यामुळे तुला काही समाधान मिळेल अशी मला आशा होती. आणि याच दवाखान्यामुळे तुला पळून जाण्याकरिता प्रेरित केले ही किती दुःखाची गोष्ट? आणि आता तू म्हणते की तुम्ही जर तो दवाखाना बंद केला तर त्याकरिता आलेला खर्च मी देईन. व्वा! तुझ्याजवळ खूप पैसे आहेत असे दिसते. त्यातून तू जे काही पाठवशील ते घेण्यात मी संकोच करणार नाही. तुझ्याकडून उत्तर यावे म्हणून मी हे सर्व लिहिलेले

नाही. वाद करून काहीही साध्य होणार नाही. मला वाटते आता आपण हे प्रकरण बंद केले पाहिजे. काळ त्याचे काम करील.

'हरिजन सेवक'च्या व्यवस्थेबद्दल सांगायचे तर प्यारेलाल इंग्रजी मजकुराचा हिंदुस्तानील अनुवाद पाठवील आणि तू गुजरातीतून हिंदीत अनुवाद करशील. राजकुमारी आणि महादेव गुजराती मजकुराचा इंग्रजीत अनुवाद करतील. ही सध्याची व्यवस्था आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१०९

सेवाग्राम, वर्धा

ऑगस्ट १९, १९४०

चि. सुशीला,

तू काय पण मुलगी आहेस! तू स्वतःवर सर्व दोष घेते आहेस. तुझ्या अनुवादाबद्दल मी जर इतका असमाधानी असतो तर मी तुझ्यावर इतकी मेहनत घेतली असती काय? असे असमाधान असते तर 'हरिजन सेवक' तिथून हलवले असते काय? हे तर मोट तयार करण्याकरिता म्हैस मारण्यासारखे होईल. मी जर असमाधानी असेन तर मग तुझ्याकडून अनुवादाचे काम का काढून घेऊ नये आणि इतर कोणाला का देऊ नये? पुण्यात मुद्रणाच्या सोयी अधिक चांगल्या आहेत आणि 'हरिजन सेवक' अधिक आकर्षक करण्याचा मोहही आहे. त्याचे परिचलन नाममात्र आहे. हरीजी स्वतःच लिहितात की ते जर पुण्याला हलवले तरच त्याचा खप वाढू शकतो. याची जबाबदारी घेऊ शकणारा तिथे कोणीही नाही. तुझ्या कारणाकरिता ते जर हलवावे लागले तर तसे करताना मला खरोखरच वाईट वाटेल. परंतु तसे करणे जर माझे कर्तव्य असेल तर मला किती जरी वाईट वाटले तरी मी ते हलवीन. आपण आशा करू शकतो की आपण जेव्हा 'हरिजन सेवक' पुण्याला हलवू तेव्हा तू तिथे गेलेली असशील. 'हरिजन सेवक'शी संबंधित लोक इथे आले होते. मी त्यांना सांगितले की सुधारणेची कल्पना तुझी आहे. सोलीचे पत्र आहे आणि त्यात ते म्हणतात की निम्मे खर्च देण्याची त्यांची तयारी आहे. तू इथे नाहीस आणि तू आल्यानंतरच सुधारणा केल्या जातील असे मी त्यांना लिहिले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ इंग्रजीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११०

२६ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

एका आठवड्यापासून तुझे एकही पत्र नाही. तुझी काही पत्रे मला प्यारेलालने दाखवली नाही असे त्याचे म्हणणे आहे. मला वेळ नव्हता, आणि तुझ्याकडून एकही पत्र नसल्यामुळे मी तुला लिहिले नाही. आज तू प्यारेलालला लिहिलेले पत्र मी पाहिले. तुझ्या मूर्खपणाला सीमा नाही. येण्याकरिता मी तुला आग्रह करणार नाही. सध्याच्या मानसिक परिस्थितीत जर तू इथे आलीस तर तुला इथे समाधान वाटणार नाही. तू जे मागते आहेस ते खरे म्हणजे तू मागायला नको आणि मला जरी ते देणे शक्य असेल तरी मी ते तुला द्यायला नको. यामुळे हे प्रकरण संपल्यासारखे समज. यामुळे कोणतीही अट न घालता तुला जेव्हा माझ्याकडे आल्याशिवाय राहवणार नाही तेव्हा माझ्याकडे ताबडतोब ये आणि माझ्याशी एकरूप हो.

तिथे तू पूर्णपणे अनासक्त भावनेने राहायला पाहिजे. मगच तू सुखी होशील. तू जेव्हा घरी जाशील तेव्हा तू पाहुणी म्हणून तरी जा वा डॉक्टर म्हणून जा. घरगुती भानगडीत स्वतःला गुंतवू नकोस. तू कमाई करू लागली तर बरे होईल. मग तू आईची भूक शमवू शकशील. तुझ्या स्वतःच्या विशेष गरजा नाहीत. तुझी बचत माझ्याकडे पाठवण्याचा मोह सोड. तू जर नोकरी करू लागशील तर तू अनेक ठिकाणी सामावून घेतली जाऊ शकशील. माझी मदत नाकारून तू पुण्य करून राहिलेली नाहीस तर पाप करते आहेस. तुला माझी मुलगी होण्याची लाज वाटते काय? माझी मुलगी म्हणून लीलावती स्वतःची ओळख करून देते. तुझा खोटा अभिमान मला खातो आहे.

मोहनलाल आणि शकुंतला यांनी माताजींपासून दूर राहायला पाहिजे. माताजींचे स्थान इथे आहे. पारनेरकरची आई इथे राहत असते. ती परत येणार आहे. महादेवची आई येतजात असते. ती त्याची सावत्र आई आहे. प्यारेलालच्या आईने इथे प्यारेलालजवळ का राहू नये? त्यांच्याकरिता स्वतंत्र स्वयंपाकघराची व्यवस्था करण्याकरिता मी तयार आहे. असे केल्याने खर्चाचा प्रश्न सुटेल. सर्व वाद संपतील. आणि पैसा नसल्यामुळे येणारा हलकटपणा निघून जाईल. ही स्वाभाविक व्यवस्था आहे. पाहुण्याप्रमाणे माताजी

मोहनलालकडे अधूनमधून जाऊ शकतील. तुझ्यावरील जड ओझे निघून जाईल. तू जर शांत झालीस तर सर्व काही ठीक होईल. मी जिवंत राहिलो तर तू माझी मुलगी झाल्याशिवाय राहणार नाहीस. याची मला घाई नाही, आणि तुलाही असू नये.

'हरिजन सेवक'मधील चुकांची मुन्नालालने तयार केलेली यादी सोबत जोडली आहे. पहिली चूक स्पष्ट आहे आणि ती घोडचूक आहे. इतर चुका मी घाईघाईत पाहिल्या. त्यांतील काही चुका चुका नसतीलसुद्धा. बाकीच्या महत्त्वाच्या नाहीत.

पुढील आठवड्यात बहुधा 'हरिजन सेवक' पुण्याला हलवले जाईल. व्यवस्था करण्याकरिता चंद्रशेखर (चंद्रशेखर शुक्ला) तिथे शनिवारी येईल. तुझ्यापेक्षा परिस्थितीच्या अधिक माहितीवर माझे निर्णय आधारलेले आहेत यावर विश्वास ठेव. तुझ्यात जर असा आत्मविश्वास असेल तर तुला शांत वाटेल. याचा अर्थ तू इथे धावत यावे असा नाही. परंतु याचा अर्थ तू नम्र व्हावे असा आहे. तुझ्यात जर नम्रता असेल तर माझ्या निर्णयासंबंधात तुला कधीही शंका येणार नाही. तू प्रश्न विचारण्याकरिता मोकळी आहेस. परंतु माझ्या उत्तरांवर तुझा विश्वास असला पाहिजे. यावर विचार कर.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१११

२६ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. याबाबतीत तुझे डोके खरोखरच बिघडलेले आहे. तू माझ्या बुद्धीवर विश्वास ठेवला पाहिजे. काहीबाही कल्पना करून तू विनाकारण स्वतःला त्रास करून घेते आहेस. तुझ्यात पात्रता नाही असे कोण म्हणते? तू जर अपात्र असतीस तर इतक्या अंतरावरून तू पात्र आहेस असे मी कसे म्हणालो असतो? यामुळे तुझे समाधान का होऊ नये? तू इथे त्याच अटींवर राहशील ज्या अटींवर महादेव, चिमणलाल, कृष्णचंद्र इत्यादी राहतात. तू महादेव आणि चिमणलालमध्ये अंतर करतेस हा तर तुझ्या मूर्खपणाचा कळस झाला. मूर्खपणाच्या या खड्ड्यातून तू बाहेर पडायला पाहिजे.

सीमल्याला जाताना राजकुमारीचे भिंतीवर लावायचे काळे घड्याळ सोबत नेण्याचा माझा विचार होता. व्यवस्थित ठेवण्याकरिता मी ते तुला अथवा प्यारेलालला दिले होते. तुला त्याबद्दल काही आठवते काय?

हरिजन सेवकबद्दल मी आधीच लिहिले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११२

सेवाग्राम, वर्धा,

ऑगस्ट २८, १९४०

चि. सुशीला,

आज मी रात्रीच्या एक वाजेपासून जागा होतो. रात्री तीन वाजता मी प्यारेलालला उठवले आणि त्याला काही कागद आणायला सांगितले. हे पहिले पत्र आहे. झोप न येण्याकरिता तू काही एकमेव कारण नाही. माझी इतर कामेही त्याकरिता कारणीभूत आहेत. तू त्याचे मुख्य कारण असल्यामुळे मी पहिले पत्र तुला लिहीत आहे.

प्यारेलालने काल मला तुझी पत्रे दिली. हे त्या पत्रांचे उत्तर आहे. माझा कार्यक्रम निश्चित नाही. मी उपवास करणार आहे की नाही हेही मला माहीत नाही. दोनपैकी एक मार्ग निश्चित आहे. तुला याची कल्पना असली राहिजे. याकरिता तू तुझ्या कार्यक्रमात बदल करण्याची आवश्यकता नाही.

तुला दवाखान्याने सेवाग्रामपासून ओढून नेले याचा अर्थ तिथे जर रुग्णालय नसते वा तू निवासी डॉक्टर नसतीस तर माझ्याबरोबर फिरायला जाण्याचा वा न जाण्याचा प्रश्न निर्माण झाला नसता.

तू माझी तुलना महादेव वा देवदासशी करावी हे योग्य नाही. पहिली गोष्ट म्हणजे तू महादेववर फार मोठा अन्याय करते आहेस. त्याला तुझ्याबद्दल मुळीच मत्सर वाटत नाही. इतकेच की आता तो तुझ्या प्रभावाखाली नाही. याकरिता मी मला स्वतःला जबाबदार समजतो. असे मी तुम्हा दोघांच्याही हिताकरिता केले. महादेवला तुझे हित हवे आहे याबद्दल माझी अजूनही खात्री आहे. शक्य झाले तर तो तुझी सेवा करील आणि ती सेवाही मनःपूर्वक करील. तू त्याला ओळखत नाहीस. देवदासबद्दलचे तुझे मत बरोबर आहे. त्याच्या मनात जर तिरस्कार असेल तर तो तुझ्याबद्दल नाही तर माझ्याबद्दल असेल. त्यामागे त्याचे सखोल ज्ञान आहे. परंतु माझ्या परिस्थितीची त्या दोघांच्या परिस्थितीशी तुलना करता येत नाही. माझ्या वर्तनात तुला आढळणारा बदल केवळ तुझ्या हिताकरिता आहे, सत्याकरिता आहे. माझ्या सद्हेतूच्या व्यवहारातही तुला असमाधान दिसते हा तुझा किती मूर्खपणा आणि अविचारीपणा ! अशा विचारातून मुक्त हो. हे तुला

शोभत नाही. हे चूक आहे. मी उचललेल्या पावलात असमाधान वाटण्यासारखे काहीही नाही. शक्य आहे की जाणताअजाणता मी तुझ्याशी चांगला वागलो नसेन. मला त्यात केवळ शुद्धतम न्याय आणि शुद्धतम प्रेम दिसते. तसे काही नसेल तर मी सत्याग्रही राहणार नाही. मग मी संघर्ष करण्याकरिता पात्र राहणार नाही.

सेवाग्रामला येण्याकरिता मी तुझ्यावर बळजबरी करणार नाही. तू दूर राहण्यातच तुझे भले आहे. तू डॉक्टर आहेस ही गोष्टच तुझ्या आडवी येत आहे. तू डॉक्टर असल्यामुळे तुझे स्थान सेवाग्राममध्येच आहे असे अनेकदा मला वाटते. जोपर्यंत डॉक्टर म्हणून तुझी उपयोगिता मी सेवाग्रामपर्यंत सीमित ठेवत नाही तोपर्यंत मी तुला महादेवप्रमाणे इकडेतिकडे नेऊ शकत नाही. मी जर असे केले तर मी माझ्या कर्तव्यानुसार वागलो नाही असे मला वाटेल. तू याउलट विचार करतेस. यामुळे जोपर्यंत आपल्या कर्तव्याबद्दल आपले दृष्टिकोन विरोधी आहेत तोपर्यंत तुझ्या प्रतिभेचा उपयोग मी कसा करू शकतो? तुझी वैद्यकीय सेवा इतर कोणाकरिताही उपलब्ध नसावी असे मी कसा काय ठरवू शकतो? दर क्षणी मला तुझी गरज जाणवते. बा तुझ्याकरिता तळमळते. कोणी आजारी पडला की त्याला तुझी आठवण येते. यामुळे मी आधी जे काही म्हणालो असलो तरी तुझे स्थान आश्रमातच आहे असे मला पदोपदी जाणवते. परंतु आरशात प्रतिबिंब दिसावे त्याप्रमाणे तुला ही गोष्ट जोपर्यंत स्पष्टपणे दिसत नाही तोपर्यंत तुझे इथे येणे निरर्थक असेल. एकदा का हा मुद्दा तुला स्पष्टपणे समजला की मग मी तुला माझ्याकरिता बाहेर नेतो की नाही या गोष्टीला तुझ्याकरिता महत्त्व नसेल.

तुला नोकरी मिळेल अशी आशा आहे. तुझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित कर. कठोर परिश्रमाशिवाय मिळवलेल्या पदवीला काय अर्थ? तू काय केले पाहिजे असे तू मला विचारतेस. माझे उत्तर असे आहे. तुला तेव्हाच शांतता मिळेल जेव्हा तू पूर्णपणे डॉक्टर होशील. त्यातच तुझा आनंद असेल.

माताजी वगैरेंबद्दल मी जे लिहिले त्यावर मी कायम आहे. बाकी तू सर्व विसर.

केवळ मी तुला मार्गदर्शन करावे, प्यारेलालने नाही यावर माझ्यात आणि प्यारेलालमध्ये सहमती झाली आहे. तो स्वतंत्रपणे कोणतेही मार्गदर्शन करणार नाही. त्याच्यात असे करण्याची क्षमता नाही. त्यालाच मार्गदर्शनाची आवश्यकता असताना तो तुला कसा काय मार्गदर्शन करील? मग तू त्याच्याकडून

पत्राची अपेक्षा का करतेस? तो काय लिहील? निदान तुझ्यासंबंधी तरी तो तुला काहीही लिहू शकत नाही. त्याने तुला नेहमीच आश्रमासंबंधी बातम्या दिल्या पाहिजे काय? मी त्या इतर कोणाकडूनही द्यायला लावू शकतो. तू त्याला गोपनीय पत्र लिहिणे पूर्णपणे बंद करावे असा माझा तुला सल्ला आहे. आवश्यक असेल तेव्हा मला लिही. तू पत्र जपून ठेवते हा तुझा फार मोठा दोष आहे असे मी समजतो. लिहिलेल्या पत्रांचे स्वरूप काहीही जरी असले तरी ती जपून ठेवण्याची आवश्यकता काय? प्यारेलाललासुद्धा ही वाईट सवय आहे. मी त्याला ती सोडायला लावणार आहे. तू मला जे कोणते पत्र लिहिशील ते मी वाचेन आणि फाडून टाकीन. मी ते परत प्यारेलालला देणार नाही. मी तुलाही ते परत पाठवणार नाही. माझी पत्रेसुद्धा फाडून टाक असे मी तुला म्हणेन. ज्या पत्रात मी काही तरी महत्त्वाचे वा मूल्यवान लिहिलेले असेल ते तू जपून ठेवू शकते. परंतु जी पत्रे तुला आवडली नाही वा ज्यात तुला माझ्यात केवळ दोषच दिसतात ती जपून ठेवणे चूक आहे. वडीलधारे वा प्रियजन यांच्या दोषाचे रडगाणे सारखे गात बसू नये. आणि त्यांचा संदर्भसुद्धा जपून ठेवू नये. आता प्रार्थनेची घंटा झाली आहे. ईश्वर तुझे सदा रक्षण करो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११३

३१ ऑगस्ट १९४०

चि. सुशीला,

परवा प्यारेलालने मला तुझे पत्र दिले होते. काय पण पत्र आहे ! माझ्याबद्दल अशी शंका का? मी तुझ्याबद्दल जे काही म्हणालो त्यात तुझी निंदा नव्हती, त्यात केवळ प्रेम होते. मी तुझे पत्र कोणालाही दाखवले नाही. माझी पत्रे कोणीही वाचू शकत नाही कारण माझ्या हातातून ती सरळ प्यारेलालकडे जातात. तुझ्या पत्राची आणि त्यांचे उत्तर देण्याची मी जितकी काळजी घेतो तितकी माझ्या या जन्मात दुसऱ्या कोणाच्याही पत्राची मी घेतली असेल असे मला आठवत नाही. मला तर काही अटी घातल्याचीही जाणीव नाही. तुझ्या येण्याबद्दल मी तुला निश्चित उत्तर दिलेले नाही. काल मी स्पष्ट शब्दांत केवळ लीलावती मुंशी यांच्या प्रश्नाचेच उत्तर दिले होते. "त्या इथे कायम राहण्याकरिता येणार नव्हत्या. त्यांच्याकरिता दवाखाना केवळ खेळभांड्यासारखा होता. त्यांना नोकरी मिळण्याची आशा आहे. जर ती त्यांना मिळाली तर त्या सध्या तरी येणार नाहीत. त्या मुळीच येणार नाहीत हे जर मला कळले तर मग दावाखान्याचे काय करावे हा मला विचार करावा लागेल." प्यारेलालने तुला पत्र लिहावे अशी जबाबदारी मी घेऊ शकत नाही. आणि माझ्या मते तर त्याने तुला मुळीच लिहू नये. मी जे काही लिहितो तेवढ्यावरच तुझे समाधान झाले पाहिजे.

'हरिजन सेवक' पुण्याला हलणार आहे. पुणे आवृत्तीकरिता तिथून तू जर काही मौलिक लिहू शकली तर मला आनंद होईल. अनेक विषय आहेत. तू जर आरोग्य आणि साफसफाई इत्यादींसंबंधी सुंदर हिंदीत एक लेखमाला लिहू शकली तर त्यामुळे तुझ्या ज्ञानाचीही उजळणी होईल आणि लेखक म्हणून तुझे कौशल्यही वाढेल. डॉक्टरने तुला लिहिलेले पत्र मला आवडले नाही. सल्ला घेण्याइतका वेळ असता तर मी कडक उत्तर तयार केले असते आणि तुला अर्ज परत घ्यायला लावला असता. तू असहाय झालेली मी पाहू शकत नाही. अशा प्रकारे मिळवलेल्या नोकरीत कोणती प्रतिष्ठा आहे? परंतु झाले ते झाले.

मला कदाचित सिमल्याला जावे लागेल. लीलावतीचे पत्र वाचण्याकरिता मी तुझ्याकडे पाठवत आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११४

सेवाग्राम,

४ सप्टेंबर १९४०

चि. सुशीला,

या दुरुस्त्या तुझ्या करमणुकीकरिता आहेत. आणि तुझ्याकरिता दुसरी मजेदार गोष्ट - पुण्याबद्दल महादेवभाईंनी जे काही 'हरिजन सेवक'मध्ये लिहिले ते कोणीही वाचले नाही. राजकुमारी आणि बबलोने खूप मेहनत घेऊन ते पूर्ण केले आणि ते काल पाठवले. आणि आता ते भाषांतर आधील छापलेले आढळते. तो तुझाच अनुवाद आहे हे निश्चित. त्यात मूळ गुजरातीवरून असा उल्लेख नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११५

८ सप्टेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. प्यारेलालला तुझे जे पत्र आले ते त्याने काल मला दाखवले.

माझ्या निरागस उद्गारांवरून तू काय पण निष्कर्ष काढला ! मी तुझी पत्रे इतरांना दाखवतो, तुला लिहिलेली पत्रे मी इतरांना वाचायला लावतो हाच विचार तू तुझ्या मानलेल्या वडिलांबद्दल करतेस काय? असे असेल तर तू त्याला पूर्णपणे टाकून दिले पाहिजे. मग त्याला लिहितेस तरी कशाला? तू त्याच्यावर विश्वास कसा ठेवू शकशील? ठीक आहे, झाले ते झाले.

सेवाग्रामचे लोक आले आणि म्हणाले की आम्हांला सुशीलाबेन हवी. मी म्हणालो की मलासुद्धा तिची गरज आहे, परंतु हे माझ्या हातात नाही, मी तिला लिहीन. मी त्यांना अजून कोणते उत्तर देऊ शकत होतो? माझ्याजवळ उत्तर होते पण मी ते त्यांना कसा सांगू शकत होतो? मला लिही म्हणजे ते मी त्यांना आणि इतरांना सांगू शकेन.

आता तुझ्या प्रश्नाचे उत्तर. मी जसा महादेवला सगळीकडे घेऊन जातो त्याप्रमाणे तुला वाटते की माझी डॉक्टर म्हणून मी तुला सगळीकडे घेऊन जावे. कधी काळी तुला योग्य वाटले तर आश्रमातील रुग्णांकरिता तू थांबूही शकशील ही वेगळी गोष्ट आहे. दर वेळी मी असे करू शकत नाही असे मी तुला सांगितलेले होते. डॉक्टरवर इतक्या प्रमाणात विंसबून राहण्याची माझी इच्छा नसल्यामुळे मी जर असे केले तर तो माझा अधःपात होईल. हे तुला माहीत असूनही तू मला परत असे विचारते हे तुला शोभत नाही. तू विचारावी अशी ही गोष्टच नाही. परंतु तुझी मागणी मान्य न करून मी चूक करतो आहे असे जर मला वाटेल तर तुझी क्षमा मागून मी माझी चूक दुरुस्त करीन. मी जर तुझ्याशी याहून काही वेगळे बोललो असेन तर मी तेव्हा चूक केली होती असे तू समज. तुला इतकी साधी गोष्ट कळत नाही याचे मला आश्चर्य वाटते. म्हणूनच मी सर्व काही ईश्वरावर सोपवले आहे. त्याची इच्छा असेल तसे तो करील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११६

८ सप्टेंबर १९४०

चि. सुशीला,

प्यारेलालने काल कुठे मला तुझे पत्र दिले. तू लिहिले असशीलही. तू जे लिहिले ते आज तुझ्याच हातात आहे. त्यामागे केवळ एकच गोष्ट आहे आणि ती अगदीच चूक आहे. न कळत का होईना तू त्या शक्तीला तुझा अधिकार समजू लागली आहेस. कर्तव्य म्हणजे अधिकार नाही, ते कर्ज आहे, जबाबदारी आहे. तुला जे काही करण्याकरिता सांगण्यात आले आहे त्यावर तू समाधान मानायला पाहिजे. मी जर मृत्यूशैय्येवर असतो तर मी तुमची केस तेव्हाच घेईन जेव्हा तुम्ही माझ्या अटी मान्य कराल, आणि नाही तर नाही असे तू म्हणाली असतीस काय? जर असे नसेल आणि तू म्हणालीस त्याप्रमाणे मी क्षणभरसुद्धा डॉक्टरशिवाय राहायला नको कारण केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. हे जर खरे असेल तर मी कितीही जरी नाही म्हणालो असतो तरी तू माझी सोबत सोडायला नको होती. परंतु हा केवळ युक्तिवाद आहे. मी हा युक्तिवाद केला म्हणून तू युक्तिवाद केला. बाकी तर ईश्वरच खरा आहे. आपण केवळ त्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे चालायला पाहिजे. माझ्या दृष्टीने तू सदैव माझ्याबरोबर असते. मी तुझ्यापासून कधीही दूर गेलो नाही आणि जाणार नाही. तुझी अनुपस्थिती मला खटकते. परंतु तुझ्या उपस्थितीकरितासुद्धा मी कर्तव्याची किंमत देऊन सौदा करणार नही.

तुझ्या वरीष्ठांना उपवासाबद्दल लिहून तू फार मोठी चूक केली आहे. तुझ्यातील हा भोळेपणा माझ्याकरिता नवीन गोष्ट आहे. मी तुला हे सांगितले कारण मी तुझ्यापासून काहीही लपवत नाही. मला तुला पटवून द्यायचे होते, परंतु तू हे माताजी वा मोहनला सांगायला नको. याचे तुझ्या अंतःकरणातच दफन झाले पाहिजे. मी याबद्दल देवदासलासुद्धा लिहिले नाही. आशा आहे यामुळे तुला काही त्रास होणार नाही. तू काहीही करण्याची आवश्यकता नाही. तू वाईटसुद्धा वाटून घ्यायला नको. ही घोडचूक आहे यात काही शंका नाही. परंतु आता याबद्दल काहीही करता येत नाही. याचे परिणाम भोगण्याची तुझी तयारी असली पाहिजे. हा तुला टोमणा नाही तर सावधगिरीची सूचना आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११७

मुंबई,

१८ सप्टेंबर १९४०

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज महाविद्यालय रुग्णालय,

नवी दिल्ली

आनंद झाला. ईश्वर तुझे कल्याण करो.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११८

तार.

१८ सप्टेंबर १९४०

डॉ.. सुशीला नाय्यर

लेडी हार्डींग्ज महाविद्यालय - रुग्णालय

नवी दिल्ली

प्रसन्नता झाली. ईश्वर तुझे भले करो.

मूळ इंग्रजीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

११९

१९ सप्टेंबर १९४०

चि. सुशीला,

प्यारेलालने मला तुझी दोन पत्रे उशिरा दिली. ते स्थान मिळण्याबद्दल मला शंका होती. ते मिळाले म्हणून मला फार आनंद झाला. तू तुझ्या पदाला शोभा आणशील याबद्दल मला शंकाच नाही. काल माझी तार तुला मिळाली असेल. जे झाले ते अगदी योग्य झाले असे मी समजतो. तुझ्याकरिता तेच वातावरण उपयुक्त आहे आणि तेच तुझे क्षेत्र आहे. मी काहीही जरी केले असते तरी तुला असमाधानाचे कारण मिळतच राहिले असते. तिथे तुझा मार्ग स्पष्ट आहे. तू तुझी महत्त्वाकांक्षा पूर्ण कर आणि एम. डी. हो. यानंतरचा मार्ग ईश्वरच सुचवील.

आपल्यामध्ये जे गैरसमज आहेत ते ईश्वराची जेव्हा इच्छा असेल तेव्हा तोच दूर करील. सध्या तरी त्याबद्दल काहीही विचार करायचा नाही.

मी पत्र न लिहिण्याबद्दल तुझी तक्रार अगदी व्यर्थ आहे. यात राजकुमारीची काय तुलना? मणिलाल, रामदासशी तुलना का करत नाही? आवश्यकता असल्यानंतर तुला निश्चितच लिहिले आहे. अशा बाबतीत महत्त्व व्यक्तीला नसते तर कामाला असते.

बापूचे आशीर्वाद

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२०

२० सप्टेंबर १९४०

चि. सुशीला,

सोबतच्या पत्राने घाबरण्याचे कारण नाही. मी तुला लांब पत्र लिहिणार आहे. उद्या ते लिहिण्याचा प्रयत्न करीन. तू तुझ्या कामाला लाग. ते आवश्यक आहे असे समजतो. मी तुम्हा दोघांचाही वडील असल्यामुळे प्यारेलालला वेगळे लिहिण्याची आवश्यकता नाही. बाकी उद्या.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२१

२१ सप्टेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझी चिठ्ठी मिळाली. आजही तुला लांब पत्र लिहिणार नाही. देवदासचे पत्र मला पाठव. तू प्यारेलालची काळजी करू नकोस. तो चांगला आहे. आता त्याच्याशीच बोलतो आहे. गोष्टींचा विषय तर तूच असू शकते.

तुला चष्म्याची गरज पडते आहे यात मला तर तुझाच दोष दिसतो. परंतु आवश्यक आहे तर घे आणि डोळे वाचव.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२२

२२ सप्टेंबर १९४०

चि. सुशीला,

आज तर इतकेच. इथून बुधवारी निघून आम्ही तिथे (दिल्लीला) पोहोचत आहो. त्याच दिवशी सायंकाळी सिमल्याला जाऊ. तिथे शुक्रवारी पोहोचायचे आहे. वेळ असेल तर स्थानकावर येशील. नसेल तर जेव्हा येऊ शकशील तेव्हा.

डॉ. सुशीला नाय्यर,
लेडी हार्डींग्ज महाविद्यालय,
नवी दिल्ली

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२३

दिल्ली,

२६ सप्टेंबर १९४०

चि. सुशीला,

आल्याबरोबर मी लगेच तुझ्याबद्दल विचारले. मला तर वाटत होते की तूच मालीश करशील. तू नक्की ६ वाजता येशील असे मोहनलालने सांगितले होते. या आधी तुला मोकळा वेळ नसेल. एवढ्यानेही माझे समाधान झाले नाही. यामुळे फोन करायला लावला. उत्तरात तुझी चिठ्ठी आणि तीही कशी? मला तर तुझ्याशी प्यारेलालबद्दल बोलायचे होते. तुझे बरेचसे सामान आणले आहे. तू आणि विधात्याने जो काही विचार केला असेल तो सहन करावाच लागेल. तू सिमल्याला यायला तयार असशील तर मी न्यायला तयार आहे. तुझे पत्र धक्कादायक आहे. परंतु त्यातूनही तुझे दुःख दिसून पडते. या दुःखाने मी दुःखी होतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२४

आगगाडीतून,

२ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

काल तू मला फार दुःख दिले. पण दिले हे चांगले केले. यामुळे मला तुझ्या अंतःकरणात खोलवर रुजलेले दुःख दिसू शकले. तरीही तू माझे म्हणणे कबूल केले, मालीश केली आणि परतही आली. हे सर्व मला फार आवडले. तुला काही शांत वाटले असेल. दे(वदास)ने तुम्हा दोघांमधील पत्रव्यवहार मला दिला. मी तो सर्व वाचला. देवदासने माफी मागितली. हे स्पष्ट आहे. परंतु तुझ्यावरील त्याचा राग कायम आहे. तुझ्या उत्तरात तुच्छता नाही, तिरस्कार नाही, दोष नाही. त्यातील शब्दाशब्दात तुझी विशुद्धता, निर्भयता स्पष्टपणा टपकताना दिसतो. तुझ्या पत्रात मला मुळीच दोष दिसला नाही. याने देवदासला पाझर फुटला पाहिजे. तू दुःखी होऊ नकोस. माझ्याआधी तर महादेवने हा (पत्रव्यवहार) वाचला होता. त्यालासुद्धा तुझ्या पत्रात कोणताही दोष आढळला नाही. मी ही पत्रे रा(ज) कु(मारीला)ही दाखवली. तिचे नाव तर त्यात येतच असते. तिने ती वाचली आणि विचारण्याआधीच यात काही दोष नाही, देवदास तुझ्यावर अन्याय करतो आहे असे ती म्हणाली.

तू नियमितपणे पत्र लिहीत जा. तू जेव्हा केव्हा येशील तेव्हा माझ्याजवळ तुझे स्थान असेलच. तू तुझी परीक्षा दे आणि मग लगेच तू माझ्याजवळ यावे असे मला फार वाटते. प्यारेलालची काळजी करू नको. तुझ्याकरिता तर मी आई आणि वडील दोन्ही आहेच, आता प्यारेलालचेही स्थान मी घेतले आहे, अशा प्रकारे तीन झाले. प्यारेलालने त्याच्या कामाशिवाय इतर गोष्टींपासून अलिप्त राहण्यातच त्याचे हित आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२५

४ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

तुला पत्र लिहिले होते. मिळालेच असेल. तू बरोबर खात नाहीस हे चांगले नाही. महादेव तक्रार करत असतो. तुझ्याबरोबर झालेल्या गोष्टींचा सार सांगत असतो. प्यारेलालची काळजी करू नको. तो आपले काम करत असतो. तू चांगली व्हावे हीच इच्छा.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२६

सेवाग्राम,

५ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

प्यारेलालने तुला लिहिलेले पत्र दिल्लीहून परत आले आहे. आता ते परत पाठवतो आहे. हे समजून घे आणि शांत हो. त्याचे सर्व ठीक सुरू आहे. तू मला प्या(रेलाल)च्या ठिकाणी समज आणि आणि कसे तरी निभवून घे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२७

६ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

माझी पत्रे तुला मिळतच असतील. तुझ्या पत्रांचा लिफाफा काल रात्रीच प्या(रेलाल)ने मला दिला. ते वाचले म्हणूनच हे लिहायला बसलो. तुझे दुःख जसे तुझ्याकरिता असह्य आहे तसेच माझ्याकरितासुद्धा असह्य आहे. तू शांत का होत नाहीस? मी चूक करो, अन्याय करो, अ.(मतुल) स.(लाम) काहीही म्हणो, महादेव काहीही म्हणो, सर्वांचे म्हणणे तटस्थ राहून ऐकून घे आणि सहन कर. तू म्हणशील तर तुला पत्र लिहिण्याची सर्वांना मनाई करीन. मी तर लिहितच राहीन. तू तुझ्या परीक्षेची निर्विघ्नपणे तयारी करशील आणि तुला सर्व प्रकारच्या सोयीसवलती मिळतील याची मला खात्री आहे.

प्या(रेलाल)ला तू पत्र लिहीत असतेच. त्याने तर तुझ्याकरिता उत्तरही लिहून ठेवले होते. परंतु मी त्याला अडवले. त्याने लिहायचे नाही असे एकदा ठरल्यानंतर त्याने त्यावर दृढ राहणेच चांगले. प्या(रेलाल)ला हे पटले, यामुळे तुला त्याचे पत्र मिळणार नाही. यात मला तुझेही सहकार्य हवे आहे. परंतु त्याच्या पत्राशिवाय जर तू अस्वस्थ होणार असशील तर त्याला लिहायला लावीन. मी तर हा निर्णय तुझ्या आणि त्याच्या हिताच्या दृष्टीनेच सुचवला आहे. अशा प्रकारच्या संयमाने तुम्हा दोघांचाही लाभ होईल याबद्दल माझी खात्री आहे. परंतु तुला वेगळे वाटत असेल तर मला हा संयम ठेवायला लावायचा नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२८

७ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

काल एक गोष्ट लिहायला विसरलो. सिव्हिल सर्जनच्या पत्रात तू शंकरला 'बॉय' म्हणाली आहेस. इंग्रजी भाषेत हा शब्द फार तुच्छ समजला जातो. बॉयचा अर्थ होतो चपराशी वा त्या दर्जाचा माणूस. तू शंकरचे नाव लिहायला पाहिजे होते. मी ते पत्र पाठवलेले नाही. परंतु त्याला सांगितले आहे. कदाचित तो आपले औषध घेऊ शकणार नाही. महादेवला विचारीन. तो आमच्या अटींवर घेईल तर देईन.

सि(व्हिल) स(र्जन)ला कांचनला दुरुस्त करता आले नाही. तिला मुंबईच्या के. इ. एम. रुग्णालयात पाठवावे असा सल्ला त्यांनी दिला आहे. मला तिला तुझ्याकडे पाठवावेसे वाटते. तू जर तिला घेऊ शकत नसशील तर साफ साफ सांगशील. तिला तुझ्याकडे पाठवल्यानंतर पैसे पाठवण्याशिवाय दुसरी कोणतीही काळजी राहणार नसल्यामुळे मी असे म्हणतो आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१२९

सेवाग्राम,

९ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

तुझी पत्रे तर दिसत नाहीत, पण मी हार मानणार नाही. इतके लक्षात ठेव की तू नसल्यामुळे माझ्यावर अतिशय ओझे पडत आहे. शरद फार आजारी आहे. ताप तर १०४ वर जात असतो. १०२ च्या खाली उतरत नाही. ओरडत होती म्हणून काल सव्वादोन तास तिच्या खाटेजवळ बसलो. ती झोपली तेव्हा उठलो. सिव्हिल सर्जनला बोलावले. त्याने औषध दिल्यानंतर ती झोपली. आता उठूनच राहिलेली नाही. शंकर फार आजारी आहे. प्राथमिक बस्तीची त्याला फार भीती वाटते. जीवराजने त्याला मुंबईला पाठवायचे कबूल केले आहे. परंतु तुझ्या मताची वाट पाहतो आहे. तू हट्ट धरला नसता तर माझे ओझे कमी झाले नसते काय? परंतु हे तर आता होऊन गेले. सध्या तरी तुझा धर्म तोच आहे. परंतु उपयोगी गोष्टी लिहायला पाहिजे असे मला वाटले.

प्या(रेलाल)चे ठीक सुरू आहे. तो स्थिरावेल अशी आशा आहे. जास्त माझ्या धैर्यावर अवलंबून असणार आहे. प्रकाशने सिमलाच्या ठिकाणाकरिता जो अर्ज केला होता तो मंजूर झाला आहे. त्यानंतर प्या(रेलाल)ला विचारले, प्या(रेलाल)ने मला विचारले. कोणी दुसऱ्या कामाकरिता हजार रुपये जरी दिले तरी ते काम सोडता येत नाही असे मी त्याला म्हणालो. बेतिया असे ठिकाण आहे की जिथे स्वातंत्र्य आहे, अनुभव आहे आणि गरिबांची सेवाही आहे. यामुळे त्याने तिथे चिकटून राहायला पाहिजे. प्या(रेलाल)लाही माझे म्हणणे योग्य वाटते, तुझे काय मत आहें?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३०

सेवाग्राम,

११ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

या पत्रासोबत कांचन येऊन राहिलेली आहे. सि(व्हिल) स(र्जन)चा अहवाल सोबत आहे. आता मी कां(चन)च्या बाजूने निश्चिंत होतो आहे. मला लिहीत राहा.

दुसरी जी भेट पाठवून राहिलो आहे ती आहे पंजाबरावची. आपल्याला पाच-सहा महिन्याकरिता कुठे तरी पाठवावे अशी पंजाबरावची मागणी होती. नंतर तो पूर्णपणे आश्रमाचा होऊन राहील. त्याला तुझ्याकडे पाठवावे असा आज रात्री माझ्या मनात विचार आला. आता तुला जर त्याला रुग्णालयाचे काम देता येत असेल तर दे. तुला जर त्याला हरिजन कॉलनीत ठेवायचे असेल तर ठेव. तिथे वियोगी हरी जे काही काम सांगतील ते तो करील. तुला जर त्याचे ओझे होणार असेल तर दुसऱ्याच ट्रेनने वा तुला शक्य असेल त्या ट्रेनने त्याला परत पाठवू शकतेस. तुझी परवानगी घ्यायला वेळच नव्हता. यामुळे पंजाबराव केवळ कांचनला सोडण्याकरिता आला होता असेही तू समजू शकतेस. प्या(रेलाल) चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३१

सेवाग्राम,

१३ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुझी पत्रे जेव्हा देवदासजवळ जातात तेव्हा त्यांच्यावर त्याची मालकी होते. देवदास जेव्हा तुझे उघडे पत्र देतो तेव्हा त्याच्यावर काही बंधन तर नसते, अजून मी काय समजू? आणि तुझ्याकरिता यात लाज वाटण्यासारखी काही गोष्टही नव्हती. मी तर हितावह समजूनच ती पत्रे दिली होती. माझ्या नावाने लिहिलेली पत्रे कोणाला देणे ही एक गोष्ट आहे आणि तू मनाई केल्यानंतरही दुसऱ्या कोणाला पत्र दाखवणे हा तर विश्वासघात आहे. तरीही त्या पत्रांतून ज्ञान मिळवणे वेगळी गोष्ट आहे. तू जर या गोष्टीच्या खोलात उतरलीस तर तुझ्या लक्षात येईल की त्या पत्रातून मिळणाऱ्या ज्ञानाचा जर उपयोग केला नाही तर त्याचा अर्थ पत्र लिहूच नये असा होईल. तू जर मला तुझा हितेच्छू समजत असशील तू हा विश्वास ठेवला पाहिजे की मी जर या पत्राचा उपयोग करीन तर तो तुझ्या हिताकरिताच करीन.

तू विचारतेस की "इतरांनीही तुला पत्र लिहू नये" याचा अर्थ काय? तुला रा(ज) कु(मारी)चेही पत्र आवडत नाही. यामुळे मी तुला विचारले, "तुला इथून कोणीही पत्र लिहू नये अशी तुझी इच्छा आहे काय?" मीराबेनने असे केले आहे.

तुझ्याशिवाय दुसरा कोणीही तिला लिहू शकत नाही. तुझी इच्छा असेल तर सेवाग्रामवासीयांबद्दल असे करता येऊ शकेल. मी माझे वजन वाढू देऊ नये असे रा(ज) कु(मारी)च्या पत्रात तू लिहिले आहे. सध्या १०४ पौंड आहे. याहूनही अधिक वाढू द्यायचे नाही काय? याहून कमी होणे अधिक चांगले राहील काय?

कांचन आणि पंजाबराव तिथे पोहोचले असतील.

प्या(रेलाल) ताळ्यावर येतो आहे असे जवळपास समजता येऊ शकते. मला वाटते की तो ताळ्यावर येईल. प्रकृती चांगली असते. कामात गुंग असतो. माझ्याबरोबर कार्यकारिणीच्या सभेलाही येत असतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३२

सेवाग्राम,

१४ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

किती नवल आहे, ज्या वेळी शरदकरिता तू इथे यायचा विचार केला त्याच वेळी मी तुला बोलावण्याकरिता तार करायचा विचार केला. मोठ्या मुश्किलीने मनाला अडवले. तार केली तर तू येशीलच हे मला माहीत होते पण मला तुझी कींव आली. दोनचार दिवसांकरिता काय बोलवायचे? किती आजाऱ्यांकरिता तुला बोलावू? यामुळे तिला ईश्वराच्या मांडीवर ठेवून झोपून गेलो. मागील दोन रात्री तिच्याकरिता आणि माझ्याकरिता फार कठीण होत्या. रात्री जागायचो तेव्हा ती रडत असायची. दोन रात्री ती फार रडली. एकदा तर तिच्याजवळ दोनदा प्यारेलाललासुद्धा पाठवले. एकदा तर मी स्वतः गेलो आणि तिला झोपवूनच परत आलो. परंतु तुझ्या मनात स्वतंत्रपणे विचार आला हे मला फार आवडले. आता तर ती चांगली झाली आहे. ताप मुळीच नाही. अशक्त झाली आहे. पिचकारीने फार मळ बाहेर पडतो. रेचक जाणूनबुजून देऊन राहिलेलो नाही. हे बरोबर आहे ना? अकबर फार अशक्त झाला आहे. व्यवस्थित खातो. त्याला काही शक्तीवर्धक दिले पाहिजे काय? विजया (विजया मनूभाई पंचोळी), शारदा (शारदा गो. चोखावाला) आलेल्या आहेत. दोघींचेही वजन फार कमी झाले आहे. शारदा तर अगदी काडी झाली आहे. पाहवत नाही. तिचे काय करावे? अशा सर्व लोकांना तुझ्याकडे पाठवीन तर तुला दवाखानाच उघडावा लागेल.

सध्या मी दररोज पत्र लिहीत असतो. सर्वांचे उत्तर मागत नसतो, परंतु पोच मिळावी अशी इच्छा जरूर असते. लिहिशील तेव्हा मागील पत्राची पोच दिली तर भरपूर होईल.

माझे अक्षर समजण्यात खूप त्रास होतो काय? गुजरातीत लिहिणे चांगले राहील की हिंदीत?

हरिजन सेवककरिता तू आरोग्यावर टिपणे लिहिणार नाहीस काय? या आधीही मी तुला हे सूचित केले होते.

कांचन जर वाईट वाटून घेणार नसेल तर तिला जनरल वार्डमध्ये ठेव. रुग्णालयाने दिलेले खाणेच चांगले राहील असे मला वाटते. याबाबतीतसुद्धा तुम्हा दोघींनाही जे उचित वाटेल ते करा.

मोटाबद्दल तर आश्चर्यच मानावे लागेल. मी चौकशी करीनच. यापुढे वेगळी व्यवस्था करत जाईन. इथे तर उलटच झाले. रामापेक्षा नाव मोठे आहे हे तुलसीदासने शिकवले आहे. इथे तर नावाने काहीही काम झाले नाही. ही माझीच चूक मानली जाईल काय? माझे इतके पुण्य नाही की ते माझ्यापेक्षा जास्त काम करेल. माझ्या मृत्यूनंतर माझ्या अनुभवाची एकूण बेरीज केली तर माझ्या नावाला काहीही किंमत नाही हेच उत्तर मिळेल. चिंतामणीने भविष्यवाणी केलीच आहे की माझा मृतदेह तुटलेल्या चरख्याने जाळला जाईल. हे तुझ्याकरिता विनोद म्हणून.

प्यारेलाल खरोखरच ताळ्यावर येतो आहे असे वाटते.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३३

सेवाग्राम,

१४ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

आज तुला लांब पत्र लिहिले पण एक गोष्ट लिहायला विसरलोच. लिव्हरचे वा दुसरे कोणतेही इंजेक्शन द्यायचे असेल तर देशील. कांचन स्वतःहोऊन याचा विरोध करील असे मला वाटत नाही. टाळता येत असेल तोपर्यंत अशा गोष्टी टाळाव्या.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३४

सेवाग्राम,

१७ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. कांचनच्या संबंधात तुला सर्व सूट दिली आहे. पंजाबरावला जे देता येऊ शकते ते द्यायला लाव. त्याचे बिल माझ्याकडे पाठव.

तुझ्या पत्राबद्दल कळले. जे व्हायचे होते ते झाले. मला त्याची लाजही नाही, पश्चात्तापही नाही. तुझी मनोभावना समजतो, तिचा मान ठेवीन. मी तुझ्या पत्राचा दुरुपयोग केला नाही. जास्त चर्चाही केली नाही. परंतु आता तर तितकेही करणार नाही. ना तुला लिहिण्याकरिता कोणाला सांगेन. जे आपोआप होणार असेल ते होऊ दे. आपण आपले सर्व मतभेद ईश्वराच्या चरणी अर्पण करून टाकू या. त्याला जसे मार्गदर्शन करायचे असेल तसे तो करील.

विजया सतत रोड होत चालली आहे. शारदा काळजीत पाडते आहे. शरद, विनोदिनी चांगले होत चालले आहेत. ताप तर मुळीच नाही. बा उद्या येईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३५

सेवाग्राम,

१८ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मी तुला कालही पत्र लिहिले होते. कांचनला लिव्हरचे इंजेक्शन देण्यासंबंधी विसरलो होतो. यामुळे त्याच डाकेने वेगळे पत्र पाठवले. असे दिसते की तुला ते मिळाले नाही. याचा अर्थ ज्याला टपालपेटीत टाकायला सांगितले होते त्याने ते त्याच दिवशी टाकले नाही. अखेरीस तुला ते मिळाले की नाही हे आता मला लिहिशील. मी तुला लिहिले होते की जे काही तुला द्यायचे असेल ते दे. विजया, शारदाबद्दल पाहीन. शारदा फार घाबरते आहे. १६ पौंड वजन कमी झाले आहे. तिला पाठवायचे तर तिच्या मुलाचा (आनंद गो. चोखावाला) प्रश्न निर्माण होईल. विजयाकरिता विचार करतो आहे.

शारदाबद्दल कळले. रेचक तर मी देऊ दिलेच नाही. इंजक्शननेच काम भागवतो आहे. तरीही तू सावध केले हे चांगले केले.

पंजाबरावचे काय आहे? तुझ्यावर अकारण ओझे व्हायला नको.

बाने आज यायले पाहिजे होते, पण आली नाही. परंतु आजउद्या यायला पाहिजे.

मोटारीबद्दल कळले. तू जो अर्थ करतेस तो मला बरोबर वाटत नाही. मी त्याच्या मुळात जाईनच. परंतु असे अनुभव जीवनात येतच राहणार आहेत.

माझ्या संकटात तू येण्याचा विचार करते आहेस ही माझ्याकरिता फार आश्वासक गोष्ट आहे.

सध्या माझ्यावर कामाचे ओझे फार जास्त आहे. कसे निपटवावे कळत नाही. परंतु जोपर्यंत ईश्वराला माझ्याकडून काम घ्यायचे असेल तोपर्यंत तो मला निभवून घेत राहील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३६

सेवाग्राम,

२० ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

तू ग्लीसरीन एनिमाबद्दल लिहितेस. याचा अर्थ असा तर नाही की सोडा, मीठ वा परमँग्नेटची बस्ती टायफाईडमध्ये देऊ नये? मी तर नेहमीच अशा प्रकारे बस्ती देत आलो आहे.

कांचनचे पत्र वाच आणि ते तिला दे. ती कशी आहे?

इथे तर दवाखाना भरत चालला आहे. वसुमतीही आज आली आहे. दासप्पा विशेषतः संधीवाताकरिता आले आहेत. वालजीभाई कुटुंबासह उद्या येत आहेत. अजूनही किती तरी आहेत. उभे राहण्याकरितासुद्धा जागा नाही असे म्हणता येईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३७

सेवाग्राम,

२२ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

हे वाच आणि याचे उत्तर सरळ वा माझ्यामार्फत पाठव. त्याचे वजन १२० पौंडांपर्यंत गेले आहे. परंतु बद्धकोष्ठता असते. का? वरिआवा (राकोटमध्ये यांनी गांधीजींवर उपचार केला होता.) म्हणतात की कुंवरजींना (कुंवरजी पारीख, ते क्षयरोगाने आजारी होते.) सध्या थंड हवेची गरज आहे. यामुळे ते राणीला (कुवरजी पारीखची पत्नी) घेऊन कांतीकडे (कांतिलाल गांधी) म्हैसूरला गेले आहेत.

सुरेंद्र तुझ्या वेळेपासूनच तिथे आहे काय? काहीही करून त्याचा दमा का दुरुस्त होत नाही? संधिवाताची एक कठीण केस मी घेतली. त्यांची काळजी मीच घेत असतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३८

सेवाग्राम, वर्धा

२३ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

माझ्या अर्थाचा अनर्थ करण्याचा तू धंदा सुरू केला आहे काय? मी जेव्हा म्हणालो की "आम्ही आपल्याला परमेश्वराच्या हाती समर्पित करू" तेव्हा त्याचा अर्थ 'एक तर तुला कळेल वा मला कळेल आणि मग तुला यावेच लागेल' असा होतो. मग मी पत्र का लिहू नये? अशाच प्रकारे इतर गोष्टींचा अर्थ समजून घे.

तू वैयक्तिक पत्र वेगळे लिहिले हे चांगले केले. यामुळे ज्या पत्रात कांचन वगैरेसंबंधी लिहिलेले होते ते त्यांना वाचायला देऊ शकलो. यापुढे असेच कर.

शारदाकरिता तू जसे सांगतेस तसेच करीन. जर येणार असेल तर एकटीलाच पाठवेन. पाहीन.

कुंवरजींविषयी महादेवने तुला लिहिलेच असेल. त्याबद्दल तू तुझे मत सांग.

माझ्याजवळ नावे तर बरीच आली आहेत, त्यातील दोन वगळता बाकी सर्व स्त्रियांची नावे आहेत. त्यांतील तू ज्यांना ओळखतेस अशा थोड्याशा आहेत. परंतु याचा अर्थ असा नाही की यांतील कोणाला तरी मी पाठवणार आहे. सध्या माझा दृष्टिकोन वेगळा आहे. सर्व काही ईश्वराधीन आहे. तो जसे म्हणेल तसे करीन.

सध्या तुझा आहार किती आहे? वजन किती आहे? शरीर बारीक तर करत नाहीस? अभ्यास कसा सुरू आहे? चांगल्या प्रकारे सुरू आहे ना?

कदाचित हरिजन वगैरे बंद करावे लागतील. सेंसॉरला दाखवल्याशिवाय सत्याग्रहाबद्दल लिहिता येणार नाही अशी सूचना मिळाली आहे. (या संबंधात गांधीजींनी वत्तपत्रांना दिलेल्या वक्तव्याकरिता पाहा "वृत्तपत्राना वक्तव्य", २४ ऑक्टोबर १९४०) अशा बंधनात राहून वर्तमानपत्र चालवू शकत नाही. माहीत होईलच.

सोबत प्रकाशचे पत्र आहे.

तू नियमितपणे मला पत्र लिहीत राहायचेच आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१३९

सेवाग्राम,

२६ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

आता 'हरिजन' आणि त्याचे गु(जराती) आणि हिं(दी) संस्करण बंद झालेले असल्यामुळे लिहिण्याकरिता तुला विनंती करण्याची आवश्यकता नाही. तुला काय काय सोडायला लावले?

कांचनच्या प्रकृतीत सुधारणा आहे असेच मानायचे ना? पंजाबरावचे योग्य वाटेल तसे कर.

तिथे येण्याकरिता शारदा काचकुच करते आहे. दोन दिवसांपूर्वी इथे एक फार सज्जन मुलगी आली आहे. अंगात ताप भरला आहे. हिवताप आहे की विषमज्वर काही कळत नाही.

परवा सेवाग्राममध्ये एक वेड लागलेले गिधाड घुसले. दोनतीन लोकांना जखमी केले. आश्रमात जाळे तर आहे. चौकशी केली. पकडला गेला आणि काल बलवंतसिंहने त्याला मारून टाकले.

आजकाल इतके लोक आहेत की सर्वांना काम पुरवता येत नाही.

विजयाला तपासण्याकरिता दवाखान्यात पाठवले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४०

सेवाग्राम, वर्धा,

२८ ऑक्टोबर १९४०

चि. सुशीला,

मला वाटते की माझ्या नशिबात उपवासच आहेत, केव्हा आणि किती दिवसांचा याचा विचार करतो आहे. दहापंधरा दिवसात सुरू होण्याची शक्यता आहे. तुझे कसे सुरू आहे? यायची इच्छा असेल तर येशील. परंतु धीर ठेवून अभ्यास थांबवला नाही आणि तो पूर्ण करशील तर मला फार आवडेल. माझे तर सर्व काही ईश्वरावर आधारित आहे आणि असेल. जीवराज येतजात राहणार आहेत. काल आशादेवींचे (आशादेवी आर्यनायकम) एक डॉक्टर मित्रही आले होते. किती दिवस थांबणार आहेत माहीत नाही. उद्या त्यांच्याबरोबर बोलणे होईल. दोनेक वर्षांपासून व्यवसाय सोडला आहे. संन्यासी जीवन जगत असतात. गरिबांना औषध देत असतात. मी तर तुला वस्तुस्थिती सांगतो आहे. यांतील कोणीही तुझी जागा घेऊ शकत नाही हे तुला माहीत आहे. परंतु काय करायचे हे तर केवळ तुलाच माहीत असू शकते. तू आलेली मला आवडेल. परंतु माझ्या मनात केवळ तुझे हित आणि तुझा धर्म आहे. तरीही तू जो निर्णय घेशील तो मी मान्य करीन.

या वेळी कदाचित तुला प्यारेलालचा सल्ला आवश्यक असेल. तर मी इतकेच सांगेन की तो यासंबंधात काहीही विचार करू शकणार नाही. कोणीही करू शकत नाही. यात तुझे हृदय तुला जे सांगेल तेच तुला करायचे आहे. जे करायचे ते तो तुला सांगेल. सध्याच तू तुझ्या अधिकाऱ्यांना काही सांगू नकोस.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४१

सेवाग्राम,

४ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझी दोन पत्रे आली आहेत. तू उपवासाबद्दल जे काही म्हणतेस ते कळले. परंतु ही गोष्ट माझ्या हाती नाही. ईश्वर जसे मार्गदर्शन करील तसेच मी करीन. ही भाषा तर तुला कळते. उपवास करण्याचा निर्णय झाला की लगेच कळवीन. तेव्हा तुझ्या अधिकाऱ्यांशी बोलशील. याकरिता तू त्यांना तयार तर केलेलेच आहे. तुझ्याशिवाय तेथील काम भागत नाही ही गोष्ट मला आवडली. तुझी नेहमीच अशी परिस्थिती असो. तू दुःखी व्हायचे नाही. उपवास करावा लागला तरी तू खुश राहायचे आहे ना? हेसुद्धा ईश्वराचेच काम असेल ना? इथे असूनही तुझे दुःख मी पाहू शकतो.

महादेवला रामचंद्रनने (जी. रामचंद्रन) पत्र लिहिले आहे की त्याने आणि सौंदरमने (डॉ. सौंदरम) लग्न करण्याचे ठरवले आहे. आणि मी मान्य केले तर तेही सेवाग्राममध्ये. मी तार केली आहे की आनंदाने या. रामचंद्रनने असेही लिहिले आहे की लग्न 'झाल्यानंतर मी अटक करवून घेईल आणि सौदरम तिथेच राहील.' ती काही काळ, कदाचित एक वर्षही इथे राहील. जर असे झाले तर तू ज्याचा शोध घेत होतीस ते तुला मिळेल. तुझी परीक्षा झाल्यानंतर मी जर जिवंत राहिलो तर तू येशीलच. माझा आत्मा दुसरे काही मान्यच करत नाही. या विवाहाला तू उपस्थित राहावे अशी माझी इच्छा आहे. परंतु या इच्छेची पूर्ती करायची की नाही हे तू ठरवायचे आहे. सध्या तुझे कार्यक्षत्र तिथेच आहे.

कांचन आता बरी झाली आहे असे वाटते. पंजाब(राव)करिता यासोबत पत्र आहे. पंजाबद्दल तू विचार करतेस तोच बरोबर आहे. याबद्दल मला तुझ्यापेक्षा जास्त माहीत नसेल. तो जर ओझे झाला असेल तर त्याला परत पाठव. तुझ्यावर त्याचे ओझे व्हायला नको.

लीलावतीच्या भावाला (लक्ष्मीदास आसर) विषमज्वर झाला आहे हे तर मी लिहिलेलेच असेल? त्याची हालचाल चांगली सुरू आहे. शारदाचे वजन फार कमी झाले आहे. काहीही केले तरी वाढत नाही. महादेव आज त्याला डेव्हीडकडे घेऊन गेला आहे.

उद्या कार्यकारिणीची बैठक आहे. सरदार कालच आले.

प्यारेलालबद्दल मी खुश होऊन लिहिले होते, परंतु त्याला झटके येतच असतात असे दिसते. क्षणात माशी पडते. माझ्या अर्थाचा अनर्थ करतो. कळत नाही की त्याची समजूत घालण्याकरिता माझ्याजवळ भाषा आहे की नाही? असे असले तरी तू चिंता करण्याची आवश्यकता नाही. मी सांभाळीन आणि अखेरीस सर्व ठीकच होईल अशी आशा आहे. व्यवस्थित खातोपितो. तू भाऊबिजेकरिता पत्र लिहिले यात आक्षेपार्ह काही असूच शकत नाही. तू त्याला अशी कितीही पत्रे लिहू शकतेस.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४२

सेवाग्राम,

८ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

आता माझी पत्रे तुला रोज मिळत असतील. आजकाल तर मला वेळच मिळत नाही. यासोबत पंजाब(राव)चे पत्र आहे, ते पाहशील आणि जे करायचे असेल ते करशील. आता तो तुझ्यावर ओझे होईल अशी मला भीती वाटते. असे वाटले तर त्याला परत पाठव. त्याला वेगळे लिहिण्याचा प्रयत्न करण्याकरिता आज वेळ नाही.

माझा उपवास सध्या तरी लांबणीवर पडला आहे.

काल सौंदरमचे लग्न लावले. आज शरदचे आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४३

सेवाग्राम,

९ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

तुला माझी पत्रे नियमितपणे मिळत असतील.

अमतुस्सलामला मी सिंधमध्ये पाठवले आहे हे मी तुला लिहिले होते की नाही हे मला आठवत नाही. हिंदूंची तिथे जी कत्तल सुरू आहे ती उपवास करून का होईना थांबवता यावी म्हणून मी तिला पाठवले आहे. आज ती कराचीला पोहोचली. तिची ही तार आली आहे.

सध्या उपवास स्थगित झाला आहे.

सौंदरम सध्या इथेच आहे.

प्यारेलाल मजेत आहे. पृथ्वीचंद अजूनही वर्धेत आहे. उद्या इथे येईल.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - पृथ्वीसिंह इथे राहायला आले आहेत.

ब्रजकिसनचे (ब्रिजकृष्ण चांदीवाला) भाऊ बरेच दिवसांपासून आजारी आहेत त्यांना मी दाखवायला सांगितले आहे. म्हणतील तर तपास. काही कळत असेल तर औषध दे.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४४

तार.

वर्धा,

११ नोव्हेंबर १९४०

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज रुगणालय,

नवी दिल्ली

ये.

बापू

इंग्रजी फोटोप्रतिवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - प्यारेलाल

१४५

सेवाग्राम,

११ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. पुस्तकांसबंधी सांगता सांगता पूर्ण पुस्तकच प्यारेलालकडून वाचून घेतले. कारण. त्याच्याबद्दल तूसुद्धा त्यात लिहिले होते. कामासंबंधी पत्र लिहायला मी मनाई केलेली नाही. परंतु त्याच्या पत्राची तू उत्सकतेने वाट पाहत असल्याचे माझ्या लक्षात आले होते. जर असे असेल तर मी मनाई मागे घेईन. मी तर दोघांच्या हिताकरिता प्रतिबंध लावला होता. परंतु तुम्हा दोघांपैकी एकाला जरी प्रतिबंधाचे दुःख असेल तर मी तो व्यर्थ समजेन. यामुळे तुझी इच्छा असेल तसे मी करीन.

प्यारेलालचे आता परत ठीक सुरू आहे. तू स्वतःबद्दल जे काही समजतेस ते चूक आहे. परंतु प्यारेलालबद्दल तू जे काही लिहितेस तेसुद्धा अगदीच बरोबर नाही. याबाबतीत मी त्याला स्वतःलाच उत्तर लिहायला सांगितले आहे. त्याचे उत्तर तयार झाल्यानंतर याबरोबर पाठवीन. परंतु इतके सांगतो की त्याच्या दुःखाचे कारण अगदी वेगळे होते. त्यात तुला भागीदार करणार नाही. भेटू तेव्हा तुझी जर जाणून घेण्याची इच्छा असेल तर सांगेन.

तू फार जिद्दी आहेस. तुला येण्याबद्दल शंका का वाटते? तुला येण्याची इच्छा असेल तर मला पाझर फुटेल की तुला फुटेल की तिसरेच काही कारण घडेल आणि तू येशील. काही तर ईश्वरावर सोड.

तू अजून कुमारप्पाला उत्तर दिलेले नाही. तू लिहिणार होतीस.

शारदाचे काय करावे कळतच नाही. तिचे वजन वाढतच नाही. तिच्या मुलाचेही वाढत नाही. सौंदरम तिला सल्ला देत असते. तिचे म्हणणे आहे की दिल्ली शारदाकरिता अनुकूल होणार नाही. मी तर तिला तुझ्याकडे येण्याकरिता तयार करत होतो. तुझे काय म्हणणे आहे?

सध्या तर सौंदरम मदुरेला जाणार आहे. तीन आठवड्यात परतणार आहे. तुझी तयारी कशी सुरू आहे? मोठ्या प्रमाणात संघर्षाची (व्यूह) रचना करून राहिलो आहे. त्यात प्या(रेलाल)ही येतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४६

सेवाग्राम,

१३ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

माझे वा राजकुमारीचे तुझ्याकरिता रोज पत्र चालले आहे. आज तर प्यारेलालचे जाईल. काल तुला राधाचे पत्र पाठवले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४७

सेवाग्राम,

१४ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

याबरोबर बालकृष्णची दोन पत्रे आहेत. एक माझे आणि एक तुझे. त्यासंबंधी काही सूचना द्यायच्या असतील तर दे.

शारदाचा आनंद रात्री झोपतच नाही आणि शकरीबेनला वा शारदाला जागावे लागते. यावर तू काही उपाय सुचवू शकतेस काय?

सध्या तरी प्या(रेलाल) पूर्णपणे शांत झाला आहे आणि खुश असतो असे म्हणता येऊ शकते. त्याला पत्र लिहिण्याची परवानगी दिली आहे. यामुळे त्याला ज्या काही बातम्या द्यायच्या असतील त्या तो देऊ शकतो. इथे पृथ्वी सिंग आहे. त्याच्यामुळे चांगली मदत होते.

अ(मतुल) स(लाम) सध्या सिंधमध्ये कामात अगदी व्यग्र झाली आहे.

तुझे काम चांगल्या प्रकारे सुरू असेल.

अजून कुमारप्पाला तुझे लिहायचे राहून गेलेले आहे. त्याचे वजन १३० पर्यंत आले आहे. हे बरोबर आहे काय? १४३ असायचे. फार फिरतो आणि भरपूर शक्ती आहे. सध्या मानसिक श्रम करू देत नाही.

बाचा खोकला फार जोरात आहे. तुला घरच्या पत्त्यावर पत्र लिहू की दवाखान्याच्या.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४८

सेवाग्राम,वर्धा,

१९ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

भाई तुझ्याकडेच येत असल्यामुळे तुला काय लिहू? इथे वातावरण वेगळे आहे असे समजतो. परंतु मी हे सर्व लिहिण्याची आवश्यकता नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१४९

सेवाग्राम, वर्धा,

२३ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुला ताप आणि खोकला येत राहतच असतो, ही चांगली गोष्ट नाही. अशा बाबतीत तू बेफिकीर असतेस हे मी स्वतः पाहिले आहे. तुला ताप आणि खोकला येत राहील आणि तू निश्चिंत राहा असे म्हणता येणे कसे शक्य आहे? लवकर चांगली हो.

बचूसंबंधात प्यारेलालने तार केली असती तर फार चांगले झाले असते. प्रकरण लवकर निपटले असते. फोन आल्यानंतरच मी मनूला पाठवले आहे. तुला उद्या तार मिळेल असे समजतो. प्यारेलालच्या दोन लोईया पृथ्वीसिंगने मनूबरोबर पाठवल्या आहेत.

कामामुळे प्यारेलालला जर थांबावे लागले तर मला कोणतीही अडचण होणार नाही.

काल रात्री मी सर्पगंधाचे दोन थेंब घेतले आणि माझा रक्तदाब १५८-९४वर आला. प्या(रेलाल)ला वेगळे पत्र लिहून राहिलेलो नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५०

२४ नोव्हेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझे वा प्या(रेलाल)चे पत्र आज यायला पाहिजे होते. आज प्या(रेलाल)चे यायला पाहिजे. हे तर तुला काळजीतून मुक्त करण्याकरिता लिहितो आहे. मला थकव्याशिवाय दुसरे काहीही नाही. कालची तार मिळाली असावी. प्रार्थनेनंतर सर्व काम करतो.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

एल. एच. एम. सी.

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५१

८ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. सर्वच जिवंत राहत नसतात ना? तू पूर्ण प्रयत्न केला याची तू साक्ष आहेस. इतक्यातच तू कृतकृत्य झालीस. परिणाम तर ईश्वराच्या हाती आहे. तू उत्तीर्ण का झाली नाही यातच तर ईश्वराची परीक्षा आहे. यामुळेच क्षमायाचनेची गरज नाही, दुःखी होण्याची गरज नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५२

वर्धागंज,

९ डिसेंबर १९४०

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज रुगणालय,

नवी दिल्ली

तू सुट्यांमध्ये निश्चित येते आहेस यात काही शंका नाही..

स्नेह,

बापू

इंग्रजी फोटोप्रतिवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - प्यारेलाल

१५३

वर्धा,

९ डिसेंबर १९४०

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज रुगणालय,

नवी दिल्ली

रुग्णाच्या मृत्यूवर शोक करू नकोस. तू प्रयत्नात मुळीच कसूर ठेवलेला नाही इतके पुरेसे आहे. प्यारेलाल उद्या अटक करवून घेईल.

स्नेह,

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - प्यारेलाल

१५४

९ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

तू मूर्ख आहेस. दुःखी का होतेस? कोणत्या प्रश्नासंबंधी लिहिते आहेस? भाईला काय समजावून सांगायचे आहे? माळेसंबंधी? पण तुझ्या पश्चात्तापाचे काय कारण आहे? नाताळच्या वेळी तुला यायचेच आहे. तू माझी मुलगी आणि प्या(रेलाल)ची बहीण आहेस हे नाते कधीही मिटणार नाही. प्या(रेलाल) तर तुझ्याकरिता वा तुझ्या आणि माझ्याकरिता जिवंत आहे. परंतु माझ्याकरिता कोणी जिवंत राहण्याची काय आवश्यकता? मी स्वतः मृत्यूच्या काठावर पडलो आहे, पण तुझ्या जीवनाची तर ही सुरुवात आहे.

त्या आजाऱ्याकरिता तू विनाकारण व्यथित होते आहेस. तुझी तार आज मिळाली. शक्य आहे की त्याच्या मृत्यूतच त्याचे भले असेल. तरीही तुला काय माहीत आहे? त्याची शस्त्रक्रिया करण्यात जर तू काही चूक केली असशील तर तुला दुःख व्हायलाच पाहिजे. तू देवाला आजाऱ्याचे जीवन मागितले होते. आता तू मागणी कर की हे देवा ती शस्त्रक्रिया करण्याचे मला पूर्ण ज्ञान दे. तू जर ही शस्त्रक्रिया करण्याचे पूर्ण ज्ञान मिळवले असशील तरच तू ही प्रार्थना करू शकशील. परंतु मला तुझ्या ज्ञानाबद्दल शंका येत नाही. ज्या गोष्टीचे तुला ज्ञान नाही त्याचे अज्ञान कबूल करण्याचे धैर्य आणि नम्रता तुझ्याजवळ आहे. हा श्लोक आठव-

“निपदो नैनषिपदः।
संपदो नैव संपदः।।
विपद विस्मरणं विष्णोः।
संपन्नारायण स्मृतीः।।”

कशाला सुख म्हणावे आणि कशाला दुःख म्हणावे हे आम्हाला कुठे माहीत आहे? तुला जर माहीत असेल तर येऊन मला शिकव. लवकर ये. तू शांत झाली असल्याची तार मला कर.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५५

सेवाग्राम,

१० डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

बरोबर ८.४५ वाजता प्या(रेलाल) रवाना झाला. बा आणि म(हादेव) मोटारीत ठाण्यापर्यंत गेले. प्या(रेलाल) खुश होता. म(हादेव)कडे पोटभर जेवला. मी सूताचा हार घातला. बाने गंध लावला. दुर्गाने (महादेव देसाईंची पत्नी) मला माळ मागितली. यामुळे माझ्याजवळ एक तुलसीमाळ होती, ती मी आधी स्वतः घातली आणि मग त्याला घातली. ती मी तुझ्यासाठी ठेवली होती. आता तुझ्याकरिता एक दुसरी तयार होईल. त्याने गावांमध्ये जायचे आहे. अजून अटक झाल्याची बातमी नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५६

वैयक्तिक

१३ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. आताच प्या(रेलाल)ला पत्र पाठवता येऊ शकत नाही म्हणून दोन्ही फाडून टाकले.

आता तुझी गोष्ट आठवली. त्यात लिहिण्यासारखी कोणती गोष्ट होती.

कांचनबद्दल कळले.

सुट्या लागताच ये.

सौंदरम आता येणार नाही. रामचंद्रन त्रिवेंद्रमला जाणार आहे.

शास्त्रीजी निर्जल उपवास करत आहेत. त्यांना दुःखमुक्ती हवी आहे. परम शांततेत आहेत. सर्व फोड वाळले आहेत. चेहरा तेजस्वी आहे. परसाकड होतच नाही. लघ्वी १२ अंसाच्या जवळपास होते. डॉक्टरी दृष्टीने हे प्रकरण पाहण्यासारखे आहे. तू जर त्यांना तपासले असते तर तुला आवडले असते. परंतु याकरिता विशेष सुटी थोडीच घेता येऊ शकते? ही केस तपासण्याकरिता तुलाच पाठवले तर चांगले होईल. अशी संधी मिळेल तेव्हा ते असतील की नाही हे कोणी सांगावे?

भाई चांगल्या प्रकारे मजेत आहे, तू त्याची काळजी करू नकोस.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५७

१५ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

काल तुला रा(ज) कु(मारी)ने पत्र पाठवले होते, ते मिळालेच असावे. शास्त्रीजींच्या इच्छेप्रमाणे आज त्यांना पाणी पाजले. त्यानंतर संत्र्यांचा रस. मी दोनदा सर्पगंधा घेतली होती. तू तर काही वेगळीच भविष्यवाणी केली होती. बोलण्याच्या बाबतीतील (नियंत्रणाचे) चांगल्या प्रकारे पालन करून राहिलेलो आहे. सकाळी येताना थोडेसे काम करतो. केले नाही तर ओझे वाटते.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज रुगणालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५८

सेवाग्राम, वर्धा,

[१६ डिसेंबर १९४०]

(तारखेच्या आधाराकरिता पाहा मागील विषयातील परचुरे शास्त्रींना पाणी आणि संत्र्याचा रस देणे.)

चि. सुशीला,

कितीही जरी सावधगिरी बाळगली तरी एक दिवस उशीर होऊनच जातो.

माझ्यावर फार कडक नियंत्रण लादून तू माझी प्रकृती चांगली ठेवू शकशील काय?

तू येशील तेव्हा प्या(रेलाल)ला भेटायला जाशीलच असे समजून चालतो आहे. यामुळे सध्याच कोणालाही भेटायला पाठवून राहिलेलो नाही. तो बहुधा एका महिन्यात एकच पत्र लिहू शकतो. चौकशी करीन.

आजपासून मी उन्हात झोपायला सुरुवात केली आहे. त्याचा परिणाम दिसतो. रक्तदाब १५८।१०० वरून १४६।९६वर आला आहे.

शास्त्रीजींबद्दलची तार मिळाली आहे. काल पाणी प्याले, ३ औंस सत्र्यांचा रस प्याले. शरीर तर बरेच चांगले होऊन राहिलेले आहे. मी रोज थोडी मालीश करतो. यामुळे त्यांना आणि मलाही समाधान मिळते. परंतु आता केवळ पाण्यावर राहून राहिलेले आहेत. यामुळे वेदना अगदीच निघून जातील अशी आशा आहे.

नवीन उपचाराबद्दल तर तू आल्यानंतर विचार करीन. तू येथून शनिवारीच निघू शकतेस. लक्षात ठेव की दोन ट्रेन आहेत. एक सकाळी आणि एक सायंकाळी. सकाळी इटारसीवर गाडी बदलवावी लागते. यामुळे तिच्यात भरपूर जागा असते आणि ती इथे दुसऱ्या दिवशी ११.३० वाजता पोहोचते.

कांचनला तिथेच ठेवणार आहेस की आणणार आहेस? जशी तुझी इच्छा असेल तसे कर. इथे आणण्याची काही घाई नाही. तिने पूर्णपणे दुरुस्त होऊनच यावे अशी सर्वांची इच्छा आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज रुगणालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१५९

२२ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

तू किती वाट पाहायला लावली? किती लोकांना तू नाराज केले? या आठवड्यात तुझ्याकडून मी भरपूर काम घेण्याचा विचार केला होता. शास्त्रीसंबंधी तू किती आशा दाखवली होती? परंतु तू तरी काय करशील? लिहिणे सोडून तू यावे अशी तर मी इच्छा करू शकत नाही. आता तू आरामात ये. तुला प्यारेलालची भेट घेता येण्याचीसुद्धा व्यवस्था केली होती. तू त्याला भेटायला येऊ नये असा प्यारेलालने निरोप पाठवला आहे. आता तुला जसे उचित वाटेल आणि येण्याची सुविधा असेल त्याप्रमाणे आरामात ये. सुटी घेण्यात अडचण असेल तर येऊ नकोस. डॉ. मेहतांनी तुझी गोष्ट सांगितली. त्याचा मला आनंद झाला.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज रुगणालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१६०

वैयक्तिक,

काळजीपूर्वक वाचले

सेवाग्राम, वर्धा,

२३ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

माझे कालचे पत्र अपूर्ण होते. असे वाटते की तुझे खरे स्थान एखाद्या मोठ्या रुग्णालयात आणि तुझ्या शिक्षणात आहे. तू तिथेच चांगली वाटतेस. डॉ. जीवराजसुद्धा तुला पाहून खुश झाले. तुझा निबंधही तपासायला लावतील असे ते म्हणाले आहेत. तू तिथेच चांगली वाटतेस. इथे तुझी काय किंमत आहे? इथे तू हरवतेस. तुझ्या बुद्धीकरिता हे क्षेत्र नाही. तुझ्या विकासात अडथळा येतो आणि जे काही तुझ्याजवळ आहे त्याची किंमत होत नाही. तुला जंग लागतो आहे.

या वेळी तू इथे यायला घाबरते आहेस ही गोष्ट मला खुपते.

तुझ्या धर्माकडे मी वेगळ्या दृष्टीने पाहतो आहे. परंतु यामुळे काय होते? तू त्याकडे ज्या दृष्टीने पाहशील तोच तुझा धर्म. चातक ज्याप्रमाणे मेघांची वाट पाहत असतो तसाच मी तुझी वाट पाहत होतो. तुला आणण्याकरिता महादेव तयार झाला होता. शास्त्रीजी, शारदा, शंकरन आणि इतर आजारी तुझी वाट पाहत होते. शास्त्रीजींची तू इतकी काही काळजी घेतली की ती पाहून मी तर खुश झालोच, पण इतरही खुश झाले. तू येऊन नवीन काही करशील अशी आशा वाटू लागली होती. परंतु तू तुझ्या निबंधाला पहिले स्थान दिले. एका आजाऱ्यासमोर निबंधाची काय तुलना? परंतु हे तर माझे शास्त्र आहे.

तू केवळ भाईला भेटायला यावे अशी त्याची इच्छा नाही. त्याची इच्छा आहे की तू लाहोरला जावे आणि परिक्षेसंबंधी जे करायचे असेल ते करावे. मी त्याच्याशी सहमत आहे. तू इथे येऊन काय करशील? शास्त्रीजींना मी आपल्या हाती घेतले आहे. मी स्वतः मालीश करत नाही, मनोहर करतो. खाण्यासंबंधी मी निर्णय घेत असतो. शारदाची व्यवस्था होऊन जाईल. तुझ्याकरिताच तुझी आशा सोडतो आहे. तुझे श्रेय

तुझ्या शिक्षणात आणि तेथील वातावरणात आहे. तिथूनच तुझी जी काही सेवा घेता येईल ती घेईन. इथून पाठवता येण्यासारख्या आजाऱ्यांना तिथे पाठवीन. जे समाधान मी तुला देऊ शकत नाही आणि तू मला देऊ शकत नाही ते तू तिथे राहिल्याने एकमेकांना मिळेल. मी जेव्हा खरोखर आजारी पडेन तेव्हा तू माझ्याकडे धावत येण्याची मला इच्छा होईल हे मला माहीत आहे. तेव्हा येशील, तुझी सेवा घेईन. हे पत्र चुकीचे वाचून तू त्याचा अनर्थ करू नकोस. यातून तू माझे दुःख पाहशील. हे अनिवार्य होते, पण अखेरीस ते सुखाकरिताच होते. दुःख आहे कारण मी आशा केली होती आणि ती तुटली. त्या आशेकरिता काही कारण नव्हते असे समजून विसरून जाईन. परंतु हे माहीत असल्यामुळे निश्चितच सुखी राहीन की तू अशा क्षेत्रात आहेस की जिथे तू शोभान्वित होशील आणि शोभा वाढवशील. अशा क्षेत्रात तू स्वतःला जेव्हा पाहशील तेव्हा सर्व सुख इथेच आहे असे तुला वाटेल. परंतु इथे आल्याशिवाय तू सुखी होऊ शकत नाही अशी वेळ निश्चितच येईल. तेव्हा तू येशील आणि तेव्हा तू अवश्य ये.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१६१

२४ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

काल लिहिलेले पत्र तुला मिळालेच असेल. कांचनचे पत्र नंतर वाचले. तिच्या पत्रानुसार ती २५ला निघेल. तारीबेनला तू ओळखतेस, ती फार रोड झाली आहे तुझ्याकडे जाण्याकरिता मी तिची समजूत घालतो आहे. ती तयार जरी झाली तरी तुझी परवानगी मिळेल तेव्हाच पाठवीन.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,
लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्याल.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१६२

सेवाग्राम, वर्धा

२५ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

तुला माझे एक पोस्टकार्ड काल आणि एक परवा मिळाले असेल. या पत्राबरोबर मी प्यारेलालचे ते पत्र पाठवत आहे जे मला आजच मिळाले. पत्रात मी जितक्या सूचना केल्या आहेत त्यांचे पालन करशील. तो तुला भेटण्याकरिता फार उत्सुक असल्याचे माझ्या लक्षात आले आहे. यावर विचार करशील.

तुला भेटण्याकरिताची त्याची अस्वस्थता आणि तुझ्या अभ्यासाबद्दलची तुझी काळजी याचा विचार कर आणि जे योग्य वाटेल ते करशील. तुला यायचे असेत तर तार करशील म्हणजे मुलाखतीची वेळ ठरवता येईल.

माझे काम चांगले सुरू आहे. रात्रीचे काम करणे नेहमीकरिता बंद होऊ शकत नाही. मी प्रयत्न करतो आहे. आशा आहे की यात मला यश मिळेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१६३

सेवाग्राम, वर्धा

२६ डिसेंबर १९४०

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मी तुला दररोज नियमितपणे पत्र लिहिले आहे. माझ्या लांब पत्रांमुळे तू तुझा निश्चिय बदलण्याची आवश्यकता नाही. यामुळे या वेळी तुझी वाट पाहीन. यामुळे जास्त लिहिणार नाही. तार करशील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

१६४

जानेवारी ६, १९४१

कृष्णदासला क्विनाईन दिली नाही. संत्र्यांवर आहे. आज ताप आला नाही. शास्त्रींजींचा हात आज जास्त कोरडा दिसतो. वैद्य एकदोन दिवसांत मुंबईला येतील. त्यांना इथे मानवले नाही. शंकरनचे करून टाकीन. तिथे तारीची व्यवस्था झाली असेल. तू चांगली असशील. बा चांगली आहे. इथे पुष्कळ लोक झाले आहेत. जीव घाबरावा इतके. तुझा लेख वेळेवर पाठवशील. माताजींनी प्यारेलालची काळजी करू नये.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर

लेडी हार्डिंग्ज वुमन्स मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१६५

जानेवारी ९, १९४१

तुझे पत्र मिळाले. येथून केवळ एक दिवसच डाक गेली नव्हती. इतर दिवशी मीच स्वतः भरपूर लिहिले वा महादेवला लिहायला सांगितले.

तू माफी मागण्याची आवश्यकता नाही. तुला माहीत आहे की तुला माफ आहे. राजकुमारी वगैरेंबद्दल तुझ्या मनात जे विचार येतात ते लिहिण्यात काहीही हरकत नाही, उलट ते लिहिणे तुझे कर्तव्य आहे. तू असे करशील तेव्हाच मला मदत होईल.

कृष्णदासला ताप आलाच नाही. तुला त्याचे हृदय डायलेटेड वाटते काय? हृदय मोठे झाले तर ते परत पूर्वीच्या आकारात येऊ शकते काय? माझ्या सल्लाप्रमाणे डॉ. दास कृष्णदासला जे खाण्याकरिता देतात तोच त्याचा आहार सुरू आहे. भाज्या, दूध आणि फळे चालतात, दुधाबरोबर आंबट फळे आणि भाज्यांबरोबर पपईसारखी गोड फळे. त्याचा या आहारावर पूर्ण विश्वास बसला आहे.

शास्त्रीजींनाही हाच आहार सुरू आहे. त्यांच्या त्वचेत सुधारणा आहे. ते आनंदात असतात.

जानकीबेन चांगल्या आहेत. आज त्यांना पाण्यात आंबट निंबू टाकून दिले. त्यांना आराम होईल असा विश्वास वाटतो. बस्ती घेण्यात आणि मळ बाहेर काढण्यात फारच कमी त्रास होतो.

तू खुश राहा आणि परीक्षेची चांगली तयारी कर.

माझी प्रकृती चांगली आहे. आराम तर घेतच असतो. तारीला मला दोन शब्द लिहिण्याकरिता सांग.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१६६

जानेवारी ११, १९४१

चि. सुशीला,

काल तुला एकही पत्र पाठवले नाही.

आज माझ्या दृष्टीने चांगली बातमी देऊ शकतो. दोनदा सर्पगंधा घेऊनही रात्री रक्तदाब २००।११० राहत असे. यामुळे आहारात मूलभूत बदल केला. यामुळे उकळलेल्या भाज्या बंद केल्या. काल आणि आज दुपारी रक्तदाब १३८।८२ होता. आजही कच्च्या भाज्या वाटून घेतल्या तर रक्तदाब १४८।९८ होता. प्रार्थनेनंतर अर्धा तास काम केल्यानंतरचे हे आहे. नंतर रक्तदाब वाढून १६२।१०२ झाला. आज असेच सुरू होते. माझा तर्क असा आहे की कच्च्या भाज्यांनी वायू होत नाही. शंकरनला कच्च्या भाज्यांचा प्रयोग फार मानवला. शास्त्रीजींच्या प्रकृतीत सुधारणा सुरू आहे. जानकीबेनची जखम मी पाहिली. मला तर तिच्यात सुधारणा दिसते. तिला स्वतःलाही असेच वाटते. डॉ. दास इतकी मेहनत करतात की ते स्वतःच आजारी पडू शकतात. शंकरनशी त्यांचे जुळले आहे आणि चांगले चालेल असे वाटते. कृष्णदास चांगला आहे आणि दूध आणि भाज्यांवर आहे. व्हॅक्सीन आल्यानंतर बाला नक्कीच द्यायला लावीन. वैद्य परत येतील अशी शक्यता आहे.

तुझा निबंध चांगल्या प्रकारे तयार कर. तुझ्या निबंधाची वा पदवीची माझ्याकरिता काही किंमत नाही असे मानण्याचे कारण नाही.

तारीकरिता दुधाची व्यवस्था झाली असल्याचे देवदास आणि गडोडियाजींनी लिहिले आहे.

माताजींची येण्याची इच्छा असेल तर मला आवडेल. आता इथे थंडी संपल्यासारखी आहे. माताजी आल्या तर त्यांना थोडे अडचणीत राहावे लागेल, परंतु त्या सहन करू शकतील. तुझ्याकडे जर चारच्या ठिकाणी तेरा असू शकतात तर इथे केव्हाही चांगलेच असेल.

राजकुमारी परवा मद्रासला गेली. १४ वा १५ तारखेला परतेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१६७

१३ जानेवारी १९४१

चि. सुशीला,

काल महादेवभाईंबरोबर तुला निरोप पाठवला होता. आजही प्रकृतीत सुधारणा सुरू आहे. सकाळी रक्तदाब १५४।८६ होता. दुपारी १४५।८७ होता. हे खोलात जाऊन तपासले पाहिजे असे मला वाटते. देशी उपचारात आहारात बदल करण्याकरिता स्थान आहे, पश्चिमेत कुठे स्थान आहे? वनस्पती औषध आहे अशी माझी नेहमीच मान्यता राहिली आहे आणि या स्वरूपात तिची आठवण ठेवली की औषधाला फार गौण स्थान उरते. या कामामागे डॉ. दास लागले असल्याचे मला दिसते. शंकरनलाही या कामात रस आहे, यामुळे दोघांचे खूप जुळते. दासची व्यवस्था सध्या रुग्णालयाच्या खोलीत केली आहे. शास्त्रीजींच्या प्रकृतीत सुधारणा आहे, जानकीबेनही ठीक आहे.

सुशीला नाय्यर,

वुमेन्स हॉस्पिटल,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१६८

जानेवारी १४, १९४१

चि. सुशीला,

तीन दिवसांपासून तुझे पत्र नाही. तारीबेनच्या प्रकृतीबद्दल लोक मला विचारत असतात. तू पत्र लिहायला पाहिजे होते. तारीला वा तारीतर्फे सुशीलालाच लिहायला सांग.

बालकृष्णचे पत्र सोबत आहे. त्याला अन्न पचत नाही, काय केले पाहिजे? माझी प्रकृती चांगली आहे. आज दुपारी रक्तदाब १४०-८६ आणि सकाळी १५४-१०० होता.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१६९

१५ जानेवारी १९४१

चि. सुशीला,

किती तरी दिवसांनंतर आज तुझे पत्र मिळाले. तू असे करायला नको. मी तर केवळ एक दिवसच पत्र लिहिले नव्हते. जानकीबेनबद्दल तू जे लिहिले त्याचा मला बराच उपयोग होईल. विनोबा आताच सुटून आले आहेत. यामुळे आता इतकेच.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर
लेडी हार्डिंग्ज वुमन्स मेडिकल कॉलेज,
नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१७०

जानेवारी १६, १९४१

चि. सुशीला,

मी काल तुला पत्र लिहिले होते. आज तुझ्याकडून काहीही नाही. विनोबा समोर बसलेले आहेत म्हणून दोन ओळीच लिहीत आहे. कच्च्या भाज्यांचा कुमारप्पाला फारसा फायदा नाही. असेच काही तरी कृष्णदासबद्दलही आहे. शास्त्रीजींमध्ये बरीच सुधारणा झाली आहे. आजाराचे फार कमी चिन्ह त्यांच्या शरीरावर दिसतात. ते थोडेबहुत चालतात सुद्धा.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

एल. एच. ,डब्ल्यू. एच.

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१७१

१७ जानेवारी १९४१

चि. सुशीला,

तुझ्या पत्राकरिता मला आज परत एक आणा दंड भरावा लागला. तुला खोली मिळाली आणि जाण्याकरिता एक नावही मिळाले.

शास्त्रीजींना जे हवे आहे ते दिले तर त्यांच्या जखमात पूसुद्धा होईल आणि तापही येईल. पथ्याचे खायला दिल्यामुळे कमीतकमी त्यांना ताप तर येत नाही. योग्यच खातात, बहुधा फळे आणि भाज्याच घेतात. असे वाटते की त्यांना सर्व काही पचते. कडूनिंबाच्या पानाची चटणीही खूप खातात. शंकरनने मान्य केलेला आहाराचा तक्ता मी तुला पाठवला हे योग्यच केले.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

एल. एच. ,एम..सी.

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

१७२

जानेवारी १७, १९४१

चि. सुशीला,

काल तुला काहीही पाठवले नव्हते. बा म्हणाली की "एक तर सुशीलाला बोलावा वा मला तिच्याजवळ पाठवा. माझ्या परसाकडच्या ठिकाणी जी गाठ आहे ती मोठी झाल्यासारखी वाटते." मी म्हणालो की मी सुशीलाला बोलावीन परंतु तिला एप्रिलमध्ये सुट्या लागतील तेव्हा. यामुळे ती शांत झाली. तिला काय त्रास आहे हे तर मी तुला लिहिलेच होते. गुदद्वारावर अडथळा आल्यासारखे आहे. डॉ. दासनी कोकेन लावले, मलम लावला, शौच्याला व्हावी म्हणून औषधही दिले परंतु आराम झाला नाही. आता तू विचार करून काय द्यायचे ते लिही. तार करायची असेल तर तार कर. बाचे तिथे येणे चांगले राहील असे तुला वाटत असेल तर मी तिला तिथे पाठवण्याकरिता तयार आहे. ती दे(वदास)कडे थांबेल. सरळ रुग्णालयात पाठवण्याची आवश्यकता असेल तर तसेही करता येईल. तू म्हणशील तसे बा करील. तुला जर वाटत असेल की घाई करण्याची काही गरज नाही आणि तू इथे आल्यानंतर स्वतःच पाहशील तर तेही ठीक राहील.

तुला इथे यावे तर लागेलच. जानकीबेन आहे, मदालसा आहे. दोघींचेही ठीक सुरू आहे पण तू पाहशील तर समाधान होईल. येशील तर रुग्णालयासंबंधीही विचार करीन.

प्यारेलाल उद्या सविनय आज्ञाभंग करील. प्रभावती चांगली आहे, उद्या ती जयप्रकाशकडे मुंबईला जाईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१७३

जानेवारी १८, १९४१

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज हॉस्पिटल,

नवी दिल्ली

उद्या ग्रँड ट्रंकने पतियाळाला जात असलेल्या गाडीत अमतुल सलामला भेट. तिला दम्याचा त्रास आहे.

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१७४

[जानेवारी १८, १९४१]

(स्रोतात ही तारीख १८ फेब्रुवारी दिली आहे, ती स्पष्टपणे चूक आहे. "सुशीला नाय्यर यांना पत्र", जानेवारी १७, १९४१)

चि. सुशीला,

बाच्या गुदद्वारात लहानसा फोड असल्याचे आढळले आहे. त्यात आग होते. डॉ. दास तपासत आहेत. त्यांनी जागा स्वच्छ करून मलम लावला आहे आणि बाला भाज्या आणि फळांच्या रसावर ठेवले आहे. जानकीबेनची चांगली प्रगती सुरू आहे. शास्त्रींचे तसेच आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज हॉस्पिटल,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१७५

जानेवारी १९, १९४१

चि. सुशीला,

तू अशी कशी मुलगी आहेस की तुझ्याकडून एकही पत्र नाही. तारी कशी आहे असे गोमतीबेन मला विचारत असते. मी काय उत्तर देऊ? एक कार्ड जरी लिहिले तरी पुरे होईल. मी चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१७६

जानेवारी २० (पाहा पुढील विषय), १९४१

चि. सुशीला,

तुझे १३ तारखेचे पत्र आज २१ तारखेला (पाहा पुढील विषय) मिळाले.

तू जागत राहणे फार वाईट आहे. त्यामुळे तुझी प्रकृती बिघडली नाही तर पुष्कळ होईल. मैत्रीणीला तारीबद्दल पत्र लिहिण्याकरिता सांग म्हणजे सध्यातरी मला तिची दररोज बातमी कळत राहील. माझ्याकरिता नाही परंतु गोमतीबेन वगैरेकरिता. तुला इतके काम आहे की तुझ्याकडून मी रोज सविस्तर पत्राची आशा करू शकत नाही.

अमतुस्सलामबद्दल तुला तार पाठवली होती (पाहा "सुशीला नाय्यर यांना तार" जानेवारी १८, १९४१). ती वेळेवर मिळाली असेल. खरे म्हणजे माझ्या कामाच्या ओझ्यात हेही एक काम वाढले आहे. परंतु तिची प्रकृती इतकी वाईट होती की तुला तार केल्याशिवाय उपाय नव्हता. हे खरे आहे की तुझ्यावरील ओझ्याची मला कल्पना नव्हती.

इथे रामनारायण आणि मनू या दोघांचीही प्रकृती चांगली नव्हती. आता ठीक आहे.

आहाराबद्दल केवळ विचार करण्याकरिताच लिहिले होते. भाईचे चांगले सुरू आहे असे जमनालालजींशी भेटण्याकरिता आलेल्यांकडून कळते.

आशीर्वाद,

बापू

परत - तुझ्या पत्रावर एक आणा द्यावा लागला. तू पातळ कागद वापरायला पाहिजे.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१७७

जानेवारी २१, १९४१

चि. सुशीला,

कालही मी चुकून २१ तारीख लिहिली. कालचे माझे पत्र मिळाले असेल. तुझे आजचे पत्र मिळाले. तारीला वाटल्यास घरी ने, परंतु यामुळे तुला किती अडचण होईल याबद्दल मी काय सांगू? तुला योग्य वाटेल ते कर. परंतु तुझ्या शक्तीपेक्षा जास्त करू नको. आहाराबद्दल कळले. माझी प्रकृती तर तुला माहीतच आहे. काळजीपूर्वक प्रत्येक पाऊल टाकतो आहे. कृष्णदास तर २४ तारखेला एक महिन्याकरिता आपल्या वडिलांकडे चालला आहे. बाकी सांभाळून चालत असतो. सर्वांना आवश्यकतेप्रमाणे दूध, तूप मिळते. कच्च्या भाज्याही हिशोबाने खाल्ल्या जातात. तू येशील तेव्हा पाहशील. शास्त्रीजींच्या प्रकृतीत सुधारणा आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज हॉस्पिटल,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

१७८

जानेवारी २३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र नाही. हे तुझ्या उपयोगाचे आहे म्हणून लिहितो आहे.

आहारातील बदलाबद्दल तू जे म्हणते ते मला कळले. ते लक्षात ठेवून ठरवीन. मनू आणि रामनारायण या दोघांचीही प्रकृती वाईट आहे. बा ठीक आहे. तुझ्या प्रकृतीबद्दल कळवत राहा. तुझे काम काहीसे हलके झाले असेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१७९

जानेवारी २५, १९४१

चि. सुशीला,

तुला पोस्टकार्ड लिहिण्याकरिता काल महादेवला सांगितले होते.

कालच्या पत्रावर मला एक आणा दंड द्यावा लागला होता आणि त्याआधीच्या पत्रावरही. आज वजन बरोबर होते. तू एक तर जवळ काटा ठेवला पाहिजे वा एक तिकीट अजून लावले पाहिजे.

तारीबद्दल कळले. जे योग्य वाटेल ते कर. सुशीलाला एक महिन्याची सुट्टी मिळाली आहे यामुळे इथून कोणाला पाठवण्याची आवश्यकता राहणार नाही. जो खर्च होईल तो इथून घेशीलच.

तुझा निबंध मान्य होवो वा न होवो तू परीक्षेची तयारी करतच राहायला पाहिजे. परीक्षा तर निमित्त मात्र आहे. मिळवलेले ज्ञान वाया जात नसते. एम. डी.च्या पुढील विचार आतापासून का? देशात इतके परिवर्तन होत असताना भविष्यात काय होईल, काय नाही याचा विचारच मला व्यर्थ वाटतो.

जे काही होते ते परमेश्वराच्या इच्छेने होते, यामुळे शोक करणे व्यर्थ आहे.

माझ्या प्रकृतीची माहिती मी तुला देतच असतो. महादेवने जे लिहिले ते बरोबर आहे असे समजू नकोस. अमतुल सलामने मला घाबरवले होते, यामुळे रक्तदाब इतका वाढला होता. आधीपेक्षा आता बराच चांगला आहे, जसे की आज १५८-१०० आहे. सायंकाळी काम केल्यानंतर तो जो वाढायचा तो आता वाढत नाही. आताही कच्चा आहारच सुरू आहे. पोळीऐवजी दोन अंस नारळ घेतो. झोप चांगली येते. शौच्याला साफ होते. वजन स्थिर म्हणजे १०९ पौंड आहे. तुझ्या सूचना लक्षात ठेवतच असतो. शास्त्रीजींची प्रगती आश्चर्यजनक आहे. धोका पत्करत नाही. विषमज्वराचे मूळ सापडत नाही, प्रयत्न सुरू आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८०

सेवाग्राम,

जानेवारी २६, १९४१

चि. सुशीला,

तुजे पत्र मिळाले. या पत्रासोबत प्यारेलालच्या पत्राची नक्कल पाठवत आहे. मूळ पत्रात अर्ज आहे आणि तो अमतुल सलामकरिता आहे म्हणून ते ठेवून घेतले आहे.

तारीचे कळले, आता तर अन्नपूर्णाला पाठवण्याची गरज राहिलेली नाही. पण ती तयार झाली तर पाठवण्याचा विचार आहे. माझे मन सांगते की तू येणारच आहेस.

अ.स.ने मला एकही पत्र लिहिले नाही.

तू खूप झोपतेस हे तर मला आवडतेच. अभ्यास तर होऊनच जाईल. ज्ञान मिळायचे असेल तर जिज्ञासू ते मिळवतोच.

देवदास आताच पोहोचला आहे.

महादेवने तुला लिहिलेच आहे.

आशीर्वाद,

बापू

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८१

जानेवारी २७, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून काहीही नाही. तुला माझे कालचे पत्र मिळाले असेल. प्यारेलालला भेटण्याकरिता तिथून कोणी येणार आहे काय? सत्याची काय इच्छा आहे? शकुंतला, मोहनलाल आणि तुला भेटायची इच्छा असेल तर तूही? जर इच्छा असेल तर येण्यापूर्वी तार करा. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात याची व्यवस्था करीन. तारी मजेत आहे. मनू आणि रामनारायण यांचा ताप सुरू आहे. नियंत्रणात आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८२

३० (जानेवारी) ४१

(मुळात गांधीजींच्या हस्ताक्षरात १२ म्हणजे डिसेंबर आहे, जे स्पष्टपणे चूक आहे.)

चि. सुशीला,

काल तुला पत्र लिहू शकलो नाही. परवा महादेवने लिहिले होते.

बाकरिता जी लस आली होती त्यात डॉ. दास आणि शंकरन यांना कचरा दिसला. यामुळे ती नामंजूर करण्यात येऊन नागपूरला परत पाठवण्यात आली.

मनू अजूनही तापाने फणफणलेली आहे. रामनारायण मुक्त आहे. शास्त्रीजींचे हात आणि नखे पाहूनच त्यांना काही तरी विकार असल्याचे लक्षात येते. बाकी काही नाही. महादेवने माझ्याबद्दल का लिहिले हे मला माहीत नाही परंतु मी तुला खात्रीपूर्वक सांगतो की माझी प्रकृती सर्वाथाने चांगली आहे. रक्तदाब किती वाढला ते माहीत नाही. सकाळी नियंत्रणात असतो. कच्चे धान्य मला मानवले असे मी परत सांगू शकतो. तू माझी मुळीच काळजी करू नकोस. काही झाले तर कळेलच.

मला कोणी अटक करणार नाही असा माझा समज आहे. प्रेस कॉन्फरन्सकरिता देवदास आला होता. आज गेला. महादेव दोनतीन दिवस तिथे थांबेल.

तारीबद्दल कळले. सुशीलाचे पत्र येणे सुरू झाले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८३

जानेवारी ३१, १९४१

चि. सुशीला,

आज ना तुझे पत्र आहे ना परिचारिका सुशीलाचे. कालचे माझे पत्र पोहोचले असेल. मनूसंबंधी काही मत देऊ शकते काय? तिचा ताप उतरून राहिलेला नाही. दिवस राहून पाच महिने झाले आहेत. थोडासा रक्तस्त्रावही होतो. भाज्यांचा रस, संत्री आणि अंगूर इतकेच देत असतो. डॉ. दासचे मत आहे की "बी कोला" आहे. जानकीबेनमध्ये शक्ती येते आहे परंतु जखम भरून राहिलेली नाही. "युसोल" मिळत नाही. यासंबंधात तू काही सूचना करू शकते काय? आज काल इथे थंडी पडू लागली आहे. प्यारेलालला भेटण्यासंबंधी तुझी तार आली नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८४

फेब्रुवारी १, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. माझी प्रकृती खूप चांगली असते. लवकर थकवा येत नाही. आहार न शिजवलेलाच घेत असतो. पोळी वा भाकरी न घेण्याने चांगलेच वाटते. लक्ष ठेवून काम करत असतो. मुळीच काळजी करू नको. माताजींना पाठवण्याची आवश्यकता नाही, त्या फारच काळजी करू लागल्या असत्या तर त्यांना येऊ दिले असते. तू तुझ्या अभ्यासात मग्न राहा.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८५

फेब्रुवारी २, १९४१

चि. सुशीला,

मला जर वेळ मिळाला नाही तर मी महादेवलाच पत्र लिहायला सांगत असल्यामुळे जर तुला म(हादेव)चे पत्र मिळाले तर ते माझेच समज. काहीही असले तरी तुला रोज पत्र मिळावे याची मी काळजी घेत असतो. गेल्या दोनतीन दिवसांपासून असेही करू शकलो नाही. त्या स्वामीला तू दिलेले उत्तर बरोबर नाही. परंतु हा हास्यविनोद तर भेटल्यानंतरच करीन. मी चांगला आहे. या वेळी मनूला ताप नसल्यासारखाच आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८६

फेब्रुवारी ४, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. आता मनू जवळपास चांगली झाली आहे. आहारात भाज्यांचा रस, अंगूर आणि संत्री असतात. जानकीबेनही चांगली आहे. फळांवर राहूनही ताकद वाढली आहे आणि अजून वाढते आहे. अशा परिस्थितीत तुला एका रात्रीकरितासुद्धा बोलावण्याची इच्छा नाही. तुला जेव्हा अधिक सुटी मिळेल तेव्हा तू यावे अशी इच्छा आहे.

ताराला सांग की तिचे पत्र मिळाले. तिची केस तर तुझ्या हातात आहे. तू माझी काळजी करू नकोस. मी अगदी चांगला आहे. अ(मतुल) स(लाम) आजच आली आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८७

सेवाग्राम,

फेब्रुवारी ५, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुला तराजू इथूनच पाठवला जाणार होता परंतु मी ते विसरलो. जो लहान तराजू आला आहे तोच पाठवायचा आहे ना? कोणी येणाराजाणारा असला तर त्याच्याबरोबर पाठवीन.

मनूचा ताप गेला असेच समज, कारण काल दुपारी १ वाजता तो ९९.६ होता. आज दुपारी दोन वाजता जेव्हा मी हे लिहीत आहे तेव्हासुद्धा तिला मुळीच ताप नाही. आज एकविसावा दिवस आहे. लघ्वीचा अहवाल आला आहे असे ऐकतो. "बिकोला"च आहे, त्याकरिता लस पाठव.

मी जोपर्यंत फिरायला जात असतो तोपर्यंत जानकीबेन फिरायला गेली होती. प्रकृतीची फार काळजी घेते. आजपर्यंत ५ संत्री आणि ३० अंगुरांवर राहिली आहे. रात्री त्रिफळा वा त्याचे चूर्ण घेते. यामुळे एकदा थोडी शौच्याला होऊन जाते. त्रास होत नाही. रोज बस्ती दिली जात नाही. तू मनूबद्दल इतकी काळजी करतेस याचे मला आश्चर्य वाटत नाही. परंतु आज कि(शोरीलाल) भाईंना मोकळे वाटणे स्वाभाविकच होते. महादेव अजून तिथेच आहे. तू वर्तमानपत्रे वाचतेस की मुळीच वाचत नाही? मीराबेन परत आली आहे हे मी लिहिले होते की नाही? ती वरोड्याच्या झोपडीत राहील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८८

सेवाग्राम,

फेब्रुवारी ६, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले, परंतु मी जर तुझ्याकरिता नाही पण माझ्याकरिता पत्र लिहवून घेत असेन तर काय हरकत आहे? तुझ्याकरिता लिहिण्याची इच्छा होत असेल तर त्याकरिताही काय हरकत आहे? लांब पत्र लिहिणे निश्चितच कठीण आहे. मनूला "बी कोला" आहे हे तर निश्चितच झाले आहे. आता तिला मुंबईला तिच्या सासरी पाठवण्याचा विचार सुरू आहे. ताप नियंत्रणात आहे, दोनतीन तास असतो. वेदना अगदीच नाही. तिच्या नवऱ्याचे काय म्हणणे आहे याबद्दल विचारले आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे करू.

यामुळे मनूकरिता तुला आताच बोलावण्याची गरज नाही. प्यारेलालकरिता तर बोलावणारच नाही. त्याच्या इच्छेचा आदर करतो. त्याला भेटण्याकरिता तुला बोलवावे अशी इच्छा फार होते, परंतु स्वतःला अडवतो.

आता इथे थंडी फार आहे. दोन रात्रींपासून माताजींनी तयार केलेली दुलई पांघरत असतो. त्यामुळे बरेच ऊबदार वाटते आणि त्याचा दाबमापक यंत्रावरही (मॅनोमिटर) परिणाम होतो. आज आणि काल सकाळी रक्तदाब होता. माझ्या मते तर मी जो आहार घेतो आहे तो योग्य आहे. शौच्याला विनासायास होते. शक्तीही चांगली वाटते. सर्व दृष्टीने चांगला आहे असे म्हणता येईल. तुझ्या लाब सुट्या कधी सुरू होतील? तुझ्या निबंधाबद्दल काही कळले काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१८९

फेब्रुवारी ७, १९४१

चि. सुशीला,

आज तुला वाईट बातमी द्यावी लागत आहे. शास्त्रीजींचा जो भाग दुरुस्त झाला असे समजत होतो त्याच भागावर खोल जखम दिसू लागली आहे. जांघेत दाबून पाहिले तर तिथेही रक्त येते. डाव्या पायाचा आंगठा चांगला आहे असे समजत होतो. पण आता वाटते की केव्हाही तुटून पडेल. डाव्या पायाची बोटे काळी आणि सुजलेली दिसतात.

यामुळे सुधारणा किती आहे ते कळत नाही. भारतानंद (मॉरीस फ्राईडमन) तर यातच लागलेले आहेत. शास्त्रीजींमधील सुधारणा पाहून मी फार खुश होतो, परंतु आता ही लक्षणे पाहून काळजी वाटते. भारतानंदच्या मते ही चिन्हे आजार जाण्याचे आहेत.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९०

व्यक्तिगत,

फेब्रुवारी ८, १९४१

चि. सुशीला,

तराजू उद्या पाठवीन. घड्याळ आणि पत्र शंकरनला दिले. प्यारेलालचे पत्र बंद आहे. तुरुंगातून तर बंद पत्र पाठवले जाऊ शकत नाही, उघडूनच पाठवतात. यामुळे काय केले पाहिजे ते मला कळव.

तुझे मत मी मान्य केले यामुळे प्रयोगाविषयी आपल्यात मतभेदच शिल्लक नाहीत. तू तुझे मत बदलू शकते हे तुझे दृढतेचे आणि निर्मळपणाचे सूचक आहे.

मनू आज मुंबईला जाते आहे, तिची तीच इच्छा आहे.

शास्त्रीजींबद्दल मनोहरचे (मनोहर दिवाण) म्हणणे आहे की जी गडबड दिसते तिच्यामुळे घाबरण्याची आवश्यकता नाही. असेही कळले आहे की खाण्याची जी वस्तू हाती लागायची ती शास्त्रीजी गुपचुप खाऊन टाकायचे. ही गोष्ट त्यांनी स्वतःच कबूल केली आहे.

तारीसंबंधी महादेवने चांगलीच बातमी दिली आहे. तारीसंबंधात तुझा तिच्यावर जितका विश्वास आहे त्याहून माझा जास्तच आहे असे म्हणता येईल ना? कारण तुझ्या हातून ती निश्चित दुरुस्त होईल याचा मला भरवसा वाटत होता.

इथेही रात्री दुलई पांघरावी लागते. मीराबेन वरोड्याच्या झोपडीत आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९१

फेब्रुवारी ९, १९४१

चि. सुशीला,

माझे कालचे आणि परवाचे पत्र पोहोचले असेल. तुझ्याकडून आजही काही नाही. आज कांचनसंबंधी लिहीत आहे. तिला परत खाज येते आहे आणि तिच्या घशात थोडेसे दुखते. तिला दुधाचे इंजेक्शन द्यावे की देऊ नये? शंकरनने सुचवले आहे. कांचनने मला विचारले. आता तू लिहिशील तसे करीन.

शास्त्रीजींचे शरीर अधिकाधिक खराब होत चाललेच दिसते. ठिकठिकाणी जखमा होण्याची भीती आहे. भारतातनंद मेहनत तर फार करत आहेत. आता जे होईल ते पाहू.

तो तराजू रघुनंदनबरोबर (रघुनंदन शरण दिल्लीचे कॉंग्रेस कार्यकर्ता) पाठवला आहे. हे पत्र पोहोचण्यापूर्वीच तो मिळाला असेल.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९२

फेब्रुवारी ११, १९४१

चि. सुशीला,

आजही तुझे पत्र नाही !!! काल तुला तारीच्या पत्रातून निरोप दिला होता. शास्त्रीजींची परिस्थिती तर नाजूकच आहे. बाकी सर्व ठीक आहे. माझी प्रकृती बरी आहे. माझा आहार तोच आहे. या आठवड्यात एक पौंड वजन वाढले आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९३

फेब्रुवारी १२, १९४१

चि. सुशीला,

किती तरी दिवसांनी तुझे पत्र मिळाले. तू चांगली तपश्चर्या करते आहेस. तुझ्याच घरात तुझे स्थान व्हरांड्यात आहे. हे तुलाच शोभते. मी तर जेव्हापासून घर वसवले तेव्हापासून माझी जागा घराच्या कोणत्या तरी कोपऱ्यात होती. परंतु माझे उदाहरण बेकार आहे.

जमनालालजींचे उत्तम आहे. त्यांनीही जितकी घरे वसवली तितक्यांच्या धर्मशाळा झाल्या. आणि त्यांनी स्वतःकरिता तयार केलेल्या खोल्यांचा उपयोगही कधीच केला नाही. माझ्यासमोर अशी उदाहरणे असल्यामुळे मला तुझी दया येत नाही. परंतु माताजी काहीही म्हणत असल्या तरी तू खाण्यात ढिलेपणा करू नये. तुझ्याकरिता जे उचित असेल तेच खा.

शास्त्रीजींची प्रकृती जशी होती तशीच आहे. याचबरोबर सूची पाहा. यात ज्या गोष्टींवर लाल खुणा आहेत त्या घेण्याची शंकरनला इच्छा आहे. ते योग्य आहे काय? विचार करून तुझ्या टिपांसह तू सूची परत पाठव.

तुझ्या निबंधाचे काय झाले? निकाल कधी लागेल?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

१९४

फेब्रुवारी १३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र आजच मिळाले. शास्त्रीजींच्या दोन्ही जांघांमध्ये पू भरला हे. त्यांनी परत उपवास करण्याचे ठरवले आहे. मी करू देईन. यामुळे जखमा तर भरून येतीलच, शिवाय त्रास न होता मृत्यू येऊ शकेल. तारीबद्दल तू चांगली बातमी दिली आहे. जे योग्य वाटेल ते कर. उद्या शंकरन आणि कनू भेटण्याकरिता जातील. तुझे पत्र उघडून वाचेन आणि मग पाठवेन.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९५

फेब्रुवारी १५, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. शंकरन आणि मनू काल भाईला (प्यारेलाल) भेटून आले आणि दाताचा काही त्रास असल्याचे सांगत होते. बेरेटो तपासणार आहेत. आज अजून बातमी कळेल. वजन जितके होते तितकेच आहे. त्याला पाठवलेली सर्व पत्रे वाचल्यानंतर जपून ठेवण्याकरिता त्याने परत पाठवली आहेत.

महमूद भेटलाच नाही. शास्त्रीजींनी उपवास केला नाही आणि आता व्यवस्थित खात आहेत.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९६

फेब्रुवारी १६, १९४१

चि. सुशीला,

तारीचे वजन सात पौंडांनी वाढले की नऊ? हे चांगले आहे. भाईबद्दल अजून बातमी मिळाली आहे. शंकर जे म्हणाला होता तो केवळ अंदाज होता. (प्या)रेलाल चांगला असल्याचे दामोदरने आताच सांगितले. काळजीचे काहीही कारण नाही. डाक आता निघते आहे, सुशीलाला सांग की तिचे पत्र मिळाले.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९७

फेब्रुवारी १९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. आज दुपारी माझा रक्तदाब १६०। १०० होता, सकाळी उठल्यानंतर १७८। १०४ होता. रात्री चांगला होता. परंतु अर्धा तास जरी काम केले तरी पूर्वी जसा वाढायचा तसा वाढतो. याचा अर्थ होतो प्रार्थनेनंतर काम बंद केले पाहिजे. सुट्यांमध्ये इथे आल्यानंतर तूच यात सुधारणा कर आणि जर काही बदल करायचे असले तर ते सांग. सर्पगंधा घेऊ काय?

प्या(रेलाल)ची ७ तारखेच्या जवळपास सुटका होईल. तू इथेच पत्र पाठव. काही दिवसांकरिता त्याला तुझ्याकडे पाठवू शकेन अशी आशा आहे. तुझे हे वर्ष तिथेच निघून जाईल. अभ्यासातही मदत होईल.

तारीचे चांगले सुरू आहे ना? क्ष-किरण चिकित्सेनंतर काय निदान झाले?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९८

फेब्रुवारी २०, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मला तर वाटते की या वेळी तारीला तू तिथेच ठेवले तर चांगले होईल. एप्रिलपर्यंत तिथे हवामान चांगले असते. त्यानंतर पाहता येईल. इथे आली आणि बिघडली तर काय होईल? परंतु तुला जर वाटत असेल की प्रकृती खराब होणार नाही तर वेगळी गोष्ट आहे. इथून कोणाला पाठवण्यात काही अडचण जाणार नाही. अनसुया अजून आलेलीच नाही.

महादेवभाईंना याकरिता पाठवले नाही की मागील वेळी प्यारेलाल याकरिता अडून बसला होता आणि मग भानगड झाली होती. आता या वेळी महादेव नाही तर कोणी बसलेला नसल्याचे दिसेल. काम असते तर इतर कोणी नक्कीच गेला असता. आता तर कोणी जाण्याची आवश्यकताच नाही.

अमतुल सलामची जाण्याची इच्छा थोडी कमी होती. मी आदेश दिला असता तर ती गेली असती. माझ्याकडून आदेश देववला नाही आणि म्हणून ती गेली नाही. तिची प्रकृती चांगली आहे असे म्हणता येऊ शकत नाही. तिने एक औषध मुंबईहून आणले होते, ते ती घेत असते. बाकी आपल्या इच्छेने. गोकुळहून आलेला हा पेढा काही काही वेगळाच आहे.

आज मी भाकरी आणि शिजवलेली भाजी खाल्ली. यामुळे काय फरक पडतो ते आता पाहायचे आहे. आज सकाळी रक्तदाब जास्त होता. १७८।१०४, दुपारी १४४।८६. शास्त्रीजींनी उपवास सुरू केला आहे, किती दिवस चालतो ते आता पाहायचे आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

१९९

फेब्रुवारी २२, १९४१

चि. सुशीला,

काल महादेवकडून लिहून घेऊन समाधान मानले होते. याबरोबरची माळ तुझ्याकरिता कधीपासून ठेवलेली होती, परंतु तुला पाठवणे राहून जायचे. तिच्यात विदेशी धागा होता. प्रभावतीने तो काढून माझ्या हाताने कातलेल्या सुताने ती परत ओवली. चंदनाचे मणी आहेत.

कांचनच्या वेदना कमी झाल्या आहेत. सध्या फळांच्या रसावरच आहे. तिला फायदा झाला आहे असे वाटते. परंतु तुझी काही सूचना असेल तर सांगशील. शास्त्रीजी परत खाऊ लागले आहेत. ते भूक धरून ठेवण्याच्या परिस्थितीत नाहीत. भाज्यांचा माझा प्रयोग सुरू आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२००

फेब्रुवारी २३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तू जर तारीला तिथे ठेवू शकणार नाही तर तिची प्रकृती इथे सुधारू शकणार नाही अशी मला भीती वाटते. तिला हरिजन आश्रमात ठेवण्याचा विचार केला होता, परंतु तुझ्यावर तिचे ओझे टाकण्याची माझी इच्छा नाही. तुला योग्य वाटेल ते कर. काय करता येऊ शकते ते मी पाहीन. सत्याला माझे आशीर्वाद. तिचा नवा प्रवास सुखाचा होवो. मी माझ्या प्रकृतीची काळजी घेतच असतो. रात्री जवळपास काहीही काम करत नसतो. प्रार्थनेनंतर लगेच झोपण्याचा प्रयत्न करत असतो.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०१

मार्च २, १९४१

चि. सुशीला,

हो, इतक्यात मी तुला लिहू शकलो नाही, परंतु तू तारीच्या प्रकृतीबद्दल नक्कीच कळवशील अशी मला आशा होती. मी तर तिथे (अलाहाबादला) केवळ दोन रात्री राहिलो आणि दोन्ही रात्री ११.३०ला झोपलो. एक अक्षरसुद्धा कोणालाही लिहू शकलो नाही. पैसे गोळा करण्यातच सर्व वेळ गेला. रक्तदाब घेण्याकरितासुद्धा वेळ मिळाला नाही. काल मालीशसुद्धा होऊ शकली नाही. काल रात्री आगगाडीत थकवा काढला. रुग्णालय (अलाहाबाद येथील कमला नेहरू रुग्णालय. त्याचे गांधीजींनी फेब्रुवारी २८, १९४१ला उद्घाटन केले होते.) पाहून तुझी आठवण आली.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०२

खाजगी

सेवाग्राम,

मार्च ३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुझे पत्र कोणीही उघडत नसते. ते सरळ माझ्या हातात येत असते आणि मी ते सामान्यपणे लगेच फाडून टाकत असतो. त्यात काही आठवण ठेवण्यासारखे असेल तर उत्तर लिहिल्यानंतर ते फाडतो. तू विनाकारण इतकी काळजी करत असते. तुला अपात्र कोण समजतो? एप्रिलच्या सुट्यात तुला यायचेच आहे. तुझी इथे गरज आहे. तू जर अलाहाबादला आली असतीस तर कुठे ना कुठे तू सामावून घेतली गेलीच असती. मुद्दाम भेटायला येणे पाप तर समजत नाहीस ना? तुझ्या कल्पनाशक्तीवर नियंत्रण ठेव.

आहाराविषयी माझे म्हणणे पूर्णपणे मानण्यासारखे नसते. त्यात अर्धसत्यच आहे. विषमज्वरात तूसुद्धा उपवास करत असते. जानकीबेनला जो फायदा झाला तो अर्ध उपवासामुळे झाला.

शास्त्रीजींच्या जखमा परत सुकू लागल्या आहेत. डॉ. जी. त्यांच्यात इतका रस घेत आहेत की त्यांनी त्यांच्या जखमांचे रोज फोटो घेण्याकरिता सांगितले आहे. त्यांचे म्हणणे आहे की शास्त्रीजींची केस अगदी आगळीवेगळी आहे. परत वेदना होऊ लागल्या, आजार परत दिसू लागला यामुळे ते निराश झालेले नाहीत.

कांचनलाही लाभ तर झालाच आहे. तिचे वजन कमी झाले नाही. भारतानंदलाही उपवासाने फायदा झाला आहे. रा(ज) कु(मारी)च्या अंगावर डाग आणि पुरळ आले होते. दहा दिवस संत्र्यांच्या आणि अंगुरांच्या रसावर राहिली. काल सायंकाळी दूध दिले. पुरळ आणि डाग गेले. तुला आहार आणि उपवासाचे अवलोकन करायचे आहे परंतु शिक्षण संपल्यानंतर. लाहोरहून अजून काहीही बातमी नाही हे आश्चर्य आहे.

तारीचे पत्र आले होते. ती हरिजन निवासात खुश आहे असे दिसते. तुझी दोन वेळा जाण्याची व्यवस्था झाली आहे.

तुझी माळ मी ओवून पाठवली आहे. त्यामुळे काम वाढले हे का विसरतेस? किती प्रयत्नपूर्वक ती ओवलेली होती, ते काय सगळे वाया गेले? बाजारातून विकत घेऊन तर तुला पाठवली नाही? माझ्या संग्रहातीलच एक आहे. परंतु आजकाल तुझे मन व्यथित आहे. यामुळे तुला काहीही आवडत नाही. हे अस्वाभाविक आहे. दुरुस्त होईल.

काल बातमी मिळाली की प्यारेलाल ६ तारखेला सुटेल. कनू वा शंकरनमधून कोणी तरी त्याला घ्यायला जाईल. महादेव एक तर तिथे असेल वा आगगाडीत. पाहीन. अजून कोणाला पाठवणे आवश्यक असेल तर पाठवीन.

माझी प्रकृती काम केल्यामुळे बिघडली नाही. कामाने तर उलट फायदाच वाटतो. वजन एक पौंड वाढले आहे. ११० पौंड झाले आहे. काल रात्री रक्तदाब १४२।९२ होता. आज दुपारी १८४।११२. याचे कारण कळले नाही. हवामान बिघडले आहे. एकाएकी पाऊस आणि थंडी पडली. बा ठीक आहे. सत्याचे निर्विघ्नपणे आटोपले.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०३

७ मार्च १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. बरे झाले तू तुझ्या मनातले बोललीस. यामुळे तू शांत तर झाली असशीलच. भाई सुटून आला आला आहे. त्याने तुला तार केली आहे. लिहिलेही आहे. मी त्या तिथे येण्याची सूट दिलेली आहे. आता तो काय करील हे पाहायचे आहे. मी अगदी चांगला आहे.

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०४

मार्च ८, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. सुट्यांमध्ये तर तू इथे यायलाच पाहिजे.

तारीला खाज येते आणि पोट चांगले नाही. तिला मी जे लिहिले ते तिला वाचायला लाव. तुला योग्य वाटेल तेव्हाच करायला सांगितले आहे.

भारतानंदला शास्त्रीजींच्या खोलीत राहण्याची परवानगी मी दिली आहे. मला ही सेवा वाटत नाही तर घोर अज्ञानाची गोष्ट वाटते. ते एका मंदिराच्या ओसरीत एकटेच राहतात. भारतानंद त्यांची सेवा करील परंतु वेगळा राहील. तिथे अनेक मंदिरांचे खंडारे झालेले आहेत. आता शास्त्रीजींची जी काळजी घेतली जात आहे त्यात दासचा कोणताही हात नाही. केवळ भारतानंदचे चालते. ते जवळपास आठ केळी, दोन पौंड ताक, तीन लहान नारळ, १५ खजूर, ६ संत्री आणि गाजर वगैरे घेतात. तीन वेळा खातात.

कांचन चांगल्या प्रकारे जेवते. दूध, भाज्या, फळे वगैरे.

प्यारेलालला फार दिवस ठेवून घेऊ नको. त्याच्या उपस्थितीचा पूर्ण लाभ घे. दातांचे इथे पाहून घेऊ.

पत्राबरोबर मनूचा अहवाल आहे. काही कळते? शारदाला आंबे आणि १० ग्रॅम अमोनिया सल्फेट देणे सुरू केले आहे. सर्व बरोबर आहे काय?

शंकरन फार अस्वस्थ आहे. त्याच्या पत्राचे तू उत्तर दिले नाही असे राधाने लिहिले आहे. भाईंना विचार.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०५

मार्च ८, १९४१

चि. सुशीला,

तू तुझ्या शब्दकोशातून "निराशा" हा शब्द तर काढूनच टाकायलाच पाहिजे. शंकरन आता जाईल. मग दवाखान्याचे काय करायचे हा प्रश्न पडला आहे. तू काही सुचवू शकत असशील तर सुचव.

तुझ्या निबंधाचे काय झाले? त्यांनी काही कळले काय? स्वीकृत झाला की नाही हेसुद्धा कळवले नाही. प्रकाशला आशीर्वाद सांग. तिचे चांगले सुरू असेल? ती सुटी घेऊन येणार आहे काय? सत्याच्या लग्नात फार खर्च झाला काय? कोणी केला आणि किती?

सुशीला नाय्यर,
लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,
नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०६

मार्च १०, १९४१

चि. सुशीला,

प्यारेलाल असेल तर त्याचे पत्र मिळाले असे त्याला सांग. तुझे अनुसरण करून पळून जायचा त्याचा विचार आहे काय? सध्या तरी त्याला थांबवून ठेव. जास्त उकाडा होऊ लागेल तेव्हा पाठव वा इस्टरमध्ये तू येशील तेव्हा पाठव.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०७

मार्च ११, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले आणि प्यारेलालचेही. आजच कांचनला पाठवले. सुशीलाला परत पाठवायचे आहे. आशा आहे की हे सोयीस्कर राहील. प्यारेलालला सांग की तो शुक्रवारीच येणार असल्यामुळे त्याला पत्र लिहिले नाही. कामाने बांधलो गेलो आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०८

मार्च १३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मला थोडे वाईट वाटले. पोस्ट कार्डात तुला वाईट वाटावे असे काही मी लिहिले याची मला जाणीवही नाही. फार घाईत लिहीत असतो. घाईघाईत मी जर किंचितसे सूचक लिहिले असेल तर तू इतकी संवेदनशील का व्हायला पाहिजे? अशी नाजूक का आहेस? तू कोणाला घाबरतेस? इतके संवेदनशील असणे हा माझ्या मते एक रोगच आहे. तू यापासून मुक्त व्हायला पाहिजे. तुझी भावना मी समजू शकतो.

अखेरीस तुला काय करायचे आहे याची चिंता तू का करतेस? ईश्वराची इच्छा असेल तसे तो करील. तू त्याला शरण जा. मी सांगितलेले काम तू करत राहिलीस तर माझे समाधान होईल.

शारदा चांगली आहे. ती व्यवस्थित खाते. आनंदला 'फेरी अमोनिया सायट्रस' दिले जात आहे. 'फेरीयट सोडियम सायट्रस' द्यावे असे तू म्हणाली होती काय? या दोन्हींच्या गुणात काय अंतर आहे?

शंकरन फार उदास असतो. रडत असतो. कोणतीही स्त्री समोर दिसली की तिच्या गुप्तांगाचाच विचार करतो. यामुळे तो त्रस्त होतो. काय करता येऊ शकते ते पाहतो.

भारतानंदच्या गुडघ्याचा चुराचुरा झाला आहे. तो मुंबईत जे. जे. रुग्णालयात आहे. काही दिवसात त्याची शस्त्रक्रिया होईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२०९

मार्च १४, १९४१

चि. सुशीला,

माझे कालचे लांब पत्र मिळाले असेल. आहारात बदल केल्यानंतर शास्त्रीजींच्या प्रकृतीत आश्चर्यजनक बदल झाला आहे. नारळ, खजूर आणि केळी बंद केली आहेत आणि त्या ठिकाणी पपई, संत्री, आंबट लिंबू, कच्चे गाजर आणि भरपूर कडूनिंब देतो आहे. त्यांचे समाधानही होते.

काल महादेव सरदारना भेटण्याकरिता आणि हरिजन परत प्रकाशित व्हावे म्हणून व्यवस्था करण्याकरिता पुण्याला गेला आहे. राजकुमारी आज दिल्लीकरिता रवाना झाली. ती महाविद्यालयाच्या संबंधात पाच दिवस तिथेच राहील. त्यानंतर भावाकडे जाईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२१०

मार्च १५, १९४१

चि. सुशीला,

प्यारेलाल पोहोचला. आज मित्राकरिता बरेतोकडे गेला आहे.

भारतानंदचा गुडघा तुटला. यामुळे आता शंकरनचे जाणे राहिले. ईस्टरमध्ये तर तुलाच इथे यायचे आहे. येण्याची तारीख लिहिशील. इथे तर तुझ्याकरिता काम पडलेलेच आहे. मी चांगला आहे. रक्तदाब दुपारी १५६।९० होता. खाणे, पिणे, झोपणे व्यवस्थित आहे. अमतुल सलाम भाज्यांचा रस, मध आणि संत्र्यांच्या रसावर आहे. महादेव अजूनही मुंबई-पुण्यात चकरा मारतो आहे. गोसीबेन आज जाणार आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२११

मार्च १८, १९४१

चि. सुशीला,

अजून तरी तुझे पत्र आले नाही. आज प्यारेलालने ९ वाजता परत सविनय आज्ञाभंग केला आणि त्याला १० मिनिटांच्या आत पकडले. उद्या केस चालेल. खुश आहे. बाशी संबंधित पत्राच्या त्वरित उत्तराची अपेक्षा आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२१२

मार्च २१, १९४१

सुशीला नाय्यर,

१५ हनुमान रोड,

नवी दिल्ली

उद्या सकाळी बा तिथे पोहोचते आहे. नवी दिल्ली स्थानकावर घेण्याकरिता जा.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२१३

मार्च २१, १९४१

चि. सुशीला,

तुझी तार आली आणि बाने ठरवून टाकले. आजच तुला आणि लक्ष्मीला तार केली आहे. आता योग्य वाटेल ते कर. रुग्णालयात नेण्यासारखी असेल तर ने. नंतर तुझ्याबरोबर परत आण. लवकर दुरुस्त झाली तर लवकर पाठव. तू लिहिले कोणाबरोबर पाठवू. सोबत कोणाची तरी मिळाली च, परंतु खास कोणालाही पाठवणार नाही.

तुझी पत्रे मिळाली. त्यांचे उत्तर आता नंतर.

बा पोहोचल्याची मला तार करशील. बाच्या प्रकृतीबद्दल दररोज कळवत जा.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२१४

मार्च २३, १९४१

चि. सुशीला,

आजच तुझी तार मिळाली. तू उशिरा केली असशील.

आज तुला मदालसाबद्दल लिहितो. तिच्या तोंडात फोड येत असतात. तिला काही दिवस संत्र्यांच्या रसावर ठेवले. आजकाल भाज्यांचा रस आणि संत्री घेत असते. तरीही फोड जात नाहीत. तू काही सांगू शकते काय?

शारदाच्या आनंदला काही ना काही त्रास असतोच. त्याला तुझ्याकडे पाठवण्याची इच्छा होतच असते. आता तर फार वेळ झाला असेल, पण तुझी इच्छा असेल तर मी पाठवायला तयार आहे. तो जर तिथे आला तर तो राहील कुठे? त्याला देवदासकडे ठेवता येईल काय? तुझ्या घरात काही जागा आहे काय? विचार कर आणि सांग. नाही म्हणायचा संकोच करू नको. मला नेहमीच अशा मदतीची गरज पडत असल्यामुळे मी तुझ्यावर ओझे टाकतच असतो. तुला माझा स्वभाव माहीत आहे, माहीत आहे ना?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२१५

मार्च २५, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तारीकरिता पाचगणीला जागा मिळाली आहे. या महिन्याच्या शेवटी वा जेव्हा बरे वाटेल तेव्हा जाऊ शकेल.

बाबद्दल कळले. मी तर तिला तुझ्या हाती सोपवले आहे.

तुझ्या पेपरसंबंधी तर घोर काळोख आहे असे म्हणावे लागेल. पण त्यामुळे निराशेचे कारण काय? परीक्षा एक निमित्त आहे. आता नाही तर ऑक्टोबरमध्ये होईलच.

"हरिजन" अहमदाबादहून प्रकाशित होईल आणि तेही ५ तारखेला.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२१६

मार्च २६, १९४१

चि. सुशीला,

बासंबंधी तू काही माहिती दिली पाहिजे. तिची छाती कशी आहे, हृदय कसे आहे, खोकला कसा आहे, गुदद्वारावर दुखत होते ते कसे आहे, तिथे गाठ आहे, ती कशाची आहे?

कांचनची प्रकृती तुला ढासळल्यासारखी वाटते काय?

तारीकरिता पाचगणीत घर घेतले असे समज. आता हवे तेव्हा पाठवू शकते. ती जर तिथून सरळ पाचगणीला जाणार असेल तर त्याकरिता तिला कोणते सामानसुमान लागेल याबद्दल तिच्याशी चर्चा करून मला कळव.

शारदाच्या आनंदला ९९ ते १०० ताप असतो. हुंदडण्यात काहीही अंतर नाही. सारखा खेळत असतो. खातोसुद्धा चांगला. डॉ. दास म्हणतात की उन्हाळ्याच्या दिवसांत काही मुलांची प्रकृती अशीच असते आणि त्यात काळजी करण्यासारखे काहीही नाही. तुझे मत काय आहे? तू काही सुचवू शकते काय?

मदालसाच्या तोंडात आलेले फोड बसत नाहीत. तिचा आहार अगदी साधा आहे. तिच्याबद्दल काय?

आता शास्त्रीजी जे म्हणतील ते मी त्यांन देऊ लागलो आहे. त्यांच्याबद्दल निश्चित काहीही संगता येत नाही.

त्यांच्या जखमा परत-परत उमळतात. त्यांच्या बोटांना असलेल्या जखमा कमी-अधिक प्रमाणात दुरुस्त झाल्या आहेत. एरव्ही ते चांगले आहेत असे म्हणता येऊ शकते. मी अर्थातच चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - हे सकाळी लिहिले होते. त्यानंतर तुझे पत्र आले. तू इथे निश्चितच येते आहेस. यामुळे तुला जेव्हा सुटी मिळेल तेव्हा बाची आणि तारीची तयारी असेल तर त्या दोघींनाही सोबत घेऊन ये. तुला जर १४ दिवसांची सुटी मिळाली तर फार चांगले होईल. तू येशील तेव्हा शंकरनबद्दल आपण पाहू.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

२१७

मार्च २८, १९४१

चि. सुशीला,

शारदा आणि मदालसा यांच्याबद्दल मी समजू शकतो. तू येऊन सर्वांना तपासशील आणि मग मला काय करायचे ते सांगशील. तुला यायचेच आहे हे मी तुला आधीच लिहिले आहे. तुझी इच्छा असेल तर तू आधी लाहोरला जाऊ शकते. तुला सोयीस्कर असेल तसे कर. तू आल्यानंतर तुझी प्यारेलालशी भेटण्याची व्यवस्था केली जाईल.

डॉ. मानू यांच्या वडिलांच्या प्रकृतीत सुधारणा होते आहे. मी स्वतःच त्यांच्यावर उपचार करत आहे. ते केवळ संत्र्यांचा रसच घेत असतात. आधी त्यांना झोप येत नव्हती, आता येते. त्यांची शक्ती कायम आहे. रक्तदाब नियंत्रणात आहे. भयंकर उकाडा आहे. प्यारेलालचा लेख विसरू नको.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२१८

खाजगी,

मार्च २९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. बासंबंधी कळले. तुला येण्यात उशीर होणार असेल तर तू तारीला पाठवू शकते. मी तिला इथून ताबडतोब पाचगणीला पाठवीन. कांचन तिला तिथे घेऊन जाईल आणि १५ तारखेनंतर सुशीला तिथे जाईल.

मी तुला काय लिहू? तू इथे यायला पाहिजे आणि आणि शक्य तितके जास्त दिवस इथे राहायला पाहिजे. मी इतकेच म्हणू शकतो की तुझ्याशिवाय मी इथे अडलो आहे, परंतु तुला लाहोरमध्ये खरोखरच काही काम असेल तर तू तिथे जा आणि मग इथे ये.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तू हरिजनला मिळालेली नोटीस पाहशील. परंतु एक सरकारी पत्रही आहे ज्याच्या हिशोबाने हरिजन सुरू होण्याची वेळ अजून झाली नाही. यामुळे हरिजन आता ५ तारखेपासून प्रकाशित होणार नाही.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२१९

खाजगी,

मार्च ३०, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तू निम्मे सुट्या रद्द केल्या असे मी समजू काय? माझ्या मते ९ वा १० तारीख म्हणजे फार उशीर. परंतु तू तेच कर जे तुला शक्य असेल. बाबद्दल मला कळले. तिचा त्रास संपावा अशी माझी इच्छा आहे.

माझा रक्तदाब चांगला आहे. काल रात्री साडेनऊ वाजता तो १४०। ९२ होता. सकाळी तो १४५।९५ होता.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - तारी भुसावळ मार्गे सरळ पुण्याला जाईल.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२२०

एप्रिल १, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. बाबद्दलची बाब चिंताजनक होऊ लागली आहे परंतु तुझ्या हाती ही केस असल्यामुळे मी काळजी करत नाही. मला पत्र लिहिणे सुरू ठेव. हं, हे खरे आहे की तू बाला सोडून येऊ शकत नाही. पाहू काय होते ते, परंतु तुझ्या सुट्यात हे सर्व दिवस मोजले जाणार नाही काय? मी चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२२१

एप्रिल २, १९४१

चि. सुशीला,

आजच मला तुझे पत्र मिळाले. बाचे पत्रसुद्धा आजच मिळाले. त्यात तिने आपल्या वेदनांबद्दल लिहिले आहे. या वेळी तू दररोज दोन ओळी तरी लिहिण्याचा प्रयत्न करत जा. बाला इथे आणले पाहिजे असे जर तुला वाटत असेल तर संकोच करू नकोस. आपण बाला मुंबईला घेऊन जाऊ. आवश्यकता असली तर मीसुद्धा तुझ्याबरोबर येईन. या आजाराचे गांभीर्य मला कळते. तुम्हा लोकांची वैद्यकीय भाषा कळणे आम्हांला कठीण जाते. कोणाला विचारल्याशिवाय मी ती समजून घेण्याचा प्रयत्नही करत नाही. तू तार पाठवली तर मला आनंद होईल, तसे तर तू तिथे असल्यामुळे मला काळजी नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२२२

एप्रिल ३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. या पत्रातूनही मला बाबद्दलची परिस्थिती कळू शकली नाही. तू जर थोडे विस्ताराने लिहिशील तर मला काही कळू शकेल. थोडी काळजी वाटू लागली आहे.

संस्थानिकांबद्दल प्यारेलालने लिहिलेली पुस्तिका मी सकाळी डाकेने पाठवतो आहे. अजून प्रत हवी असेल तर मला सांग.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२२३

एप्रिल ५, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र आणि तार दोन्ही मिळाले. बा अजून १५ दिवस थांबू शकते असे लक्ष्मीच्या पत्रावरून कळले. आता मला कळले की तिच्या कातडीत भेग पडली आहे आणि ती सुईमुळे पडलेली नाही. शरीराच्या नाजूक भागात सुई टोचली तर कातडी फाटू शकते हे माझ्या आता लक्षात आले. अनेकदा लोकांनी केलेल्या हलगर्जीपणामुळेही शंका वाटते.

तुझ्या शिष्यवृत्तीची भानगडही काही वेगळीच आहे. यातून तुझ्या मनाचे प्रतिबिंब झळकते. डॉ. जीवराजला तू लिहिले यात काही चूक नाही. तुला शिष्यवृत्ती मिळेल अशी आशा आपण करू शकतो. तुला अशा गोष्टी मिळत राहतील याबद्दल मला किंचितही संशय नाही. तुझ्यासारखे कार्यक्षम आणि वाहून घेतलेले विद्यार्थी मिळणे ही साधी गोष्ट नाही. यामुळे कोणीही तुला मदतीचा हात देईल. तू फक्त पुढे जात राहा. अखेरीस तुझ्यातील या सर्व गोष्टींचा मला उपयोग होईल आणि यावरूनच तुझे स्थान इथेच आहे हे कळते. तुझ्या सुट्यांच्या दिवसात आपली भेट होऊ शकत नाही ही गोष्ट अर्थातच मला बोचत राहील. आता तुला सुट्या कधी मिळतील? तुला प्यारेलालची पुस्तिका मिळालीच असेल. अजून प्रती हव्या असतील तर कळव.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२२४

तार

वर्धागंज,

एप्रिल ७, १९४१

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

बाची संमती असेल तर ये.

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

२२५

तार

वर्धागंज,

एप्रिल ९, १९४१

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

परिस्थितीमुळे माफ करतो.. आताच येऊ नको.

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२२६

व्यक्तिगत

एप्रिल ९, १९४१

चि. सुशीला

तुझी तार मिळाली. तू तिथेच थाबले पाहिजे असे तार करून मी तुला कळवल्यामुळे तुला निश्चितच धक्का बसला असेल. आता बा जेव्हा पूर्णपणे चांगली होईल तेव्हाच काही दिवसांची सुटी घेऊन तिला घेऊन ये. अडचण काय आहे हे कळल्यामुळे आता मला काळजी वाटणार नाही. माझी उपेक्षाच या सर्व काळज्यांच्या मुळाशी होती.

अनेक लोक तुझ्या येण्याची वाट पाहत आहेत, त्यात मुख्य दुर्गाबेन आहे. त्यांच्या हातात फार वेदना आहेत. आज त्या मला म्हणाल्या, "आता सुशीला येत आहे. एक सुई टोचून ती मला दुरुस्त करील." तुझ्यावर तिचा फार विश्वास आहे. ज्याप्रमाणे कोणी श्रावणाची वाट पाहत असतो त्याप्रमाणे शारदा तुझी वाट पाहते आहे. तू जेव्हा तपासशील तेव्हाच आनंदचे समाधान होणार आहे. मी माझ्याबद्दल काय सांगू? तुझी वाट पाहणारी अजूनही किती तरी नावे आहेत. परंतु त्यांच्या खुशीकरिता तू बाला सोडून येऊही शकत नाही. आता ही पोकळी भरून येणार आहे. तुझ्या परीक्षेबद्दल कळावे म्हणून मी फार उत्सुक आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२२७

एप्रिल ११, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र दुःखाने भरलेले आहे, परंतु माझे दुःखही काही कमी नाही. तुझ्याकडून मला अर्थातच तपासून घ्यायचे होते. परंतु तू दुर्गा, शारदा, आनंद यांना तपासावे म्हणून मी उतावीळ झालो होतो. परंतु तू तिथे चिकटून राहणेच तुझे कर्तव्य आहे हे मला स्पष्ट दिसत होते. बाची मनापासून तयारी असल्याशिवाय बाला एकटीला तिथे ठेवता येऊ शकत नाही हेही मला स्पष्ट दिसत होते. ठीक आहे. तुझ्यासमोर काम आहे. तुझ्यासमोर तुझे शिक्षण, तुझा अनुभव आहे. हे सर्व महत्त्वाचे आहे यात काही संशय नाही. यामुळे यतो धर्मः ततो विजयः असे गाणे आपण म्हणू या.

माझी प्रकृती खरोखरच चांगली आहे. माझ्यात पूर्ण शक्ति आहे असे मला जाणवते. मी अन्न पचवू शकतो, माझे काम करू शकतो. तुझे सर्व नियम जरी मला आठवत असले तरी त्यांचे पालन करण्यासंबंधात मला माझीच असमर्थता जाणवते. सुशिलाबेन तुम्हांला असे कधीही करू देणार नाही, सुशीलाबेन रात्री ८ नंतर तुम्हांला कधीही काम करू देणार नाही, ती मुलगी आश्रमाची शोभा आहे असे म्हणून उर्मिलाबेन नेहमीच मला तुझी आठवण करून देत असतात. उद्या ती दिल्लीहून जाणार आहेस. परंतु मगन तिच्याशिवाय जिवंत राहू शकणार नाही, कोणता बाप राहू शकेल?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

२२८

एप्रिल १२, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. परीक्षेकरिता जाताना तझ्या खिशात नेहमीच माझ्या शुभेच्छा असतील. तू उत्तीर्ण होण्यासंबंधात मला किंचितही शंका नाही. तुझ्याबरोबर नेहमी ईश्वराचे आशीर्वाद असतात हे याचे कारण आहे. केवळ तू चांगल्या प्रकारे राहिली पाहिजे. परीक्षेआधी तुझ्या पाठीवरून हात फिरवण्याची माझी इच्छा होती, परंतु तितक्याकरिता तू इथे कशी येऊ शकली असती? बाबरोबर तू इथे यावे अशी निश्चितच माझी इच्छा आहे. आता मला बाची मुळीच काळजी नाही. ती लवकर यावी अशी घाई मला नाही.

प्यारेलालला आता कोणालाही भेटण्याची इच्छा नाही असा त्याचा निरोप आला आहे. मला त्याचे मन कळत नाही. त्याचे वाचन सुरू आहे आणि तो पुस्तके मागवत असतो. असे वाटते की त्याच्या दाढा अजून चांगल्या झाल्या नाही. त्याची जरी इच्छा नसली तरी तू जेव्हा इथे येशील तेव्हा त्याची जरूर भेट घेशील. ईश्वराची इच्छा असेल तसेच होईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२२९

एप्रिल १५, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. जेव्हा जमेल तेव्हाच ये. मी काळजीपासून मुक्त आहे. तू तुझे काम तिथे घेऊन जाऊ शकते.

तू कमला रुग्णालयात नोकरी करू शकते परंतु ते तुझे ध्येय असू शकत नाही. तालिमी संघामुळे मलाही औषधांची थोडीफार माहिती झाली आहे. परंतु याकरिता तुझ्या उपस्थितीची आवश्यकता वाटते. या उद्देशानेच तू शिकते आहेस असा विश्वास या वेळी तरी मला वाटतो. परंतु एक अदृश्य शक्ती आम्हांला कुठे घेऊन जाईल हे कोण सांगू शकतो? यामुळे परिणामाची काळजी न करता आपण आपले प्रयत्न सुरू ठेवले पाहिजे.

मला कागदपत्रे मिळतील तेव्हाच काय करता येऊ शकते ते मी पाहीन. आज मी प्यारेलालकरिता दोन पुस्तिका अजून पाठवतो आहे.

दुर्गाबेनचा ताप अजूनही कायम आहे. त्यांचे हात आणि पाय अकडलेले आहेत. सध्या त्या ठीक आहेत. त्यांना दररोज शेकावे लागते, मगच त्यांना बरे वाटते. डॉ. मानू त्यांच्यावर उपचार करत आहेत. त्यांना सेलीसिलेटच्या ज्या सुया टोचल्या जातात त्यामुळेही त्यांना आराम होतो. सध्या त्यांना जेवायला दिले जात नाही. तू असती तर काही प्रयत्न करू शकली असती. बालाही याची माहिती दे. बा नागपूरला गेली नाही तर बरे होईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मारक संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३०

वैयक्तिक

एप्रित १६, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुला लिहिण्याचा मला कसा काय त्रास होऊ शकतो? कामाच्या धबडग्यातूनही मी तुला लिहीत असतो. काही वेळा मी जर असे करू शकलो नाही तर मी विशेष प्रयत्न करत नसतो. काल असेच घडले. मी पोटावर मातीच्या पट्ट्या ठेवल्या होत्या. आणि मग मला झोप लागली. मध्यंतरीच्या काळात जर डाक निघून गेली तर तुला पत्र लिहायचे राहून गेले.

बा जर तुझ्याबरोबर रुग्णालयात वा घरी थांबू शकली तर मला ते आवडेल. इतकेच की तिचे माताजींवर ओझे व्हायला नको. बाची इच्छा असेल तर तसा बदल कर. तू प्रसंगोपात तिला पाहण्यापेक्षा ती जर तुझ्याबरोबर राहू शकली तर त्यामुळे तिला अधिक लाभ होईल.

प्यारेलालकरिता पत्रे येत असतात. त्याला जर ती पाठवता येऊ शकली असती तर मी ती त्याला पाठवली असती. मनाला लावून घेण्याच्या स्वभावावर तो विजय मिळू शकत नाही. आपण जर लक्ष घातले तर मनाला लावून घेण्याकरिता त्याची स्वतःची कारणे असल्याचे आढळून येईल. परंतु कारणे जरी असली तरी आपण मनाला लावून घेऊ नये अशी माझी शिकवण आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - दुर्गाबेनला काल परत वेदना होऊ लागल्या. परंतु आता तिला बरे वाटते.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३१

एप्रिल १७, १९४१

चि. सुशीला,

राजकुमारीने मला तुझे पत्र दिले. तू देवदासकरिता पाठवलेल्या वस्तू अजून मिळालेल्या नाहीत. त्या दोन्ही गोष्टी राजकुमारीबरोबर आल्या असत्या तर बरे झाले नसते काय? परंतु त्यांची घाई नाही.

बा पोहोचली.

इथे दिवस बरेच गरम आहेत. रात्री उशिरा छान आणि थंड वाटते. तुझी परीक्षा वारंवार लांबते हे किती धक्कदायक आहे! अशा गोंधळाच्या परिस्थितीतून तुला तुझी पदवी मिळवायची आहे ! परंतु काय करता येऊ शकते? तुला या व्यवस्थेच्या त्रासाचा सामना करावाच लागेल.

आशीर्वाद,

बापू

ता.क. - डॉक्टरांनी सैनिकी सेवेत दाखल होण्याबद्दल तू दिलेले उत्तर बरोबर आहे.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३२

वैयक्तिक.

एप्रिल १८, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुझी परिस्थिती मला माहीत नाही काय? परंतु हा विषय मी आताच कशाला काढायला पाहिजे? तुला तिथे जे काही काम करायचे असेल ते पूर्ण कर. एक प्रकारे पाहिले तर कोणतेही काम कधीही पूर्णपणे संपत नसते. परंतु जे सहजपणे पूर्ण करता येऊ शकते ते पूर्ण करायला पाहिजे. मग आपोआपच मार्ग उघडेल.

तू देवदासला कागदपत्रे दिली काय? त्यात प्यारेलालचे लेख आहेत. ते पाहून त्यांचा आताच उपयोग करता येऊ शकतो काय ते मी पाहिले पाहिजे.

सुटकेनंतर काल ब्रह्मदत्त आला होता. त्याने प्यारेलालची चांगली बातमी दिली. उद्या प्यारेलालला भेटायला महादेव जाईल तेव्हा अजून कळेल.

दुर्गाबेन चांगली आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३३

एप्रिल २०, १९४१

चि. सुशीला,

काल मी तुला लिहू शकलो नाही. महादेवला मी नागपूरला पाठवले आहे. त्याची प्यारेलालशी अतिशय समाधानकारक भेट झाली. तो तुला भेटीची पूर्ण माहिती सांगेल.

सरूपबेनला (विजयालक्ष्मी पंडित) घेण्याकरिता तो अर्थातच वर्ध्याला जाईल.

प्राध्यापक त्रिवेदी (जे.पी. त्रिवेदी, मानशंकर त्रिवेदी यांचे वडील) बरेच आजारी असल्यामुळे त्याला परतण्याकरिता बराच वेळ होऊ शकेल. त्यांच्याकरिता त्याला थांबावे लागेल. मी तुला एका गोष्टीकरिता लिहीत आहे. प्यारेलालचे म्हणणे आहे की पूर्ण तयारी झाल्याशिवाय तू परीक्षेला बसू नये. यामुळे तू ऑक्टोबरमध्ये वा येत्या एप्रिलमध्ये परीक्षेला बसलेली त्याला आवडेल. मला खात्रीपूर्वक वाटते की तुझी जर पूर्ण तयारी असेल तर तू या मेमध्येच परीक्षेला बसायला पाहिजे. तुझ्याबाबतीत वैद्यकीय सेवा ही ईश्वरी देणगी आहे आणि यामुळे तू जेव्हा केव्हा परीक्षेला बसशील तेव्हा तू सहजपणे उत्तीर्ण होशील. जोपर्यंत ज्ञानाचा प्रश्न आहे तू त्यात सतत भर घालत राहणार आहे. त्याकरिता तुला कोणाच्या प्रशस्तीपत्राची आवश्यकता नसेल.

बा तिथे पोहोचली आहे असे दिसते. तू तिच्या प्रकृतीबद्दल अर्थातच मला कळवशील. शारदाच्या मुलाला आंबे आणि दूध देण्याकरिता आम्ही सुरुवात केली आहे. यामुळे त्याला शौच्याला होऊ लागली आहे. आता मदालसावर उपचार करायचा राहिला आहे. मी तिलाही याच गोष्टी देत आहे. यामुळे तिची प्रकृती चांगली राहते. दुर्गाबिन अगदी चांगली आहे असे म्हणता येईल. आज तिला तापही नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३४

एप्रिल २१, १९४१

चि. सुशीला,

तुझे पोस्टकार्ड मिळाले. बाकरिता सोबत पत्र जोडले आहे. ते तिला दे. दुर्गाबेन अगदी चांगली आहे. तू जेव्हा इथे येशील तेव्हा तुला तिच्या प्रकृतीत बरीच सुधारणा आढळेल अशी आशा आहे.

परीक्षेच्या वेळी तुझ्यावर कोणतेही ओझे असलेले मला आवडत नाही. परंतु तुला बा ओझे कसे वाटेल? ईश्वरच तुला वाचवू शकतो. तू शुल्क जमा केले हे चांगले केले.

मी चांगला आहे. शास्त्री चांगले आहेत. त्रिवेदीजींकरिता एक तज्ज्ञ आला होता. त्याने काही महत्त्वाचे बदल केले.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३५

एप्रिल २२, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. प्यारेलालला कोणी तरी भेटायला जायलाच पाहिजे असा नियम मी केला आहे. पी. गुप्ता यांचा पत्ता मला पाठव. जेव्हा त्याची परत भेटीची वेळ येईल तेव्हा मी त्याला सूचना देईन.

तुझ्या परीक्षेबद्दल मी समजू शकतो. मला मुळीच काळजी वाटत नाही. ती केव्हाही होऊ शकते. ती जर मेमध्ये झाली तर कोणतीही काळजी न करता तू मला वेळ देऊ शकशील. या दृष्टिकोनातून ती मेमध्ये संपलेली मला आवडेल.

बाची प्रकृती चांगली आहे आणि यामुळे मी तिची मुळीच काळजी करत नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३६

एप्रिल २३, १९४१

चि. सुशीला,

आज तुझे एकही पत्र आले नाही. तुला माझे कालचे पत्र मिळाले असेल.

आज दुर्गाबेन किती तरी चांगली आहे.

बाबद्दल माझ्या दोन सूचना आहेत. तिने कटिस्नान घ्यायला पाहिजे आणि रात्रीच्या वेळी खालच्या पोटावर मातीचा लेप लावला पाहिजे. या दोन्ही गोष्टींचा गुदद्वारावर परिणाम झाला पाहिजे.

आज जवळपास प्रत्येकजण उपवासावर आहे.

सत्याचे जीवन कसे काय सुरू आहे? प्यारेलालला पत्र लिही आणि ते इथे पाठव. मी ते त्याच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करीन.

उर्मिला तिथे गेली आहे. तुला भेटण्याकरिता मी तिला सांगितले आहे.

माझी प्रकृती उत्तम आहे. आनंदला बस्ती दिल्याशिवायही शौच्याला होत असेल तर तुझे काय म्हणणे आहे?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३७

एप्रिल २४, १९४१

चि. सुशीला,

काल मी तुला लिहू शकलो नाही (ही चूक आहे असे दिसते. पाहा "सुशीला नाय्यर यांना पत्र," एप्रिल २३, १९४१). आणि आज मी हे झोपायच्या वेळी लिहितो आहे. संपूर्ण दिवस लोकांच्या भेटीगाठीत गेला.

दुर्गाबेन चांगली आहे. मी स्वतःही चांगला आहे. प्यारेलाल चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३८

एप्रिल २४, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. बासंबंधीची तुझी सर्व पत्रे मिळाली आणि त्या सर्वांचे मी उत्तरही दिले. तू मला मनाई केलेली असल्यामुळे मी बाला तिच्या तापासंबंधी काहीही लिहिलेले नाही. मला माहीत आहे की बाला तू ओझे समजणार नाही. तरीही बा तुझा वेळ घेते, घेते ना? तिला पाहायला तुला दररोज दोन वेळा जावे लागते ही गोष्ट मला खटकते. बा केवळ तुझ्या हातात आहे आणि यामुळे तुझ्याजवळ असलेले सर्व काही तू तिच्यावर उधळशील. परंतु यासंबंधात माझे स्वतःचे कर्तव्य काय आहे? आणि तरीही बा तिथे तुझ्याबरोबर असल्यामुळे मी अजून कशाची अपेक्षा करू शकतो? यामुळे तू जे लिहिते ते अगदी बरोबर आहे.

आज माझा उपवास आहे. (हा उपवास एप्रिल २७ला सोडण्यात आला होता; पाहा "अपक्ष पुढाऱ्यांच्या परिषदेचा प्रस्ताव", मार्च १४, १९४१) हे पत्र तुझ्या हाती पडेल तेव्हा उपवास सुटायला फारफार तर ४ वा ५ तास राहिलेले असतील. आज मला काहीही जाणवत नाही. मी भरपूर पाणी पितो आहे. उद्याचा दिवस जर अशाच प्रकारे गेला तर काळजीचे कोणतेही कारण असणार नाही. आणि तसे जरी झाले नाही तरी २४ तासात कोणतीही हानी होणार नाही. हा उपवास नैतिक कारणाकरिता करण्यात आला आहे. शरद आणि आभा खोटे बोलल्या याने मी फार अस्वस्थ झालो. माझ्या अटी मोडल्या जाणे अपरिहार्य होते आणि जेव्हा त्या मोडण्यात आल्या तेव्हा माणसाजवळ खोटे बोलण्याशिवाय पर्याय नसतो. यामुळे माझ्या मानसिक शांततेकरिता मला उपवास करणे भाग होते.

ही माहिती बालाही दे. मी ती आजूबाजूला पसरू दिली नाही. तूसुद्धा हे बाशिवाय इतर कोणालाही सांगू नको. लक्ष्मी वा देवदासजवळ याचा उल्लेख करू नको. उपवास सुटल्यानंतर मी तार पाठवणार नाही. काळजी करण्याचे मुळीच कारण नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२३९

सेवाग्राम, वर्धा,

एप्रिल २६, १९४१

चि. सुशीला,

माझ्या श्रद्धेला भक्कम आधार आहे. ती अनुभवावर आधारित आहे. कोणत्याही शिक्षणाला सीमा नसते. सुदैवाने परीक्षकांचीसुद्धा शिक्षणाच्या असीमतेपासून सुटका नाही. मग आपण या गोष्टीला घाबरण्याचे कारण काय? तू अर्थातच घाबरणाऱ्या लोकांच्या कोटीतील नाहीस.

आतापर्यंत तरी कोणताही त्रास न होता उपवास व्यवस्थित सुरू आहे. माझे दैनंदिन काम मी करू शकतो. मी तुला हे सकाळी ६ वाजता लिहीत आहे. मी भरपूर पाणी पीत आहे.

तू जर इथे जूनमध्ये येऊ शकलीस तर फार चांगले होईल. दुर्गा चांगली आहे. प्रा. त्रिवेदींना रक्तदाब आहे. आता त्यांना लघ्वी करायलाही त्रास होतो. त्यांना मधूमेह आहे. परंतु त्यांची प्रकृती बरीच चांगली आहे. दुर्गाला विश्रांती सांगितलेली आहे

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४०

एप्रिल २७, १९४१

चि. सुशीला,

पाच वाजून वीस मिनिटांनी निंबू आणि पाणी घेऊन मी नुकताच उपवास सोडला. मध्यंतरी द्राक्ष आले आणि ते खातखात मी हे लिहीत आहे. माझी प्रकृती अगदी चांगली आहे. आज मी दिवसभर अंथरुणात पडून होतो. मालीशकरिता ते मला आरामखुर्चीत घेऊन गेले. दिवसभर मी द्राक्षे आणि लिंबाच्या रसावर राहीन. आता काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही.

आज मी अधिक लिहिणार नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४१

एप्रिल २८, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. बाबद्दल मला समजले. बाला पाठवलेल्या पत्रातून तुला माझ्याबद्दल कळेल. त्यात मी रक्तदाबाचा उल्लेख केलेला नाही. तो दुपारी १३२।८६ होता. उपवासाने निश्चितच काही फायदा होईल. वजन १०५ पौंडावरून १०१ पौंडांवर आले.

मदालसा पूर्णपणे दुरुस्त झाली असे म्हणता येऊ शकते. ती सकाळी आणि संध्याकाळी एक तास फिरते. तिच्या चेहऱ्यावर तेज आहे. ती दूध, फळे आणि भाज्या योग्य पद्धतीने घेते. बस्ती वा रेचक न घेता तिला शौच्याला साफ होऊ शकते.

जानकीबेनची जखम अजून भरलेली नाही. तू पाहिल्यानंतर ती दुरुस्त झाली की नाही हे मला सांगशील. तसे तर तिचे खाणेपिणे चांगले आहे आणि ती हालचालही करते. उशी न घेता ती बसते.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४२

एप्रिल २९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र आपुलकीने आणि प्रेमाने भरलेले आहे. मला माहीत आहे की मी केव्हाही उपवास केला तर तुला शक्य असले तर तू लगेच उडत येशील. मला खात्री आहे की बाची प्रकृती दुरूस्त करण्याकरिता तू शक्य ते सर्व करशील आणि तसे करताना एम. डी. पदवी मिळण्यापेक्षाही तुला हजारपट आनंद होईल. मी मुळीच काळजी करून राहिलेलो नाही. तुला शक्य असेल तेव्हा ये.

आनंदचे वजन आता थोडेसे वाढले आहे. ते १९ पौंड आहे. तो चांगला आहे. तो फार खोडकर झाला आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - राजकोटला मला जो त्रास होत होता तो इथे होत नाही. आणि मी चांगला आहे. आज मी एक पौंड दूध घेतले.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४३

मे १, १९४१

चि. सुशीला,

तू बाला थांबवून घेतले हे चांगले केले. तिचा ताप पूर्णपणे गेला, हो ना? बाने कुठेही मुळीच जाऊ नये हे तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे.

तू परीक्षेला निश्चितच बसते आहेस असे मी समजतो. तू परीक्षेत उत्तीर्ण होशील हे मी गृहीत धरून चाललो आहे. तू त्या मुलीबद्दल जे लिहिले ते अगदी बरोबर आहे. तू जर तिला स्वतः तपासले असते तर तुला अधिक समाधान मिळाले असते. परंतु असा तोल सांभाळणे नेहमीच शक्य नसते.

मी चांगला आहे. दुर्गाबेनसुद्धा चांगली आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४४

मे २, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून एकही पत्र नाही. लक्ष्मीकडून एक आले. एव्हाना बा पूर्णपणे चांगली झाली असेल. दररोज माझी शक्ती वाढते आहे.

प्रा. त्रिवेदी वारल्यानंतर माझे मन अस्वस्थ आहे. ते हजारो लोकांना मदत करत होते. त्यांना वर्ध्यात आणण्याकरिता मीच कारणीभूत होतो. मानू आणि इतर डॉक्टरांनी शक्य तितके सर्व प्रयत्न केले; परंतु आयुष्याची दोरीच जेव्हा कापली जाते तेव्हा काय करता येऊ शकते?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४५

मे ४, १९४१

चि. सुशीला,

मला तुझे पत्र मिळाले. तुझी परीक्षा केव्हा आहे? असे किती दिवस चालणार आहे? निकाल कधी कळेल? तू उत्तीर्ण होणार आहे असे मी गृहीत धरून चालतो आहे. तू कोणत्याही गोष्टीचे ओझे मनावर घेऊ नको.

सध्या तरी माझा रक्तदाब चांगला आहे. मी ९ वाजता झोपलो. इथे रात्री प्रसन्न आणि शांत आहेत. मला वाटते की दुर्गाबेनची प्रकृती दिवसेंदिवस सुधारते आहे. तिला सध्या कोणताही आजार नाही असे म्हणता येईल.

मुंबईत झालेल्या दंगलींच्या संदर्भात महादेवभाईला उद्या मुंबईला जावे लागणार आहे. (सांप्रदायिक दंगलीसंबंधातील गांधीजींच्या लेखाकरिता पाहा "सांप्रदायिक दंगली", मे ४, १९४१)

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४६

५ मे १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. इतक्यात मी एकही दिवस विसरलो नाही. आणि लागोपाठ दोन दिवस तर कधीही नाही. बाची प्रकृती नाजूक आहे. तू तुझ्याकडून सर्व काही करते आहेस. तुला बरेच यश मिळाले आहे. अजून काय? हा महिना संपेल तेव्हा तुम्ही दोघीही इथे याल. तुझ्या परीक्षेबद्दल मला मुळीच संशय नाही. तू अर्थातच दररोज अनुभव मिळवते आहेस. यामुळे तुझ्या ज्ञानात भर पडत नाही काय? आणि तू वाचनही पूर्णपणे थांबवलेले नाही. तुझ्या माघारी बाकडे कोण पाहील?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४७

वर्धागंज,

मे ६, १९४१

डॉ. सुशीला,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

देवदास म्हणतो की अतिशय भक्तिभावाने तू सेवा करत असूनही बा अशक्त आणि अस्वस्थ होते आहे. असे असेल तर लाहोरला जाण्यापूर्वी तिला इथे पाठव. परंतु याबाबतीत तू अधिक चांगला निर्णय घेऊ शकशील.

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४८

मे ८, १९४१

चि. सुशीला,

मी तुला तार पाठवली आहे (पाहा मागील विषय). मी तुझ्या उत्तराची वाट पाहत होतो आणि यामुळे मी तुला काल काहीही लिहिले नाही. बा खरोखरच चांगली असेल अशी आशा आहे. यामुळे मी त्याकरिता तार पाठवलेली नाही. आता जेव्हा तुझी परीक्षा आहे तेव्हा तुला बाची काळजी घ्यावी लागत आहे हे जाणवल्याने मी अस्वस्थ होतो. परंतु ईश्वर तुझे रक्षण करील हे मला माहीत आहे.

माझी प्रकृती अगदी उत्तम आहे. डॉक्टरन आणि शंकरनने लीलावती, राजकुमारी आणि अमतुल सलाम यांना माझ्या अंथरणापासून दूर हलवले. माझ्या एका बाजूला दास झोपले आणि दुसऱ्या शंकरन. असे पाचसहा दिवस चालले. लीलावतीने गोंधळ केला आणि म्हणून काल रात्री ती परत आली. राजकुमारी आणि अमतुल सलाम या योजनेशी सहमत आहेत. लीलावतीला याची कल्पना नव्हती. असे असले तरी ती काही अंतरावर झोपली. डॉक्टर दासनी जेव्हा वेगळी सूचना केली तेव्हा तिने तक्रारसुद्धा केली नाही. हा सर्व बदल मला विश्रांती मिळाली म्हणून करण्यात आला.

'हार्डोनियन'मधील (बहुधा लेडी हार्डिंग्ज मेडिकल कॉलेजची पत्रिका) तुझा लेख मी वाचला हे मी तुला लिहायलाच विसरलो. मला वाटते तो चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२४९

मे ९, १९४१

चि. सुशीला,

मी तुझ्या तारेची वाट पाहत होतो. ती आली नाही. तू येण्यापूर्वीच जर बा आली तर तिला सोबत लागेल. यामुळे मी लीलावतीला पाठवत आहे. याच बरोबर बा अंथरुणाला खिळून असेपर्यंत लक्ष्मीवरील ओझे कमी होणे असाही याचा अर्थ होईल. आता लक्ष्मी तिथे येत आहे. तिला जर तिथे थांबावे लागले तर तू तिला अर्थातच तुझे महाविद्यालय वगैरे दाखवशील. हे काम तू इतर कोणावर तरी सोपव. तुझा वेळ घेण्याची माझी इच्छा नाही.

प्यारेलालकरिता तू पाठवलेली कागदपत्रे मी परत पाठवत आहे. त्याला ती नको आहेत.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२५०

मे ९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पोस्टकार्ड आणि पत्र दोन्ही एकाच वेळी मिळाले.

बाबद्दल मी समजू शकतो. लीलावतीला पाठवल्यानंतर मला मोकळे वाटले. लक्ष्मीवरील ओझ्याचे मला दुःख होत होते. लीलावती तुला येथील सर्व बातम्या सांगेल. तुझ्या परीक्षेचे खरोखरच विचित्र आहे. हे असे कसे विद्यापीठ आहे की जे ऐन वेळेपर्यंत परीक्षेची तारीखही ठरवू शकत नाही? यातून तू काय मिळवशील? परंतु ते काही जरी असले तरी तुला या अग्निदिव्यातून जावे लागेल.

तू दोन वा तीन जूनला येशील अशी अपेक्षा आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२५१

मे १०, १९४१

चि. सुशीला,

आज तुझे एकही पत्र नाही. परंतु देवदासचे मात्र एक पत्र आले. बाच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे त्यातून कळले. आशा आहे की ही सुधारणा यापुढेही होत राहील आणि ती इथून गेली होती तेव्हा तिची प्रकृती जशी होती त्यापेक्षा ती इथे येईल तेव्हा तिची प्रकृती अधिक चांगली असेल.

तुला हे पत्र १२ तारखेला मिळेल. तुझी परीक्षाही १२ तारखेला सुरू होईल. यातील कोणते विधान खरे ठरणार आहे? दुर्गाबेन चांगली आहे. आणि मीसुद्धा

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२५२

मे ११, १९४१

चि. सुशीला,

आज कोणाचेही पत्र नाही. तू लाहोरला गेलेली असशील. तरीही मी हे पत्र पाठवत आहे. सोबत जोडलेले कात्रण कदाचित तुझ्याकरिता उपयोगी असेल. ते खोडलेले होते, परंतु ते जेव्हा माझ्या लक्षात आले तेव्हा मी ते तुझ्याकरिता कापले. बा चांगलीच असेल.

इथे सर्व काही ठीक सुरू आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - आशा आहे की तू तारीला नियमितपणे मार्गदर्शन करत असशील. तिला जुनाट बद्धकोष्ठ आहे. ती म्हणते की ती तुला लिहीत असते.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२५३

मे १२, १९४१

चि. सुशीला,

तुझी अगदी परिपूर्ण माहिती देणारे पत्र मिळाले. देवदासच्या पत्राने मी इतका घाबरलो होतो की तुझ्यावर सर्व काही सोपवणारी तार मी तुला पाठवली होती. मी जरी तारेने उत्तर पाठवायला सांगितले नव्हते तरी मी तशी अपेक्षा करत होतो. परंतु आता ती जुनी गोष्ट झाली आहे.

आता केवळ तूच बाला आणशील.

परंतु तुझ्या परीक्षेचे काय? काय गोंधळ आहे! असे मी कुठेही पाहिले नाही. परीक्षा १२ तारखेला होईल असे लॅझारस कोणत्या आधारावर म्हणतो? या महिन्यात जर परीक्षा झाली नाही तर जून महिन्यात तू लांब सुटी घेऊ शकशील काय?

लीलावतीला सांग की मला तिचे पत्र मिळाले. तिला अभ्यास करण्याकरिता प्रेरित करत जा. अभ्यासाशिवाय तिने तीन महिने राहावे अशी माझी इच्छा नाही.

जमनालालजी आजारी पडले आहेत. मी दासना पाठवले आहे. ते दासचा उपचार घेत होते. त्यांना लघ्वी करताना त्रास होतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२५४

मे १३, १९४१

चि. सुशीला,

बालकृष्णचे पत्र सोबत जोडले आहे. त्यावर विचार करणे आवश्यक आहे. तुला काही सुचवायचे असेल तर सुचव.

असे दिसते की तारीचे प्रकरण पूर्णपणे निपटले नाही.

इथे सर्व काही ठीक आहे.

आज तुझ्याकडून काहीही बातमी नाही. सलग दोन दिवस तुझे पत्र मिळाल्याचे मला आठवत नाही. तुला तुझ्या परीक्षेबद्दल विचारणे व्यर्थ आहे. ती केव्हा होते ते पाहू.

महादेव उद्या येईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२५५

मे १४, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. सर्व ठीक आहे. देवदास येईल तेव्हा त्याला बाला घेऊन येऊ दे. याच वेळी तुझी परीक्षा असू शकेल. परीक्षा झाल्याबरोबर तू येशील.

दुर्गाबेन चांगली आहे. माझ्याबद्दल मी काय सांगू?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२५६

सेवाग्राम, वर्धा,

१५ मे १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तू फार चांगली बातमी दिली. इथेसुद्धा सर्व काही उत्तम आहे. परंतु बालकृष्णची प्रकृती चांगली नाही.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

ले. हा. मे. कॉ., नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - आणि डॉ. सुशीला नाय्यर

२५७

मे १६, १९४१

चि. सुशीला,

अखेरीस एकदाची परीक्षा आली. तू निश्चितच उत्तीर्ण होशील. तू ३ तारखेला लिहिशील अशी अपेक्षा आहे.

हो, हे खरे आहे. तुझ्या अनुपस्थितीत बा निश्चितच अस्वस्थ होईल. यामुळे तुला शक्य असले तर तिला लवकर पाठव. तुला हवे त्याप्रमाणे कर.

बालकृष्णचा ताप वाढत आहे. तारी काळजी करते. तारीने स्वतःचा आहार ठरवला पाहिजे असे तू जे लिहिले ते बरोबर आहे. परंतु हे कठीण आहे. माणसाला कशाची गरज आहे हे कळणाऱ्या तुझ्यासारख्या व्यक्तीलाच हे शक्य नाही काय? शक्य आहे की तुला एकदोन दिवसांकरिता पाचगणीला जावे लागेल. मला आशा आहे की दोघांच्या प्रकृतीत सुधारणा होईल कारण जूनपर्यंत हवामान थंड होत असते.

आशीर्वाद,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - आणि डॉ. सुशीला नाय्यर

२५८

मे १७, १९४१

चि. सुशीला,

तुझे ११ तारखेचे पत्र आज मिळाले. असे कसे? आज महादेवभाई जाऊन प्यारेलालला भेटले. तो चांगला आहे, परंतु तो जवळपास मौन पाळतो. मानेतील गाठ अर्थातच स्पष्टपणे दिसते. तो मुळीच पत्र लिहीत नाही. तुझी पत्रे मी आज पाठवीन. आता तू लाहोर भेटीची तयारी करत असशील. इथे सर्व काही चांगले आहे. मी तुझी इथे ३ तारखेला वाट पाहीन.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

ले. हा. मे. कॉ., नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - आणि डॉ. सुशीला नाय्यर

२५९

मे २०, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तू बरोबर आहेस. आजकाल मला खरोखरच मुळीच वेळ मिळत नाही. मृदुलाबेन आणि गुलझारीलाल आलेले आहेत, आणि म्हणून मी माझा बहुतांश वेळ त्यांना दिला पाहिजे.

तुझ्या परीक्षेचा मी विचार करत असतो. निकाल केव्हा कळणार आहे?

मी प्यारेलालला पत्र पाठवीन.

मी चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - आणि डॉ. सुशिला नाय्यर

२६०

मे २१, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तू नक्कीच उत्तीर्ण होशील. आणि जर एकच विद्यार्थी उत्तीर्ण होणार असेल तर उत्तीर्ण होणारी पहिली आणि शेवटची तूच असशील.

मी तुला हिंदीत लिहिल्याचे आठवत नाही आणि लिहीन तरी का? आजकाल मी वेगात माझ्या कामाचा निपटारा करण्याचा प्रयत्न करतो आहे.

महादेवभाई, मृदुलाबेन आणि गुलझारीलाल आज अहमदाबादला गेले. अहमदाबादमध्ये अजूनही दंगलीचा धोका आहे. वैद्यकीय तपासणीकरिता दुर्गाबेन मुंबईला गेली आहे. नथूभाईंनी (डॉ. नथूभाई पटेल) आग्रह केला. यामुळे घर अगदी रिकामे आहे.

देवदास आणि त्याच्या सहकाऱ्यांचा जत्था २४ तारखेला रात्री येणार आहेत.

३ तारखेला मी अर्थातच तुझ्या येण्याची वाट पाहीन, परंतु तुला मदत करण्याकरिता कुठे जायचे असेल तर अवश्य जा. काय होते ते पाहू या. काही विलंब होणार असेल तर मला कळव. आवश्यक असेल तर प्रकाशकरिता तू मुंबईला जा. तू इथे येशील तेव्हा आपण त्याबद्दल विचार करू. तेव्हाच आपण पाचगणीचाही विचार करू.

तू मला नियमितपणे लिहायलाच पाहिजे. तुझ्या परीक्षेची मला काळजी वाटत राहील. बाकी इथे सर्व ठीक आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - आणि डॉ. सुशीला नाय्यर

२६१

मे २२, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले.

तू तुझ्या भावाच्या विरोधाची फिकीर करू नको. मत तयार करण्याकरिता त्याला पार्श्वभूमी माहीत नाही. आणि माझा निर्णय अंतिम असतो याचासुद्धा तो का विचार करत नाही? "बापूंनी आता निर्णय घेतलेला असल्यामुळे मी आता काय म्हणू शकतो?" असे त्याने महादेवलासुद्धा सांगितले आहे. शिवाय त्याच्या विरोधामागे प्रेम वा आसक्ती आहे. तो तुला प्रत्येक गोष्टीत उच्च स्थानावर पाहू इच्छितो. तू अनुत्तीर्ण झालेली त्याला मुळीच सहन होणार नाही. तू जरी नापास झाली तरी मी त्याला मुळीच महत्त्व देणार नाही. परीक्षेत उत्तीर्ण झाल्यामुळे माणसाची प्रतिष्ठा वाढत असल्यामुळे पास होण्याला महत्त्व आहे. परंतु जे नापास होतात त्यांची प्रतिष्ठा कमी होत नाही, होते काय? माणूस अनेक कारणांमुळे नापास होतो. अनेक हुशार माणसेही नापास झाल्याचे प्रसिद्ध आहे. परंतु तू नापास होशील यावर मी विश्वास ठेवूच शकत नाही.

तू येशील तेव्हा दुर्गाबेन आणि महादेवभाई हे दोघेही आलेले असतील. मुन्नालालही आजरी होऊन आला आहे. त्याला केवळ हिवताप आहे आणि मी त्याला केवळ सिंकोना आणि क्विनाईन दिले. आज तो चांगला आहे.

बा परवा येईल अशी अपेक्षा आहे. रामदास तिथे गेलेला असल्यामुळे तिला यायला दोनचार दिवस उशीर होईल असे लीलावतीने लिहिले आहे.

बाची काळजी करू नको. तुझा उपचार मी इथे सुरू ठेवीन.

तारी आणि बालकृष्ण परत आजारी पडले तर मला त्रास होऊ शकतो. तू येशील तोपर्यंत ते धोक्यातून बाहेर पडलेले असतील अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - आणि डॉ. सुशीला नाय्यर

२६२

मे २३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मी हे तारीला पत्र पाठवत आहे. ते आजच गेले असते परंतु त्याकरिता मी वेळ देऊ शकलो नाही. यावरून मला किती अधिक काम आहे हे दिसेल ! यामुळे मला एक दिवस उशीर झाला.

मुंबई आणि अहमदाबादच्या दंगलींमुळे काळजी वाटते आहे. ईश्वराची इच्छा काय आहे ते पाहू या. तुझी परीक्षा लवकर संपण्याची मी आता वाट पाहतो आहे.

अधिक लिहिण्याकरिता वेळ नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - आणि डॉ. सुशीला नाय्यर

२६३

मे २४, १९४१

चि. सुशीला,

बा पोहोचली. देवदास, लक्ष्मी आणि रामदास हेही आले आहेत. आज इतकेच पुरे. हे पत्र तुला मिळेल तेव्हा तुझ्या परीक्षेचा पहिला दिवस संपलेला असेल.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

सोहनलाल कॉलेज, १६ लेक रोड, लाहोर (पंजाब)

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२६४

मे २५, १९४१

चि. सुशीला,

लाहोरहून पाठवलेले तुझे पोस्टकार्ड मला मिळाले. तुझ्याकरिता ते तिखटाशिवाय भाज्या करू शकत नाही काय? ते करू शकत नसतील तर तू सलाडवर समाधान मानायला पाहिजे.

बा इथे पोहोचली हे कळवणारे जे पोस्टकार्ड काल मी तुला पाठवले होते ते तुला मिळालेच असेल. बा फार अशक्त झाली आहे. पण ती जर काळजीपूर्वक राहिली तर त्रास होऊ नये. आता ती इथे आलेली असल्यामुळे ती स्वतःच कामकाजापासून दूर राहील. ती जास्तीत जास्त काळजी घेईल याकडे मी लक्ष ठेवीन.

तुझी परीक्षा संपेल तेव्हा तू जग जिंकलेले असेल. इथे कमालीचा उकाडा आहे. परंतु मी माझी प्रकृती उत्तम प्रकारे सांभाळतो आहे. शिवाय मी भरपूर कामसुद्धा करतो आहे.

देवदास परवा जाईल.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२६५

मे २७, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून काहीही बातमी नाही. बासुद्धा तुझी परीक्षा संपण्याची वाट पाहते आहे. आज दुसरा दिवस आहे.

आज बालकृष्णचे पत्र आले. ते वाच आणि त्याबद्दल तुला काही सांगायचे असेल तर सांग.

देवदास आणि महादेव सिमल्याला गेले आहेत. लक्ष्मी मद्रासला गेलेली आहे. रामदास अहमदाबादला गेला आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२६६

मे २८, १९४१

चि. सुशीला,

आज तुझे पत्र नाही. काल मी तुला पाठवलेले पत्र मिळाले असेल. आज तुझा तिसरा दिवस आहे. तुला हे पत्र ३१ तारखेला सकाळी मिळेल. तो तुझ्या परीक्षेचा शेवटचा दिवस असेल. परीक्षा संपली की तार पाठव. निकाल कधी कळेल?

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

सोहनलाल कॉलेज,

१६ लेक रोड, लाहोर (पंजाब)

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२६७

मे २८, १९४१

(हे पत्र संपूर्ण गांधी वांङ्मयमध्ये २९ मे अंतर्गत देण्यात आले आहे.)

चि. सुशीला,

आज मला तुझे दोन पोस्टकार्ड मिळाले. मी तुला दररोजच लिहीत असतो. दररोज मी तुझ्या पत्राची वाट पाहीन. बा चांगली आहे. मीसुद्धा चांगला आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशील नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२६८

मे ३०, १९४१

चि. सुशीला,

आता केवळ पोस्टकार्ड जरी पाठवले तरी पुरे होईल. तू उत्तीर्ण हो याशिवाय मला तुला काहीही सांगायचे नाही. आज तुझ्याकडून एकही पत्र नाही.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशील नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय, नवी दिल्ली

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२६९

जुलै ११, १९४१

चि. सुशीला,

तू तिथे सुरक्षित पोहोचली असशील अशी आशा आहे. त्याचबरोबर तुला जर प्रह्लादच्या घरी बरे वाटत नसेल तर तू सुशीच्या घरी जाऊ शकते. ही सर्व ठिकाणे तुझ्या घरासारखीच आहेत. परंतु तू सुशीला चांगली ओळखत असल्यामुळे तुला तिथे कदाचित अधिक चांगले वाटू शकेल. तुला जे योग्य वाटते ते करण्याकरिता तू स्वतंत्र आहेस. तुझा लहान चाकू मला सापडला. तो तिथे पाठवणे उचित नाही. तू तुझी छत्री बाजवळ विसरली. छत्रीशिवाय तू कसे भागवशील? एक रेनकोट विकत घे. इथे सकाळी तीन वाजतापासून जोरदार वाऱ्यांसह पाऊस सुरू आहे. अजूनही तो सुरू आहे. खान साहेबांना येणे शक्य झाले नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशिला नाय्यर

२७०

जुलै १२, १९४१

चि. सुशीला,

मी तुझ्या पत्राची वाट पाहत होतो. प्रभावती आज इथे आली. तुझ्या दोन्ही जपमाळा माझ्याजवळ आहेत. तू तिथे चांगल्या पद्धतीने स्थिरस्थावर झाली असशील अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर द्वारा सहाय्यक डॉक्टर के. इ. एम. रुग्णालय,

मुंबई

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७१

जुलै १४, १९४१

चि. सुशीला,

आज वातावरण निवळले आहे.

तुझ्याकडून आज पत्र नाही. रुग्णालयाच्या पत्त्यावर मी पाठवलेली दोन (वा तीन) पत्रे तुला मिळाली असतीलच. रुग्णालयाकरिता वस्तू विकत घे. अखेरीस त्यांचा तुलाच उपयोग होईल. तू उत्तीर्ण होशील आणि दुसऱ्याच दिवशी इथे येशील असे मी गृहीत धरले आहे. मला तुझी गरज आहे. तू आल्यानंतरच ज्या वस्तूंचा उपयोग होईल त्या मी आतापासून गोळा करणार नाही. एका वर्षात काय होईल आणि त्या वेळी त्यांची किती किंमत होईल हे कोणाला माहीत?

सध्या तरी कोणत्याही अडथळ्याशिवाय तू अभ्यास करावा अशी माझी इच्छा आहे. ताराबेनच्या जबाबदारीचा यात अडथळा येणार नाही अशी आशा आहे. तुझ्याशिवाय इतर कोणाच्याही उपचाराला ती प्रतिसाद देणार नाही. ऑगस्ट-सप्टेंबरनंतर तेथील हवामान उत्तम असेल. काल तुला किशोरीलालभाईंनी सविस्तर लिहिले. यामुळे इथे मी विस्तार करत नाही.

तू प्रह्लादकडे थांबली हे चांगले केले. तो चांगला तरुण आहे. तू कुठेही राहिली तरी त्या कुटुंबातील तू सदस्य झाली पाहिजे. राधा अगदी जवळच आहे. शक्य झाले तर परतल्यानंतर जाऊन तिला भेट. परंतु कोणाला भेटण्याची सूचना देऊन तुझ्यावर ओझे टाकण्याची माझी इच्छा नाही.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - मी चांगला आहे. बासुद्धा चांगली आहे. मनोज्ञाला परत ताप आला नाही. जमनालालजी उद्या सिमल्याला जातील.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७२

जुलै १५, १९४१

चि. सुशीला,

तुझी दोन्ही पत्रे एकदम मिळाली. मी इतका कामात आहे की मला लिहिण्याकरिताही वेळ नाही. मी इथून कुठे जाईन असे मला वाटत नाही. तुझे दोन आठवडे संपल्यानंतर इथे ये. तू तिथे भरपूर काही शिकशील. तुला विविध रुग्णालयांचा अनुभव मिळावा अशी माझी इच्छा आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

४९० मुलजी मॅन्शन, इडनवाला रोड,

माटुंगा, (जी. आय. पी.)

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७३

(जुलै १६, १९४१पूर्वी)

(सुशीला नाय्यर पहिल्यांदा १९४१ साली एम. डी. परीक्षेसाठी बसल्या तेव्हा बहुधा हे लिहिले असावे; पाहा, "प्रभावती यांना पत्र","अमृत कौर यांना पत्र", जूलै १६, १९४१ आणि "एच. एल. शर्मा यांना पत्र", ऑगस्ट २५, १९४५. या तारखेचा अंदाज "अमृत कौर यांना पत्र" जुलै १६, १९४१ पत्रावरून केला आहे. त्यात सुशीला नाय्यर परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याचा उल्लेख आहे.)

चि. सुशीला,

अशा प्रकारे तू (भेट) परत करू शकत नाही. ती प्रेमाची भेट आहे. आणि ती नेहमी तशीच असेल. तू ती दुसऱ्याला देऊ शकते.

तू हे सर्व काय लिहिते आहेस? तू मूर्ख आहेस आणि राहशील.

अशा प्रकारचे विचार तू मनात का घोळवतेस? मी जरी चिडलो तरी त्यामुळे काय फरक पडतो? परंतु तू मला ओळखते आणि तुला माहीतच असेल की माझा राग कधीचाच गेलेला आहे. तू मोठी झाली तरी तुझ्यात कधीच सुधारणा होणार नाही काय !!! परंतु मी स्वतःलाच सुधारण्याचा प्रयत्न करतो आहे आणि मरेपर्यंत करत राहणार आहे. तुला मुळी शंका तरी का येते? तू ऐकत का नाहीस? तू इथून हलण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. तू स्वतः ज्याची घडण केली ते तू कसे सोडून जाऊ शकते? तू अजून कुठेही राहणार नाही. तुला जे काही करायचे असेल ते तू इथूनच करशील असा विश्वास माझ्या मनात रुजू लागला आहे. माझ्यानंतर कोणी तरी माझे काम पुढे नेईल. त्यातील एक अर्थातच तू असशील. आता सर्व शंका काढून टाक. तुझ्या परीक्षेत लवकर उत्तीर्ण हो आणि माझ्या मांडीवर येऊन बस.

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७४

जुलै १८, १९४१

चि. सुशीला,

आज तुला लांब पत्र लिहिण्याकरिता मी प्रभाला सांगितले आहे आणि ते पत्र या पत्रासोबत जाईल. आता तुला तिथे केवळ सहा दिवस घालवायचे आहेत. हो, या वर्षी तुला जर वेगवेगळ्या रुग्णालयात अनुभव घेण्याची संधी मिळत असेल तर मला ते आवडेल. याचा अर्थ तुला काही महिन्यांकरिता दिल्लीबाहेर राहावे लागेल. तू जर एक महिना मुंबईत, एक महिना कलकत्त्यात आणि एक महिना मद्रासला राहिली तर तुझा अनुभव संपन्न होईल. आवश्यक व्यवस्था सहज करता येईल. या वेळी तुझी अशी काही तयारी असली पाहिजे की तुझ्या उत्तीर्ण होण्याबद्दल वादच राहायला नको अशी माझी इच्छा आहे, आणि तुला भरपूर अनुभवही मिळेल. किशोरीलालने काल तुला तारीबद्दल आधीच लिहिले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७५

जुलै १९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तू पाचगणीला जाण्याची आवश्यकता नाही. तारीबेनचे स्वागत आहे. परंतु मला वाटते की तीसुद्धा दिल्लीला जाऊ शकते. तिथे अगदी बाजूलाच वातानुकलनाची सोय असलेले रुग्णालय आहे. घनश्यामदासने (घनश्यामदास बिर्ला) त्याकडे माझे लक्ष वेधले आहे.

दासचा रुग्ण भरपूर चांगला आहे. तो दररोज एक शेर दूध घेतो. खान साहेबांना अजूनही किंचित ताप आहे. ते दूध आणि ओव्हलटीन घेत आहेत. आजा त्यांना थोडेसे सूपही दिले.

महादेवभाई आज मुंबईला जाणार आहेत. ते निश्चितच तुला भेटतील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७६

जुलै २०, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून एकही पत्र नाही. तारीबेन तिथे आलीच असली पाहिजे. तिला तपास आणि मला कळव.

पेला फुटल्याबद्दल तू काही तरी उल्लेख केला होता. तू किती पागल आहे ! काही तरी तूटफूट झाली म्हणून तू दर वेळी पैसे भरत राहिलीस तर तुझे सर्व पैसे संपून जातील. यामुळे हे विसर. कांचन आणि कुसुम देसाई आज आल्या आहेत.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७७

जुलै २१, १९४१

चि. सुशीला,

तुझ्या इच्छेप्रमाणे मी अर्थातच तुला रुग्णालयाच्या पत्त्यावर लिहीत होतो. तुला पत्रे मिळाली नाही हे आश्चर्य आहे. हे पत्रसुद्धा त्याच पत्त्यावर पाठवत आहे. तू दुसऱ्या कोणत्या रुग्णालयात गेल्यामुळे काही फरक पडणार नाही अशी आशा आहे.

डॉ. गोपीचंदनी तुला लिहिलेले पत्र सोबत जोडलेले आहे. इथेसुद्धा पाऊस थांबलेला आहे. यामुळे दिवसा गरमी होऊ लागली आहे. रात्री प्रसन्न असतात.

खानसाहेबांचा ताप ९९ ते ८९.४ असतो. सकाळी ताप नसतो. भंसाळी आजारी पडले आहेत. त्यांच्या पायात संधिवात आहे. ते कालपासून उपवास करत आहेत आणि त्यांनी सलाईनही घेतली आहे. विरम्माने रागाच्या भरात पोटॅशियम परमँग्नेट घेतले. (शिवाय पाहा "अमृत कौर यांना पत्र", जुलै २१, १९४१) ते लगेच लक्षात आले. तिला लिंबाचा रस प्यायला दिला आणि ओकारी करायला लावली. चांगली झाली.

२५ तारीख लवकरच येणार आहे!

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७८

जुलै २२, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. पेल्याची जी काही किंमत असेल ती तू सहन केली पाहिजे. परंतु तुझ्या खिशात निश्चितपणे तिकिटे असायलाच पाहिजे होती, आणि नव्हती तर तू डॉ. गिल्डरकडून घेऊ शकली असती. सध्या याबद्दलही माफ.

प्यारेलालच्या तिथे राहण्यावगैरेंबद्दल तू जे काही केले ते योग्यच असेल असे मला वाटते.

आता मी अजून केवळ एकच पत्र लिहिणार आहे. तुझ्याकडे बरेच रोगी आले आहेत. कुंवरजींची (कुवरजी के पारेख) काहीशी काळजी वाटते. तू जुगतरामकडे (जुगतराम दवे) गेली हे चांगले केले.

आता माझ्याजवळ फार वेळ नाही. तुला माझी सर्व पत्रे मिळायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२७९

जुलै २८, १९४१

चि. सुशीला,

तुझे बरोबर होते. अखेरीस खान साहेब आलेच नाही. आता ते गुरुवारी येतील. असे असले तर आधीच मौन पाळणे माझे कर्तव्य होते.

रेल्वेत तुला जागा मिळाली असेल आणि कोणताही त्रास न होता तू घरी पोहोचली असशील असा विश्वास आहे. खरे म्हणजे तुला किंचित ताप होता. तू अनसुयाला पूर्णपणे दुरुस्त केले पाहिजे.

तू आता अभ्यासावर पूर्ण लक्ष केंद्रित केले पाहिजे. परंतु असे करताना प्रकृती बिघडवू देऊ नको. एकदा अनुत्तीर्ण झाल्याचा तू पूर्ण फायदा घेतला पाहिजे. तू चांगला अभ्यास केला पाहिजे आणि अनुभवही मिळवायला पाहिजे. मी तुला खादी जगत (अखिल भारतीय चरखा संघाचे वर्ध्याहून प्रकाशित होणारे मासिक. त्याचा पहिला अंक जुलै २७, १९४१ला निघाला होता.) पाठवीन.

पत्र आणि चरखा हरवल्यामुळे अजूनही मला त्रास होतो आहे. शोध सुरू आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - माताजी चांगल्या असतील.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२८०

जुलै ३१, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुझ्याबरोबर अनसुया होती हे मला आवडले. ती जर पूर्णपणे दुरुस्त होऊन आली तर मला फार आनंद होईल. आणि ती जर तुझ्याबरोबर कामाला लागू शकली तर फार चागले काम करता येईल.

सोबत काकासाहेबांचा अहवाल आहे. साखरेचे प्रमाण तपासल्यानंतर डॉ. मानूंनी इंजेक्शन थांबवले, आणि गोड फळेही थांबवली. हे बरोबर आहे काय? आता त्यांचा आहार दही, दूध, पालेभाज्या, लिंबू इत्यादींचा राहील.

मी अर्थातच चांगला आहे.

खानसाहेब आले आहेत. ते चांगले आहेत. बहुधा ते रविवारी जातील. ते तिथे बहुधा रविवारी पोहोचतील. त्यांना घेण्याकरिता देवदासला कार घेऊन जाण्याकरिता सांग.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२८१

[जुलै ३१, १९४१]

(ताराबेन मश्रूवाला बालकुटीरमध्ये गेल्या होत्या या संदर्भावरून; पाहा "सुशीला नाय्यर यांना पत्र", ऑगस्ट १, १९४१)

चि. सुशीला,

तू पोहोचल्यानंतर तुला एक पत्र आणि त्यानंतर एक पोस्टकार्ड मिळाले असेल. सोबत शंकरनचे विचित्र पत्र आहे. ते तू वाचलेच पाहिजे आणि जपून ठेवले पाहिजे. अन्नपूर्णाची भीती खरी ठरली. शंकरनने फार मेहनत घेतली होती. तो भरपूर शिकलेलाही आहे. परंतु त्याचे मन स्त्रियांमध्येच गुंतलेले असते. याबद्दल काय करावे हा निर्णय मी घेऊ शकत नाही. याबद्दल तू काळजी करावी अशी माझी इच्छा नाही. मी ते पाहीन. परंतु तुला माहीत असणे आवश्यक आहे.

माझा रक्तदाब समाधानकारक म्हणजे मागच्याच पातळीवर आहे. असे दिसते की काही दिवसांपासून मी जे मिठात मुरवलेले निंबू घेत होतो ते अनावश्यक होते. ते निंबू घेणे बंद केल्यानंतर चार दिवसाच्या आत माझा रक्तदाब कमी होण्याकरिता सुरुवात झाली. काल तीन वेळा मी रक्तदाब घेतला आणि तो १५०/९०च्या दरम्यान होता. परवासुद्धा तो बराच कमी झाला. मी अर्थातच फार मेहनत घेतो आहे.

तारी अजूनही इथे आहे. बालकुटीरला बहुधा उद्या जाईल. ती रिकामी होण्याकरिता काही वेळ लागेल.

मदालसा उत्तम आहे. आता महेशच्या (प्रा. महेशदत्त मिश्रा, माजी खासदार आणि स्वातंत्र्य सैनिक) वेदना गेल्या असे दिसते. कुमारी मूरसुद्धा चांगली आहे.

सध्या तरी बा चांगली हिंडूफिरू शकते. तिला भरपूर जोम वाटतो.

तुझे पत्र आज मिळाले.

काकाच्या लघ्वीत साखर आणि ऍसिटोन आढळले. त्यांना तिथे पाठवण्यात मला आनंद होईल. महमूद फार परोपकारी आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशिला नाय्यर

२८२

ऑगस्ट १, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. खान साहेबांचा स्वभाव मला माहीत आहे. ते येतील तेव्हा मी त्यांच्याशी बोलावे अशी त्यांची निश्चितच अपेक्षा असेल. हे लिहीत असताना मला वाटते त्याप्रमाणे काही तरी चूक झाली होती. ते सकाळी येणार होते आणि त्यामुळे मी त्यांच्याशी नंतर बोलू शकलो असतो तरी चालले असते. घडले असे की ते जेव्हा आले तेव्हा माझी मालीश सुरू होती. त्यांना थोडा वेळ वाट पाहणे शक्य नव्हते आणि म्हणून मालीश सुरू असतानाच दार ठोठावून ते आत आले आणि माझ्याशी बोलू लागले. प्रेमबंधनही विचित्रच असते. परंतु असे तर व्हायचेच होते.

कनू आज राजकोटला जात आहे. त्याच्या आईचा एक डोळा काचबिंदूमुळे गेला आहे आणि दुसरा जाण्याचा धोका आहे. तिची शस्त्रक्रिया होणार आहे. कनूला पाहिल्याशिवाय शस्त्रक्रिया करण्याकरिता ती तयार नाही. यामुळे तो एकाएकी चालला आहे.

तारी आज बालकुटीरमध्ये जाणार आहे.

ईश्वर माझी काळजी घेईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२८३

ऑगस्ट २, १९४१

चि. सुशीला,

मी काय केले पाहिजे? मी इतका व्यस्त आहे की मला पत्र लिहिणेही शक्य होत नाही आणि पत्र न लिहिणे मला आवडतही नाही. आंघोळीच्या वेळी मालीश करताना तुझी आठवण होत नाही असे कधीही होत नाही. यामुळे तुझी विशेषेकरून केव्हा आठवण झाली हे मी सांगू शकत नाही.

उद्या जाण्याऐवजी खान साहेब आजच गेले. मी देवदासला तार पाठवली आहे. पुरीसुद्धा त्याच्याबरोबर गेला आहे. प्रभाही गेली. ती पटण्याला गेली आहे. ती १५ला परतेल.

पावसाची सर्व चिन्हे दिसत असूनही पाऊस येऊन राहिलेला नाही.

तारीला ९९ - १०२ डिग्रीच्या जवळपास ताप आहे. आणि तिला बस्ती दिल्याशिवाय शौच्याला होत नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशिला नाय्यर

२८४

ऑगस्ट ३.१९४१

चि. सुशीला नाय्यर,

आज तुझे पत्र का नाही. मी रोज सकाळी तारीला पाहण्याकरिता जात असतो. असे वाटते की हे टाळता येऊ शकत नाही. मला थकवा वाटत नाही. जवळच्या रस्त्याने गेलो तर किंचितसा रक्तदाब वाढतो. तारीची प्रकृती ठीक झाली की जाणार नाही.

काकांचे पत्र सोबत जोडले आहे. कोयाजी हे प्रसिद्ध आणि अनुभवी डॉक्टर आहेत आणि जे काही नवीन आहे त्याच्याशी ते परिचित आहेत. पुण्याला जा आणि काही दिवस तिथे राहा असे काकांना मी लिहिले आहे. तुला जर काही सूचना करायच्या असतील तर सांग.

कांचनची प्रकृती चांगली आहे असे म्हणता येत नाही. ती सारखी आजारी पडते. तिने जर कबूल केले तर तिला तुझ्याबरोबर ठेवण्याची माझी इच्छा आहे. तुझी अशी इच्छा आहे काय? तिचे तुझ्यावर ओझे तर होणार नाही? स्वयंसेवक परिचारिका म्हणून तिला रुग्णालयात ठेवता येईल काय? की तिला तुझ्या घरी ठेवता येईल? तुझ्या ठिकाणी तिला ठेवले तर तुझ्या आईला तिचे ओझे होईल काय? या सगळ्यांचा विचार केल्यानंतर मला लिही. याची निश्चितच घाई नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२८५

सेवाग्राम,

ऑगस्ट ४, १९४१

चि. सुशीला,

तुझी दोन पत्रे एकदम आली. काकाबद्दल मी समजू शकतो. कोयाजींनी काल तपासल्यानंतर दिलेला अहवाल मी पाठवला आहे. ते काळजी घेतील.

अनसुयाच्या प्रकृतीत सुधारणा झाली तर चांगले होईल.

कुवरजींची संबंधित पत्रे आणि मथुरादासचे पत्र मी सोबत पाठवत आहे. डॉक्टरनी मुंबईत तुला जी मदत केली त्याबद्दल त्यांना लिहिलेल्या पत्रात तू त्यांचे आभार मानले नाही. की आधीच त्यांना आभार मानणारे पत्र पाठवले आहे?

शंकरनबद्दल मी पाहीन. अन्नपूर्णा तिथे येणार नाही. रेंटिया बारसनंतर तिची गुजरातमध्ये जाण्याची इच्छा आहे. तिला खादीकामाचे प्रशिक्षण घ्यायचे आहे. पूर्वीप्रमाणेच बाचे काम सुरू राहील. माझे वजन वाढले नाही. काल ते ९९.५ पौड होते. लसूण घेण्याचा मी विचार करतो आहे. मी निर्णय घेऊ शकून राहिलेलो नाही. त्याचा वास अगदीच आवडत नाही. आहार वाढवण्याचा धीर होत नाही. रक्तदाब नियंत्रणाखाली आहे. बाला हिंडण्याफिरण्याबद्दल सावध करीन. परंतु तिच्यात जेव्हा शक्ती असते तेव्हा तिला कोणीही अडवू शकत नाही. तू तिला लिही.

आशीर्वाद,

बापू

ता. क. कुमारी मूर गेली. यामुळे प्यारेलालचे घड्याळ मी तिच्याबरोबर पाठवले.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशिला नाय्यर

२८६

ऑगस्ट ५, १९४१

(हिंदी मुद्रित आवृत्तीत हे ४ ऑगस्ट अंतर्गत प्रकाशित झाले आहे तर म. गा. सं. साहित्यात याची तारीख ५ आहे.)

चि. सुशीला,

आज तुझे पत्र नाही. आजपासून मी माझा आहार वाढवला. आजपासून मी लसूण घेण्याकरिताही सुरुवात केली आहे. त्याच्या वाईट वासाचे पापही तुझ्या डोक्यावर आणि त्याच्या उपयोगामुळे जर काही नुकसान झाले तर त्याचे पापही तुझ्या डोक्यावर.

मी बाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु जोपर्यंत तिच्यात शक्ती आहे ती स्वतःच मेहनत घेत राहणार आहे. ती जेवण मात्र चांगले करते.

म(हादेव) अजून परतला नाही. आणि निधी गोळा करण्यात तो इतका गुंतला आहे की त्याच्याकडून एकही पत्र नाही.

नालवाडीतील आठेक लोकांना एकाच वेळी अतिसार झाला आहे. मी डॉ. दासना पाठवले आहे. मनू आधीच पोहोचली आहे. आता काही बातमी कळेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२८७

सेवाग्राम,

ऑगस्ट ६, १९४१

चि. सुशीला,

आज मला तुझी दोन पत्रे एकदम मिळाली. तू विनाकारण माझी काळजी करते. ईश्वर माझे रक्षण करील हे माझे वाक्यच मी चांगला आहे हे सांगण्याकरिता पुरेसे आहे. मला कोणतीही भीती वाटत नाही. मी दुधाचे प्रमाण वाढवले आहे आणि कांदा आणि लसूण घेण्याकरिता सुरुवात केली आहे हे मी तुला आधीच सांगितले आहे. काळजी करू नको. तुझ्या अभ्यासावर लक्ष केंद्रित कर आणि तू केवळ उत्तीर्णच व्हायला नको तर तुझ्या क्षेत्रात जाणण्यासारखे जे काही आहे त्यांतील काहीही तुला माहीत नाही असे व्हायला नको. तुला लहान वा मोठ्या रुग्णालयाची योजना आखता आली पाहिजे आणि ते कसे असले पाहिजे ते तुला सांगता आले पाहिजे, तसेच ग्रामीण आरोग्याची योजनाही तुला आखता आली पाहिजे. हे सर्व तेव्हाच शक्य होईल जेव्हा तू एक वर्षाकरिता संन्यासी होशील.

तू म्हणतेस तशीच शर्माची केस आहे. परंतु तो प्रामाणिक आहे असा ठसा माझ्या मनावर उमटलेला आहे. याबद्दल महादेवला विचारण्याची आवश्यकता नाही कारण त्याचे मत मला माहीत आहे. तू जर संयम ठेवू शकली तर तुझा फार मोठा उपयोग होऊ शकतो. परंतु यामुळे तुझ्या अभ्यासात अडथळा येत असेल तर मला तुला यात गुंतवायचे नाही. यामुळे ही गोष्ट माझ्यावर सोपवण्याऐवजी तू स्वतंत्रपणे तुझे मत दे.

सध्या तारीला इथे राहू दे. तिची प्रकृती बिघडली तर मी तिला तिथे पाठवीन. स्वतंत्रपणे राहू शकत असल्यामुळे ती खुश आहे. मी तिला दररोज सकाळी भेटत असतो.

परत विचार केला असता मी तुला शर्मा प्रकरणात गुंतवायला नको होते असे वाटते. ते विसर. तुझ्यावर या जबाबदारीचे ओझे टाकायला नको.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

२८८

ऑगस्ट ७, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. काय पण पत्र आहे! ही निराशा का? तू माझ्याजवळून निष्फळ आणि अपयशी होऊन गेली नाहीस. इतर लोक काय म्हणतील या विचाराने तू स्वतःवर परिणाम का करून घेते? ही विचारसरणी वैज्ञानिक नाही. डॉक्टरने स्थितप्रज्ञ असायला पाहिजे. तू जेव्हा अनासक्तिभाव अंगी बाणवशील आणि इतर कशाचाही तुझ्यावर परिणाम होऊ देणार नाही तेव्हाच तू खऱ्या अर्थाने एम. डी. होशील. हीसुद्धा अशी गोष्ट आहे की जी वैद्यकीय विज्ञानाने हाताळली पाहिजे. 'मटेरिया मेडिका'त तुला यावरील उपचार आढळणार नाही. तो तुला स्वतःलाच शोधावा लागेल. मागील वेळी वैद्यकीय परीक्षेची तू जी अपूर्ण तयारी केली होती ती आता तुला भरून काढायची आहे. या वेळी तुला निश्चितच चांगला अभ्यास करायचा आहे. तू जर अस्वस्थ राहिली आणि एखाद्या जिज्ञासूप्रमाणे अभ्यासावर लक्ष केंद्रित केले नाही तर केवळ तुझीच नाही तर माझीही लाज जाईल. यामुळे तयारी कर. निराशेतून बाहेर पड आणि अभ्यासावर लक्ष केंद्रित कर.

वैद्यकीय नोकरीबद्दल सांगायचे तर तू लाहोरला तीन महिने घालवण्याची परवानगी घ्यावी असा माझा तुला निश्चित सल्ला आहे. मोठमोठ्या रुग्णालयात अनुभव मिळवण्याकरिता तुला नोकरी सोडावी लागली तर मला त्याची मुळीच फिकीर वाटणार नाही. त्याकरिता जो काही खर्च येईल तो मला देऊ दे. माझ्याकरिता ते ओझे होणार नाही. अखेरीस तुला माझ्याकरिता काम करायचे आहे.

तारीबद्दल मी विचार करीन. अखेरीस मला तिला तुझ्याकडे पाठवावे लागेल. कांचन अंथरुणाला खिळलेली आहे. तिला ताप आहे. अजून मी तिला क्विनाईन दिलेले नाही. मी तिला दूध आणि मोसंबीचा रस देत आहे.

काकांबद्दल मी पाहीन. रीतसर मिळाली. अमतुल सलामने ती घेतली आणि त्याला (प्यारेलालला) भेटायला गेली. ती त्याला ती राखी देईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२८९

ऑगस्ट ७/८, १९४१

चि. सुशीला,

अमतुल सलाम परतल्यानंतर मी हे लिहीत आहे. तिने प्यारेलालला राखी बांधली. कोणी तरी आपल्याला भेटायला येईल असे प्यारेलालला वाटतच होते. यामुळे अमतुल सलाम भेटल्यामुळे त्याला फार आनंद झाला. त्यांनी इकडच्या तिकडच्या गप्पा केल्या. खुश होता. मागील वेळेपेक्षा त्याची प्रकृतीही चांगली होती. आता त्याला हिरव्या भाज्या मिळत असल्यामुळे बरे वाटते.

याच्या पाठीमागे कुवरजींचे पत्र आहे. ते वाच.

जर काही लिहिण्यासारखे असेल तर मी तुला उद्या लिहीन. आज डाकेने पाठवलेली पत्रे तुला मिळालीच असतील.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - आज तुझे पत्र नाही. कांचनला आज बरे वाटत आहे. तारीला इथे राहणे आवडते पण तिला बद्धकोष्ठता असते.

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२९०

वैयक्तिक

ऑगस्ट ११, १९४१

चि. सुशीला,

आज कुठे तुझे पत्र आले. एव्हाना तू पूर्णपणे चांगली झालेली असशील.

माझ्या डोक्यात कोणतेही विशिष्ट रुग्णालय नाही. कल्पना कर की कोणी तीस लाख रुपये दान दिले तर त्यात कसे रुग्णालय तयार होईल हे सांगण्याची शक्ती तुझ्यात असली पाहिजे. मगच तुला इतक्या पैशात कशा प्रकारचे रुग्णालय चालवता येईल आणि शंभर रुपयात कसे चालवता येईल हे सांगता येईल. मला माहीत आहे की हे फार कठीण आहे. परंतु अतिशय कठीण प्रश्नाचेही उत्तर देता येणे हा एम. डी. पदवीचा अर्थ होत नाही काय? एका वर्षाच्या अभ्यासक्रमाने हे सर्व शक्य आहे काय हे केवळ तूच सांगू शकते. बहुधा अशा प्रकारच्या ज्ञानाकरिता एम. डी. अभ्यासक्रमाची आवश्यकता नसेल. परंतु असे जरी असले तरी हे ज्ञान तुला असले पाहिजे अशी मी अपेक्षा करीन कारण वैद्यकीय कौशल्याची तुला ईश्वरी देणगी आहे. यामुळे तू वाचनाच्या आणि निरीक्षणाच्या मदतीने काही तरी चांगले निर्माण करू शकशील.

तू अनुत्तीर्ण झाल्यामुळे इतकी अस्वस्थ होशील हे जर मला माहीत असते तर मी तुला मुळीच परीक्षेला बसू दिले नसते. प्यारेलालला तुझी जी माहिती आहे त्यावर विसंबून मी त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागायला पाहिजे होते. परंतु मलासुद्धा तुझी चांगली माहिती आहे असे मी माझ्या अहंकारात समजत होतो. माझ्या अहंकारात मी असेसुद्धा गृहीत धरले होते की माझ्या संपर्कात असल्यामुळे तुझ्यातही काही विशिष्ट प्रमाणात अनासक्ती भाव रुजला असेल. परंतु सांडलेल्या दुधाकरिता रडत बसण्यात अर्थ नाही. आता शक्यतोवर गत परीक्षेतील तुझे अनुत्तीर्ण होणे विसर आणि पुढील परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता भरपूर मेहनत कर. त्यात कोणताही अडथळा यायला नको.

कोणतीही आर्थिक मदत न घेण्याच्या तुझ्या निर्धाराचे मला कौतुक वाटते. परंतु यातसुद्धा फार ताठरपणा योग्य होणार नाही. परीक्षेच्या तयारीकरिता तुला अधिक वेळ हवा असेल तर तू अशी मदत स्वीकारली पाहिजे.

कांचनवर मी स्वतःच उपचार करतो आहे. तिचा ताप कमी होत आहे, पण पूर्णपणे गेला नाही. इतकेच नाही तर तिला पाणीसुद्धा कडू लागते. यामुळे मी तिला अन्न देत नाही. ती जेव्हा दुरुस्त होईल तेव्हा मी तिला सर्व काही देईन. मी तिला केवळ दूध आणि फळे यांवर ठेवणार नाही.

अनसुयाबद्दल मला कळले. तीन पौंडानी वजन वाढणे ही चांगली गोष्ट आहे. हीच प्रगती सुरू राहिली तर चांगली गोष्ट होईल.

कांचनला तिथे बोलावणे तुझे कर्तव्य आहे असे मुळीच समजू नको. कोणताही त्रास न होता तू सहजपणे जर तिचे करू शकशील तरच तिला बोलाव.

मी अर्थातच माझी चांगली काळजी घेतो आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२९१

ऑगस्ट ११/१२, १९४१

(संपूर्ण गांधी वाङ्मयमध्ये ही तारीख ११ आहे.)

चि. सुशीला,

याशिवाय बाळकोबा आणि मथुरादाससंबंधी डॉ. जीवराज यांच्या पत्रातील भाग तुझ्या माहितीकरिता सोबत जोडत आहे. यावर तुला जे काही म्हणायचे असेल ते मला कळव.

आशीर्वाद,

बापू

ऑगस्ट १२, १९४१

तुझे पत्र मिळाले. तू सारखी आजारी का पडतेस?

तुला इथे माझ्या आहाराची सविस्तर माहिती कळेल. दुधाचे प्रमाण मी वाढवू शकत नाही असे माझ्या लक्षात आले आहे. मला आज ते कमी करावे लागले. परंतु दूध कमी केल्यामुळे उष्मांकात फरक पडणार नाही. शंकरनने केलेले गणित बरोबर आहे काय? त्यात तू काय बदल सुचवशील? रक्तदाब ठीक आहे. मी आठवड्याचा अहवाल तयार करवून घेईन आणि तो तुला पाठवीन. तारी चांगली आहे.

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२९२

ऑगस्ट १३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुझी सर्दी पुष्कळ दिवस चालली. इथे असतीस तर इतके दिवस चालू दिली नसती.

तुझ्या मनातील माझ्याबद्दलची काळजी मी कसा दूर करू? सोबत मी रक्तदाबाचा तक्ता पाठवत आहे. जिथे कुठे रक्तदाब जास्त आढळेल तिथे तो अतिशय थंडी, वा आहार वा अशाच काही कारणामुळे आहे. एका प्रसंगी मी उशिरा झोपलो होतो. माझ्या प्रकृतीबद्दल तक्रार करण्यासारखे काही नाही. मी तारीला दररोज भेटत नाही.

कांचन चांगली आहे. तिचा ताप गेला असे म्हणता येईल. मी तुझ्याबद्दल समजू शकतो.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२९३

ऑगस्ट १४, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. अ. स. कवळी आणायला गेली आहे. ती प्यारेलालला भेटण्याचा प्रयत्न करणार आहे.

सोबतचे पत्र तुला आलेले आहे. महादेवचे पत्र मी इथेच राहू दिले आहे. कृपलानीसंबंधीच्या मजकुराची प्रत तयार करून ती त्यांना पाठव. सध्या ते इथे नाहीत.

तारीकडे जाणे मी जवळपास थांबवले आहे.

दृढ राहा आणि तुझा कार्यक्रम पूर्ण कर. बिनपगारी रजा घेणे उत्तम राहील असे दिसते. तू पैसे घेण्याकरिता नकार देते हा तुझा केवळ हट्टीपणा आहे. सगळ्या काळज्या सोड आणि शिक्षण पूर्ण कर आणि पूर्ण अनुभव घे. हे सर्वात महत्त्वाचे आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२९४

ऑगस्ट ८, १९४१

चि. सुशीला,

तू तुझा एक पेन इथे सोडून जाणार होतीस. तो मला इथे दिसत नाही. तो तुझ्याजवळ असेल तर ठीक आहे. मला नवीन पेन नको आहे.

नागपूरहून तुझ्याकरिता एक पोस्टकार्ड आले आहे. तुझ्या पत्राचे ते उत्तर आहे. : 'नियमाप्रमाणे कैद्याला कोणालाही भेटण्याची परवानगी नसते आणि त्याला कोणत्याही विशेष व्यक्तीला भेटण्याची इच्छाही नाही." यामुळे फोन जरी केला तरी तुला हेच उत्तर मिळेल.

आशा आहे की तुला विशेष त्रास झाला नसेल आणि सहजपणे आगगाडी पकडता आली असेल. तुला जर आठवत असेल तर तू किती मिनिट आधी पोहोचली ते मला कळव.

कुठेही भेटीगाठी ठरवू नकोस. तुझ्यावर कोणतेही ओझे टाकण्याची माझी इच्छा नाही. तुझ्या अभ्यासातील एक क्षण जरी मी घेतला तरी मला वाईट वाटेल.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२९५

ऑगस्ट १९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुला माझे मिळालेच असावे. तुझे पत्र अगदी वेळेवर पोहोचले.

कुवरजी चांगले आहेत.

नटवरशी झालेली चर्चा उद्बोधक होती.

घराबद्दल मी समजू शकतो. मी अर्थातच व्यवस्था करीन. तू लिहिले हे चांगले केले.

बालकृष्णचे पत्र सोबत आहे. तुझी इच्छा असेल तर त्याला लिही.

आज खुर्शिदबेन आणि शंकरलाल इथे आहेत; गुलझारीलालसुद्धा.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२९६

सेवाग्राम, वर्धा,

ऑगस्ट २०, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून पत्र नाही. शंकरनचे म्हणणे आहे की डॉक्टरला एक स्टेथॅस्कोप पाहिजे असल्यामुळे अजून एका स्टेथॅस्कोपची आवश्यकता आहे. अजून एक स्टेथॅस्कोप हवा असे जर तुलाही वाटत असेल तर तू एक विकत घे आणि इथे पाठव. कनू उद्या येत आहे. परंतु तो केव्हाही येऊ शकतो. मला काळजी वाटत नाही. किती तरी लोक इथे येत आहेत.

मला असे दिसते की मी अजून खाऊ शकणार नाही. पोटात काही तरी जड जड वाटते. मी तुझ्या सूचनांचे पालन करण्याचा प्रयत्न करतो, परंतु तू इथे जेव्हा असतेस तेव्हाच तसे शक्य होते.

मगनलाल आणि कांचन तापातून मुक्त झाले आहेत. आप्पासाहेबही.

तुझे चांगले सुरू असेल.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

२९७

ऑगस्ट २१, १९४१

चि. सुशीला,

तुझे पोस्टकार्ड मिळाले. काल कांचन वालोडला गेली. मी तिला अर्थातच सर्व सूचना दिल्या होत्या. तिचा पत्ता आहे - मगनलाल कालिदास, वालोड, मढीमार्गे, ताप्ती गाव, व्ही. रेल्वे.

गरजू आजाऱ्यांना मदत करणे तुझे कर्तव्य असते; यातून तू बाहेर कशी पडू शकते? मदालसाबद्दल मी डॉ. दासचा सल्ला घेतला. ते म्हणाले : "मला मुद्दा कळला. डॉ. सुशीलाच्या उपचाराबद्दल मला आदर वाटतो. परंतु मला मदालसाला एकही औषध देण्याची इच्छा नाही." तिचे सर्व सुरळीत असल्यामुळे मी आग्रह करणार नाही. महादेवची केस पूर्णपणे डॉ. दासच्या हाती आहे. तुझ्या अनुपस्थितीत वेगळे काही करण्याची हिंमत माझ्यात नाही. इतर बाबतीत मात्र मला शक्य आहे ते मी करतो आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

२९८

ऑगस्ट २१, १९४१

चि. सुशीला,

तुझी तीन पत्रे एकदमच मिळाली.

सरदारची सुटका करण्यात आली आहे. त्यांचा पॉलिपस पाहण्याकरिता तू जाणार असल्याचे महादेवशी फोनवरून झालेल्या चर्चेतून कळले. तुझी इच्छा असेल तर तू त्यांना जाऊन भेटू शकते. कांचन आणि मगनभाईंचा ताप आता गेला आहे. यातून कोणालाही क्विनाईन देण्यात आले नाही. केवळ प्रयोग म्हणून मगनभाईंना मी विड्याचे पान आणि रुईचे पान दिले. याची मदत झाली की आपोआप ताप गेला हे मी सांगू शकत नाही. आप्पा चांगले आहेत. त्यांना भाज्यांचे सूप आणि फळांच्या रसावर ठेवले आहे. त्यांना थोडेसे लोणीही दिले. आजपासून त्यांना पोळी दिली जाईल. त्यांना बरे वाटत आहे. घशाचा त्रास असल्याची तक्रारही आता ते करत नाहीत. अन्नपूर्णाला ९९ डिग्रीपर्यंत ताप असतो. शंकरनच्या घशात सूज असल्याचे तो सांगतो. तो काही तरी तिथे लावील.

काल आहार कमी केल्यानंतर मला बरेच चांगले वाटू लागले. मला शौच्याला साफ झाली. आहार वाढवल्यामुळे सुरुवातीला जरी फायदा झाला असेल तरी नंतर त्याची प्रतिक्रिया झाली असावी. दूध वगैरे वाढवण्यासंबंधी तुझ्या आग्रहानंतर हा माझा तिसरा प्रयत्न आहे. मी फिरणेसुद्धा कमी केले आहे. साडेआठ वाजता काम थांबवतो. फिरत असताना महत्त्वाच्या विषयावर बोलणे पूर्णपणे बंद करता येणे शक्य आहे. सायंकाळी फिरायला जाताना आणि परतताना मी माझे दोन्ही डोळे बंद ठेवतो. त्यामुळे रात्रीच्या झोपेवर कोणताही परिणाम होत नाही.

भूल देणाऱ्या औषधामुळे तुला जो त्रास होत होता तो आता थांबला असेल. जिवराज मेहतांना याची काळजी वाटत नव्हती काय?

तू योग्य आहार घेतेस की नाही? मी हे तुझ्या पेनने लिहिले आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

२९९

ऑगस्ट २३, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून पत्र नाही. तारीबेनला परत ताप आला आहे आणि तो ९९ अंश असतो. तिची प्रकृती माझ्या क्षमतेबाहेर आहे. परंतु मी काय करू शकतो? शिवाय ती फार दूर आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर, द्वारा सहाय्यक अधिष्ठाता के. इ. एम. रुग्णालय,

परेल, मुंबई

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३००

ऑगस्ट २४, १९४१

चि. सुशीला,

आज तुझी दोन पत्रे मिळाली. तुझी जिथेकुठे गरज असेल तिथे हजर राहणे ही तुझ्याकरिता सन्माननीय गोष्ट होईल.

कर्करोगाच्या रुग्णाकडेही लक्ष द्यावे लागेल.

तू मला प्यारेलालचा पत्ता दिलेला नाही. अन्नपूर्णाला विश्रांती दिली आहे. परंतु तिला ताप येतोच आहे.

माझ्या आहारात केलेल्या बदलामुळे मला फायदा झाला आहे. माझे वजन अर्ध्या पौंडाने वाढले आहे. मी ५ तोळे लोणी आणि ४ अंस पोळी घेत असतो. मी सकाळी, दिवसातून एकदाच, आठ अंस दूध घेत असतो. तू सुचवलेला बदल मी हळूहळू करीन. मी अधिक फळे घेण्याचा प्रयत्न करीन. आजूबाजूला नवीन चेहरे आहेत. राम शरण दास आणि त्यांची सून इथे आलेले आहेत

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३०१

व्यक्तिगत

ऑगस्ट २५, १९४५

चि. सुशीला,

तारीला आज खूप त्रास आहे. तिचा ताप वाढला आहे आणि डॉ. दासला बोलावले आहे. काल मी तिला पाहायला गेलो होतो. ती अतिशय अस्वस्थ होती. वरोड्यावरून तिचे मन उडाले आहे. ती वरोड्याला राहू शकणार नाही असे मला नेहमीच वाटत होते. तिला तर आजूबाजूला लोक हवे असतात. तिला रात्री भीती वाटते. कोणी पुरुष सोबत असावा अशी तिने मागणी केली आहे. मी कोणाला तरी तिथे झोपायला पाठवले. रात्री तिचा ताप वाढला आणि ती घाबरली. याप्रमाणे तिचा ताप जर वाढतच राहिला तर तिला इथे आणल्याशिवाय मी तिची काळजी घेऊ शकणार नाही. ती तिथे थांबू शकत नाही.

आता डॉ. दासनी तिच्या प्रकृतीचा पूर्वेतिहास मागितला आहे. यामुळे तुला जे काही माहीत आहे ते तू इंग्रजीत लिही आणि मला पाठव. तू तिची जबाबदारी घेईपर्यंत ती माझी जबाबदारी आहे. मी डॉ. दास यांना मदतीकरिता बोलावीन, परंतु काय करायचे यासंबंधी अखेरीस मी ठरवीन तसेच होईल. तारी कठीण रुग्ण आहे. मी ठरवल्याप्रमाणे ती करू देईल की नाही हे मला माहीत नाही. हा प्रश्न थोडा किचकट आहे. तू सध्या हे ओझे मनावर घेऊ नको. मी ते शक्य तितके कमी करण्याचा प्रयत्न करीन. सध्या तू मला केवळ तिच्या प्रकृतीचा अहवाल पाठव. तिच्या त्रासाची मलाही नेमकी कल्पना नाही. तू कोणत्या तरी गाठीचा उल्लेख केला होता काय? ओटीपोट दाबले असता तिथे दुखत असल्याची तक्रार आज ती डॉक्टरजवळ करत होती.

हे ११ वाजण्यापूर्वी लिहिले आहे. तुझे पत्र आल्यानंतर मी अधिक लिहू शकेन. आता घंटीसुद्धा वाजली आहे. आज तुझ्याकडून काहीही नाही.

मी माझा आहार वाढवत आहे. दुधाऐवजी अधिक लोणी घेणे मला पसंत आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३०२

व्यक्तिगत

ऑगस्ट २७, १९४५

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तू मुळीच चूक केलेली नाही. मी तुला सर्वसामान्य नियम सांगितला होता. तू गेली हेच योग्य झाले. तू मला विचारलेल्या प्रश्नाचे मी केवळ उत्तर दिले होते. तू मुलीलासुद्धा जाऊन पाहायला पाहिजे. तू जिथेकुठे जावे अशी महादेवची इच्छा असेल तिथे तू जायला पाहिजे.

तू शंकरनला लिहिलेल्या पत्रावरून मी दूध थांबवण्याला तुझा सक्त विरोध असल्याचे मला कळले. मी अन्नपूर्णाला पूर्णपणे फळांवर आणि पालेभाज्यांवर ठेवले आहे. त्यामुळेसुद्धा तिला काही लाभ झाला असल्याचे दिसते. हे मला स्पष्ट करून सांग.

लोण्याबद्दलचा तुझा मुद्दा मला कळतो. तुला माहीत आहे की मला ते आवडत नाही. हळूहळू मी दुधाचे प्रमाण वाढवीन. लोण्याचा शौच्यावर चांगला परिणाम होतो. वजन वाढत आहे. तू येईपर्यंत तरी मी निश्चितच प्रकृती चांगली ठेवीन.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - प्रकाश सिमल्यात आहे. तिची राजकुमारीशी भेट झाली. तिला (राजकुमारीने) जेवणाकरिता बोलावले होते.

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३०३

ऑगस्ट २८, १९४१

चि. सुशीला,

तारीबेन कोणाचेही ऐकणार नाही. ती तुझे वा तुझ्या नावाच्या सुशीलेचे ऐकेल. आणि सुशीलासुद्धा तुझे ऐकते. तर अशा प्रकारे तारीची प्रकृती केवळ तूच दुरुस्त करू शकते. ती मुंबईला जाणार नाही. ती काहीही करून इथे राहील. केवळ तूच तिला सुई टोचू शकते. तुझा आग्रह असेल तर तिला सुई देण्याची मी कसे तरी करून व्यवस्था करीन. तू इथे १३ तारखेला येते आहेस ना? प्यारेलालची शनिवारी सुटका होईल अशी माहिती आहे. कनू त्याला घेण्याकरिता जाणार आहे. अमतुल सलाम दुसऱ्यांदा गेली कारण तिला नागपूरला जायचे होते. एरव्ही तू म्हणतेस ते बरोबरआहे.

तुझे काम चांगले सुरू असेल.

मी अनसुयाचे पत्र पाठवले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३०४

ऑगस्ट २९, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून पत्र नाही. प्यारेलालला घेण्याकरिता कनैयो जात आहे. प्रभाकर आज तापाने फणफणलेला आहे. त्याला क्विनाईनचे इंजेक्शन दिले आहे. मी चांगला आहे. काळजी करू नको.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर द्वारा सहाय्यक अधिष्ठाता,

के. इ. एम. हॉस्पिटल,

परेल, मुंबई

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशिला नाय्यर

३०५

ऑगस्ट ३०, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. प्यारेलाल आला आहे. मी त्याला तुझे पत्र वाचायला दिले. तो आनंदात दिसतो. आमचे बोलणे झाले नाही. बहुधा तो तिथे येईल आणि दिल्लीलासुद्धा जाईल.

अन्नपूर्णाचा ताप जात नाही. मनू तिला राजकुमारीकरिता दिलेले औषध देत आहे.

प्रभाकर चांगला आहे. तू येईपर्यंत म्हणजे तेरा तारखेपर्यंतच तू सांगितलेला आहार सुरू ठेवावा आणि तू आल्यानंतर तू जे काही सांगशील त्यावर विचार करायचा असा मी विचार केलेला आहे. सध्या मी जो आहार घेत आहे तो मी सुरू ठेवीन आणि १३ तारखेला तू आल्यानंतर तू सुचवशील तो बदल करीन. सध्या दोन अंस लोण्याचा चांगला फायदा आहे. हळूहळू मी दुधाचे प्रमाण वाढवत आहे. परसाकड साफ होऊ लागण्यात बरीच सुधारणा आहे. सौबत जोडलेली व्यंगचित्रे प्यारेलालने आणलेली आहेत. तुला ती आवडतील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३०६

ऑगस्ट ३१, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तू आली नाही हे चांगलेच झाले. काहीही झाले तरी मी प्यारेलालला पाठवणारच होतो. तुझा अभ्यास माझ्याकरिता सर्वात महत्त्वाचा आहे. सत्या तिथे आहे हीसुद्धा चांगली गोष्ट आहे.

तारी महिलाश्रमाजवळ राहणार आहे. तिला तिच्या मैत्रिणीशिवाय बरे वाटत नाही. ती दिल्लीपर्यंत तुझ्याबरोबर येऊ शकेल. तिला केवळ हरिजन आश्रमात राहायचे आहे. तुझ्याकरिता ते फार दूर होईल. आता कार मिळणेही कठीण होईल. तू येशील तेव्हा आपण त्याबद्दल पाहू.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३०७

सप्टेंबर १, १९४१

चि. सुशीला,

आज तुझे पत्र नाही. प्यारेलाल आज जात नाही. काही काम करायचे राहिले आहे. कोलाया जेव्हा डॉ. दासना भेटायला येतील तेव्हा हजर राहण्याचे त्याने कबूल केले आहे. प्यारेलालबरोबर ते तुरुंगात होते. प्यारेलाल उद्या (मंगळवारी) निश्चित निघेल. आज तार पाठवली आहे.

तुला महादेवच्या आजाराची तर कल्पना असेलच, नसेल तर तिथे त्याला भेटायला जाणे उचित राहील. मेरी बार (मेरी बार, या दक्षिण आफ्रिकेत गेल्या होत्या.) आली आहे. तीसुद्धा इथे आहे.

माझे वजन काल दोन पौंडांनी वाढले. आता ते १०२.५ पौंड आहे. हा प्रामुख्याने लोणी घेतल्याचा परिणाम आहे. मी दोन अंस लोणी खातो. दूध उकळले असता जी साय येते ते सुद्धा लोणी आहे, नाही काय? तिच्यात काही वेगळे असते काय?? रवी लावल्यानंतर ताकातून लोणी काढणे कठीण असते. दूध मंद आचेवर उकळल्यानंतर त्यातून साय काढणे सोपे असते.

प्रभाकरचा ताप गेला आहे. अकबर चांगला आहे. अन्नपूर्णाचे दुखणे अजून नियंत्रणात आले नाही. मी तिला मेगासल्फा आणि सोडासल्फाची अतिशय कमी मात्रा दिली आहे. तिची जीभ वाईट आहे; आणि भूक लागत नाही. तिचा चेहरा चांगला दिसत नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३०८

सप्टेंबर २, १९४१

चि. सुशीला,

दोन दिवसांपासून तुझे पत्र नाही. यामुळे मी काय लिहू शकतो? शिवाय मी प्यारेलालला पाठवत आहे. अजून काय? काकासाहेब माझ्यासमोर गप्पा मारत बसले आहेत. यामुळे आज इतके पुरे. तुझ्या येण्याचे दिवस मी मोजत आहे. अन्नपूर्णाची काळजी वाटू लागली आहे. बाकी सर्व ठीक आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३०९

सप्टेंबर २, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र लवकरात लवकर परवा येईल. तू जर प्रवासात लिहिले असशील तर मात्र ती वेगळी गोष्ट असेल. तारीबेनला अजूनही किंचित ताप आहे. अजूनही ती सेवाग्राममध्ये आहे. २-४ दिवसात ती वरोड्याला जाऊ शकते. मी ते पूर्णपणे तिच्यावर सोडले आहे. तू तुझे काम चांगल्या प्रकारे सुरू केले असशील.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज वैद्यकीय महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१०

सप्टेंबर ३, १९४१

चि. सुशीला,

तीन दिवसांपासून तुझ्याकडून एकही पत्र नाही हे आश्चर्य आहे. प्यारेलाल कदाचित आलाही असेल. तो नीट जेवत नाही. हे तू तिथे पाहशील. "प्रिन्सेस ऍन्ड शेफ्स ऍन्ड नोटेबल पर्सन्स इन काठेवाड" नावाचे एक पुस्तक आहे. बॅरिस्टर छुदगर लिहितात की त्यांनी हे पुस्तक पाठवले आहे. प्यारेलालला आठवत असेल तर त्याला मला लिहायला सांग.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर द्वारा सहाय्यक अधिष्ठाता,

के. ई. एम. छात्रालय, परळ

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३११

सप्टेंबर ५, १९४१

चि. सुशीला,

इतक्यात तुझी पत्रे फार अनियमित आहेत. अखेरीस महादेव न्युमोनियाने आजारी पडला. प्यारेलाल आपला औषधोपचार घेतच असेल. सर्व ठीक असतील.

तुम्हा दोघांनाही आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर, द्वारा सहाय्यक अधिष्ठाता के. इ. एम. रुग्णालय,

परेल, मुंबई

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१२

सप्टेंबर ८, १९४१

चि. सुशीला,

आज परत तुझे पत्र नाही. परंतु तुझ्या परिस्थितीचा विचार करता मी दररोज तुझ्या पत्राची अपेक्षा करायला नको.

प्यारेलालच्या गाठींची (ग्लॅन्ड्स) शस्त्रक्रिया करावी की नाही हे मी पूर्णपणे तुझ्यावर सोडले आहे. ती शस्त्रक्रिया करणे सर्वात चांगले कुठे राहील हे केवळ तूच सांगू शकते. तुझ्या सोयीचा विचार केलाच पाहिजे यात काही संशय नाही. तुला हे पत्र मंगळवारी मिळेल. तू तिथून शुक्रवारी मोकळी व्हायला पाहिजे. तुझी तिथे दोन वा तीन दिवस गरज असेल तर मी काळजी करणार नाही. परंतु हेही शक्य आहे की तोपर्यंत शस्त्रक्रिया पार पडणार नाही आणि तू वेळेवर मोकळी होणार नाही. दिल्लीत लवकरात लवकर १६ तारखेला शस्त्रक्रिया होऊ शकेल. प्यारेलाल तिथे लवकरात लवकर ११ तारखेला पोहोचू शकेल. त्याला तिथे पाच दिवस राहावे लागेल. आवश्यक झाले तर तो त्या दिवसात आईकडे राहू शकेल. आता तू स्वतःबद्दल विचार कर.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१३

सप्टेंबर १०, १९४१

चि. सुशीला,

तुला मुंबईच्या पत्त्यावर पाठवत असलेले माझे हे शेवटचे पत्र अलेल. तुला लिहिले नाही असा एकही दिवस मी जाऊ दिला नाही. नाही मी विसरलो. एक दिवस असा होता की जेव्हा मी असे केले नव्हते. मी लिहूच शकलो नाही.

अन्नपूर्णा पुष्कळच चांगली आहे. ती विश्रांती घेते आहे. ती व्यवस्थित खातेपिते. उद्या मी तिला डेव्हीडकडे पाठवत आहे.

राजेंद्रबाबू आज आले. अजून मी त्यांची भेट घेऊ शकलो नाही. ते बंगल्यात आहेत. सरूप इथे आहे. ती उद्या जाणार आहे.

तुझ्यावर जी टिकाटिप्पणी होते त्याला उत्तर देण्याचे कारण नाही. परंतु न चिडता तू लोकांचे गैरसमज दूर करू शकते. तू जर चिडली तर गैरसमज अजून दृढ होतील. तू जर त्यांना खेळीमेळीने प्रतिसाद दिला तर तू ते दुरुस्त करू शकते.

तुला माहीत नसेल तर सांगतो की इतक्यातच मला निल्लाचे (निल्ला क्रॅमक्रूक) पत्र आले होते. त्यात ती म्हणते की तिला माझ्याकडे परत येण्याची इच्छा आहे, कारण तिला माझ्याकडेच सत्य आढळले. जो माणूस जाणूनबुजून चूक करतो तो चूक दुरुस्त करण्याची अर्थातच शक्यता नसते.

माझे वजन एक पौंडाने जे कमी झाले तो केवळ अपघात आहे असे समज. माझी प्रकृती चांगली आहे.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - मला खात्री आहे की प्यारेलाल तिथे पोहोचला असेल आणि तू शस्त्रक्रियेबद्दल निर्णय घेतला असशील

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१४

सप्टेंबर १४, १९४१

चि. सुशीला,

आशा आहे की तुला आरामशीर जागा मिळाली असेल आणि तू तिथे कोणतही त्रास न होता पोहोचली असशील. अभ्यासात गुंग हो. अन्नपूर्णाचे तुझ्यावर ओझे व्हायला नको.

एक दिवसाकरिता का होईना तू आली याचा मला आनंद होतो.

प्यारेलालचे पत्र सापडलेच असेल. त्याने डॉक्टरशी संपर्क केला असेल. चष्मा आणि दात यांची काळजी घेतलीच पाहिजे.

माताजी इथे येण्यासंबंधीचा प्रस्ताव असाच खारीज करू नको. तू इथे येशील तेव्हा माताजी इथे असल्या तर तुही काळजीतून मुक्त होशील आणि माताजीही. मुलांचे एकदा लग्न झाले की ते आईवडिलांच्या उपयोगाचे राहतात काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१५

सप्टेंबर १५, १९४१

चि. सुशीला,

आता ठीक दुपारच्या साडेतीन वाजता तू तुझ्या रुग्णालयाच्या कामात व्यस्त असशील.

काल राम सरण दासचे सर्व दात काढले आणि आज त्याला मुळीच ताप नाही. काल ताप असतानाही बारेटोने दात काढले. त्यांचे मत होते की दाढांमध्ये जहर असल्यामुळे ताप आहे, आणि त्याचा ताप दूर करण्याकरिता दात काढणे आवश्यक आहे. निर्मल सिंग बराचसा चांगला आहे. त्याचा ताप पूर्णपणे गेलेला नाही. त्याला वेगळ्या खोलीत ठेवले आहे. बाकी तो चांगला आहे. एक दात काढून घेण्याकरिता आणि बाकीचे दात स्वच्छ करून घेण्याकरिता रामनारायणला उद्या नागपूरला जावे लागेल. त्याचे वजन वाढले आहे. काल माझे वजन १०१.५ पौंड होते. माझी काळजी करू नको.

प्यारेलालला मी वेगळे पत्र लिहून राहिलेलो नाही. जर शस्त्रक्रिया झाली नसेल तर तो तिथून गेलेला असेल. तो जर तिथे असेल तर दात दाखवल्यानंतर त्याला येऊ दे. त्याला हे नागपूरला करावेसे वाटत असेल तर गोष्ट वेगळी.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - अन्नपूर्णा चांगलीच असेल; आणि अनसुयाही?

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१६

सप्टेंबर १७, १९४१

चि. सुशीला,

काल तुला पत्र लिहिणे मला अगदीच शक्य झाले नाही. अगदी शेवटच्या टोकापर्यंत लोक भरलेले होते. आज तुझे पत्र यायला पाहिजे होते, परंतु ते आले नाही. तुझ्या भावाकडूनही पत्र नाही! माझे चांगले सुरू आहे. राम शरण दास चांगला आहे. निर्मल सिंगला ताप आहेच. त्याची सूज गेली.

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१७

सप्टेंबर १८, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मला तुला एक दिवस पत्राशिवाय ठेवावे लागले. प्यारेलाल तिथे असेल वा नसेल, आणि म्हणून मी तुला लिहीत आहे. तू ज्याप्रमाणे तेथील रुग्णांची चांगली बातमी देते आहेस त्याप्रमाणेच मी येथील रुग्णांबद्दल सांगू शकतो. दोघेही चांगले आहेत.

निर्मल सिंगची गाठ जिरली आहे. त्याचा ताप आज उतरला. त्याला निंबू आणि सोडा याशिवाय काहीही दिले नाही. आणि कालपासून ग्लुकोज दिले. त्याने चिंचोणी मागितली आणि मी ती दिली.

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१८

सप्टेंबर १९, १९४१

चि. सुशीला,

मला तुझे पत्र मिळाले. अन्नपूर्णा तिथे घरात रुळली हे फार चांगले आहे. ती अशी बाई आहे की ती कुठेही गेली तरी जुळवून घेईल.

तुझ्याकरिता का होईना मी माझी प्रकृती चांगली ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे. तू काळजी न करता तुझे ज्ञान वाढवत राहा. इथे सर्व काही ठीक आहे.

अन्नपूर्णाच्या ठिकाणी मी राम सुंदर दासला आणले आहे. त्याचा ताप पूर्णपणे गेला आहे. त्याला पुरेसे दूध देण्यात येत आहे. त्याचे दात काढल्यानंतर त्याचा चेहरा बदलला आहे. त्याच्या श्वासाचा जो घाणेरडा वास येत होता आता तोही बराचसा गेला. आपल्याला नवजीवन मिळाले असे त्यालासुद्धा वाटते. त्याचे दात काढल्याबरोबर त्याचा ताप उतरू लागला.

निर्मलसिंगमध्येही कालपासून सुधारणा होत आहे. त्याची गाठ पूर्णपणे गेली. अजून त्याला दूध दिले नाही. आज त्याला बार्लीचे पाणी दिले. त्यानेच ते मागितले. तर आता इथे कोणीही रुग्ण नाही. चक्रैय्याबद्दल सांगायचे तर मी स्वतःच त्याला मोजूनमापून खायला देत असतो. तो चांगला आहे. आज मी अन्नपूर्णाला लिहिणार नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३१९

सेवाग्राम,

सप्टेंबर २१, १९४१

चि. सुशीला,

प्यारेलाल लिहितो की घशातील सुजेमुळे तुला थोडासा ताप आला आहे. तुझा घसा खराब कसा होऊ शकतो? तुला इंग्रजी वाक्प्रचार निश्चितच माहीत असेल - डॉक्टर, आधी तुम्ही बरे व्हा! म्हणून तू आणि अन्नपूर्णाने लवकर बरे व्हायला पाहिजे.

येत्या चरखा बारसला तू माझ्याबरोबर असशील यात काही संशय आहे काय?

तुझे १५ तारखेचे पत्र दोन दिवस उशिराने मिळाले. बहुधा ते डाकघराच्या पत्रपेटीत पडून राहिले असावे.

माझे चांगले सुरू आहे. आज माझे वजन १०३ पौंडाच्या थोडे वर होते. याचा अर्थ ते कमीतकमी दीड पौंडाने वाढले आहे. इतर दृष्टींनीही मी अगदी चांगला आहे. झोपण्याची वेळ पाळण्याचा मी जवळपास प्रयत्न करत असतो. फिरायला जात असताना मी बोलणे पूर्णपणे थांबवू शकत नाही.

सर्व आजारी चांगले आहेत. प्रभाकरच्या हातावर आणि पायावर गजकर्णासारखे काही तरी झाले आहे. यामुळे मी त्याला पालेभाज्या आणि फळांवर ठेवले आहे. यामुळे त्याला भरपूर फायदा वाटतो.

माताजींबद्दल काय ठरवले?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२०

सप्टेंबर २३, १९४१

चि. सुशीला,

आज तुझे पत्र नाही. प्यारेलाल आला नाही.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

ले. हा. वै. महाविद्यालय,

नवी दिल्ली

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२१

सप्टेंबर २४, १९४१

चि. सुशीला,

आज तुझे पत्र आले. एका वा दुसऱ्या कारणाने तुझ्या अभ्यासात अडथळा येत असल्यामुळे मी समाधानी नाही. परंतु याबाबतीत तू वा इतर कोणी काहीही करू शकत नाही. ईश्वराची इच्छा असेल तसे होईल.

अन्नपूर्णाचेसुद्धा काही प्रमाणात तुझ्यावर ओझे झाले आहे. मला वाटत होते की तिला तिथे ताप येणार नाही. ती तुझ्या उपचाराने निश्चितच दुरुस्त होईल. परंतु तसे होईपर्यंत मला काळजी वाटते.

माताजींच्या संबंधात प्यारेलालशी बोलेन. तू लिहिजे त्याप्रमाणे घटना घडल्या नाही तर अडचणी नक्कीच येतील. माताजी स्वतःच इतक्या विचारपूर्वक वागणाऱ्या आहेत की त्या माझ्यावर मुळीच ओझे होणार नाहीत. असे असले तरी तू म्हणशील तसे होईल. मी कोणत्याही बाजूने आग्रह करणार नाही. माझी पूर्ण तयारी आहे.

मी अगदी चांगला आहे. सर्व आजारी चांगले आहेत. चक्रैय्याला परत दौरा पडला.

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२२

सप्टेंबर २५, १९४१

चि, सुशीला,

आज तुझे पत्र नाही. काल प्यारेलाल आला नाही. तो आज येईल असे मी समजतो.

मी चांगला आहे असे मी म्हणू शकेन. सर्व रुग्ण चांगले आहेत. चक्रैय्याकरिता योग्य उपचार काय आहे हे अजूनही कळत नाही. त्याला ताप नाही. त्याला खाज नाही कारण त्याला अन्न देणे बंद आहे. असे असले तरी तो वासनांनी त्रस्त आहे, आणि वारंवार त्याचा वीर्यपात होतो. तुझ्या लक्षात जर याचे कारण येत असेल तर मला सांग.

तुझ्या अभ्यासाच्या कार्यक्रमाची आता तुला सवय झाली असेल.

मुंबईला गेल्यानंतर असे दिसते की काही विशेष लाभ झाला नाही.

तेथील हवामान कसे आहे?

आशीर्वाद,

बापू

ता. क. दीनबंधू स्मृतीनिधीकरिता मी ऑक्टोबरमध्ये दौऱ्यावर जाण्याची शक्यता आहे.

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२३

सप्टेंबर २६, १९४१

चि. सुशीला,

प्यारेलालबरोबर तू पाठवलेले पत्र मला मिळाले.

तुझा जेव्हा दररोजचा अभ्यासाचा कार्यक्रम ठरेल तेव्हाच मला तू व्यवस्थित अभ्यास करते आहेस असे वाटेल.

मी माताजींबद्दल चर्चा करतो आहे. माझ्यावर त्यांचे ओझे कसे असू शकते?

अन्नपूर्णाबद्दल सांगायचे तर तिला हलक्या आहारावर ठेवले पाहिजे. जर क्षयरोगाची शंका नसेल तर दूध, फळे आणि पालेभाज्या यांच्या आहाराने ताप निघून गेला पाहिजे. परंतु अर्धवट वैदूची ही सूचना आहे. तुला जे काही योग्य वाटेल ते कर. तुझ्या हाती सोपवलेल्या रोग्यांची मला मुळीच काळजी वाटत नसते.

सोबतचे पत्र पंजाबसंबंधी आहे.

महादेव उद्या येत आहे. तो इथून २९ तारखेला निघेल आणि अल्वरला जाताना तिथे येईल.

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२४

[सप्टेंबर २७, १९४१]

(मागील विषयात महादेव देसाई आले असल्याचा उल्लेख असल्यामुळे आणि यात दुर्गा आणि बबलो आले असल्याच्या उल्लेखावरून; शिवाय पाहा "अमृत कौर यांना पत्र", सप्टेंबर २२, १९४१)

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. ही भीती कशी? अन्नपूर्णाने तिच्या आईवडिलांना घाबरवले. अशा प्रकारे जर ते तिथे आले तर त्यांना पश्चात्ताप होईल. तू जर तुझ्या बाजूने काहीही करायचे ठेवले नसशील तर अजून कोणी काय अपेक्षा करू शकतो? तू तिच्या वडिलांना लिही. ते फार चांगले गृहस्थ आहेत.

अनसुयाचे ओझे तू सहन करू शकत असशील तरच तू तिला तुझ्याबरोबर ठेव.

दुर्गाबेन आणि बबलो आले आहेत. दुर्गाबेनच्या मांडीतील वेदना कायम आहेत.

आशीर्वाद

बापू

ता. क. - माझे वजन १ पौंडाने कमी झाले आहे. बहुधा लोणी कमी घेतल्याने असे झाले असावे. मी लोणी काहीशा संकोचानेच खात असतो. कामाचा ताण हेही कारण असू शकते.

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२५

सप्टेंबर २८, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मला अन्नपूर्णाची मुळीच काळजी वाटत नाही.

अखेरीस मलाच माताजींबद्दल विचार करावा लागेल. प्यारेलालचे मन दोलायमान आहे. दृष्टिकोनात जरी अंतर असेल तरी त्या इथे असण्याच्या बाजूने तो अधिक आहे.

माताजी जर इथे येणार असतील तर मी पुन्हा झोपडीच्या भागात जाईन आणि मी रुग्णालयाचा जो भाग उपयोगात आणत होतो तो परत रुग्णालयाला देऊन टाकीन. माताजी तिथे राहू शकतात. शंकरन त्यांची चांगली सेवा करू शकेल याबद्दल शंका नाही. माताजी स्वतःकरिता वेगळा स्वयंपाक करू शकतात आणि हवे ते शिजवू शकतात. प्यारेलालला वाटते की माताजी रुग्णालयात मदत करू शकतात. तुला या सर्वांबद्दल काय वाटते? माताजींचासुद्धा सल्ला घे.

तूप महाग पडले. ते ६४ पौंड दुधापासून बनवले हे मी कसे सहन करू शकतो?

आशीर्वाद

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२६

सप्टेंबर २९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मला जर दौरा करावा लागला तर तू माझ्याबरोबर असणे मी पसंत करीन. परंतु दौरा न होण्याचीच शक्यता आहे. काय होते हे पाहू या. मला जरी जावे लागले तरी मी अर्थातच काळजीपूर्वक राहीन.

अन्नपूर्णाने परिस्थितीवर मात केली आहे असे दिसते. तिचा ताप गेला तर मोठीच अडचण दूर होईल. लक्ष्मीपतीने चक्रैय्याला बोलावले आहे. तो त्याला आपल्याच महालात ठेवील. मी त्याला तिथे उद्या पाठवत आहे.

मी प्रभाकरबद्दल समजू शकतो. मीसुद्धा त्याची काळजी घेतो आहे. तुझ्या सल्ल्याची मदत होईल.

सोबत अन्नपूर्णाकरिता कात्रण आहे.

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२७

सप्टेंबर ३०, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. प्यारेलालला पाठवलेले पत्रही मी वाचले. हे पत्र विलंब शुल्कासहित जाईल. आज नालवाडीत गोसेवा संघाची सभा झाली आणि तिने तीन तास घेतले. मी तिथून साडेपाच वाजता परतलो. त्यानंतर मी जेवण केले. मी हे प्रार्थनेनंतर लिहीत आहे.

उद्या प्यारेलाल सत्याग्रह करणार आहे. आज तो वेड्याप्रमाणे काम करत होता. इथे आल्यानंतर त्याने (सत्याग्रह) फार दिवस लांबवत राहणे योग्य होईल असे मला वाटत नव्हते. त्याचे काम तर नेहमीच सुरू राहणार आहे. यामुळे उद्याचे ठरवून टाकले. आता मी त्याच्याकरिता वक्तव्य तयार करीन. (पाहा "न्यायालयात वक्तव्य"ऑक्टोबर ३, १९४१)

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२८

ऑक्टोबर १, १९४१

चि. सुशीला,

आज प्यारेलालने अटक करवून घेतली. ते सुंदर दृश्य होते. सेवाग्रामच्या सीमेपर्यंत आम्ही सर्व त्याच्याबरोबर गेलो. त्यानंतरही आम्ही मिरवणुकीने चालत होतो. गावातील लोक पावलोपावली त्याचे पाय धूत होते, ओवाळत होते. अशाप्रकारे मिरवणूक बरबडीपर्यंत गेली. बहुधा याचे वर्णन याबरोबरच तुला मिळेल.

तो रात्रभर काम करत होता. त्यानंतर तो माझ्या बाजूला झोपला. आणि मग तो स्मितहास्य करत निघून गेला.

या सोबत मी पत्रे आणि कागदपत्रे पाठवत आहे.

ता. क. - काल मी विलंबशुल्क भरून तुला पाठवलेले पत्र मिळालेच असेल.

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३२९

ऑक्टोबर २, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. आज आश्रम लोकांनी भरलेला आहे. ते येतच आहेत. चरखे सुरू आहेत. मीसुद्धा चरख्याला एक तास दिला.

माताजींबद्दल मला समजले. आता तू आणि मी ठरवायचे आहे. ही इमारत जरी रुग्णालयाला दिली तरी माताजी तुझ्या खोलीत राहू शकतात. त्यांना स्वतःला असे काय हवे आहे? त्यांची येण्याची इच्छा आहे काय? त्यांना तितका उत्साह वाटतो काय? त्यांच्याशी चर्चा कर आणि मला लिही. जे काही करायचे असेल ते करताना तुला आणि माताजींना काय सोयीस्कर आहे याचा विचार केला पाहिजे. त्यामुळे माझी कोणती गैरसोय होणार आहे? आश्रमातील इतक्या सगळ्या लोकांमुळे जर माझी गैरसोय होईल असे मला वाटत नसेल तर माताजींबद्दलही मला तसे कसे वाटेल? अखेरीस त्यांना इथे यायचे आहे. यामुळे निर्णय घेताना त्यांचे मला ओझे होईल असा विचार करून निर्णय घेऊ नको.

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३०

ऑक्टोबर ३, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. प्यारेलालने तुरुंगातून लिहिले आहे. मी तुला ते पत्र पाठवत आहे.

मी अन्नपूर्णाबद्दल समजू शकतो. आता राजकुमारीला लिहिण्याची आवश्यकता नाही कारण ती जवळपास दुरुस्त झाली आहे. आणि तिचा भाऊ तिला कुठेही जाऊ देणार नाही असेही तिने लिहिले आहे. तिने सिमल्यात प्रकृती दुरुस्त करावी असे त्याचे म्हणणे आहे.

प्या(रेलाल)च्या वक्तव्याची प्रत मी सोबत जोडत आहे. बाकी नंतर. सुनावणी सकाळी होती. निकाल दुपारी ३ वाजता सांगितला जाईल. जर काही बातमी असेल तर तिचा मी या पत्रात समावेश करीन.

आशीर्वाद

बापू

ता. क. - लक्ष्मीपतीबद्दल काहीच नक्की नाही. तो घर केव्हा बांधतो ते पाहू या. तो जर एखादे घर बांधील तर त्याची योजना ते टेकडीजवळ बांधण्याची आहे.

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३१

ऑक्टोबर ४, १९४१

चि. सुशीला,

सोबत प्यारेलालचे दुसरे पत्र आहे. काल मी तुला पाठवलेले पत्र वा त्याची प्रत वा त्यातील ज्या मजकुराशी मला काम आहे आहे त्याची नक्कल करून मला परत पाठव. मला सर्व काही आठवेल असे वाटत होते. परंतु आता असे वाटते की मी काही तरी विसरलो आहे.

या वेळी सर्व काही ठीक राहिले. जमनालालजीसुद्धा त्याच्याबरोबर १ तास बसले होते आणि बाही त्याच्याशी बोलत होती. त्याला आज बहुधा नागपूरला नेले जाईल. निर्मल सिंग आणि राम सरूप दास हे दोन्ही आजारी आता दुरुस्त झाले असून पंजाबमध्ये गेले आहेत.

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३२

ऑक्टोबर ६, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून काहीही नाही. इथूनही लिहिण्यासारखे विशेष असे काहीही नाही. मी अगदी चांगला आहे.

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३३

ऑक्टोबर ७, १९४१

चि. सुशीला,

पृथ्वीसिंगकडून मला तुझे पत्र आणि धनादेश असे दोन्ही मिळाले. तो त्रावणकोर बँकेचा का आहे? ती बँक ज्यास्त व्याज देते की अधिक सोयी देते? तो धनादेश कुठे वटवता येईल? ते भरपूर वटाव घेत असतील. मीसुद्धा चौकशी करीन.

तू दोन्ही बहिणींना ठेवू शकते काय? तुझ्या अभ्यासात सतत अडथळे का येतात? तुझी जर पूर्ण तयारी झालेली नसेल तर मी तुला परीक्षेला बसू देणार नाही. असा एकही प्रश्न नाही की ज्याचे तू उत्तर देऊ शकत नाही. एप्रिलपर्यंत तुझी जर इतकी तयारी नसेल तर मग तू नंतर परीक्षेला बसू शकते. मला घाई नाही. तू मिळवलेले ज्ञान वाया जाणार नाही, आणि यामुळे त्याकरिता काही अधिक वेळ लागणार असेल तर लागू दे. परीक्षेत उत्तीर्ण होण्याकरिता तू रात्रंदिवस अभ्यास करून तुझे डोळे बिघडवून घ्यावे अशी माझी इच्छा नाही. अशा प्रकारे उत्तीर्ण होण्यापेक्षा अनुत्तीर्ण होणे बरे. तुला नाव करण्याकरिता नाही तर सेवा करण्याकरिता परीक्षेत बसायचे आहे.

तू किती खादी विकली आणि कुठे विकली?

आश्रमात आता फार गर्दी होते आहे. विजया आणि वसुमती आल्या आहेत. पन्नालाल आला आहे. काही इतर लोकही येणार आहेत. अजून किती तरी लोक येण्याकरिता उत्सुक आहेत. मी त्यांना कुठे ठेवू? स्वयंपाक घर आणि ओसरी यांच्या आकाराचा केवळ विचार कर. ओसरीत लोक जेवत असतात. बांधकाम अर्थातच सुरू आहे. ते केव्हा संपेल हे सांगता येत नाही. आणि मीही त्याकरिता वेळेची सीमा घालू शकत नाही. ईश्वराची इच्छा असेल तसे होईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३४

ऑक्टोबर ८, १९४१

चि. सुशीला,

आज तुझे पत्र नाही. या भागातील वर्तमानपत्रांमध्ये प्यारेलालचे वक्तव्य प्रकाशित झाले. तिकडे झाले काय? आता या क्षणी चरखा संघाची सभा सुरू आहे.

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३५

ऑक्टोबर ९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. अभ्यासाच्या काळजीने तू ग्रस्त आहेस असे दिसते. तुझ्याकडून जितके होत असेल तितक्यावर समाधान मान. तुझे उद्दिष्ट परीक्षेत उत्तीर्ण होणे नाही तर ज्ञान मिळवणे आहे. तू अर्थातच परीक्षा दिली पाहिजे, परंतु जेव्हा तुला पूर्णपणे आत्मविश्वास वाटेल तेव्हाच तू असे करायला पाहिजे. उशीर होण्याची काळजी करू नको. त्याकरिता जो काही वेळ लागणार असेल तो लागू दे.

लाहोरमध्ये तू थांबण्यासंबंधी प्यारेलाल माझ्याशी बोलला. मी त्याला सांगितले की याकरिता मी नंतर तयारी करीन. याबद्दल मी तुला लिहायला विसरलो. तू जर मला परवानगी दिली तर मी तसे लवकरही करू शकतो.

कनू गेलेला असल्यामुळे अमतुल सलाम मालीश करत असते. तू समजून चाल की तुझ्याकडून सेवा घेण्याची गोष्ट अजून संपलेली नाही. अर्थात मला अशा सर्व चर्चेच्या वर उठायचे आहे. आपली कोणी स्तुती करत असेल वा कोणी दोष देत असेल तर त्याचा आपल्यावर परिणाम का व्हावा?

माझी शिकवण केवळ सत्याग्रहीच्या कर्तव्याबद्दल होती. वेदना विसरण्याकरिता वा त्यापासून पळ काढण्याकरिता सत्याग्रही सत्याग्रह करणार नाही. सत्याग्रह करणे आपले कर्तव्य आहे असे वाटल्यामुळेच तो सत्याग्रह करील.

आणि जोपर्यंत अ. स.चा प्रश्न आहे मला वाटते की तिच्याबद्दल आपण विचार करायला नको. ती जी काही सेवा करते तिचा माणसाने स्वीकार केला पाहिजे, परंतु तिच्याकडून काहीही अपेक्षा करू नये.

असे दिसते की प्यारेलालच्या वक्तव्याचे चांगले स्वागत झाले आहे. ते थोडक्यात परंतु मुद्देसूद आहे.

माझ्या वजनाची काळजी करू नको. ते अगदी हळूहळू वाढवणेच योग्य होईल. मी लोण्याचे प्रमाण परत वाढवले आहे.

आशीर्वाद

बापू

ता. क. - राजकुमारी परत आजारी पडली आहे. तिचा खोकला अजून वाढला आहे. तो कमी झाला असल्याचे ती आजच्या पत्रात लिहिते. तो एक प्रकारे काही वेळा चांगला असतो तर काही वेळा फार वाईट.

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३६

ऑक्टोबर १०, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. अन्नपूर्णाकरिता अभिनंदन. शंकरनकडून पत्र आले आहे. त्याचे इनिमा घेणे सुरूच आहे. यामुळे इनिमा घेण्याची पिचकारी सोडली तर तो सर्व काही पाठवणार आहे. मी दुसरी पिचकारी पाठवीन.

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३७

ऑक्टोबर १२, १९४१

चि. सुशीला,

काल मी मुळीच लिहू शकलो नाही. आजही केवळ इतकेच. मी चांगला आहे. कनू फोटोग्राफी करण्याकरिता गेला आहे. तो दोन आठवडे राहील. जास्तीत जास्त एक महिन्याकरिता डॉ. दास उद्या जात आहेत. लीलावती काल आली. सोबत ताप घेऊन आली. आज ती कालपेक्षा चांगली आहे. मीराबेनच्या कानात ढोल वाजवल्यासारखा आवाज येतो. तो कशाचा असू शकतो?

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

मूळ गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३३८

ऑक्टोबर १३, १९४१

चि. सुशीला,

मी या संधीचा उपयोग करतो आहे, नाही तर मला हे पत्र लिहिणेच शक्य झाले नसते. मी जे लिहिले त्याचा अर्थ एकच आहे. मी जे लिहिले नाही तो त्याचा अर्थ नाही. आणि अशी काही गोष्ट बोलली जात असेल तर त्याने काय फरक पडतो? दुसरे वाक्य शुभेच्छा व्यक्त करणारे आहे. याला जे काही महत्त्व द्यायचे असेल ते आपण देऊ शकतो. गीतेतील श्लोक उद्धृत करण्यासारखे नाही काय?

आज मी पृथ्वी, चांद आणि पुरी यांना प्यारेलालला भेटायला पाठवले. डॉ. दास आणि निमाई कलकत्त्याला गेले. बारेटोला भेटण्याकरिता ते मध्येच नागपूरला थांबतील. एका महिन्यानंतर ते परततील.

मालीशमध्ये काही बदल करण्यासंबंधी मी अजून विचार केला नाही.

इथे हवामान परत गरम झाले आहे. रात्री थंड असतात. माझे वजन परत वाढले आहे. वजन अडीच ते तीन पौंडांनी वाढले आहे. सर्व काही लोणी आणि तूप यांवर अवलंबून आहे.

आशीर्वाद

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३३९

ऑक्टोबर १४, १९४१

चि. सुशीला,

काल मी तुला मोठ्या घाईगर्दीत पत्र लिहिले होते. आज डाक जाण्यापूर्वीच्या एका तासात मी मौन पाळतो आहे आणि त्यात हे पत्र लिहिण्याची संधी घेतो आहे.

काल मोठ्या मुश्किलीने पृथ्वीचंद, गिरधारी आणि महमूद प्यारेलालला भेटले होते. त्यांनी पूर्वसूचना दिली नव्हती. प्यारेलालला फार आनंद झाला. पृथ्वीचंद येईल तेव्हा तो तुला सर्व माहिती सांगेल. परीक्षेपूर्वी तू सेवाग्रामला येऊ नये असे त्याचे म्हणणे आहे. माताजींना सेवाग्रामला राहण्याकरिता यायचे नसेल तर केवळ भेट घेण्याकरिता त्यांनी येऊ नये. त्यांची महादेवला भेटण्याची इच्छा आहे. बाकी पृथ्वीचंदकडून. माताजींनी इथे येऊन राहायला पाहिजे अशी प्यारेलालचीसुद्धा इच्छा आहे या निष्कर्षावर मी आलो आहे. मी अजून पृथ्वीचंदला भेटलो नाही. गिरधारीने मला असे सांगितले. पृथ्वीचंद वर्ध्याला गेला आहे.

प्रभाकरचा आजार फार गंभीर आहे. त्याला अतिशय खोकला आहे. सकाळी त्याला ९९ ताप होता. तो दररोज १०३पर्यंत जातो. आज होमिओपॅथ इथे आला होता आणि प्रभाकरला मी त्याचे औषध घेण्याची परवानगी दिली.

आशीर्वाद

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४०

ऑक्टोबर १५, १९४१

चि. सुशीला,

आज पोस्टकार्डाशिवाय अजून काही नाही. तुझ्याकडून पत्र नाही. आता आसफ अली येणार आहे. प्रभाकर चांगला आहे. होमिओपॅथ मालीशही करू शकतो. मी त्याच्याकडून माझ्या पोटाची आणि पाठीची मालीश गेल्या दोन दिवसांपासून करून घेतो आहे. त्यात निश्चित सुधारणा आहे. अधिक नंतर.

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४१

ऑक्टोबर १७, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. अनसुया तुझ्याकरिता समस्या झाली आहे. गोमतीबेनने अर्थातच तिला लिहिले आहे. तिची इच्छा असेल तर तिला जाऊ दे. तू तुझे कर्तव्य केले आहे. तू अजून काय करू शकली असती?

स्वामी वकीलचे प्रकरण उल्लेखनीय आहे. आता काय होते ते पाहू. सत्याचा किंचित जरी आग्रह धरला तरी ते किती लाभदायक होते हे या प्रकरणावरून दिसून येते. बाकी तुला पृथ्वीचंद सांगतील. प्रभाकरचा आजार गेला असे म्हणता येईल. मीराबेनबद्दल मी समजलो.

आशीर्वाद

बापू

ता. क. - आज प्रकाशम आणि इतर चार लोक आले. अशा प्रकारे लोकांचे येणे सुरू राहणार आहे.

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४२

ऑक्टोबर १९, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून दोन पत्रे आली. आज मी वेळ वाचवतो आहे. काल मला लिहिणे शक्यच झाले नाही. इथे कोणी आजारी असले की तुझी आम्हांला खरोखर आठवण येते. इथे दोन लोक आजारी आहेत. होमिओपॅथ त्यांना सांभाळू शकत नाही. दोघेही तापाने फणफणलेले आहेत. तो अर्थातच मलेरिया आहे. आज रामदास, निमू आणि मुले येत आहेत.

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४३

ऑक्टोबर २०, १९४१

चि. सुशीला,

तुझा लिफाफा इतका जड होता की तो फाटला आणि अखेरीस सरकारी लिफाफ्यात तुझे पत्र पाठवण्यात आले. मी तुझा नियम अगदी थोडा मोडला आहे. यामुळे मी सांयकाळीही डोळे बंद करून मौन पाळतो. मी रात्री बरोबर साडेआठ वाजता थांबतो. माझी प्रकृती अर्थातच चांगली आहे. मी जर जास्त काम केले तर रक्तदाब वाढतो. काल माझे वजन एक पौंडाने कमी झाले. मला वाटते की फार कामामुळे असे झाले. मी योग्य आहार घेत आहे.

आशीर्वाद

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४४

ऑक्टोबर २१, १९४१

चि. सुशीला,

आज अर्धा दिवस दिवाळी आणि अर्धा दिवस नवीन वर्ष आहे. उद्या पूर्ण दिवस नववर्षदिवस असेल. आता इथे किती तरी लोक आहेत. आजपासून सरदार इथे आहेत. मी स्वतः त्यांच्यावर मातीचा आणि पाण्याचा उपचार करणार आहे. या ठिकाणी फार गर्दी झाली आहे.

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४५

ऑक्टोबर २२, १९४१

आज मी केवळ आशीर्वाद पाठवतो आहे. मुळीच वेळ नाही.

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४६

ऑक्टोबर २३, १९४१

चि. सुशीला,

आता या क्षणी मी इतके लिहू शकून राहिलो हे उपकार समज. चर्चांनी सर्व वेळ घेतला. तू पुरीच्या ठिकाणी जायचे ठरवले ही फार चांगली गोष्ट आहे. मी सर्व काही समजून घेतले आहे. डिसेंबरची कल्पना चांगली आहे. मला चांगले वाटते.

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४७

ऑक्टोबर २५, १९४१

चि. सुशीला,

आज मी तुला पत्र कसा लिहू शकतो? दिवस केवळ चर्चा करण्यात निघून जातो. आज गोविंद वल्लभ पंत आले आहेत.

तेथील हवामानात गारवा आला काय?

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज,

नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४८

ऑक्टोबर २६, १९४१

चि. सुशीला,

आजसुद्धा तुझ्याकडून पत्र नाही. अनियमित होऊ नको. तू जर दररोज लिहू शकत नसशील तर कोणत्या दिवशी लिहू शकशील ते मला सांग. संपूर्ण जग नियमाने चालत असते. आजकाल माझा रक्तदाब थोडा जास्त असतो.

आशीर्वाद

बापू

ता. क. - आज १०२ पौंड वजन होते. याचा अर्थ ते एक पौंडाने वाढले.

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज, नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३४९

ऑक्टोबर २७, १९४१

चि. सुशीला,

आजसुद्धा तुझ्याकडून पत्र नाही. मला वाटते की रुग्णालय आणि अभ्यास यानंतर तुला मोकळा वेळच मिळत नाही. आज मला माझ्या वक्तव्याचा मसुदा तयार करायचा आहे (पाहा "वृत्तपत्रांना वक्तव्य", ऑक्टोबर २८, १९४१).

आशीर्वाद

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,

लेडी. हार्डिंग्ज मेडिकल कॉलेज, नवी दिल्ली

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३५०

ऑक्टोबर २८, १९४१

चि. सुशीला,

रक्तदाब जास्तच आहे. यामुळे काल सकाळी आणि सायंकाळी मी सर्पगंधाचे तीन थेंब घेतले. आज ते १६६।९८ म्हणजे खाली आले. काळजीचे कारण नाही. सकाळी फिरायला जात असताना मी बोलत होतो आणि मी जेव्हा रक्तदाब मोजला तेव्हा तो १९६।११२ होता. दुपारी मी रक्तदाब घेतला असता तो १५०।९० होता. माझा आहार चांगला आहे.

सरदार बरेच चांगले आहेत. वसुमतीचे स्तन फार हुळहुळे आहेत. थोडासा जरी दाब दिला तरी दुखतात. असे का हे जर तुझ्या लक्षात येत असेल तर मला सांग.

आजसुद्धा तुझे पत्र नाही. तू फार व्यस्त असल्यामुळे असे होते असे मी समजतो.

आशीर्वाद

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३५१

सेवाग्राम,

ऑक्टोबर २९, १९४१

चि. सुशीला,

किती तरी दिवसांनी तुझे पत्र मिळाले. तू सतत आजारी कशी असू शकते? "वैद्यराज, आधी स्वतःच्या प्रकृतीची काळजी घ्या" ही म्हण तू लक्षात ठेवायला नको काय?

अनसुया अगदी दुरुस्त झाली आहे असे म्हणता येऊ शकते.

सरदारबद्दल तू काहीही सुचवले नाही. तू विसरली असे दिसते. असे दिसते की त्यांची प्रकृती आपोआप दुरुस्त होते आहे. गेले दोन दिवस मी त्यांना पालेभाज्यांचा सूप दिला.

बाला परत खोकला सुरू झाला आहे. तिला रात्री फार त्रास होतो. तिला भाकरी देणे बंद करावे असा विचार मी करतो आहे.

बालकृष्णबद्दल मला समजले. नियम म्हणून तू रुग्णालयातच तुझे जेवण घेतले पाहिजे.

आशीर्वाद

बापू

ता. क. - प्यारेलालचे पत्र एक तर पृथ्वीचंदने वा तू झाकीरला दिले असावे.

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशिला नाय्यर

३५२

ऑक्टोबर ३०, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून काहीही नाही. वसुमतीबेनला आज थोडासा ताप आला आहे. चक्रैय्या मद्रासमध्ये तापाने खिळलेला आहे. लक्ष्मीपतीचे पत्र विचित्र आहे. त्याच्यात सुधारणा होत आहे असे त्याचे म्हणणे आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३५३

सेवाग्राम,

ऑक्टोबर ३१, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. कोणत्याही कारणाकरिता का होईना तू जर चांगला अभ्यास करू शकत नसशील तर मला वाईट वाटेल आणि वाईट वाटत राहील.

मला भूल देण्याच्या औषधासंबंधीचे कळले नाही. माणसाला जे कोणते काम दिले जाते त्यातून त्याला अनुभव मिळत असतो.

कैद्याला भेटायला आलेल्या कोणलाही कैद्यांना तुरुंगात भेटण्याची परवानगी नसल्यामुळे महादेवला तुरुंगात प्यारेलालशी भेट घेण्याची परवानगी मिळाली नाही. आता या विषयावर संघर्ष होईल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३५४

[नोव्हेंबर १, १९४१]

(पोस्टाच्या शिक्क्यावरून)

चि. सुशीला,

आजसुद्धा तुझ्याकडून पत्र नाही.

सरदारच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याचे दिसते. काल सिव्हिल सर्जन आणि डॉ मनूने त्यांना तपासले. त्यांनासुद्धा त्यांच्या प्रकृतीत सुधारणा वाटली. त्यांना उपचारात काहीही चूक वाटली नाही. वसुमतीला अजूनही ताप आहे. तुझे औषध दिल्यानंतर बाला थोडे बरे वाटू लागले. तिच्या छातीत दुखणे सुरूच आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३५५

नोव्हेंबर २, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मी बाबद्दल समजू शकतो. बाची गोष्ट कठीण आहे.

माझ्याबद्दल तू जे लिहितेस ते अनावश्यक आहे. तू जे म्हणते त्या प्रत्येक गोष्टीचे मी माझ्याकडून पालन करण्याचा प्रयत्न करत असतो. माझी झोपमोड करण्याला मी परवानगी देत नाही. फिरायला जातानाही मी कमीतकमी बोलतो. सायंकाळी शक्य होईल तितके मी माझे डोळे बंद ठेवून मौन पाळत असतो. सर्पगंधाच्या तीन थेंबाने रक्तदाबसुद्धा कमी झाला. तो अजून कमी व्हावा म्हणून मी प्रयत्न करतो आहे. मला खात्री आहे की तू जर इथे असतीस तर तू तो अजूनच परिणामकारक पद्धतीने नियंत्रणात आणला असता. यामुळे परीक्षा पास हो आणि इथे ये. मला तुझा आत्मविश्वास आवडतो. पण त्याला तेवढ्याच प्रमाणात अभ्यासाची जोडही असली पाहिजे.

तुला जर आवश्यक वाटत असेल तर सरदारकरिता काही तरी सुचव. मी त्यांना पालेभाज्यांचे सूप आणि मध देत असतो. अशक्तता जाणवत नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३५६

नोव्हेंबर ३, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून काहीही नाही. माझे वजन एक पौंडाने वाढले याची तार करायला काल मी विसरलो. ते १०३ पौंड होते. रक्तदाब पूर्णपणे नियंत्रणात आहे.

विश्रांती घेण्याचा सल्ला ऐकायला बा तयार नाही. ती वेगळीच व्यक्ती आहे.

काल बालकृष्ण आला. ओसरी मोठी केल्यामुळे त्याची खोली छान दिसते. त्याला प्रवासाचा कोणताही त्रास झाला नाही.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३५७

नोव्हेंबर ४, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. माझ्याबद्दल काळजी करण्याचे काहीही कारण नाही. या वेळी रक्तदाब अगदी चांगला आहे. काल रात्री तो १३६।९६ होता. सकाळी १७२।९८ होता. मला जेवणसुद्धा चांगले जाते. बा चांगली आहे.

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर,
लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज
नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३५८

नोव्हेंबर ६, १९४१

चि. सुशीला,

वसुमतीबेनचा ताप कायम आहे, परंतु तो कमी होत आहे. ती प्रसन्न आहे. मी कामात व्यग्र आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,
लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज
नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३५९

नोव्हेंबर ७, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. माझ्या मते सरदारच्या प्रकृतीत सुधारणा होऊ लागली आहे. त्याबद्दल काळजी का वाटते हे तू किशोरीलालला विचार. आता सभा सुरू असल्यामुळे मी त्याला विचारू शकत नाही.

असे म्हणता येईल की बा चांगली झाली आहे. म्हणूनच मी तुला लिहिले नव्हते. ती केवळ तू दिलेले औषध घेते. विश्रांती घेण्याबद्दल ती मुळीच ऐकत नाही. एकदा ती चिडली आणि म्हणाली की मी काम करतच राहणार आहे. मी त्यावर हसलो.

भाईबद्दल महादेवला सरकारचे पत्र मिळाले. काही विशेष कारण असल्याशिवाय परवानगी मिळू शकत नाही असे त्यात लिहिले आहे. केवळ नातलगांना अशी परवानगी मिळू शकते. प्यारेलाल कोणाचीही भेट घेण्याकरिता तयार होणार नाही अशी भीती मला वाटते. विनोबाने भेटायला येणारांची भेट घेणे बंद केले आहे. आता पत्रव्यवहार लांब होईल.

सध्या तू पुरीकडे राहणेच चांगले होईल. तुला जर त्या डॉक्टरकडे राहण्यात विशेष लाभ दिसत असेल तर तिथे जाऊन राहा आणि पुरीला 'नाही' सांग. याबद्दल विचार कर आणि मला लिही.

मी अगदी चांगला आहे. थकल्यामुळे माझी पाठ दुखत होती. तो खांद्याचा भाग आहे. ते अजून काही असावे असे प्रभावतीचे मत आहे. म्हणून मी तुला लिहीत आहे. थकव्याशिवाय त्याकरिता अजून काही कारण असू शकते काय?

लक्ष्मीदास लिहितो की चक्रैय्याची प्रकृती बरीच सुधारली आहे. त्याला ताप नाही. तो दोन मैल चालतो.

अन्नपूर्णाचे वजन फार चांगले आहे असे म्हणता येईल. महादेव ग्वाल्हेरला गेला आहे. तो ११ तारखेला वा आधी परतेल. तो तुझी भेट घेण्याकरिता एका दिवसाकरिता येऊ शकेल.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६०

नोव्हेंबर ८, १९४१

चि. सुशीला,

थकव्यामुळे खांद्यातील दुखणे पूर्णपणे गेले असे दिसत नाही. मालीशने थोडा आराम होतो. परंतु तो संधिवात असू शकेल. मी सध्या लक्ष ठेवतो आहे.

रक्तदाब चांगला आहे. तो १५०।८८ आहे. भरपूर खातो. तरीही काही दिवस फलाहारावर राहणे आवश्यक असू शकेल.

तू माझ्या बाजूला असती तर बरे झाले असते असे काही वेळा वाटते. परंतु तो विचार लगेच मी माझ्या मनातून काढून टाकतो. मी मनाशी विचार करतो की तुझी परीक्षा होईपर्यंत असा विचार टाळला पाहिजे.

नवीन दोन दिवसांकरिता आला आहे. लक्ष्मीबेन (नारायण मोरेश्वर खरे यांची पत्नी) आणि माधुरी (लक्ष्मीबेन खरे यांची मुलगी) आल्या आहेत. माधुरीने आम्हांला भजन म्हणून दाखवले. ते लिहून घ्यायला आणि तुला पाठवायला मी प्रभाला सांगितले आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६१

नोव्हेंबर ९, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. तुझा अभ्यास चांगल्या प्रकारे सुरू राहावा इतकीच माझी इच्छा आहे.

सिव्हील सर्जन आणि डॉ. मनूभाई यांनी आज सरदारला तपासले. त्यांना तपासल्यानंतर दोघांचेही समाधान झाले. सध्या सुरू असलेला उपचार सुरू राहावा असे त्यांचे मत आहे. त्यांचा आहार आणि वजन हे दोन्ही वाढले तर त्यांना आनंद होईल. अर्थात जेवणातील पदार्थ तेच राहतील.

बा चांगली आहे.

माझे वजन १०३.५ पौंडावर स्थिर आहे. मला खांद्यात सुधारणा वाटते.

प्यारेलालने पुस्तकांची मोठी यादी पाठवली आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६२

नोव्हेंबर ११, १९४१

चि. सुशीला,

तुला माझी पत्रे नियमितपणे मिळत असतील. सरदार चांगले आहेत. तू राजाजींशी भेटली काय? की आजकाल तू कुठेही जात नाही? जर जात नसशील तर तू जावे अशी माझी इच्छा नाही. सध्या तुझ्याकरिता एकांत चांगला आहे.

तानपुऱ्याकरिता केलेला खर्च आवश्यक होता. कामातील बदल म्हणजे विश्रांती असेच नाही काय? शिवाय ते तुझे आवडते वाद्य आहे. तुझा शिक्षक कोण आहे?

आशीर्वाद,

बापू डॉक्टर

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६३

नोव्हेंबर ११, १९४१

चि. सुशीला,

डॉ. सुब्रॉयन यांची पत्नी राधाबाई आज आली आहे. गोसीबेन आणि खुर्शिदबेन अर्थातच इथे आहेत. सुलताना इथे आहे. गुजरातमधील एक मंडळही इथे आहे. असे सुरू आहे. तुझे चांगले सुरू असेल.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६४

नोव्हेंबर १२, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. आताच अन्नपूर्णाला पाठवण्याची काहीही आवश्यकता नाही. बाला पुरेशी मदत मिळते आहे. तिला फारशा मदतीची गरजसुद्धा नाही. तिला त्या ठिकाणाचा पूर्ण लाभ घेऊ दे.

माझ्या वेदना बऱ्याच कमी झाल्या आहेत. परंतु त्या पूर्णपणे गेल्या नाही तर मी रेचक घेईन. सध्या तरी मी तुला बोलावणार नाही.

तू माताजींना दिलेले उत्तर बरोबर होते, परंतु तू ते उत्तर जर दिले नसते तर अजून बरे झाले असते. माताजी त्याचा चुकीचा अर्थ घेणार नाही. परंतु त्यांना उत्तर देण्याची आवश्यकता नव्हती. वडीलधाऱ्यांच्या चिडण्यावर आपण मौन धरले पाहिजे.

कालपासून मी ओसरीत झोपतो आहे. माझी काळजी करू नको.

इथे असलेले लोकसुद्धा कुटुंब आहेत हे तू लक्षात ठेवले पाहिजे. प्रत्येकाला तुझी ओढ वाटते. तू शंकरला योग्य तेच लिहिले.

माताजींनी डिसेंबरमध्ये नक्की यायला पाहिजे. महादेवला परवानगी मिळू शकत नाही, परंतु माताजींना मिळू शकते. प्यारेलाल त्यांना भेटायला नकार देणार असेल तर मात्र वेगळी गोष्ट आहे. आज भजन पाठवण्यात आले आहे

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६५

नोव्हेंबर १३, १९४१

चि. सुशीला,

आज तुझ्याकडून पत्र नाही. मी चांगला आहे. परंतु काल रात्री मी सर्पगंधाचे परत तीन थेंब घेतले. पाठदुखी कमी झाली आहे. मला भरपूर काम करावे लागते. प्रभा तक्रार नोंदवील.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६६

नोव्हेंबर १४, १९४१

चि. सुशीला,

तुझे पत्र मिळाले. मी सरदारबद्दल विचार करतो आहे. आज अधिक नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६७

नोव्हेंबर १५, १९४१

चि. सुशीला,

आजसुद्धा तुझे पत्र नाही. महादेवभाईने प्यारेलालला भेटण्याची परवानगी मिळवली त्याअर्थी माताजी आनंदाने प्यारेलालला भेटू शकतील. मी रुग्णालयातील खोली रिकामी केलेली असल्यामुळे कोणतीही अडचण न येता माताजी त्या खोलीत राहू शकतात.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६८

नोव्हेंबर १७, १९४१

चि. सुशीला,

काल मला तुला लिहिणे शक्य झाले नाही. सरदार चांगले आहेत. त्यांचा आहार १२०० उष्मांकांचा आहे. शंकरनने रक्तचाचणी केली. परंतु त्याचा विश्वास बसला नाही. काल तो इथे तीन तास होता. मी चांगला आहे. पाठदुखी अजून पूर्णपणे गेली नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३६९

नोव्हेंबर १८, १९४१

चि. सुशीला,

आज तुझे पत्र आले. त्या मुलीच्या संबंधात मी तुझ्या इच्छेप्रमाणे करीन. याहून अधिक चांगले माहीत असण्याच्या परिस्थितीत मी नाही. मी अजून लिहू शकत नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७०

नोव्हेंबर २०, १९४१

चि. सुशीला,

सध्या कामाचे इतके काही दडपण आहे की काही लिहायला घेणे ही मला कठोर परीक्षाच वाटते. सरदार अगदी चांगले आहेत असे म्हणू शकते. ते अजूनही हे कबूल करत नाही.

दोन दिवसांकरिता मी दूध आणि लोणी सोडल्यामुळे माझी बद्धकोष्ठता निघून गेली. मला चांगले वाटले आणि माझा रक्तदाब दुपारी १३६।९६वर आला. आज मी दूध घेतले. लोणीसुद्धा घेतले. मी चांगला आहे. रक्तदाब १५६।९६ आहे.

रात्री बाला थोडा खोकला येतो. तिचा आहार चांगला आहे. ती खूप काम करते. गर्दीबद्दल तर विचारूच नको.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७१

[नोव्हेंबर २१, १९४१]

(हे पत्र कस्तुरबा गांधींच्या नोव्हेंबर २१, १९४१च्या पत्रामागे लिहिलेले आहे.)

चि. सुशीला,

आज इतकेच पुरे. कालच मी तुला लिहिले होते.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७२

नोव्हेंबर २२, १९४१

चि. सुशीला,

काल मी मोठ्या मुश्किलीने लिहू शकलो. आज बऱ्याच प्रमाणात तशी परिस्थिती नाही. प्रार्थनेची घंटी होण्याकरिता अजून पाच मिनीट आहेत. सरदारना आज दोन अंस सपेरेटा दूध (स्निग्धांशविरहित) सुरू केले आहे. आज राजकुमारी आली. राजाजी आणि भूलाभाई गेले.

रंगनायकी (दिवंगत एस. श्रीनिवास ऐय्यंगार यांची पत्नी.) काही दिवसांकरिता इथे आली आहे. मी चांगला आहे. पाठदुखी गेली असे मी म्हणू शकतो. अजूनही तिचे काही अंश शिल्लक आहेत काय हे सांगता येऊ शकत नाही. आता चांगलीच थंडी सुरू झाली आहे.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज, नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७३

नोव्हेंबर २३, १९४१

चि. सुशीला,

आजसुद्धा तुझ्याकडून पत्र नाही. आज महादेवभाई तिथे आहेत. ते कदाचित तुला भेटले असतील. सर्व काही चांगले सुरू आहे. मी कामाच्या फार दडपणाखाली आहे इतकेच.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७४

नोव्हेंबर २५, १९४१

चि. सुशीला,

सध्या तरी तुला पोस्टकार्डवरच समाधान मानावे लागेल. मला कामातून किंचितही सवड मिळत नाही. मला वाटते की मी अगदी चांगला आहे. मी जरी दोन दिवसांपासून दूध घेणे थांबवले असले तरी माझे वजन १०३.५ पौंड कायम आहे. सरदार चांगले आहेत.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७५

नोव्हेंबर २६, १९४१

चि. सुशीला,

किती तरी दिवसांनी आज तुझे पत्र मिळाले. केवळ आळशीपणामुळे जर तू लिहीत नसशील तर मला वाईट वाटेल. तुझ्या अभ्यासात व्यत्यय येणे ही गोष्ट माझ्याकरिता असहनीय आहे. तू परीक्षेत जरी उत्तीर्ण झाली तरी तुझ्या अभ्यासात व्यत्यय आला तर त्यामुळे तुझे नुकसान होईल. सत्या वा तुझा इतर कोणीही मित्र जरी आला तरी तुझ्या अभ्यासात व्यत्यय यायला नको.

माझ्या मते तू पुरीच्या घराऐवजी इतर कुठे तरी राहण्याचा विचार सोडला पाहिजे. तू पुरीकडेच टिकून राहा. तुला जर पुरीच्या घरापेक्षा अधिक सुविधाजनक घर मिळत असेल तर मी माझा विचार बदलू शकेन. परंतु मला पुरीचेच घर पसंत आहे. एकदा आपण निर्णय घेतल्यानंतर तो एकाएकी बदलवू नये.

तीन महिन्यांकरिता जाण्याचा विचारही तू बदलायला नको. त्याचे काही लाभ आहेत. पगार न मिळण्याची काळजी का करतेस? तू निश्चितच पगाराला चिकटून राहणार नाहीस. नाही, तू तुझा तीन महिन्यांचा निर्णय बदलायला नको.

तुला एम. डी.ची पदवी निश्चित मिळणार असल्याचे काल रात्री मला स्वप्न पडले; तू फार हुशार आहेस आणि तुझे ज्ञान वाढवण्याकरिता तुला दोनचार वर्षांकरिता ३०० वा ४०० रुपयांची नोकरी देऊ करण्यात आली आहे; मला निर्णय घ्यायचा होता, पण मी निर्णय घेऊ शकलो नाही आणि मला जाग आली. माझ्या लक्षात आले की असा कोणताही प्रस्ताव नाही आणि मला कोणताही निर्णयसुद्धा घ्यायचा नाही.

इथे सर्व चांगले आहेत.

आशीर्वाद,

बापू

ता. क. - महादेवने भेटण्याकरिता कोणतीही तारीख दिलेली नाही.

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७६

नोव्हेंबर २७, १९४१

चि. सुशीला,

मी तुला काल लिहिलेले पत्र मिळाले असेल. आज रक्तदाब १४२।८६ आहे. सकाळी तो १५६।९६ होता. इतका चांगला नेहमी नसतो. परंतु हे ठीक आहे असे तुला आढळेल. सरदारचा आहार वाढवला आहे. ४ अंस सपरेटा दूध (स्निग्धांश काढलेले दूध).

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७७

नोव्हेंबर २८, १९४१

चि. सुशीला,

आजसुद्धा केवळ पोस्टकार्ड. आज दुपारी रक्तदाब १३४।८४ होता, आणि १५८।९६ सकाळी होता. प्यारेलालला भेटायला बा, महादेव आणि रामदास जाणार आहेत. आजच परवानगी मिळाली.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७८

नोव्हेंबर २९, १९४१

चि. सुशीला,

बा आणि महादेव नागपूरला गेले आहेत. महादेव कदाचित तुला नागपूरहून लिहील.

काल रात्री रक्तदाब वाढला होता. आज सकाळी तो कमी होऊन १५४।९६वर आला. दुपारीसुद्धा तो १५४।९२ होता. हवामान चागले आहे. सरदार चांगले आहेत.

आशीर्वाद,

बापू

सुशीला नाय्यर,

लेडी हार्डींग्ज मेडिकल कॉलेज

नवी दिल्ली

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३७९

नोव्हेंबर ३०, १९४१

चि. सुशीला,

आज लिहिण्याचा प्रश्नच येत नाही. बाने लिहिले आहे. महादेवभाईंनीसुद्धा लिहिले आहे. त्यातून तुला सर्व काही कळेल.

काल रात्री माझा रक्तदाब २०२।११० होता. आज सकाली तो १५२।९२ आहे. याचा अर्थ मी प्रार्थनेनंतर काम करणे बंद केले पाहिजे असा होतो. त्या दिशेने मी विचार करतो आहे. प्रभावती उद्या जाते आहे.

आशीर्वाद,

बापू

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३८०

[नोव्हेंबर १९४१]

(सरदार पटेलवरील उपचार आणि त्यांच्या प्रकृतीतील सुधारणा यावरून हे पत्र नोव्हेंबर १९४१मध्ये लिहिले असावे असे वाटते. सरदार पटेल गांधीजींच्या उपचाराखाली ऑक्टोबर २० ते नोव्हेंबर ३०, १९४१पर्यंत होते.)

चि. सुशीला,

देवसंबंधी सांगायचे तर तू त्याची समजूत घातली पाहिजे. परीक्षेचा इतका मोह काय? नोकरीचा इतका मोह का? जे कमावतात ते सर्व काय उच्चशिक्षित असतात? त्या करोडो लोकांचे काय ज्यांना शिक्षण मिळू शकत नाही? असे असले तरी त्याची इच्छा असेल तर तो शिकू शकतो; परंतु त्याचे इतके वेड का? तू त्याला हे सर्व सांगू शकशील काय? आवश्यक वाटेल तर तू या पत्राचा उपयोग करू शकते.

येथील पाहुण्याची गर्दी कमी होईल तेव्हा महादेव प्या.ला भेटायला जाईल. सध्याच्या चर्चेत त्याची उपस्थिती आवश्यक आहे.

तुझ्या अभ्यासाकडे तू केव्हा नीट लक्ष देऊ शकशील?

सध्या रैहाना इथे आहे. मला तुझी आठवण येत असते. रैहाना संगीत फार चांगले शिकवू शकते. ती इतर गोष्टीही शिकवू शकते. परंतु या सर्व गोष्टी तुझ्या परीक्षेनंतर. तू लाहोरला केव्हा जाणार आहेस?

सरदारांवर आधी सहासात डॉक्टरांचा उपचार सुरू असतानाही ते त्रास सहन करत होते. पण इथे आल्यापासून ते त्रासापासून मुक्त झालेले आहेत. मुरडा पूर्णपणे गेलेला नाही, परंतु आता त्यांना मुळीच त्रास होत नाही. त्यांना दिवसातून पाचदा शौच्याला जावे लागत असे आणि तेही बस्तीच्या मदतीने. आता केवळ एकदा. त्यांना संडासात एक तास लागत असे, आता अधिकात अधिक १५ मिनीट लागतात. केवळ माझाच उपचार सुरू आहे - मातीच्या पट्ट्या, कटिस्नान, आणि कोमट पाण्यात पडून राहणे. त्यांना हवे तितके मध आणि लिंबू घेण्याची परवानगी आहे. त्यांना भरपूर उत्साह वाटतो.

बालकृष्णचे पत्र वाच. तू मला भगवे पाठवले त्याचा अर्थ काय?

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३८१

रविवार, [१९४१]

(मजकुरावरून हे पत्र १९४१सालचे असले पाहिजे असे वाटते.)

चि. सुशीला,

ही चिठ्ठी महादेवच्या पत्राबरोबर जाईल. याचा अर्थ मी इतकाच काढू शकलो. मी चांगला आहे. कुमारप्पाही (जे. सी. कुमारप्पा) चांगले आहेत. कृष्णदासच्या प्रकृतीची थोडी काळजी वाटते. आज त्याला ताप आहे. त्याचे थोडेसे रक्त गेले. काळजी करू नको. आशा आहे की रस्त्यात तुला त्रास झाला नसेल. मला नियमितपणे लिहीत राहा.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३८२

[१९४१]

(मजकुरावरून हे पत्र १९४१सालचे असले पाहिजे असे वाटते.)

मूर्ख पोरी,

तू किती मूर्ख आहेस! माझ्यापासून सुटून तू कुठे जाशील? तू कुठेही जरी गेलीस तरी तुला मी तिथे आढळेन. मला टाकून जाणे कठीण आहे. रविवारी तुला माझ्याजवळ झोपायचे आहे.

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य डॉ. सुशीला नाय्यर

३८३

[फेब्रुवारी ६, १९२नंतर]

(ज्या कागदावर हे लिहिले आहे त्या कागदाच्या एका बाजूला जो मजकूर लिहिलेला आहे त्यावर फेब्रुवारी ६, १९४२ ही तारीख आहे.)

चि. सुशीला,

प्यारेलाल अतिशय गोंधळलेला आहे. त्याच्याकरिता सर्व काही विपरीत घडत आहे. माझ्यावर जरी नाही तर त्याच्यावर दया कर आणि दोनचार दिवसांकरिता इथे ये. तुला माझ्याशी बोलावेसे वाटेल तरच बोल. नाही तर बाकी लोकांना भेट. रुग्णालयाच्या कामकाजात लक्ष घाल. शंकरनला आवश्यक सूचना दे. माझी प्रकृती तपास म्हणजे तुला कळेल. एरव्ही तर आम्ही लोक हो आणि नाहीमध्ये हेलकावे खात असतो. हे असेच सुरू राहणार आहे. जर तू एक वा दोन दिवसांकरिताच येणार असशील तर तू इथे मी ठरवलेल्या दैनंदिन कामात हस्तक्षेप करणार नाही. जर तू इथे थांबणार असशील तर तू माझ्या आणि मी तुझ्या परिस्थितीचा विचार करीन. एक तर आपण काही उपाय शोधू वा एकमेकांचे मतभेद सहन करत दूर बसून तू तुझे काम करत राहा आणि मी माझे काम करत राहीन. सध्या तरी कोणतीही तक्रार न करता तू इथे यावे इतकेच मी म्हणेन. मग तू तुझी इच्छा असेल तेव्हा दिल्लीला परत जाऊ शकशील.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजराती. प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३८४

फेब्रुवारी १७, १९४२

चि. सुशीला,

च्यांग काई शेक यांना भेटण्याकरिता मी कलकत्त्याला जात आहे. मी प्यारेलालला सोबत घेऊन राहिलेलो नाही. बाची प्रकृती फारशी चांगली नाही आणि यामुळे आपणा तिघांपैकी एकाने बाजवळ राहणे आवश्यक आहे. प्यारेलाललासुद्धा असेच वाटते. बाची तक्रार जुनीच आहे. तिचा धीर आता सुटला आहे. तू येईपर्यंत ती जर जीवंत राहिली तर तू तिला तपासशील आणि काय करायचे ते पाहशील. सध्या तरी फारशी आशा नसताना मी मार्ग काढण्याचा प्रयत्न करतो आहे. केवळ डॉक्टर तिला मदत करू शकत नाही. तिच्याजवळ कोणी असा असला पाहिजे की ज्याच्यावर तिचा विश्वास असेल. प्यारेलाल काय चमत्कार करतो ते आता आपण पाहू. तो शिरीनला आणायला जेव्हा गेला तेव्हा तो माझ्याबरोबर होता. ती स्वतःच वर्ध्यातील रुग्णालयात भरती झाली होती. अजून मी तिला पाहण्याकरिता गेलो नाही. उद्या राजकुमारी इंदोरहून सेवाग्रामला येईल. लीलावती आली आहे. तिला (परीक्षेत बसण्याचे) आवेदनपत्र मिळाले नाही. आता काय होते ते आपण पाहू. परत जाऊन शिक्षण सुरू ठेवण्याकरिता ती नाही म्हणते.

आम्ही उद्याच परतू. २० तारखेला मी जमनालालजींच्या मित्रांना बोलावले आहे. मी जवळपास १९० निमंत्रणे पाठवली आहेत.

गुजरातीवरून. महादेव देसाई यांच्या हस्तलिखित रोजनिशीतून. सौजन्य नारायण देसाई

३८५

जुलै १२, १९४२

चि. सुशीला,

तुला शुल्क म्हणून किती मिळतात? तू जेव्हा येशील तेव्हा मी इथे असेन की नाही वा कुठे असेन याची मला मुळीच कल्पना नाही. परंतु तू तुझे तेथील सत्र पूर्ण केले पाहिजे.

गेल्या तीन दिवसांपासून प्यारेलालला ताप आहे. आज तो थोडा उतरला. याला कारण जीवनसत्वांचा अभाव आहे असे मुंबईच्या डॉक्टरांचे म्हणणे आहे. त्याच्या डोळ्याच्या अशक्ततेचे कारणही हेच आहे. काय करता येईल हे मी पाहतो.

इथे चांगला पाऊस सुरू आहे. हवा थंड आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स, नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय, सौजन्य बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

३८६

[जानेवारी ९, १९४५नंतर]

(जॉन सार्जंट यांनी सुशीला नाय्यर यांना जानेवारी ९, १९४५ला लिहिलेल्या पत्राच्या कागदावर ही चिठ्ठी लिहिलेली आहे.)

त्यांना असे सुंदर पत्र लिही - "तुम्हाला जेव्हा केव्हा येणे शक्य होईल तेव्हा गांधींना तुम्हाला भेटण्यात आनंदच वाटेल. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे."

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३८७

मे १४, १९४५

चि. सुशीला,

तुझे अपेक्षित पत्र आले. मनूबद्दल मी सकाळी जे लिहिले त्याचे मी पालन करीन. तीने आणि तिच्या बहिणीने त्यांना जे योग्य वाटते ते करावे.

श्यामलालचे काम व्यवस्थित नाही याचे मला दुःख होते. तू त्याला हे सांगायला नको होते आणि यासंबंधात त्याने तुझे नाव घ्यावे असे म्हणण्याची माझी इच्छा नाही. काय होते याकडे माझे लक्ष आहे. तू तुझ्या पहिल्या श्रेणीची काळजी घेतली तर तितके पुरे आहे. तू इतरांना देऊ शकशील असे ते सर्वोत्तम शिक्षण असेल.

आशीर्वाद,

बापू

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

३८८

मे १४, १९४५

चि. सुशीला,

तुझे काम सुरळीत सुरू असेल आणि तू तुझे नाव काढशील अशी आशा आहे. भगिनी सर्व ऐकतील आणि जे काही त्यांना करायचे असेल ते त्या विचारपूर्वक करतील तर ते योग्य होईल. प्रत्येक ठिकाणी काही लाभदायक असते आणि काही तसे नसते. शक्य आहे की केवळ सांगितल्याने मनूच्या मनातील भीती जाणार नाही. असे दिसते की आपल्यामध्ये हा गुण रुजलेला आहे. ती जर पूर्णपणे दुरुस्त झाली तर आपल्याकरिता ती फार मोठी उपलब्धी असेल. तू १६ तारखेला परतते आहेस असे मी गृहीत धरतो आहे.

प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

३८९

सेवाग्राम,

जुलै २२, १९४५

चि. सुशीला,

मी तुला जाऊ दिले परंतु नंतर मी तुझ्या प्रकृतीबद्दल विचार करत राहिलो. (सुशीला गांधींना हगवण लागली होती.) यामुळे त्याबद्दल मला तारेने कळवण्याकरिता मी सरदारांना लिहिले. (ही उपलब्ध नाही.) पूर्णपणे दुरुस्त हो. तुझी इच्छा असेल तर डॉ. गिल्डरकडून (डॉ. डी. डी. गिल्डर, मुंबई कॉंग्रेसच्या पहिल्या मंत्रिमंडळात आरोग्यमंत्री, १९३७-३९) तपासून घे. मला सविस्तर लिही. गर्दी होती काय? डॉ. गिल्डर जर प्रभावतीचा (जयप्रकाश नारायण यांची पत्नी.) चरखा वापरत नसतील तर तो परत आण. त्यांच्याकरिता नवीन विकत घे, वा त्यांच्याकरिता इथून आपण पाठवू शकतो. प्रभावतीचा चरखा विशेषेकरून माझ्याकरिता तयार करण्यात आलेला असल्यामुळे शक्यतोवर मला तो परत हवा आहे. तू मथुरादासला (मथुरादास त्रिकमजी, मुंबईचे महापौर. त्यांना क्षयरोग झाला होता) भेटशील याची मला खात्री आहे. आज मी एक तास सात मिनीट कताई केली. तोपर्यंत गीतापाठ पूर्ण झाला होता.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

३९०

सेवाग्राम,

ऑगस्ट ३, १९४५

चि. सुशीला,

तुला असे कसे डॉक्टर मिळाले की तू इतकी आजारी आहेस? ते कोणते औषध देत आहेत? आणि त्यांचा परिणाम काय आहे? पण मी तुला काय सांगू?

काल मी चूक केली. हरिजन सेवक संघ आणि कस्तुरबा निधी यांच्या दोन सभा मी विसरलो. यामुळे लवकरात लवकर मी इथून १९ तारखेला निघू शकतो. यामुळे तुला तिथे इतके दिवस अडकवून ठेवणे योग्य होईल असे मला वाटत नाही. तुला जर तिथे तुझ्या प्रकृतीच्या कारणाकरिता थांबावे लागत असेल तर वेगळी गोष्ट. याबरोबर तुला सिमल्याचे आमंत्रणही दिसेल. तुला जावेसे वाटते काय? ते काहीही असले तरी तू चांगली हो. सरदारना मी अहमदाबादला लिहिले आहे.

पुष्पा इथे आहे.

प्यारेलालचे पत्र सोबत जोडलेले आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३९१

सप्टेंबर १०, १९४५

चि. सुशीला,

आशा आहे की तू तिथे आरामात पोहोचली असशील. किशोरीलालची आताच तार आली की तू येण्याची आवश्यकता नाही. परंतु तू तिथे आहे हे चांगले आहे. सोबत कृष्णवर्मा यांचे पत्र जोडले आहे. ते कॉलऱ्यासंबंधी आहे. ते वाच. त्यांनी काही औषध पाठवले आहेत. त्यांनी वर्तमानपत्राचे जे कात्रण पाठवले आहे ते मी परत करून राहिलेलो आहे. (पाहा पुढील विषय.)

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल प्रतीवरून. सौजन्य - प्यारेलाल

३९२

सप्टेंबर १९, १९४५

चि. सुशीला,

आताच रात्रीचे ९ वाजले. परंतु मला काही ओळी लिहू दे. मालीश आणि असेच काही काम सोडले तर दिवसभर मी कामात होतो. उद्या रात्री मी मुंबईला जाणार आहे. तिथे तीन दिवस मुक्काम केल्यानंतर परत येईन.

तुझे पत्र चांगले आहे. वर्णन सजीव आहे. सरकारकडून मदत मिळाली नाही तरी फिकीर करू नको. आवश्यकता असेल तर कार भाड्याने घे. कार वा लॉरी विकत घेण्याबद्दल आपण नंतर पाहू. प्यारेलाल तसाच आहे. तुला सर्वच माहीत असल्यामुळे अजून काय सांगू?

आशीर्वाद,

बापू

डॉ. सुशीला नाय्यर, वर्धा

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल प्रतीवरून. सौजन्य - प्यारेलाल

३९३

सप्टेंबर २५, १९४५

चि. सुशीला,

जेवल्यानंतर मला तरतरी आल्यामुळे मी हे लिहीत आहे. तेथील तुझे काम संपल्यानंतर तू लगेच इथे परतशील अशी आशा आहे. अशक्तपणाशिवाय बाकी काहीही नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल प्रतीवरून. सौजन्य - प्यारेलाल

३९४

सेवाग्राम,

वर्धा

चि. सुशीला,

तू वाचू शकली नाही ते पत्र मला मिळाले नाही. तू विसरली असशील. तू जर ते परत पाठवशील तर मी ते परत लिहीन. मला तू कधीही संवेदनशून्य वाटली नाही. तू असा कसा विचार केला हे मला कळत नाही. तुझी नाराजी पाहिल्यानंतर मला वाटते की तू माझ्याबद्दल संवेदनाशून्य हो आणि मला विसर. तिथे जे काम आहे त्यात गुंतून जा आणि जेव्हा ईश्वर तुला इथे पाठवेल तेव्हा कोणतीही पूर्व अट न घालता इथे निघून ये. त्यांना क्षमा माग ज्यांना तू अकारण दुखवले आहे. असे केले तर तुला इथे येण्याचा आनंद होईल आणि इथे राहण्यात तुला कोणतीही अडचण जाणार नाही. इथे आल्याशिवाय तू राहू शकत नाही असे जेव्हा तुला वाटेल तेव्हा इथे ये. तो दिवस जर लवकर आला तर मला आनंद होईल.

बापूचे आशीर्वाद

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल प्रतीवरून. सौजन्य - प्यारेलाल

३९५

[मे ६, १९४६]

(स्रोतात हे पत्र या तारखेच्या पत्रांत ठेवलेले आहे.)

चि. सुशीला,

मी हे प्यारेलालच्या लिफाफ्यात पाठवत आहे, तो तुला हे देईल. यामुळे एक दिवसाचा वेळ वाचेल. अजून तुझ्याकडून एकही पत्र नाही. एक तरी पत्र यायला पाहिजे होते. आजचा टपाल अर्थातच अजून आलेला नाही. मी आता बराच मोकळा आहे, परंतु ही स्वागतार्ह गोष्ट आहे. येथील परिषद सुरू आहे, परंतु तिच्यातून काय निघेल हे सांगता येत नाही. इतकेच लक्षात ठेव की माझे काम शुभ कामना करणे इतकेच आहे. मला मदत करण्याकरिता इथे राजकुमारी, मणी आणि ब्रिजकृष्ण आहेत. आजकरिता इतके पुरे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

३९६

सेगाव, वर्धा,

[जुलै १०, १९४६नंतर]

(हे १० जुलैच्या पत्राच्या मागे लिहिलेले आहे.)

चि. सुशीला,

काल तुझ्याकडून काहीच आले नाही. शिरीन सकाळी रक्तदाब घेत असते. ते १७०-१०० होते. काल ते १३५-१०० होते. दुपारच्यावेळी चे १५५-९०पर्यंत खाली आले. आता ते अजून कमी झाले असेल.

पावसाचा थेंबही नाही. प्रत्येक जण अस्वस्थ आहे.

कार्यकारिणीची आजपासून सभा होणार आहे. तिच्याकरिता मला किती वेळ द्यावा लागतो हे आपण पाहू. अमतुस्सलाम १२पर्यंत अपेक्षित आहे. हरदोईची राणी विद्यावती आज येणार आहे. राजकुमार अर्थातच येत आहे. शंकरन चांगला आहे. पाचगणीला जाण्याकरिता दोन माणसे तयार आहेत. एक नालवाडीचा आहे आणि दुसरा नवागत आहे. त्यांच्यापैकी कोणा एकाला आज वा उद्या पाठवीन.

आशीर्वाद

बापू

मूळ हिंदीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती लेखागार आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

३९७

नवी दिल्ली,

सप्टेंबर २, १९४६

चि. सुशीला,

माताजी म्हणत होत्या की तू आज इथे असतीस तर किती बरे झाले असते. याकरिता काही विशेष कारण नव्हते. आज लोकप्रिय सरकार पद धारण करणार असल्यामुळे त्यांच्या तोंडून असे उद्गार निघाले.

विजया येईपर्यंत तुझे स्थान तिथेच आहे याबद्दल माझ्या मनात शंका नाही. मी इथे १० तारखेपर्यंत नक्कीच असेन. कदाचित मला इथे महिनाभरही राहावे लागेल. ईश्वराची इच्छा काय आहे ते पाहू या. बाळ नक्कीच कलकत्त्याला गेला असेल.

तू चांगली असशील आणि दवाखान्याचे काम चांगले सुरू असेल अशी आशा आहे. तुझ्याकडून एकही पत्र नाही. चांद अमृतसरला गेली आहे.

वातावरण खूप गरम आहे असे म्हणता येत नाही.

सुशीला नाय्यर, सेवाग्राम.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य – प्यारेलाल

३९८

नवी दिल्ली,

सप्टेंबर ११, १९४६

डॉ. सुशीलाबेन,

सेवाग्राम, वर्धा

इथे सूचना नाही. सर्व काही तिथे.

बापू

इंग्रजी प्रतीवरून. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य - डॉ. सुशीला नाय्यर

परिशिष्ट ५. डॉ. सुशीला नाय्यर यांचे निर्मल कुमार बोस यांना पत्र

(पाहा "प्रार्थना प्रवचन", डिसेंबर १७, १९४६)

श्रीरामपूर,

रविवार, डिसेंबर २२, १९४६

काल रात्री बापूंची डायरी वाचत असताना मी वाचले "मला एक विलक्षण स्वप्न पडले". सहजपणे मी त्यांना विचारले की ते काय होते. परंतु ते काहीही बोलले नाही, ते गप्प राहिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तीन वाजता बापू आपल्या अंथरुणावर उड्या मारत असल्याच्या आवाजाने मी उठले. ते म्हणाले की मला फार थंडी वाजत होती म्हणून मी अंथरुणात उड्या मारून व्यायाम करत होतो. तू जागीच होती काय असे त्यांनी मला विचारले आणि मग ते आपले स्वप्न मला सांगू लागले. स्वप्न सांगितल्यानंतर ते म्हणाले की सध्या मी जे काही करत आहेत ती माझ्याकरिता तपश्चर्या असून तिच्याकरिता मी सर्व प्रकारच्या अडचणी सहन करतो आहे. काल मी त्यांना म्हणाले होते की तुम्ही जे काही करता त्याकरिता मदत करणारे लोक ईश्वराने पाठवले आहेत आणि पाठवीलही . . . . तुमच्याबरोबर येण्याची परवानगी तुम्ही मला देऊ शकाल काय असे मी त्यांना थोडक्यात विचारले. मी त्यांना म्हणाले की तुम्ही जिला तपश्चर्या म्हणता ती आणि ईश्वर जी मदत पाठवतो ती यांत विरोध नाही असे मी म्हणाले आणि मी ते स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न करू लागले. ते चिडून म्हणाले की मी तू स्पष्ट करून सांगण्याचा प्रयत्न केला पण मला त्यात तुला यश आले नाही. . . . . ते उत्तेजित होत असल्याचे माझ्या लक्षात आले. त्यामुळे मी तिथून निघून आले.. . . तितक्यातच ते कपाळावर थापडा मारून घेत असल्याचे मला ऐकू आले. मी धावत गेले आणि त्यांना थांबवले. . . .

मी काल अगदी घाबरून गेले होते. ... बापूंनी मला गीतेकरिता बोलावले होते. . . . . आज त्यांनी परत ती गोष्ट काढली परंतु मी स्वतःवर अजून ताबा मिळवू शकले नव्हते.

'माय डेज विथ गांधी', पृष्ठ ११९-२०

खंड 94

परिशिष्ट २

२१. डॉ. सुशीला नायर आणि अरुणा आसफ अली यांच्याशी गांधीजींची चर्चा

नवी दिल्ली,

जुलै ८, १९४७

ईश्वराने मला कठोर शिक्षा केली आहे. या परीक्षेपेक्षा अधिक कठीण परीक्षा मला माहीत नाही. आपण जेव्हा गुलाम होतो तेव्हा आपली नैतिकता किती उच्च दर्जाची होती. येत असलेल्या तथाकथित "अमूल्य स्वातंत्र्याच्या उंच शिखरावरून आपण खाली पडण्याच्या बेतात आहो. आता अजून काय पाहायचे राहिले आहे? एकदा बिहार मला बोलावत आहे असे वाटते तर दुसऱ्यांदा मला नोआखालीची हाक ऐकू येते जिथे काही प्रमाणात शांतता स्थापित करण्यात मला यश आले होते. एक महिन्यापूर्वी पटण्याहून मी जेव्हा इथे आलो तेव्हा एखाद्या आठवड्यात मी परत माझ्या कामावर रुजू होऊ शकेन असे मला वाटत होते. परंतु या एका महिन्याच्या दरम्यान देशात इतके काही बदल झाले आहेत की एका पिढीतही इतके बदल एखाद्या कुटुंबाला पाहायला मिळू नये. मी दिल्लीत कुजत आहे. ते काहीही असले तरी मी नोआखाली आणि बिहारचे काम सोडलेले नाही. पंजाबमध्ये जाण्याचीही मला तीव्र इच्छा आहे. परंतु कुठे जायचे हे मी ठरवू शकत नाही. अशा मनःस्थितीत असल्यामुळे मी एका विचारवंताच्या म्हणण्याचे अनुसरण करत आहे. तो म्हणतो की तुम्हांला जर तुमचा मार्ग दिसत नसेल तर तुम्ही जिथे आहा तिथेच राहणे उत्तम. म्हणून मी इथे आहे. मी काही तरी सिद्धीस नेले पाहिजे अथवा त्या प्रयत्नात मरण तरी पत्करले पाहिजे. मी जेव्हा या दोन ठिकाणातून एका ठिकाणी पोहोचेन तेव्हाच मी काही तरी नवीन विचार करेन. तिसरा मार्ग नाही. या क्षणी आश्रमवासियांना कोणताही सल्ला देण्याची क्षमता माझ्यात आहे असे मला वाटत नाही. या सर्व वर्षात मी त्यांना बरेच काही सांगितले आहे आणि बरेच काम करायला लावले आहे. आता त्यांच्यातील प्रत्येकाने जे

योग्य वाटेल ते केले पाहिजे. अखेरीस प्रत्येक सेवेला समान मूल्य असते. डोके शरीरात सर्वात उंचावर असते आणि त्याला बरेच महत्त्वही आहे. परंतु पायाचे तळवे अगदी खाली असतात आणि मातीला स्पर्श करत असतात. यामुळे त्यांची किंमत मुळीच कमी नाही. पायाला जर काटा रुतला तर माणूस चालायला असमर्थ ठरतो आणि त्याला किती वेदना होतात! अशाच प्रकारे ज्यांनी स्वतःला सेवेला वाहून घेतले आहे ते आपल्या क्षमतेप्रमाणे आणि आवडीप्रमाणे कोणत्याही प्रकारे सेवा करू शकतात. माझ्याकरिता प्रत्येक प्रकारची सेवा मूल्यवान आहे.

गुजरातीवरून. 'बिहार पछी दिल्ली', पृष्ठ २९४-५

* * * * *